म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३३६२
REFBK-0026052

संदर्भ
निबंध

23 JAN 1991 16 JAN 1991

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे
वर्गणी भरावी लागले.

MAR 1990
5 MAY 1990
9 MAY 1990
3 JUN 1990
JUN 1990
27 JUN 1990
JUN 1990

11 JUL 1990
18 JUL 1990
5 SEP 1990
5 SEP 1990
8 SEP 1990
22 SEP 1990
26 SEP 1990
10 JAN 1991
21 FEB 1998

( क्र. मा. पहा )
१००००–११–८९

27 MAY 1998

# धार्मिक

अनिल अवचट

REFBK-0026052

मजेस्टिक प्रकाशन

धार्मिक
प्रथम आवृत्ती :
ऑक्टोबर, १९८९

©
अनिल अवचट

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६ प्रसाद चेंबर्स,
मुंबई ४०० ००४.

मुद्रक :
रवींद्र केशव कोठावळे
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०.

मुखपृष्ठ व आतील चित्रे :
सुभाष अवचट

मूल्य : ५० रुपये

चिंध्या पांघरून
लोकशिक्षण करीत
अंतर्बाह्य साधं जीवन जगणार
गाडगेबाबा
या थोर आस्तिकास

आणि

जन्मभर ज्ञानव्रत घेऊन
युद्धाविरुद्ध धैर्याने
एकाकी आवाज उठवणार
बर्ट्रांड रसेल
या थोर नास्तिकास

बुवाबाई

ओरखसल्ल्याची

उरुस

देवदासी-

एक मागोवा

झपाटलेलं

गाणगापूर

बुवा बाधामाई

इतस्ततः



बसू नका. समोरच्या खोलीत बसा.' मी म्हटलं, 'मग नीट दिसणार नाही.' स्वयंसेवक म्हणाला, 'साहेब, जागृती घेतल्याशिवाय माताजींच्या जवळ बसू नका. तुमच्या हिताचं तेच सांगतो, फार त्रास होईल. सध्या माताजींच्या शरीरातून फार व्हायब्रेशन्स बाहेर पडत असतात, म्हणून सांगतो.'

मी समोरच्या खोलीत गेलो. तिथून चौकात उघडणाऱ्या दारात बसलो. चौकात बसण्यापेक्षा उलट इथूनच जास्त चांगलं दिसत होतं.

समोर एका बाजूला पुरुष व दुसरीकडे स्त्रिया होत्या. बहुतेक सगळे बहुजनसमाजातले दिसत होते. ब्राह्मणी चेहरे फारच कमी. कामगारवर्ग दिसत होता. नवनाथपंथी, दत्त परंपरेतले, अंगात येणारे, अशा तऱ्हेच्या लोकांचे असतात तसे चेहरे होते. कुणी दोन भुवयांत शेंदूर लावलेला, तर कुणी उभे गंध. एका बाजूला मधोमध एक सोफा ठेवला होता. त्यावर अबोली रंगाची रेशमी शाल पसरली होती. मागे एक सोफा ठेवला होता. त्यावर एक बॅनर लावलं होतं. 'सहजयोगी निर्मलामाताजी नमो नमः' अशी अक्षरं त्यावर होती. खाली स्वस्तिक, अशोक चक्र, चांदतारा आणि क्रॉस अशी चिन्हेही काढली होती.

सोफ्यासमोर विटांचे दोनतीन थर मांडून छोटे चौकोनी यज्ञकुंड तयार केलेले होते. त्याभोवती थोडी जागा मोकळी.

चौकाच्या भिंतीलगत चहूबाजूंनी खुर्च्यांची एक रांग मांडली होती. फॉरिनर्स आत आले. पस्तिशीतले टक्कल पडलेले पेटकर लगबगीनं पुढं होऊन म्हणाले, 'ऑल फॉरिनर्स– यू सीट ऑन दि चेअर्स!' त्यातली पुढची एकदोन माणसं इंग्रजीत म्हणाली, 'आम्ही बसतो खाली.' पण पेटकर खास इंग्रजीत म्हणाले, 'नो नो. यू मस्ट सीट हियर, नॉट देअर.' मस्ट म्हणाल्यावर चुळबुळत सगळेजण खुर्च्यांमधून बसू लागले.

पेटकर हे कमिशनर ऑफिसमध्ये नोकरीस आहेत. हे प्रमुख कार्यकर्ते. पुण्याच्या सेंटरची तशी प्रमुख व्यक्ती म्हणजे राजाभाऊ राजवाडे. राजवाडे कार्यालयाचे मालक. माताजींसाठी सोफा ठेवला होता, त्यामागे दार होतं. तिथंच ते राह... दारातच खुर्ची टाकून हाताची घडी करून कृतकृत्य चेहऱ्याने बसले होते. कपा...र लाल कुंकवाचा ठिपका.

प्रेक्षकांत बरेचजण हाताचे पंजे पुढे पसरून बसले होते. काहीजण हाताची बोटं जुळवून तो हात एका खांद्यावरून, डोक्यावरून दुसऱ्या खांद्यापर्यंत अर्धवर्तुळाकार नेत होते आणि परत त्या खांद्यापर्यंत नेत होते. शेजारच्यास विचारलं, हे काय कर...तात? तो म्हणाला, याला 'बंधन' म्हणतात. डोक्यातून कुंडलिनी शक्ती वर जाते. त... बाधा जाऊ नये म्हणून हे बंधन घालायचं असतं.

'आणि ते हात का पसरलेत?'



संग्रहालय ठाणे
३३६२
६०५२
निबंध
२।३।८०

बसू नका. समोरच्या खोलीत बसा. ' मी म्हटलं, ' मग नीट दिसणार नाही. ' स्वयंसेवक म्हणाला, ' साहेब, जागृती घेतल्याशिवाय माताजींच्या जवळ बसू नका. तुमच्या हिताचं तेच सांगतो, फार त्रास होईल. सध्या माताजींच्या शरीरातून फार व्हायब्रेशन्स बाहेर पडत असतात, म्हणून सांगतो. '

मी समोरच्या खोलीत गेलो. तिथून चौकात उघडणाऱ्या दारात बसलो. चौकात बसण्यापेक्षा उलट इथूनच जास्त चांगलं दिसत होतं.

समोर एका बाजूला पुरुष व दुसरीकडे स्त्रिया होत्या. बहुतेक सगळे बहुजनसमाजातले दिसत होते. ब्राह्मणी चेहरे फारच कमी. कामगारवर्ग दिसत होता. नवनाथपंथी, दत्त परंपरेतले, अंगात येणारे, अशा तऱ्हेच्या लोकांचे असतात तसे चेहरे होते. कुणी दोन भुवयांत शेंदूर लावलेला, तर कुणी उभे गंध. एका बाजूला मधोमध एक सोफा ठेवला होता. त्यावर अबोली रंगाची रेशमी शाल पसरली होती. मागे एक सोफा ठेवला होता. त्यावर एक बॅनर लावलं होतं. ' सहजयोगी निर्मलामाताजी नमो नमः ' अशी अक्षरं त्यावर होती. खाली स्वस्तिक, अशोक चक्र, चांदतारा आणि क्रॉस अशी चिन्हेही काढली होती.

सोफ्यासमोर विटांचे दोनतीन थर मांडून छोटे चौकोनी यज्ञकुंड तयार केलेले होते. त्याभोवती थोडी जागा मोकळी.

चौकाच्या भिंतीलगत चहूबाजूंनी खुर्च्यांची एक रांग मांडली होती. फॉरिनर्स आत आले. पस्तिशीतले टक्कल पडलेले पेठकर लगबगीनं पुढं होऊन म्हणाले, ' ऑल फॉरिनर्स– यू सीट ऑन दि चेअर्स ! ' त्यातली पुढची एकदोन माणसं इंग्रजीत म्हणाली, ' आम्ही बसतो खाली. ' पण पेठकर खास इंग्रजीत म्हणाले, ' नो नो. यू मस्ट सीट हियर, नॉट देअर. ' मस्ट म्हणाल्यावर चुळबुळत सगळेजण खुर्च्यांमधून बसू लागले.

पेठकर हे कमिशनर ऑफिसमध्ये नोकरीस आहेत. हे प्रमुख कार्यकर्ते. पुण्याच्या सेंटरची तशी प्रमुख व्यक्ती म्हणजे राजाभाऊ राजवाडे. राजवाडे कार्यालयाचे मालक. माताजींसाठी सोफा ठेवला होता, त्यामागे दार होतं. तिथंच ते राहतात. दारातच खुर्ची टाकून हाताची घडी करून कृतकृत्य चेहऱ्याने बसले होते. कपाळावर लाल कुंकवाचा ठिपका.

प्रेक्षकांत बरेचजण हाताचे पंजे पुढे पसरून बसले होते. काहीजण हाताची बोटं जुळवून तो हात एका खांद्यावरून, डोक्यावरून दुसऱ्या खांद्यापर्यंत अर्धवर्तुळाकार नेत होते आणि परत त्या खांद्यापर्यंत नेत होते. शेजारच्यास विचारलं, हे काय करतात ? तो म्हणाला, याला ' बंधन ' म्हणतात. डोक्यातून कुंडलिनी शक्ती वर जाते. ती वाया जाऊ नये म्हणून हे बंधन घालायचं असतं.

' आणि ते हात का पसरलेत ? '

' ते माताजींकडून व्हायब्रेशन शरीरात येण्यासाठी. '

' माताजींना यायला वेळ आहे का ? '

तो म्हणाला, ' माताजी तुळशीबागेतल्या राममंदिरात गेल्या आहेत. मी तिथनंच पुढं आलो. खाली जागा नाही म्हणून इथं बसलो. काय शक्ती आहे माताजींमध्ये ! फॉरिनर्सना खरेदी करायची होती तुळशीबागेत. माताजींची मुलंच ती. घेऊन गेल्या त्यांना तुळशीबागेत. तिथं राममंदिरात गेल्या. म्हणाल्या, ' रामाला बाधा झालीय. '

' कसली बाधा ? '

' भूतबाधा हो. कुठल्याही जातीजमातीची, पापं करणारी माणसं देवळात जातात, देवाला शिवतात, त्यामुळं बाधा होते. माताजी रामासमोर उभ्या राहिल्या. डोळे रोखले. हातानं नुसतं काही फेकल्यासारखं केलं. रामाची भूतबाधा पार पळाली. '

' पण ती बाधा गेल्याचं कसं समजलं ? '

' ते लगेच समजलं. आम्ही कुठल्याही वास्तूत गेलो की तिथली व्हायब्रेशन्स समजतात. तुम्हीही यायला लागा, तुम्हांलाही समजतील. '

लोकांत अचानक हालचाल सुरू झाली. पेठकर गडबडीनं आत आले व म्हणाले, ' माताजी आल्या आहेत. ही वाट मोकळी करा. दोन्ही हात पसरून आपण नेहमी उभे राहतो तसे उभे राहा. कोणीही माताजींना स्पर्श करू नका. स्पर्श केला आणि कुणाला त्याचा त्रास झाला तर आम्ही जबाबदार नाही ! '

लोक उभे राहिले. मधे वाट सोडली होती. तिकडे तोंड करून हात पसरून सगळे उभे होते. तेवढ्यात माताजी आल्या. एक पंचेचाळीस, पन्नाशीची, जाडजूड, बुटकी बाई होती. माताजींनी लालभडक, जरीच्या बुट्ट्यांची सहावारी साडी नेसली होती. त्यावर लाल भरजरी शाल पांघरली होती. केस पाठीवर मोकळे सोडले होते. कपाळावर लालभडक मोठे कुंकू होते. चेहरा गोरा होता. मान खालून सुटलेली. नाकपुड्या फुगीर. डोळे उग्रट. दातांमध्ये पुढेच मोठी फट. भुवया काळ्या रंगाने कोरलेल्या. ओठाला लिपस्टिक. हातात अनेक अंगठ्या. गळ्यात भरपूर दागिने. हिंदी सिनेमातल्या जमीनदाराची बायकोच वाटावी असा एकूण थाट !

' निर्मलामाता की जय ' अशा घोषणा झाल्या. माताजींनी ओठ रुंद करून दातांमधली फट दाखवीत स्मित केलं आणि कोचावर जाऊन बसल्या. खांद्यावरची शाल मागे कोचावर पडली तसे पेठकर पुढे झाले आणि ती शाल काळजीपूर्वक उचलून परत खांद्यावर ठेवली. बाईंनी डोके हलवून केसांना दोनतीनदा हिसका दिला. परत एकदा लोकांना हास्य दिलं. लोकांनी व्हायब्रेशन्स बाहेर जाऊ नयेत म्हणून जोरजोराने ' बंधन ' घालणे सुरू केले.

माताजी कोणाकोणाकडे बघून स्मित करीत होत्या. मधूनच चेहरा गंभीर करायच्या. डोळे वटारल्यासारखे करून कुठेतरी बघत राहायच्या. त्या वेळी दोन्ही

मी चकितच झालो. त्याच्या पुढे दुसरे नाव आले–

' ॐ त्वमेव साक्षात जीझस मेरी निर्मलादेवी नमो नमः '

पण लोकांना आश्चर्य वाटत नव्हते. ते पैंच्या मागून मोठ्या उत्साहाने ती नावे म्हणतच होते. माताजींच्या वर्णनपर नावे बरीच होती. ' विशालाक्षी ', ' सुंदर ', ' लहान कंबरेची ', ' भव्य कपाळाची ' वगैरे. हे वर्णन माताजींना लागू पडते की नाही ते कुणी पाहात नव्हते.

तूप जळल्याचा कुबट वास आणि धूर सर्वत्र पसरत होता. स्थली दांपत्ये फॉरिनर्सना कसा हविर्भाग घालायचा ते शिकवत होती. धुराने फॉरिनर्सची पार माकडे झाली होती. रुमालावर नाक साफ करून करून, डोळे पुसून पुसून ते बेजार झाले होते.

माझ्या मागे रोंऽऽरोंऽऽरोंऽऽ असा बराच वेळ आवाज येत होता. मी मागे पाहिले तर आठनऊ वर्षांच्या छोट्या मुलीच्या मांडीवर एक मतिमंद मूल तसला आवाज करीत होते. तिची आई पुढे माताजी दिसतील अशा बेताने बसली होती. हात पसरून व्हायब्रेशन्स घेऊन जरा वेळाने मुलाच्या डोक्यावर हात ठेवीत होती.

माताजी डोळे मिटून बसल्या होत्या. क्षणभर डोळे उघडून पेठकरांना त्यांनी खुणेने जवळ बोलावले. पेठकरांना त्यांनी कानात सांगितले. पेठकरांनी त्यांच्या दंडाला एक हात लावला आणि दुसरा हात यज्ञकुंडाकडे करून, पुढे झुकून, अवघडल्या पोजमध्ये उभे राहिले. काही वेळाने तो पेठकरांचा हात माताजींनी उचलून दंडावर ठेवला. देशपांड्यांना बोलावून त्यांना दुसऱ्या खांद्यावर हात देऊन तशाच पोजमध्ये उभे केले. आणखी एकास बोलाविले. त्याला पाठीच्या खालच्या बाजूस हात ठेवायला सांगितले. एकाला खाली उकिडवे बसून मांडीत हात घालून बसायला लावले. एका बाईला डोक्यावर हात ठेवून उभे राहायला सांगितले. तर एकास बोलावून पदर जरा बाजूस करून पोटावर हात ठेवून तसे बसायला सांगितले. अशी पाचदहा माणसे माताजींच्या शरीरावर कुठे ना कुठे हात ठेवून यज्ञाकडे दुसरा हात पसरून उभी होती. मोठं थिएट्रिकल दृश्य होते !

मी शेजाऱ्यास विचारले, ' असं का करताहेत त्या ? ' तो म्हणाला, ' त्यांच्या अंगात खूप व्हायब्रेशन्स तयार होत आहेत. ती इकडे तिकडे वाया जाऊ नयेत म्हणून ती यज्ञकुंडाकडे आता सोडत आहेत. तिथून ती आपल्याला मिळू शकतील. '

मला अनेक हातांच्या खेकड्यासारखे ते दृश्य दिसत होते. पण माझ्या शेजाऱ्यास हे दृश्य अनेक हातांच्या जगदंबेसारखे वाटत असणार.

मागे रोंऽऽ रोंऽऽ चाललेलेच होते.

पैंची सहस्रनामे संपतच नव्हती. पै नावे घेत होते, लोक मोठ्याने ' स्वाहा ' म्हणत होते. शेवटी नावे संपली.

पेठकरांनी एक उत्स्फूर्तपणे आयडिया काढली.

' पुणे सहजयोग केंद्राच्या सर्व बाधा......'

लोक आनंदाने ' स्वाहा ' म्हणाले.

' आकुर्डी केंद्राच्या सर्व बाधा...'

' स्वाहा. '

मग केंद्राची मालिकाच सुरू झाली. भारत देशाच्याही सर्व बाधा स्वाहा करून टाकल्या. मग लंडन केंद्र, सिडने केंद्र अशी परदेशी केंद्रे सुरू झाली. माताजी मधेच डोळे उघडून सांगत, ' इजिप्त. ' की मग पेठकर इजिप्त केंद्राच्या बाधा स्वाहा करीत. माताजी पुढे सांगत, सीरिया, इराक, इराण. तसतशा बाधा ' स्वाहा ' होत.

माताजींनी पुणे केंद्राला एक इंपोर्टेड कॅसेट रेकॉर्डर भेट दिला. राजवाड्यांनी तो स्वीकारला. माताजी म्हणाल्या, ' प्रत्येक केंद्राला आता रेकॉर्डर देऊन झाला आहे. माताजींच्या भाषणाच्या कॅसेट आता नियमित ऐकता येतील. ' माताजींची आरती सुरू झाली.

माताजी डोळे मिटून हाताच्या आशीर्वाद देताना करतात तशा मुद्रा करून बसल्या. हातावर लाल रंगातली चिन्हे. समोर धूर. हिरवीगार साडी, त्यावर लाल शेला. कपाळावर लाल मळवट. केस सोडलेले. डोळे मिटलेले. मुद्रा उग्र. खालून वर येणाऱ्या धुरामुळे सर्वच दृश्य धूसर. सर्व लोक अनिमिष नेत्रांनी हे दृश्य पाहात राहिले होते.

आरतीमध्ये निर्मला माताजींचे गुणगान होते. ' येशू, मेरी, पैगंबर, सरस्वती, हनुमंत, शिव हे तुझे गुण गात गात तुझ्याभोवती रंगले आहेत, तू या सर्वांना वेड लावले आहेस, ' अशा अर्थाच्या ओळी होत्या.

सगळ्यांनी हात पसरून ' जगदंब... जगदंब... जगदंब ' असा घोष सुरू केला. नंतर आकाशाकडे हात वर करून ' अल्ला... हो अकबर... अल्ला...हो अकबर ' असे म्हणायला सुरुवात केली. मराठमोळ्या वेशातली मंडळी, ब्राह्मण बाया ' अल्ला हो अकबर ' म्हणताना पाहून फारच गंमत वाटली. शेवटी बायबलमधले इंग्रजी वचन म्हणायला सुरुवात केली. ' अवर फादर हू इज इन हेवन. ' आणि शेवटी सगळ्यांनी मिळून ' आमेन ' चा घोष केला तेव्हा; तर सर्वांवर कडीच झाली !

आरती संपली.

आता माताजींचे जेवण.

कोचासमोरच स्टुलावर ताट मांडले.

माताजींनी थोडे पदार्थ खाल्ले. त्यांचे संपल्यावर ती उरलेली बटाट्याची भाजी व इतर काही काही एकाच पातेल्यात एकत्र केली गेली. आणि तिकडूनच चमच्याने तो प्रसाद वाटायला सुरुवात झाली. दुसऱ्या एका पातेल्यात माताजींनी हात धुतले.

माताजी खाली उतरल्या होत्या.

स्टेजवर ती वीसपंचवीस माणसे बसली होती. एकेकाजवळ एकेक फॉरिनर उभा राहून त्याला ट्रीटमेंट देत होता. त्याच्या डोक्यावरून मालिश केल्यासारखे हात हवेत फिरवीत होता. मधूनच डोक्यावर कसली तरी गाठ मारावी अशी ॲक्शन करत होता. कुणी बसलेल्या माणसाच्या पाठीच्या मणक्याजवळ अंगठा हवेतूनच वर वर अजून शेवटी झटका मारीत होता. गोरे गोरे फॉरिनर्स काळ्या माणसांची न्हावी करतो तशी सेवा करताना पाहून गंमत वाटत होती. त्यांचा इतका उत्साह ओसंडत होता की सगळे स्टेज ॲक्शन-पॅक्ड झाले होते.

माताजी तीनचार भक्तांसह खुर्च्यांच्या रांगेतून फिरत एकेका माणसापुढे येत होत्या. माझ्या शेजारच्या प्रौढ माणसापुढे आल्या. त्यांनी त्याला खणखणीत आवाजात विचारले, ‘ कसला त्रास आहे ? ’ तो माणूस रडवेल्या सुरात मानेवर हात ठेवून म्हणाला, ‘ स्पाँडिलोसिसचा त्रास आहे. इथं दुखतं.’ माताजी हसल्या. म्हणाल्या, ‘ एवढंच ना ? ’ असं म्हणून मानेवर चारपाच सेकंद हात ठेवला. काढून म्हणाल्या, ‘ काय, कसं वाटतं ? बरा झाला ना स्पाँडिलोसिस ? ’

तोही मान हलवून म्हणाला, ‘ हो, बरा झाला. ’

त्यावर माताजी हाः हाः करून हसल्या. भक्तांचे चेहरे अधिकच ओथंबले. माझ्या समोर आल्या. ‘ काय आला का अनुभव ? ’

‘ नाही. ’

‘ नाही ? आत्ता आणते,’ म्हणून माझ्या डोक्यावर हात ठेवला.

‘ काय येतोय का ? ’ मी ‘ नाही ’ म्हणताच परत पुटपुटू लागल्या.

‘ हात गार पडतात ना ? अंगात मुंग्या सुरू झाल्या असतील ! ’

मी ‘ नाही ’ म्हणत चालल्लो. तसे बाजूचे भक्त मी काही तरी अपराध करीत आहे अशा नजरेने बघू लागले. शेवटी माताजी कंटाळल्या. माझ्या डोक्यावर हात मारीत म्हणाल्या, ‘ हे फार स्ट्राँग आहे. ’ स्वतःच्या छातीवर हात ठेवून म्हणाल्या, ‘ हे स्ट्राँग पाहिजे. ’

माताजी पुढे सरकल्या, तसा शेजारचा स्पाँडिलोसिसवाला परत आडवा जाऊन उभा राहिला. माताजी म्हणाल्या, ‘ आता काय तुमचं ? ’

‘ मघा अल्सरचं सांगायचं राहिलं. ’

जरा आणखी मोठ्या आवाजात त्या म्हणाल्या, ‘ होईल बरा. मी सगळ्यांची आई आहे ना ? मी करीन बरा तुझा अल्सर. मला काळजी आहे सगळ्यांची. ’

तो खूष होऊन नमस्कार करीत बाजूला झाला.

एक माने नावाचे ओळखीचे गृहस्थ भेटले. ते म्हणाले, ‘ माताजी डायबेटिस बरा करतात. कॅन्सरही बरा केलेला आहे.’

पेठकरांनी एक उत्स्फूर्तपणे आयडिया काढली.
' पुणे सहजयोग केंद्राच्या सर्व बाधा……'
लोक आनंदाने ' स्वाहा ' म्हणाले.
' आकुर्डी केंद्राच्या सर्व बाधा…'
' स्वाहा. '

मग केंद्राची मालिकाच सुरू झाली. भारत देशाच्याही सर्व बाधा स्वाहा करून टाकल्या. मग लंडन केंद्र, सिडने केंद्र अशी परदेशी केंद्रे सुरू झाली. माताजी मधेच डोळे उघडून सांगत, ' इजिप्त. ' की मग पेठकर इजिप्त केंद्राच्या बाधा स्वाहा करीत. माताजी पुढे सांगत, सीरिया, इराक, इराण. तसतशा बाधा ' स्वाहा ' होत.

माताजींनी पुणे केंद्राला एक इंपोर्टेड कॅसेट रेकॉर्डर भेट दिला. राजवाड्यांनी तो स्वीकारला. माताजी म्हणाल्या, ' प्रत्येक केंद्राला आता रेकॉर्डर देऊन झाला आहे. माताजींच्या भाषणाच्या कॅसेट आता नियमित ऐकता येतील. ' माताजींची आरती सुरू झाली.

माताजी डोळे मिटून हाताच्या आशीर्वाद देताना करतात तशा मुद्रा करून बसल्या. हातावर लाल रंगातली चिन्हे. समोर धूर. हिरवीगार साडी, त्यावर लाल शेला. कपाळावर लाल मळवट. केस सोडलेले. डोळे मिटलेले. मुद्रा उग्र. खालून वर येणाऱ्या धुरामुळे सर्वच दृश्य धूसर. सर्व लोक अनिमिष नेत्रांनी हे दृश्य पाहात राहिले होते.

आरतीमध्ये निर्मला माताजींचे गुणगान होते. ' येशू, मेरी, पैगंबर, सरस्वती, हनुमंत, शिव हे तुझे गुण गात गात तुझ्याभोवती रंगले आहेत, तू या सर्वांना वेड लावले आहेस, ' अशा अर्थाच्या ओळी होत्या.

सगळ्यांनी हात पसरून ' जगदंब… जगदंब…. जगदंब ' असा घोष सुरू केला. नंतर आकाशाकडे हात वर करून ' अल्ला… हो अकबर… अल्ला…हो अकबर ' असे म्हणायला सुरुवात केली. मराठमोळ्या वेशातली मंडळी, ब्राह्मण बाया ' अल्ला हो अकबर ' म्हणताना पाहून फारच गंमत वाटली. शेवटी बायबलमधले इंग्रजी वचन म्हणायला सुरुवात केली. ' अवर फादर हू इज इन हेवन. ' आणि शेवटी सगळ्यांनी मिळून ' आमेन ' चा घोष केला तेव्हा; तर सर्वांवर कडीच झाली !

आरती संपली.
आता माताजींचे जेवण.
कोचासमोरच स्टुलावर ताट मांडले.

माताजींनी थोडे पदार्थ खाल्ले. त्यांचे संपल्यावर ती उरलेली बटाट्याची भाजी व इतर काही काही एकाच पातेल्यात एकत्र केली गेली. आणि तिकडूनच चमच्याने तो प्रसाद वाटायला सुरुवात झाली. दुसऱ्या एका पातेल्यात माताजींनी हात धुतले.

माताजी खाली उतरल्या होत्या.

स्टेजवर ती वीसपंचवीस माणसे बसली होती. एकेकाजवळ एकेक फॉरिनर उभा राहून त्याला ट्रीटमेंट देत होता. त्याच्या डोक्यावरून मालिश केल्यासारखे हात हवेत फिरवीत होता. मधूनच डोक्यावर कसली तरी गाठ मारावी अशी ॲक्शन करत होता. कुणी बसलेल्या माणसाच्या पाठीच्या मणक्याजवळ अंगठा हवेतूनच वर वर अजून शेवटी झटका मारीत होता. गोरे गोरे फॉरिनर्स काळ्या माणसांची न्हावी करतो तशी सेवा करताना पाहून गंमत वाटत होती. त्यांचा इतका उत्साह ओसंडत होता की सगळे स्टेज ॲक्शन-पॅक्ड झाले होते.

माताजी तीनचार भक्तांसह खुर्च्यांच्या रांगेतून फिरत एकेका माणसापुढे येत होत्या. माझ्या शेजारच्या प्रौढ माणसापुढे आल्या. त्यांनी त्याला खणखणीत आवाजात विचारले, ‘ कसला त्रास आहे ? ’ तो माणूस रडवेल्या सुरात मानेवर हात ठेवून म्हणाला, ‘ स्पाँडिलोसिसचा त्रास आहे. इथं दुखतं.’ माताजी हसल्या. म्हणाल्या, ‘ एवढंच ना ? ’ असं म्हणून मानेवर चारपाच सेकंद हात ठेवला. काढून म्हणाल्या, ‘ काय, कसं वाटतं ? बरा झाला ना स्पाँडिलोसिस ? ’

तोही मान हलवून म्हणाला, ‘ हो, बरा झाला. ’

त्यावर माताजी हाः हाः करून हसल्या. भक्तांचे चेहरे अधिकच ओथंबले. माझ्या समोर आल्या. ‘ काय आला का अनुभव ? ’

‘ नाही. ’

‘ नाही ? आत्ता आणते,’ म्हणून माझ्या डोक्यावर हात ठेवला.

‘ काय येतोय का ? ’ मी ‘ नाही ’ म्हणताच परत पुटपुटू लागल्या.

‘ हात गार पडतात ना ? अंगात मुंग्या सुरू झाल्या असतील ? ’

मी ‘ नाही ’ म्हणत चाललो. तसे बाजूचे भक्त मी काही तरी अपराध करीत आहे अशा नजरेने बघू लागले. शेवटी माताजी कंटाळल्या. माझ्या डोक्यावर हात मारीत म्हणाल्या, ‘ हे फार स्ट्राँग आहे. ’ स्वतःच्या छातीवर हात ठेवून म्हणाल्या, ‘ हे स्ट्राँग पाहिजे. ’

माताजी पुढे सरकल्या, तसा शेजारचा स्पाँडिलोसिसवाला परत आडवा जाऊन उभा राहिला. माताजी म्हणाल्या, ‘ आता काय तुमचं ? ’

‘ मघा अल्सरचं सांगायचं राहिलं. ’

जरा आणखी मोठ्या आवाजात त्या म्हणाल्या, ‘ होईल बरा. मी सगळ्यांची आई आहे ना ? मी करीन बरा तुझा अल्सर. मला काळजी आहे सगळ्यांची. ’

तो खूष होऊन नमस्कार करीत बाजूला झाला.

एक माने नावाचे ओळखीचे गृहस्थ भेटले. ते म्हणाले, ‘ माताजी डायबेटिस बरा करतात. कॅन्सरही बरा केलेला आहे. ’

माझे डोके गरगरू लागले. मनात आलं, हीच ती व्हायब्रेशन्स दिसताहेत. जवळच्या हॉटेलात जाऊन दोन कप चहा प्यालो तेव्हा ती व्हायब्रेशन्स थांबली.

एकेकाळी माताजींच्या निकट असलेल्या व नंतर दुरावलेल्या डॉ. पी. व्ही. वर्तकांकडे गेलो. शनिवार पेठेत त्यांच्या दवाखान्यात भेटलो. पंचेचाळीस पन्नाशीचे चष्मा लावणारे हे गृहस्थ आहेत. ते म्हणाले, 'माताजींपासून दुरावण्याचं कारण, त्या काहीही सांगू लागल्या, न टिकणारे दावे करू लागल्या. मी एक डॉक्टर आहे. मला ते कसं पटणार ?'

'कुठले दावे ?'

'सगळे रोग बाई बरे करते. डायबेटिस बरा करते, कॅन्सर बरा -करते म्हणे. ते राजाभाऊ राजवाडे आहेत ना, त्यांना डायबेटिस आहे. माझ्याकडे ट्रीटमेंट घेत होते. या बाईच्या नादानं त्यांनी ट्रीटमेंट सोडून दिली. सगळं गोड खायला लागले. मी म्हटलं, असं करू नका. पण ऐकलं नाही. काही महिन्यांनी मांडी दुखतीय म्हणत आले. बघितलं तर ॲब्सेस. डायबेटिस चेक केला. शुगर शूट झाली होती. म्हटलं, मेला असता अशानं, मग स्ट्राँग ॲंटिबायॉटिक सुरू केली. तरी बरं व्हायला महिना लागला.'

'कॅन्सरचं काय ?'

'अहो, एकदा लिव्हर कॅन्सरचा पेशंट आला. पोटावरनं लंप दिसतच होता. मी मुद्दाम आधी माप घेऊन ठेवलं. बाई आल्या. त्यांनी पेशंटला जमिनीवर झोपवलं. लंपवर पाय दिला. मंत्र म्हटले. मला म्हणाल्या, डॉक्टर बघा, कुठे गेला कॅन्सर ! मी म्हटलं, पाय ठेवलाय म्हणून तो आत गेला. पाय काढा; मग बघू. पाय काढला की लंप पूर्ववत.'

जरा थांबून ते म्हणाले, 'नुसतं हेच नाही. काहीही बोलते. ख्रिस्त, झरतुष्ट्र आणि नंतर हीच. मध्ये कोणीच नाही. आपल्या ज्ञानेश्वर, तुकाराम यांना तर भूतबाधाच झाली असे ती म्हणते. आता लोकांचा विरोध होतो म्हणून भाषा जरा बदलली आहे. पण खासगीत तेच. एकदा आम्ही चारसहा जण ध्यानाला बसलो. हिनं कल्पना काढली, जेरुसलेम असं म्हणायचं म्हणजे कशी व्हायब्रेशन्स येतात ते बघा. मग मदिना म्हणून बघा. तसं लोकांनी म्हटलं, त्यांना व्हायब्रेशन्स आली. मी मुद्दाम म्हटलं आळंदी म्हणून पाहू या. त्यानंही लोकांना व्हायब्रेशन्स आली. मी म्हटलं, ज्ञानेश्वरांना जर भूतबाधा झाली होती तर मग व्हायब्रेशन्स कशी आली ! त्यावर त्या म्हणाल्या, मी आताच त्यांची भूतबाधा काढून टाकली आहे. म्हणजे हिनं संतांची भूतबाधा हजार वर्षांनंतर काढली.'

ठेवून लहरी सोडाव्यात, सांधेदुखीबाबत चैतन्यलहरीयुक्त तेल लावावे, मधुमेहाच्या रोग्यास चैतन्यलहरीयुक्त पाणी नेहमी प्यायला द्यावे, त्वचेच्या रोग्यास लहरीयुक्त तेल लावावे, अशा अनेक रोगांवर उपाय सांगितले आहेत. शेवटी कॅन्सरबाबत म्हटले आहे, ' हा रोग इडा-पिंगला शक्ती जास्त वापरल्याने होतो. तेव्हा कुंडलिनी जागृत करून पिंगला शिथिल करावी, जिथं कर्करोगाचा भास असेल तिथं चैतन्य लहरी सोडाव्यात. '

सहजयोग्यांसाठी सूचनाही भरपूर दिल्या आहेत.

माताजींच्या फोटोतून चैतन्यलहरींचा स्रोत वाहत असल्याने दररोज फोटो पाण्याने पुसत जावा, त्यास सुवासिक द्रव्य लावावे. फुलमाळा वाहाव्यात, तेलदिवा लावावा इ. सहजयोग्याने कुणाही अनधिकारी व्यक्तींकडून कुंकू, अंगारा लावून घेऊ नये. त्यास नमस्कार करू नये, त्या व्यक्तीसमोर मान झुकवू नये. त्यामुळे सहज-योग्यास त्रास होतो व आज्ञाचक्र बिघडते. सहजयोग्याने बंधने घालून आपली सर्व चक्रे स्वच्छ ठेवावीत, इत्यादी मजकूर आहे.

असे एकूण हे निर्मला माताजी प्रकरण. सध्या यांचा प्रभाव वाढत आहे. पंथ फोफावत आहे. परदेशात केंद्रे निघत आहेत. तेव्हा यातली हास्यास्पदता सोडून या प्रकाराकडे गंभीरपणे पाहायला हवे. पिढ्या-दोन पिढ्यांपूर्वीचे गुरुमहाराज आणि निर्मलामाता, रजनीश, महेश योगी यांसारखे आधुनिक गुरू यांच्यात तुलना केल्यास हे आधुनिक गुरू अधिक घातक आहेत. ते सायन्सची भाषा बोलतात. आणि त्या भाषेच्या आव-रणाखाली अशास्त्रीय गोष्टी दडपून सांगून आभास निर्माण करतात. मेंदू व मज्जा-रज्जू शेजारी सिंपॅथेटिक आणि पॅरासिंपॅथेटिक नर्व्हस सिस्टिमच्या साखळ्या आहेत. पण त्या म्हणजे इडा-पिंगला आणि त्याचे परिणाम अमुक अमुक, ही अशास्त्रीय गोष्ट आहे. आपल्या तत्त्वज्ञानात सांगितलेली चक्रे ही अनुमानवजा होती. ती शरीरशास्त्रा-वर आधारलेली नव्हती. आता त्याचा उपयोग करून हे भ्रमजाल निर्माण करण्यात येत आहे. अमक्या चक्रात येशू, तमक्यात पैगंबर असे माताजी म्हणतात. मग येशू, पैगंबरापूर्वीच्या मानव देहातल्या चक्रात कोण बसले होते? का चक्रेच नव्हती? सर्वांत उंच डोक्यावर असलेल्या सहस्र चक्रात ' निर्मलादेवी ' आहेत, असे निर्मलादेवीच म्हणतात. याला पुरावा काय? संमोहन शास्त्राने हात किंवा पाय गार पाडता येणे ही मामुली बाब आहे. तो जणू साक्षात्कार आहे असे हे भक्तलोक मानतात, त्यांची कीव येते. संमोहन केल्याने रोगी माणसांना काही काळ वेदना विसरायला लावता येतात. तेवढाच परिणाम या माताजींना साधता येत असणार. पण ' रोग बरा करते ' या दाव्यातून त्या माणसाला शास्त्रीय उपचारापासून वंचित

माझे डोके गरगरू लागले. मनात आलं, हीच ती व्हायब्रेशन्स दिसताहेत. जवळच्या हॉटेलात जाऊन दोन कप चहा प्यालो तेव्हा ती व्हायब्रेशन्स थांबली.

एकेकाळी माताजींच्या निकट असलेल्या व नंतर दुरावलेल्या डॉ. पी. व्ही. वर्तकांकडे गेलो. शनिवार पेठेत त्यांच्या दवाखान्यात भेटलो. पंचेचाळीस पन्नाशीचे चष्मा लावणारे हे गहस्थ आहेत. ते म्हणाले, 'माताजींपासून दुरावण्याचं कारण, त्या काहीही सांगू लागल्या, न टिकणारे दावे करू लागल्या. मी एक डॉक्टर आहे. मला ते कसं पटणार ?'

'कुठले दावे ?'

'सगळे रोग बाई बरे करते. डायबेटिस बरा करते, कॅन्सर बरा करते म्हणे. ते राजाभाऊ राजवाडे आहेत ना, त्यांना डायबेटिस आहे. माझ्याकडे ट्रीटमेंट घेत होते. या बाईच्या नादानं त्यांनी ट्रीटमेंट सोडून दिली. सगळं गोड खायला लागले. मी म्हटलं, असं करू नका. पण ऐकलं नाही. काही महिन्यांनी मांडी दुखतीय म्हणत आले. बघितलं तर ॲब्सेस. डायबेटिस चेक केला. शुगर शूट झाली होती. म्हटलं, मेला असता अशानं, मग स्ट्राँग ॲंटिबायॉटिक सुरू केली. तरी बरं व्हायला महिना लागला.'

'कॅन्सरचं काय ?'

'अहो, एकदा लिव्हर कॅन्सरचा पेशंट आला. पोटावरनं लंप दिसतच होता. मी मुद्दाम आधी माप घेऊन ठेवलं. बाई आल्या. त्यांनी पेशंटला जमिनीवर झोपवलं. लंपवर पाय दिला. मंत्र म्हटले. मला म्हणाल्या, डॉक्टर बघा, कुठे गेला कॅन्सर ! मी म्हटलं, पाय ठेवलाय म्हणून तो आत गेला. पाय काढा; मग बघू. पाय काढला की लंप पूर्ववत.'

जरा थांबून ते म्हणाले, 'नुसतं हेच नाही. काहीही बोलते. ख्रिस्त, झरतुष्ट्र आणि नंतर हीच. मध्ये कोणीच नाही. आपल्या ज्ञानेश्वर, तुकाराम यांना तर भूतबाधाच झाली असे ती म्हणते. आता लोकांचा विरोध होतो म्हणून भाषा जरा बदलली आहे. पण खासगीत तेच. एकदा आम्ही चारसहा जण ध्यानाला बसलो. हिनं कल्पना काढली, जेरुसलेम असं म्हणायचं म्हणजे कशी व्हायब्रेशन्स येतात ते बघा. मग मदिना म्हणून बघा. तसं लोकांनी म्हटलं, त्यांना व्हायब्रेशन्स आली. मी मुद्दाम म्हटलं आळंदी म्हणून पाहू या. त्यानंही लोकांना व्हायब्रेशन्स आली. मी म्हटलं, ज्ञानेश्वरांना जर भूतबाधा झाली होती तर मग व्हायब्रेशन्स कशी आली ! त्यावर त्या म्हणाल्या, मी आताच त्यांची भूतबाधा काढून टाकली आहे. म्हणजे हिनं संतांची भूतबाधा हजार वर्षांनंतर काढली.'

ठेवून लहरी सोडाव्यात, सांधेदुखीबाबत चैतन्यलहरीयुक्त तेल लावावे, मधुमेहाच्या रोग्यास चैतन्यलहरीयुक्त पाणी नेहमी प्यायला द्यावे, त्वचेच्या रोग्यास लहरीयुक्त तेल लावावे, अशा अनेक रोगांवर उपाय सांगितले आहेत. शेवटी कॅन्सरबाबत म्हटले आहे, 'हा रोग इडा-पिंगला शक्ती जास्त वापरल्याने होतो. तेव्हा कुंडलिनी जागृत करून पिंगला शिथिल करावी, जिथं कर्करोगाचा भास असेल तिथं चैतन्य लहरी सोडाव्यात.'

सहजयोग्यांसाठी सूचनाही भरपूर दिल्या आहेत.

माताजींच्या फोटोतून चैतन्यलहरींचा स्रोत वाहत असल्याने दररोज फोटो पाण्याने पुसत जावा, त्यास सुवासिक द्रव्य लावावे. फुलमाळा वाहाव्यात, तेलदिवा लावावा इ. सहजयोग्याने कुणाही अनधिकारी व्यक्तींकडून कुंकू, अंगारा लावून घेऊ नये. त्यास नमस्कार करू नये, त्या व्यक्तीसमोर मान झुकवू नये. त्यामुळे सहजयोग्यास त्रास होतो व आज्ञाचक्र बिघडते. सहजयोग्याने बंधने घालून आपली सर्व चक्रे स्वच्छ ठेवावीत, इत्यादी मजकूर आहे.

असे एकूण हे निर्मला माताजी प्रकरण. सध्या यांचा प्रभाव वाढत आहे. पंथ फोफावत आहे. परदेशात केंद्रे निघत आहेत. तेव्हा यातली हास्यास्पदता सोडून या प्रकाराकडे गंभीरपणे पाहायला हवे. पिढ्या-दोन पिढ्यांपूर्वीचे गुरुमहाराज आणि निर्मलामाता, रजनीश, महेश योगी यांसारखे आधुनिक गुरू यांच्यात तुलना केल्यास हे आधुनिक गुरू अधिक घातक आहेत. ते सायन्सची भाषा बोलतात. आणि त्या भाषेच्या आवरणाखाली अशास्त्रीय गोष्टी दडपून सांगून आभास निर्माण करतात. मेंदू व मज्जारज्जू शेजारी सिंपॅथॅटिक आणि पॅरासिंपॅथॅटिक नर्व्हस सिस्टिमच्या साखळ्या आहेत. पण त्या म्हणजे इडा-पिंगला आणि त्याचे परिणाम अमुक अमुक, ही अशास्त्रीय गोष्ट आहे. आपल्या तत्त्वज्ञानात सांगितलेली चक्रे ही अनुमानवजा होती. ती शरीरशास्त्रावर आधारलेली नव्हती. आता त्याचा उपयोग करून हे भ्रमजाल निर्माण करण्यात येत आहे. अमक्या चक्रात येशू, तमक्यात पैगंबर असे माताजी म्हणतात. मग येशू, पैगंबरापूर्वीच्या मानव देहातल्या चक्रात कोण बसले होते? का चक्रेच नव्हती? सर्वांत उंच डोक्यावर असलेल्या सहस्र चक्रात 'निर्मलादेवी' आहेत, असे निर्मलादेवीच म्हणतात. याला पुरावा काय? संमोहन शास्त्राने हात किंवा पाय गार पाडता येणे ही मामुली बाब आहे. तो जणू साक्षात्कार आहे असे हे भक्तलोक मानतात, त्यांची कींव येते. संमोहन केल्याने रोगी माणसांना काही काळ वेदना विसरायला लावता येतात. तेवढाच परिणाम या माताजींना साधता येत असणार. पण 'रोग बरा करते' या दाव्यातून त्या माणसाला शास्त्रीय उपचारापासून वंचित

ठेवतात. आणि याचे घातक परिणाम झाल्यास त्याला जबाबदार कोण ? अमक्या देवाची, संताची, वास्तूची बाधा मी काढली असे माताजींनी म्हणायचे आणि त्यांच्या भजनी लागलेल्यांनी ते सत्य मानायचे असा प्रकार असल्याने या वातावरणात कोणी कुणाला कसलाही पुरावाच मागत नाही. त्यामुळे तोंडाला येईल ते बोलले जाते. आणि ते सत्य मानले जाते.

निर्मलामाताजींनी आपला पंथ 'फुलप्रूफ' करायचा केलेला प्रयत्न व्यवस्थित आहे. सर्व धर्मांचे अपील घेतले आहे त्यामुळे प्रभावक्षेत्र इंटरनॅशनल झाले आहे. पण त्या त्या धर्मातल्या मूळपुरुषांपेक्षा वरचे स्थान स्वतःस घेतले आहे. आपल्या व्यतिरिक्त कोणा भक्तांनी इतर उपासना करू नये याची दक्षता घेतली आहे. इतर मार्गातले गंडे, दोरे, ताईत यांना तर बंदी आहेच. पण आपल्या फोटोसमोरच ही उपासना करावी असे मूळ सूत्र आहे. या मार्गातून होणारा प्रत्यक्ष व्यावहारिक उपयोग म्हणून रोगनिवारणाचा भ्रम निर्माण केला आहे. आपल्याला पैसा नको हे सांगण्यासाठी नवऱ्याच्या लठ्ठ पगाराचा आकडा सांगितला जातो. आपल्या शरीरातून व्हायब्रेशन्स बाहेर पडतात या नावाखाली भक्तांकडून आपल्या शरीराचे विकृत मर्दन आणि चोचले पुरवून घेतले जातात.

पूर्वीच्या गुरूंपेक्षा या गुरूंपाशी आधुनिक साधने हाताशी आहेत. त्यामुळे यांची घातकता अधिक वाढली आहे. कॅसेट्स्मार्फत आपल्या मोहमयी भाषणाचा प्रसार कितीतरी पटींनी अधिक करता येतो. रजनीशांच्या आश्रमात या आधुनिकतेचा प्रत्यय जागोजाग येतो. येताना अत्तर, सेन्ट न लावता आत यावे लागते, इथे तुम्ही त्यांची शर्त मान्य करून त्यांच्यापेक्षा एक पायरी खालचे स्थान स्वीकारूनच आत येता. झुळूझुळू बोलणे, पुनरावृत्ती, मंद पार्श्वसंगीत यांनी भूल पडते. रजनीशांचे उत्कृष्ट फोटो जिकडे तिकडे भक्तांच्या गळ्यात, पुस्तकांच्या कव्हरांवर, त्यांच्या 'संन्यास' या नियतकालिकाच्या पानापानांवर.

अलीकडच्या या गुरूमंडळींना 'सायंटिफिक' भाषेत बोलायची फार हौस. माताजी पूर्वीची चक्रे घेऊन आज ॲनॉटॉमीत दिसणारी सिंपॅथॅटिक, पॅरासिंपॅथॅटिक नर्व्हस सिस्टिम्सवर ती लादतात. पाठीच्या कण्याच्या खाली सॅक्रल प्लेक्सस असते. मज्जारज्जूचे पायथ्याकडे जाणारे मज्जातंतू त्यात असतात. शास्त्रीयदृष्ट्या त्यांचे काम एखाद्या वायरसारखे कंडक्शनचे आहे. पण त्या प्लेक्ससला मूलाधार चक्र असे म्हणून कुंडलिनी शक्तीचा मूलस्रोत वगैरे समजतात.

यांची भाषा इतकी भोंगळ आणि मुद्दाम गुंतागुंतीची केली असते की कुणाला अर्थ तर समजू नये; तरीही काहीतरी सायंटिफिक आहे असा भास व्हावा. उदाहरणार्थ 'सहजयोग' पुस्तिकेत पान ५ वर असे लिहिले आहे, 'हृदयाच्या स्पंदनाची गती आपणास कमी करता येत नाही. कारण ती क्रिया पॅरासिंपॅथॅटिक नर्व्हस सिस्टि-

मची आहे. पॅरासिंपॅथॅटिक नर्व्हस सिस्टिमला पेट्रोल पंपाची उपमा देता येईल. या पंपाद्वारे ईश्वरी प्रेमाचे ( डिव्हाइन लव्ह ) पेट्रोल आपल्यात भरून घेता येते. ' आता यात पॅरासिंपॅथॅटिक सिस्टिमवर हृदयाची स्पंदने अवलंबून असतात हे शास्त्रीयदृष्ट्या खरे असले, तरी पेट्रोल पंप आणि डिव्हाइन लव्ह ही भानगड त्यात कशी बसेल ?

पुढे असे लिहिले आहे, ' पॅरासिंपॅथॅटिक नर्व्हस सिस्टिममधेसुद्धा एऑर्टिक प्लेक्सस आणि व्हेगस नर्व्ह यामधे असणारी पोकळी वैद्यकीयदृष्ट्या पाहता येईल. भारतीय वेदान्तात या पोकळीला अथवा अवकाशाला उद्देशून ( भवसागर ) माया हा शब्द आला आहे. ' आता नर्व्ह आणि प्लेक्ससमधली पोकळी म्हणजे काय ? ती ' पाहता ' येईल म्हणतात, तशी कुठे ' दिसत ' नाही. बरे, ही पोकळी म्हणजे भवसागर किंवा माया, हे त्यावरून कसे सिद्ध होते हेही समजत नाही.

पुढे त्या लिहितात, ' अहंभाव आणि उच्चतर अहंभाव ( इगो आणि सुपर इगो ) फुगा फुगवावा तसे फुगवून सिंपॅथॅटिक नर्व्हस सिस्टिमच्या डाव्या आणि उजव्या शीर्षबिंदूमधून मेंदूवर आवरण घालतात आणि टाळू भरते. याच क्षणी सर्वव्यापी ईश्वरी प्रेमाची प्राणभूत शक्ती आणि ती व्यक्ती यांची पूर्ण ताटातूट होते. ' यासाठी आकृतीही दाखवली असून डोक्यात इगो आणि सुपर इगो दोन फुगे टाळूवर आवरण घालताना दाखवले आहेत. आता इगो, सुपर इगो या संकल्पना आहेत. या नावाचा शरीरात कुठलाही दृश्य भाग नाही. पण त्यांना फुगेबिगे बनवून बाईंनी जागतिक संशोधनात भलतीच मोठी भर घातलेली दिसते. याला नोबेल पारितोषिक देणे हाही या दिव्य संशोधनाचा अपमानच ठरावा !

या आधुनिक गुरूंचे आलिशान गाड्यांशिवाय चालत नाही. विमानप्रवास तर नित्याचाच. यांचे क्षेत्र खूपच व्यापक झाले आहे. पूर्वी गुरूच्या चमत्काराचा फुगा फोडला की तो नेस्तनाबूद होत असे. आता मुंबईहून हाकलले की पुण्याला आश्रम, पुण्याहून सासवडला, महाराष्ट्रात प्रतिकूल वातावरण निर्माण झाले की कच्छला. तसे या प्रत्येक महाराजांना परदेशी भक्तांच्या त्यांच्या देशात आश्रम काढायचा तर फार आग्रह असतोच; पण यांचेच या भूमीवर प्रेम म्हणून हे इथे आश्रम काढतात !

या आधुनिक गुरूंनी त्यांच्या परदेशी भक्तांच्या इच्छेला आणि आग्रहाला जरूर मान द्यावा आणि तिकडे आश्रम काढावेत. त्यांचे मधुमेह, कर्करोग बरे करावेत. भारतातील जनतेच्या रोगांना या जडसृष्टीतील औषधांवर सोपवावे हे बरे. समृद्ध देशांना अध्यात्माची जास्त गरज आहे हे ओळखून हे सर्व आधुनिक गुरू कायमचे तिकडे गेल्यास भारतातील अडाणी जनतेवर त्यांचे फार उपकार होतील !

दादरचा सी. के. पी. हॉल.

माताजी तिथे संध्याकाळी सहाला येणार होत्या. महाशिवरात्रीनिमित्त तिथे त्यांची पूजा होणार होती. उच्च मध्यमवर्गातली दहावीस प्रौढ माणसे गेटबाहेर उभी राहून वाट बघत होती. गेटमध्ये पाट मांडला होता. भोवती रांगोळी. स्त्रिया नटलेल्या. पंजाबी ड्रेसमधली, चष्मिस्ट तरुण मुलगी उभी होती. एकीच्या हातात पाण्याचा तांब्या, दुसरीच्या हातात हार. साडेसहा झाले. सात झाले. साडेसात व्हायला आले, तरी माताजींचा पत्ता नव्हता. स्त्रिया हातात तांब्या घेऊन जागीच उभ्या होत्या. त्यांच्या चेहऱ्यावर कंटाळा वगैरे दिसला नाही. सुहास्य मुद्रा. बाहेरही लोक वाट पाहत होते. पण तक्रार नव्हती. मुंबईत असं पाहून आश्चर्य वाटले. ७–३७ ची लोकल यायला सात चाळीस झाले की ही मंडळी अस्वस्थ होऊन येरझारा घालीत बसली असती.

साडेसातला अँबॅसेडर येऊन लागली. हसत हसत माताजी खाली उतरल्या. पाटा-समोर थांबल्या. बाजूची एक स्त्री खाली वाकली. आणि माताजींची चप्पल मागून धरली. माताजींनी त्या उंच टाचांच्या चप्पलमधून एक पाय बाहेर काढला आणि पाटावर ठेवला. दुसरा पाय काढेपर्यंत वाकलेल्या स्त्रीने दोन्ही चप्पल्स हातात घेऊन छातीशी धरल्या आणि गाडीच्या दिशेने जाऊन त्या गाडीत ठेवल्या. इकडे पायावर पाणी, हारतुरे झाले होते. सगळे लोक दोन्ही हात पुढे करून आपापल्या जागी उभे होते. माताजींमागोमाग सगळे आत आले.

आजच्या जमावात एकही फॉरेनर नव्हता हे पाहून सुनेसुने वाटले. माताजींनी संक्रांतटाईप महाशिवरात्र शब्द पकडून 'महा' म्हणजे काय, 'शिव' म्हणजे काय आणि 'रात्र' म्हणजे काय अशी पिळापीळ चालू केली होती. ती संपल्यावर पैंची कारकुनी मूर्ती उभी राहिलेली दिसली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली माताजींची यथासांग पूजा चालू झाली.

पुण्यातल्या पूजेत राजवाडे कार्यालयातली जुनी पितळी भांडी होती. इथं स्टीलची कोरी करकरीत भांडी होती. मोठी परात, पातेली, वादल्या. सगळेच स्टीलचे. चकचकीत.

आज माताजींची शिवस्वरूपात पूजा होती. त्यामुळे त्याला साजेशी माताजींनी ड्रेपरी केली होती. पांढरी साडी, त्यावर परत पांढरी चादर व त्यावर आणखी बफ कलरची शाल घातली होती. साडीबाहेरून गळ्यात जानवे घातले होते. भक्त माताजींचे वरूनखालून पाय धूत असताना वाटले, माताजींना गुदगुदल्या कशा होत नाहीत ? पायावर दूध ओतले गेले, दही चोपडले गेले. स्टीलच्या झगझगीत जगने पाणी ओतले गेले. अत्तर लावले. पाय धुऊन झाल्यावर गेरू किंवा कावेची तांबडी पावडर भक्तांनी माताजींच्या हातापायाला चोपडली. चेहऱ्यावर, कपाळावर कावेचे

आडवे पट्टे ओढले. पैनी शिवाची हजार नावे माताजींच्या नावात गुंफून म्हणायला सुरुवात केली. तसे समोरच्या पाच दांपत्यांनी एकेक बेलाचे पान पायावर वाहायला सुरवात केली. लवकरच पुष्ट, मांसल पोटऱ्या बेलाच्या ढिगात बुडून गेल्या.


एक तरुण मुलगा हाराची पुडी घेऊन आला. माताजींनी त्याला कोचाशेजारी खाली बसवले. त्या पाय तिकडेच ठेवून या मुलाकडे कलल्या. कोचात जवळपास आडव्याच झाल्या. त्या तरुणाच्या केसातून त्यांनी दोनचारदा हात फिरवला. आपला हात त्याच्यापुढे पसरून त्याच्या हाताची तर्जनी हाती घेऊन ती आपल्या तळहातावर फिरवायला खुणेने सांगितले. तो आनंदाने मोहोरून गेला. एका हाताने माताजींचा गुबगुबीत मांसल हात हातात धरून दुसऱ्या हाताच्या तर्जनीने तो घासत राहिला. असं बराच वेळ चाललं. मग हा प्रसाद समोरच्या पुरुषांपैकीही एक दोघांनामाताजींनी दिला.

माताजींनी तरुण मुलींना बोलावून काहीतरी सांगितले. एक बाहेर गेली. दहा मिनिटांनी आली, तर तिच्या हातात सहासात कोरे नॅपकिन होते. बहुधा शेजारून विकत आणले असावेत. एका मुलीने माताजींचे केस मागून एकत्र करून वर धरले. दुसरी एका कोऱ्या नॅपकिनने मान पुसून घेऊ लागली. असे काही वेळ चालले. माताजींनी परत काहीतरी त्यांना सांगितले. एकजण धूपदान घेऊन कार्यालयातल्या खोलीत गेली. विस्तव घेऊन बाहेर आली. एक मुलगी माताजींचे केस वर धरून बसली होतीच. दुसरी धूपदान घेऊन तिथे आली. त्यावर धूप टाकला. सगळीकडे धूर उधळला गेला. त्या मुलीने धूपदान केसांजवळ धरले आणि हाताने तो धूर माताजींच्या केसाखाली घालवू लागली.

मागे एक गुजराती स्त्री चवरी घेऊन उभी राहिली होती. स्टीलचा दांडा आणि पांढरे केस. दुसऱ्या बाजूने एक दहाबारा वर्षांची स्मार्ट मुलगी गुलाबी रंगाचा, वर रंगीबेरंगी टिकल्या बसवलेले डिझाईन असलेला पंखा घेऊन उभी राहिली. चवरीने आणि पंख्याने दोन्हीकडून वारा बसल्याने धूर माताजींच्या डोक्यामागून सगळीकडून बाजूला उधळू लागला. तितक्यात एका तरुणीने एक गुलाबी रंगीबेरंगी झालरी टिकल्या लावलेली छत्री उघडली. त्यावर स्टीलचा कलश बसवला आणि ती माताजींच्या डोक्यावर धरली. धूर वरून अडला जाऊन परत माताजींच्या डोक्याभोवती साठू लागला. माताजींनी डोळे मिटून, गंभीर भाव चेहऱ्यावर चढवले. सगळे हात पुढे करून बसले होते.

आरती झाल्यावर सगळ्यांनी बंधन केले. पुण्यापेक्षा इथे बंधनही अधिक पॉलिश्ड् होते. डोक्यावरून अर्धवर्तुळाकार हात फिरवून झाल्यावर डोक्यावर गाठ मारल्यासारखे करून तिथूनच दोन्ही हात वर झटकायचे. त्यामुळे सराईत दुकानदार प्रेझेंटेशन आर्टिकल पॅक केल्यावर फितीचा बो बांधून फितीची दोन टोके सफाईने मोकळी सोडतो, तसे वाटत होते.

एका सिंधी भक्ताने आपल्या मुलीच्या लग्नाप्रीत्यर्थ सर्व उपस्थितांना पक्वान्नांचे जेवण घातले आणि कार्यक्रम संपला.



# शेखसल्ल्याचा उरूस

पुण्यातल्या शनिवारवाड्यासमोर, नव्या पुलाच्या सुरुवातीलाच उजवीकडे वळलं की कसबा पेठेचा दाट भाग सुरू होतो. तिथनं थोडं पुढं जाऊन डावीकडे वळलं की कुंभारवेस, कागदीपुरा येतो. तिथंच डाव्या हाताला पांढरी मशिदीसारखी दिसणारी इमारत दिसते. समोर दगडी पायऱ्या चढून गेलं की मोकळं आवार आहे. बाजूला पत्र्याची शेड आहे. पुढं पांढरा रंग दिलेल्या दगडी भिंतीत कमान आहे. तिच्या-वरच्या अर्धगोलात हिरव्या रंगावर सोनेरी उर्दू अक्षरांत भरगच्च मजकूर लिहिलेला आहे. कमानीखालच्या दरवाजातनं आत गेलं की टाकी. तिला बऱ्याच तोट्या लावलेल्या दिसतात. इथे हातपाय धुऊन, डोक्यावर रुमाल चढवून लोक आत जातात. आतल्या आवारात मोठी शेड आहे. एका बाजूला वीतभर उंचावर चार-सहा कबरी आहेत. त्यावर हिरव्या, पांढऱ्या, लाल सिल्कच्या चादरी अंथरलेल्या असतात. समोर एक छोटं गोल, वर तसलाच कुठलाही नक्षी नसलेला गोलघुमट असलेलं, मुसलमानी पद्धतीचं देऊळ आहे. त्याचा व्यास फार तर वीस फूट असेल. त्याला समोरनं एकच छोटं दार आहे.

आत लाकडाचा दीड फूट उंचीचा चौकोनी कठडा आहे. त्याच्या आत एक कबर आहे. तिच्यावर हिरवी, लाल बॉर्डरची रेशमी चादर आहे. त्यावर हारांचा, फुलांचा खच आहे.

ही प्रसिद्ध धाकट्या शेखसल्ल्याची कबर. आणि ही सगळी वास्तू म्हणजे धाकट्या शेखसल्ल्याचा दर्गा. शनिवारवाड्यापासून डावीकडे थोड्या अंतरावर थोरल्या शेख-

सल्ल्याचा दर्गा आहे. तो आकारानं भरपूर मोठाही आहे. पण धाकटा शेखसल्ला हा त्याच्यापेक्षा खूपच प्रसिद्ध आहे. कारण तो नवसाला पावतो. दर वर्षी धाकट्या शेखसल्ल्याच्या उरुसात लोक गालात सळया, सुया खुपसून नवस फेडतात.

दरवर्षी उरूस होऊन गेल्यावर वृत्तपत्रात दोनचार ओळींची बातमी येते. मग ती वाचल्यावर मी हळहळायचो. या वर्षी उरूस दहा जुलैला सुरू होऊन तेराला संपणार असल्याची 'केसरी'त बातमी वाचली, तेव्हा ठरवलं की काही झालं तरी या वर्षी हा उरूस पहायचाच. दोन दिवस आधीच दर्ग्यावर गेलो. तिथले मुख्य ट्रस्टी मोईनुद्दीन जमालुद्दीन निझामी पीरजादे हे शेखसल्ल्याचे वंशज. पण ते गंजपेठेत रहातात असं कळलं. तिथला पत्ता घेऊन ती जागा शोधून काढली. मच्छी मार्केटमधल्या एका बकाल वस्तीतल्या चाळीत ते रहातात. मधनं सांडपाण्याचे ओहोळ. अरुंद गल्ल्यांतून पुढं पुढं जावं लागतं.

आत एका खाटेवर पीरजादे बसलेले. सत्तर–पंचाहत्तर वर्षांचे, पांढरी खुरटी दाढी ठेवलेले, नाकेले, गोरे गृहस्थ. समोर कागदपत्रं घेऊन ते वाचीत होते. मी ओळख करून देताच ते म्हणाले, 'ज्यांचा उरूस आहे त्यांचंच चरित्र मी लिहितोय. त्यांचं सबंध नाव हजरत ख्वाजा शेख सलाउद्दीन चिश्ती. त्यांचे आम्ही वंशज.'

त्यांनी एक कागदाची घडी शोधून काढली. उलगडून माझ्यासमोर ठेवली. ती त्यांची वंशावळ होती. त्यात शेवटी कुठंतरी बोट ठेवून त्यांनी स्वतःचं नाव दाखवलं.

मी विचारलं, 'हे सलाउद्दीन कधी पेशवाईत होऊन गेलेत का ?'

'छे छे ! हे फारच आधी. हे हिजरी सनाप्रमाणं ६३२ हिजरीमधे जन्मले आणि ७५९ हिजरीमधे वारले. हे मूळ अरबस्तानमधले. अबूबकर यांच्या वंशातले. हे घराणं तिकडे खूप मानाचं समजलं जातं. पण ते वैभव सोडून हे हिजरी ७०० मधे दिल्लीला आले. तिथं त्यांनी सूफी पंथाची दीक्षा घेतली. हजरत ख्वाजा निजामुद्दीन अवलिया महबुबे इलाही चिश्ती हे त्यांचे गुरू.'

'चिश्ती हे बरंच प्रसिद्ध नाव आहे. मीही ऐकलंय.'

'चिश्त नावाचं गाव इराणमधे आहे. या पंथाचे मूळपुरुष त्या गावचे. म्हणून पंथाला हेच नाव पडलं. दिल्लीत एकदा त्यांच्या गुरूंनी सगळ्या शिष्यांना जमवलं आणि म्हणाले, 'हजरतकी दुवा लोगोंतक पहुँचाने और इन्सानियतकी तालीम देनेके लिये दख्खनमें जाने के लिये कौन तैयार है ?' त्याबरोबर सगळे शिष्य उभे राहिले. त्यांतल्या पाचशे शिष्यांना त्यांनी दक्षिणेकडे जायची आज्ञा केली. त्यात आपले हे सलाउद्दीनसाब होते. ते पहिल्यांदा देवगिरीत आले आणि नंतर महाराष्ट्रात फिरू लागले. तेव्हाच ते पुण्याला आले. त्या वेळी पुणं अगदी छोटं होतं. त्याला पुणं असं नावही नंतर पडलं. माळी–मुंजेरी अशी दोन छोटी खेडी होती.'

‘ देवरकर माळ्यांचा इथंच संबंध आला का ? त्यांच्याविषयी कुणीतरी सांगितलंय मला. ’

‘ हो हो ! त्याची एक कथाच आहे. हे अवलिये शिष्यांसह फिरताफिरता इथं आले. त्यांनी शिष्यांना बजावलं होतं की आपला कुणाला त्रास होता कामा नये. कंदमुळं खाऊन रहा. हे हजरतचं ध्यान करीत बसले. शिष्यांना खूप भूक लागलेली. एक बैल चरताना दिसला. त्याचा कोणी मालक दिसेना. त्यांना वाटलं, रानातला, बिनमालकाचा बैल आहे; कापून खावा. त्यांनी तो कापून खाल्ला. कातडं आणि हाडं एका बाजूला ठेवून दिली. काही वेळानं तो माळी ओरडत सलाउद्दीन यांच्याकडे आला. रडू लागला. म्हणाला, ‘ एकुलता एक बैल तुमच्या शिष्यांनी खाल्ला. आता मी कशावर पोट भरू ? ’ गुरूच्या ध्यानात परिस्थिती आली. ते म्हणाले, ‘ तू तुझ्या बैलाला नावानं हाक मार. ’ त्यानं हाक मारल्याबरोबर बैल त्या हाडा–कातड्यातनं उठून उभा राहिला. तेव्हापासून देवरकर माळ्याची या गुरूंवर श्रद्धा बसली. त्यानं रोज नाचणीची भाकरी, मेथीची नाहीतर करडईची पालेभाजी आणि कांदा असं गुरूला पाठवायला सुरुवात केली. नंतर ते गुरूही गेले, शिष्यही गेले. पण त्यांच्या वंशजांनी शेकडो वर्षं उरुसाला नाचणीची भाकरी पाठवायची प्रथा चालू ठेवली आहे. ’

‘ हे इतकी वर्षं टिकून राहण्याचं कारण काय ? ’

‘ हे जागृत स्थान आहे. त्यांच्या हयातीत त्यांनी अनेक लोकांचा फायदा करून दिला. शिर्के नावाच्या माणसाच्या मुलीला रक्तपित्ती झाली होती. त्यानं तिला बाबांकडे आणली. बाबांनी एका दृष्टिक्षेपात तिला बरी केली. ती बाबांच्या सेवेसाठी इथंच राहू लागली. ती मेल्यावर तिची कबरही तिथंच बांधली. मधे रस्तारुंदीत ती कबर उखडली गेली. ’

कागद चाळताचाळता त्यांनी एक कागद उचलला. त्याच्यावर उर्दूत मोठी यादी होती. कागद जीर्ण होता. त्यावर मातीचे डाग होते. पीरजादे म्हणाले, ‘ ही पान-शेतची माती बरं का. या यादीत सलाउद्दीन बाबांच्या शिष्यांची नावं आहेत. पुण्यातच यांच्या कबरी आहेत. ’ असं म्हणून त्यांनी नावं वाचून दाखवली. त्यांच्या कबरींची ठिकाणंही सांगितली. शमशाद हुसेन खाँ म्हणजे कलेक्टर कचेरीमागचा गारपीर, अब्दुल रज्झाक म्हणजे कँपातला साचापीर, सुभानशा म्हणजे बोहरीआळीतला दर्गा, अल्लाउद्दीनसाहेब म्हणजे सर्किट हाऊसमोरचा पीर, कुतुबुद्दीन म्हणजे दारूवाला पुला-जवळच्या मशिदीतला पीर... अशी त्यांनी बारा नावं सांगितल्यावर वाटलं, हे सगळे पीर आपण वेळोवेळी पहातो, पण हे या धाकट्या शेखसल्ल्याचे शिष्य असतील, त्यांची कुठं अशी नोंद असेल असं वाटलं नव्हतं.

पीरजादे म्हणाले, ‘यांचेही अनेक शिष्य होते. पुण्यात तीनशे साडेतीनशे भक्तांच्या

कबरी आहेत. त्यांतल्या बहुतेक सदाशिव, नारायण पेठेत वाड्यांखाली गाडल्या गेलेल्या आहेत. या उरसाला सूफी पंथात फार महत्त्व आहे. शे–दीडशे फकीर या वेळी इथं येतात.'

'या उरसाचा कार्यक्रम काय आहे?'

त्यांनी एक निमंत्रणपत्रिका बाहेर काढून हातात दिली. 'उर्स शरीफ' असं इंग्लिशमधे शीर्षक होतं. त्याच्याही डोक्यावर '७८६' हा इंग्लिशमधे छापलेला आकडा होता. मी म्हटलं, 'या ७८६ चा अर्थ काय?'

ते म्हणाले, 'हा शुभ आकडा आहे. तुम्ही जसं वर 'श्री' लिहिता तसा आम्ही हा आकडा लिहितो.' खाली प्रोग्रॅम होता. गुरुवारी रात्री दहाला 'संदल शरीफ'. त्याचा अर्थ त्यांनी सांगितला. 'रात्री कबरीवरची चादर काढून तिच्यावरचा आधीचा लेप खरवडून काढतो. ती धुतल्यावर तिला अत्तर, गुलाबपाणी लावतो. चंदनाचा लेप देतो. मग नवी चादर त्यावर घालतो. हे करताना आत फक्त आम्ही त्यांचे वंशजच राहू शकतो. त्यावेळी बाहेर भजन चाललेलं असतं. आमच्या भजनात तुमच्यासारखी वाद्यं नसतात. त्याला कुरआन ख्वानी म्हणतात. दुसऱ्या दिवशी महिलांसाठी प्रवचन. शनिवारी रातीब–उल रफाई. हे फकीरलोक तलवारीचे, कुऱ्हाडीचे खेळ करून दाखवतात. रविवारी शेवटचा दिवस. त्या दिवशी जरब लावून घ्यायचा कार्यक्रम.'

'जरब म्हणजे?'

'लांब लोखंडी दाभणासारख्या सळया असतात. लोक गालातनं त्या खुपसून घेतात.'

'हो हो. मी ऐकलंय त्याच्याबद्दल. कशासाठी खुपसून घेतात ते?'

'नवसासाठी. मूल होत नाही, नोकरी लागत नाही... कुठल्याही कारणासाठी लोक नवस करतात.'

'पण ते नंतर पुरे होतात का?'

'अहो, पुरे झाले तरच जरब लावायची असते. ज्या अर्थी ते जरब लावतात त्या अर्थी त्यांच्या इच्छा पुऱ्या होतच असल्या पाहिजेत.'

'पण ते खुपसताना किंवा नंतर त्रास होत नाही?'

'काही होत नाही. उदी लावली की अगदी पूर्वीसारखी कातडी होऊन जाते.' पूर्वी जरब लावून घेणाऱ्यांची संख्या कमी होती. पण दिवसेंदिवस पहातोय तर संख्या वाढतच चाल्लीय. हजारो लोक जरब लावून घेतात. दर्ग्यात तर पाय ठेवायला जागा नसते. त्याच वेळी देवरकर माळी नाचणीची भाकरी वाजतगाजत आणतात. मग त्याचा नैवेद्य दाखवून प्रसाद वाटतात. लोक छोटा तुकडा मिळवण्यासाठी केवढी धडपड करतात. तो तुकडा कुणी आपल्या गल्ल्यात टाकून ठेवतं, कुणी पाकिटात

ठेवतं.'

'ही जरब टोचतं कोण?'

'फकीर. त्यातलेही रफाई पंथाचे फकीर.'

'त्यांच्यातही पंथ असतात?'

'म्हणजे? अहो, मुख्य चार पंथ. रफाई, मलंग, बानवा आणि जलाली. त्या प्रत्येकातही आणखी पोटप्रकार आहेतच.'

'प्रत्येक पंथाचा वेष वेगवेगळा असतो का?'

'फकिराचा खरा वेष म्हणजे वर कफनी आणि खाली लुंगी. कफनी म्हणजे एका कापडाला मधे चीर फाडायची आणि त्यातनं डोकं काढायचं. अर्थात आता प्रत्येक-जण आपापल्या परीनं शृंगार करीत असतोच.'

फकिराच्या संदर्भात 'शृंगार' शब्द आल्यानं मला गंमत वाटली.

ते पुढं म्हणाले, 'फकीर या शब्दाची उर्दू अक्षरं आहेत : फे, काफ, ये आणि रे. या चारही शब्दांना वेगवेगळे अर्थ आहेत. 'फे' म्हणजे फाका. म्हणजे उपास करणारा. 'काफ' म्हणजे कसली हाव नसलेला; सुखदुःख काहीच न मानणारा. 'ये' म्हणजे यादे इलाही. म्हणजे परमेश्वराची आठवण करणारा. 'रे' म्हणजे रियाजत. म्हणजे भक्ती करणारा. हे सगळं करणारा असेल तर तो फकीर. नाहीतर तो भिकारी.'

मी म्हटलं, 'हो. मी जेवढे फकीर पाहिलेत ते कुणी भीक मागताना पाहिले नाहीत. समोर येऊन उभे रहातात. 'देगा उसका भला, न देगा उसका भी भला' असं म्हणतात. आमच्या गावात तर बहुसंख्य हिंदूच फकिराला काहीतरी घालतात.'

ते म्हणाले, 'अहो, धर्मांचे भेद आपण पाडतो. परमेश्वर एकच आहे. मुसल-मानांचा देव, हिंदूंचा देव, ख्रिश्चनांचा देव हे वेगवेगळे असते तर त्यांनी जी माणसं निर्माण केली त्यांत व्हरायटी आली असती. कुणाचं नाक डोक्याच्या मागच्या बाजूला गेलं असतं. कुणाचा कान पुढं आला असता. पण सगळी माणसं ज्या अर्थी सारखीच आहेत, त्या अर्थी त्यांना निर्माण करणारा परमेश्वर एकच असला पाहिजे.'

त्यांच्या या लॉजिकची मला खूप गंमत वाटली. ते पुढं म्हणाले, 'उद्या आता उरसात केवढी गर्दी जमेल. कित्येक राजे-रजवाडे, वीरपुरुष होऊन गेले. त्यांच्या समाध्या कुठं धूळ खात पडल्यायत, त्याचा कुणाला पत्ताही नाही. पण ही एका साध्या भिकाऱ्याची समाधी. पण गेली सातशे वर्षं लोक वर्षाकाठी नियमितपणं उत्सव करतात. तुकाराममहाराज घ्या, ज्ञानेश्वरमहाराज घ्या... ही त्या वेळची परिस्थितीनं दरिद्री माणसं. पण अजून त्यांची याद ठेवून लोक पायी वारी करतात.'

तेवढ्यात एक मध्यमवयीन बाई आतून आली. त्यांच्याकडे बघून म्हणाली, 'कितना वक्त बातें करते है ? नही तो फिर ॲडमिट करना पडेगा.'

मी म्हणालो, 'काय झालं ?'

पीरजादे हसून म्हणाले, 'दोनदा हार्ट ॲटॅक येऊन गेलेयत. परवा माझे रोजे हॉस्पिटलमधेच झाले.'

मी शरमून म्हणालो, 'मला आधी हे माहीत असतं तर मी इतका त्रास तुम्हाला दिला नसता.'

ते हसले नि म्हणाले, 'असू द्या. काही बिघडत नाही.'

वाटेत पीरजाद्यांचा मुलगा भेटला. हा स्कूटर मेकॅनिक आहे. त्याच्याकडे रात्रीच्या 'संदल' कार्यक्रमासाठी अत्तर, गुलाबपाणी आणायचं काम होतं.

तो म्हणाला, 'यासाठी 'हीना' अत्तरच लागतं. दुसरं चालत नाही. बऱ्याच ठिकाणी जाऊन आलो. पण प्युअर 'हीना' मिळतच नाही. एका अगदी खात्रीच्या ठिकाणी गेलो. तो दुकानदार म्हणाला, 'हे अत्तर 'हीना' म्हणून विकतो; पण हे इंटिमेट अत्तर आहे. दर्ग्याचं काम आहे म्हणून तुला खरं ते सांगितलं.'

तुकाराम देवरकर यांचं घर शोधू लागलो. कसब्यातल्या गल्लीबोळांत एका अर्धवट पडक्या घरात पायऱ्या चढून गेलो. आत घराच्या आकाराचंच भैरोबाचं प्रशस्त देऊळ होतं. एका बाजूला एक बाई पालेभाज्यांच्या गड्डया ठेवून निवडीत बसली होती. मागे धान्याच्या पोत्यांच्या थप्प्या होत्या.

तुकाराम देवरकर सत्तरीचे. पायजमा– नेहरू शर्ट– टोपी घातलेले गृहस्थ होते. त्यांनी शेखसल्लयाच्या प्रसिद्ध गोष्टीची त्यांची 'व्हर्शन' सांगितली. शेखसल्ला ह्यांच्या पूर्वजांच्या शेतात आले, तेव्हा त्यांनी नाचणीची भाकरी मागितली. तो माळी 'बरं, घरून आणतो' म्हणून गेला. आपल्या भागात नाचणी काही रोजच्या खाण्यात नसते. म्हणून बाजारातून आणून, दळून, भाकरी करून आणायला वेळ लागला. इकडे येऊन पहातो तो ह्यांनी मोटेचा बैल मारून खाल्लेला. माळ्यानं विचारलं, 'बाबा, मी तुम्हाला भाकरीला नाही म्हणालो होतो का ? मग माझा बैल का खाल्लात ?' त्यावर बाबा म्हणाले, 'हाक मार तुझ्या बैलाला...' इथून पुढची गोष्ट सारखीच होती.

पीरजाद्यांनी आधीचा भाग रंगवून सांगितला होता, तो आठवला. बाबा आपल्या शिष्यांना बजावून सांगत की दुसऱ्याच्या वस्तूला हात लावायचा नाही. शिष्य विचारायचे, 'मग आम्ही काय खायचं बाबा ?' बाबा म्हणायचे, 'कंदमुळं खायची.' बाबा ध्यानाला बसले असता शिष्यांनी नकळत हा बैल मारून खाल्ला.

प्रत्येकजण आपल्या पूर्वजांना कसं सांभाळून घेतो याची गंमत वाटली.

मी विचारलं, ' दर वर्षी भाकऱ्यांसाठी किती नाचणी लागते ? '

' सव्वा मण लागते. पण आता काही हिशेबच ठेवत नाही. आता मुंढव्याला शेत घेतलंय. तिथं भात घेतो. त्याच्या कडेनं नाचणी लावतो. ती जितकी येईल तितक्या भाकरी करतो. ही काय नाचणीचीच पोती आहेत. '

' आणि पालेभाज्या ? '

' त्या विकत आणतो. पूर्वी माझं शेत नव्हतं. तेव्हा नाचणी पण विकतच आणायचो. वडगाव-कर्जतपर्यंत जायचो. रेल्वेनं पोतं घेऊन यायचो. तो रेशनिंगचा कडक जमाना होता. पण कुणी टीसीनं, साहेबानं मला कधी अडवलं नाही. '

' तुम्ही कारण सांगितल्यावर ? '

' त्यांनी विचारलंच नाही. एवढं कशाला, शिवाजीनगरला उतरल्यावर ओळखीचा हमाल दिसला की म्हणायचा, ' दादा, तुम्ही घरी जावा. मी आणून टाकीन पोतं. ' कुठल्या हमालानं याचे कधी पैसे घेतले नाहीत. '

' या भाकरी तुम्ही उद्या मिरवणुकीनं नेणार का ? '

' हो. तिथं गेल्यावर कबरीपुढं पाच भाकरी ठेवायच्या. फकिरांच्या पाच चौक्या असतात. प्रत्येक चौकीदाराला पाचपाच भाकरी. मग उरलेल्यांचे तुकडे करून वाटायचे. फार गर्दी असते त्या वेळी. '

' हे भैरोबाचं देऊळही तुमचंच का ? '

' हो. '

बाजूला वीसबावीस फूट लांबीचा लाकडाचा सरळसोट ओंडका पडलेला होता. बैलगाडीचे भाग वाटावेत असं लाकडी सामान पडलेलं होतं. मी विचारलं, ' हे काय आहे ? '

' बगाड आहे. हे सगळं जोडलं की गाडा तयार होतो. त्याच्यावर मधे तो खांब. आणि दुसरा त्याच्यावर आडवा. त्याला लोक टांगून घेतात. दर वर्षी म्हसोबाची इथं जत्रा होते. त्या वेळी बगाडाची मिरवणूक कसब्यातनं फिरते. '

' पण या गल्लीबोळातनं जातं कसं हे बगाड ? '

' नेतात बरोबर. '

' पाठीला हूक लावतात का ? '

' नाही, नुसतं बांधून घेतात. '

परतताना वाटत होतं, पुण्याच्या मध्यावर अजूनही आदिम संस्कृती टिकून आहे. आणि देवरकर हे धार्मिक सरमिसळीचं प्रतीकच आहेत.

संदलला गेलो. मुसलमानी वातावरणात पहिल्यांदाच जात होतो. डोक्यावर रुमाल. सतरंज्यांवर पुरुषमाणसं बसलेली. गर्दीत मधे काही माणसं पुढं माईक ठेवून निरनिराळ्या चालींवरची उर्दूतली भजनं म्हणत होती. काही भजनांना ओळखीच्या हिंदी सिनेमातल्या गाण्यांच्या चाली लावलेल्या होत्या. त्यात इतर कुठल्याही वाद्याचा वापर केलेला नव्हता. बावांच्या शिष्यांच्या पाचसहा कबरींच्या मागे स्त्रिया बसलेल्या होत्या. त्या बहुसंख्य मुसलमानच होत्या. त्यांचे कपडे अतिशय कंगाल होते. माझ्या आसपास बसलेली मुसलमान माणसंही अंगात सुरकुतले, मळके, फाटके कपडे घालून आलेली होती. पुढं गादीवर बसलेल्या लोकांचे कपडे चांगले. दाढ्या वाढवण्याचे प्रकारही वेगवेगळे. मिश्यांना चाट देऊन दाढी वाढवलेली. काहींनी दाढी किती कोरलेली असावी? गाल, हनुवटी कोरलेली; दाढी फक्त हनुवटीखाली आणि गालाच्या मागच्या बाजूला. मधे भजन म्हणणाऱ्या फकिरानं अंगावर कलाबतू लावलेली हिरवी शाल पांघरलेली. त्याला साथ देणाऱ्या चारपाच तरुण पोरांनी हिरव्या टोप्या घातलेल्या. जमावातल्या बहुतेकांच्या डोक्यावरच्या टोप्या पांढऱ्या, क्रोशाच्या सुईनं विणलेल्या; जाळीदार. गांधी–टोपीत जसा उलटून आलेला दुहेरी थर असतो, तसा यात नव्हता. पीरजादे डोक्याला फरकॅप, अंगात काळा जोधपुरी कोट, सुरवार घालून गादीवर बसून भजन ऐकत होते. टोप्या, दाढ्या, मागच्या भिंतीमधल्या कमानी, उर्दू शब्द यामुळं हिंदी सिनेमातलं जुन्या लखनऊतलं दृश्य वाटत होतं.

रात्री अकरानंतर दर्गा असलेल्या त्या छोट्या गाभाऱ्यातली (त्याला त्यांच्या भाषेत काय म्हणतात, कोण जाणे) गडबड वाढली. पाण्याच्या बादल्या आतबाहेर जाऊयेऊ लागल्या. काही वेळानं हातात छोट्या कुंड्या घेऊन आतून काहीजण बाहेर आले. आणि सुगंध येणारी माती चिमटीनं लोकांना वाटू लागले. लोक तिचा कण तोंडात ठेवीत. कुणी कागदात, रुमालात बांधून घेत. गाभाऱ्यात लोक घुसू लागले. छोटा दरवाजा. आतला गाभाराही छोटा. आत जाणाऱ्यांच्या रेट्याबरोबर मीही आत गेलो. समोरच्या कठड्याच्या चौकटीत हिरवी सॅटिनची चादर आणि तीवर फुलं दिसली. इतका गुदमर व्हायला लागला, की लगेच रेटा देऊन तिथून बाहेर पडलो.

बाहेर आल्यावर एकाला विचारलं, 'इथं माणसं गुदमरत नाहीत का हो? याला दोनतीन खिडक्या का नाही पाडत?'

तो कानाला हात लावून म्हणाला, 'ती तर बाबाची करणी आहे. इतके लोक इथं येतात. उद्यापासून तर बघाल— याच्या चौपट गर्दी आत होते. पण कधी कुणी गुदमरलं नाही!'

सकाळी नऊ–साडेनऊला दर्ग्यावर गेलो. रात्रीच्या वातावरणाची जादू निघून

गेलेली होती. भिंतीमधे कमानी असल्या तरी मागचा भाग पडकाच होता. बाजूला शेडमधे पाचपन्नास फकीरलोक उतरलेले होते, तो भाग तर अगदीच गचाळ होता. पायऱ्यांवर एकदोन माणसं हिरवट रंगाची, सिनेमाच्या तिकिटांसाठी असतात तसली पॅडस् घेऊन बसली होती. लोक येऊन रुपरुपया देऊन ती तिकिटं घेऊन जात होती.

काल पीरजाद्यांकडे बसलो असता एक सावळा, लुंगी–टोपी घातलेला तरुण ओळखीचा झाला होता. त्याचं नाव—युसूफ बांगी. दर्ग्याची व्यवस्था ते पहातात. बांग देतात. दर्ग्याच्या दारातच असलेल्या झोपडीवजा खोलीत ते रहातात. ते इथं भेटले. मी विचारलं, ‘ ही तिकिटं कसली आहेत हो ? ’

ते म्हणाले, ‘ जरब लावून घेतात ना उद्या, त्याची ही फी आहे. हे तिकीट दाखवलं की फकीर त्याला टोचतात. ’

‘ फक्त रुपयाच फी ? ’

‘ वर इच्छेला येईल ते फकिराला देतात. कुणी चार आणे देतं. कुणी सव्वा रुपया. कुणी पाच रुपये पण देतं. ’

खाली दोनतीन फकीर लांब सळया कानशीनं घासत बसले होते. बांगी म्हणाले, ‘ हे काम गेले दहा दिवस चाललंय. लोक आपापल्या जरबी इथं आणून फकिरांकडून घासून नेतात. ’

मी जरब पहिल्यांदाच पहात होतो. दाभणाच्या जाडीइतकी, दोनअडीच फूट लांब, पुढं टोकदार होत गेलेली ती लोखंडी सळई होती. अशा बऱ्याच जरबी तिथं पडलेल्या होत्या. काही फक्त वीतभर लांबीच्या; तर काही तीन–साडेतीन फूट लांबीच्या. जरबेचं एक टोक तीक्ष्ण, तर दुसऱ्या जाड बाजूला अर्धचंद्राचा आकार दिलेली धातूची पट्टी वेल्ड केलेली. त्यात अनेक फॅशन्स होत्या. काहींना नुसतेच चंद्र; तर काहींच्या मधे चांदणीही होती.

फकीर पुढं लाकूड ठेवून त्यावर जरब ठेवून कानशीनं घासत होते. लाकडाला झिजून ज्या खाचा पडल्या होत्या त्यात जरब ठेवून वरून कानस मारीत होते. काळ्या जरबी चकचकीत होत होत्या. पलीकडे मुसल्मानांची छोटी पोरं घासलेल्या जरबांना पॉलिश पेपरने घासून गुळगुळीत करीत होती. जरब घासायला घेऊन येणारी बरीच माणसं हिंदू दिसत होती.

युसूफभाईंना म्हटलं, ‘ या फकीरमंडळींना जरा भेटायचंय. ’

ते म्हणाले, ‘ या ना. त्यांच्यातल्या मुख्य माणसाचीच गाठ घालून देतो. ’

शेडच्या मुख्य भागाकडे त्यांनी मला नेलं. अनेक फकीर तिथं बसून आराम करीत होते. काही पहुडले होते. खाली सतरंज्या होत्या. पावसाळी दिवसांतल्या जमिनीच्या ओलीमुळं त्या ओलसर, दमट लागत होत्या. बाजूला शेडच्या खांबांवर त्यांच्या लुंग्या,

पटके वाळत होते. शेडच्या एका टोकाला गाठोड्यांचे ढीग होते. त्याला टेकून चार-सहा फकीर बसले होते. त्यांतल्या मुख्य फकिराची ओळख करून देऊन नाव सांगितलं, ' हे इमदाद अली मेहताब अली शाह सदर सर खलिफे रफाई. '

इमदाद अली हे पासष्ट ते सत्तर वयाचे, बुटके, फकीर होते. त्यांच्या अंगावरचे कपडे मळके, चुरगळलेले होते. त्यांच्या एका डोळ्याचं बुबुळ पूर्ण पांढरं झालेलं होतं. दाढी अर्धवट वाढलेली. शरीरही कृश आणि खप्पड झालेलं होतं. हे ' रफाई ' या फकिरांमधल्या सर्वांत मोठ्या पंथाचे खलिफा.

मी त्यांना विचारलं, ' रफाई पंथाच्या फकिराला ओळखायचं कसं ? '

ते म्हणाले, ' हा जो उरूस चाललाय, त्यात रफाईंनाच महत्त्व आहे. जरब टोचणार ते आम्हीच. बुरूज आम्हीच वापरतो. '

' बुरूज म्हणजे ? '

त्यांनी मागच्या गाठोड्यातून बुरूज काढला. फूट–दीड फूट लांबीचा, चांगला अंगठ्याएवढ्या जाडीचा लोखंडी गज होता. तो पुढं निमुळता पण बोथट होता. टोकाला प्रार्थनायंत्रासारखा दिसणारा टिनच्या पत्र्याचा ड्रम आणि त्याला बारीक साखळ्या लोंबत होत्या.

' मी विचारलं, ' याचा उपयोग कसा करता ? '

इमदाद अलींनी उठून डोक्यावरचा पटका बाजूला फेकला. दोन्ही हातात बुरजाचा दांडा धरला. मग ते मोठ्यानं उर्दूत काहीतरी म्हणाले आणि हात उंचावून त्यांनी तो दांडा डोक्यावर आपटला, तिथं दाबून धरला आणि नंतर काही वेळानं उपसून काढल्याची ॲक्शन केली. आपटताना त्या दांड्याचं टोक डोक्याला लागणार नाही, आणि बाजूचा स्पर्श होईल अशी दक्षता त्यांनी घेतली होती. पण त्या आवाजामुळं आणि त्यांच्या आविर्भावामुळे ते खरोखरीच मारून घेतात असं पाहणाऱ्याला वाटत होतं.

ते खाली बसले. बाजूच्या बोचक्यातून त्यांनी एकदोन तलवारी काढल्या. एक कुऱ्हाड आणि काही सुऱ्या काढल्या. इतकी खरी शस्त्रं पाहून मी चाटच झालो. इमदाद अली म्हणाले, ' आम्ही यांचे खेळ करतो. संध्याकाळी लोक दर्ग्याला चादरी चढवतात. त्या वाजतगाजत आणतात. त्या मिरवणुकीपुढे आम्ही या सगळ्याचे खेळ करतो. रात्री दहानंतर इथेही हे सगळे खेळ करणारच आहोत. तुम्ही या पाहायला. '

' दुसरा कुठला पंथ आहे ? '

पलीकडे उंच, पन्नाशीचे देखणे फकीर बसले होते. ते म्हणाले, ' आम्ही मलंग. आमचं नाव साजिक अलि शाह सरगुरू. आमच्या पंथाची खूण म्हणजे चिमटा. ' त्यांनी तीनचार फूट लांबीचा चिमटा दाखवला. तो बंद स्थितीत ठेवण्यासाठी कंबरेच्या

कातडी पट्ट्याला असतात तसे लोखंडी लूप्स होते. त्यांनी एकाला डफ घेऊन भजन म्हणायला सांगितलं. त्यांचं भजन सुरू होताच लूप काढून चिमटा सोडवून साजिक अलि शाह हातावर चिमटा आपटत ताल धरू लागले.

पलीकडे भगव्या रंगाची कफनी आणि वर भगवाच फेटा घातलेली दोनचार माणसं बसलेली होती. मला त्या जमावात हिंदू पाहून जरा आश्चर्यंच वाटलं. पण इमदाद अली तेवढ्यात त्यांच्याकडेच बोट दाखवून म्हणाले, 'हे बानवा पंथाचे अनवर अली शाह—सरगुरू. यांच्या हातात धूपदान असतं. छट्टा असतो.' छट्टा म्हणजे लोखंडी छोटी सळई. तिच्या वरच्या बाजूला इंग्रजी 'वाय'चा आकार.

कोपऱ्यात काळ्या जर्द रंगाचा शर्ट, लुंगी, टोपी घातलेला एक तरुण माणूस बसलेला होता. हा जलाली पंथाचा, बहादूर अली शाह. इमदाद अलींनी त्यांना उभं रहायला सांगितलं. ते त्यांच्या पंथाच्या खुणा दाखवू लागले. पहिला आसूड काढून एक पाय पुढं करून त्याच्यावर 'फडाक्' असा आवाज काढून दाखवला. गळ्यात एक काळं कुळकुळीत पडलेलं तेलकट शिंग होतं. ते वर करून शंखासारखं फुंकून दाखवलं.

कुणीतरी म्हणालं, 'ते लंगर गळ्यात घालून दाखव ना!'

आडव्या वाशावर टांगून ठेवलेल्या साखळ्यांच्या झुपका त्यांनी उचलला. आपण गुरं बांधतो त्या आकाराची ती साखळी होती. त्यांनी त्या साखळीचा संच गळ्याभोवती, खांद्यावरून छातीवर क्रॉस करून अडकवला. चंद्राच्या कोरीच्या आकाराचा अर्धाइंच जाडीचा लोखंडी आकार गळ्यात घातला. हातांत, पायांत जाडजाड लोखंडी कडी अडकवली. साक्षात मध्ययुगीन माणूसच माझ्यापुढं अवतरला होता. बहादूर अली शाह म्हणाले, 'आम्हाला सव्वा मण ओझं अंगावर बाळगावंच लागतं.'

एकानं काळा, मेणचट कटोरा माझ्या हातात दिला. मी कटोरा पहिल्यांदाच हातात घेत होतो. त्या कटोऱ्याकडे पहात मी विचारलं, 'हा कशाचा करतात?'

'नारळ आडवा कापतात. त्याला तेल लावलं की काळा पडतो.'

'पण एवढा मोठा नारळ असतो?'

'समुद्रातले नारळ मोठे असतात. फक्त त्याचाच कटोरा बनवता येतो.'

हे चार गुरू शेडच्या रुंदीच्या बाजूवर एका रांगेत ठरवून बसल्यासारखे बसले होते.

मी विचारलं, 'फकिराची दीक्षा घेतल्यावर काय काय नियम पाळावे लागतात? हिंदूंमधे संन्यास घेतल्यावर त्याला संसार, मुलंबाळं, बायको सोडावी लागते. किंवा काही पंथांत लग्नच करायची परवानगी नसते.'

'तसं आमच्यात काही नाही. आम्ही लग्न करू शकतो. आम्ही संसारात राहतो.'

मला आश्चर्यच वाटलं.

'तुम्ही नेमकं करता काय ?'

'फकिरी वृत्तीनं रहायचं. कधी कुणावर रागवायचं नाही. हात उगारायचा नाही. आम्हाला ज्या वेळी फकिरीची दीक्षा देतात तेव्हा कुराणातले जे मंत्र म्हणतात ना, ते माणूस मेल्यावरचे असतात. दीक्षेनंतर आम्ही स्वतःला प्रेतच समजतो. प्रेत कुणाला घाबरतं का ? तसं आपण न घाबरता स्पष्ट बोलायचं. कसला लोभ धरायचा नाही. अल्लाचा दुवा देत फिरायचं.'

दीक्षाविधीबद्दल कुतूहल वाटून मी विचारलं, 'काय असतो हा विधी ?'

'आधी हजामाला बोलवून अंगावरचे सगळे केस काढायचे. अगदी डोक्यापासून ते पायाच्या नखापर्यंतचे. हे बोटांवर केस असतात ना, ते सुद्धा ठेवायचे नाहीत. पुढं तीन दिवस त्यानं काही खायचं नाही. पाणी देखील प्यायचं नाही. जागचं उठायचंही नाही. एका कोपऱ्यात बसून राह्यचं. नंतर मग अंगावर कफन चढवतात. तीन दिवस जेवण घालतात. मयत झाल्यावर जसं घालतात, तसं.'

अधूनमधून फकीर येत होते. या चौघा 'सरगुरूं'ना भेटून जात होते. त्यांची नमस्काराची पद्धतही वेगळी होती. आलेला माणूस हाताचा पंजा समोर धरायचा. सरगुरू आपल्या एका पंज्यानं खालून आणि दुसऱ्यानं वरून धरून काहीतरी पुट-पुटायचं, मान हलवून खूण करायचं, की झालं. एकानं पावतीपुस्तक आणि शेदीडशे रुपये इमदाद अलींकडे आणून दिले. इमदाद अलींना लिहिता-वाचता येत नसावं. त्यांनी मला पावतीपुस्तकावर 'अब्दुल' अशी अक्षरं लिहायला सांगितलं. ती मी लिहिली. त्यांनी खिशातून कॉलेज-गॅदरिंगमधे स्वयंसेवक लावतात तसे कागदी बिल्ले काढले. कुणाला तरी त्याखाली हिरवी रिबन स्टेपल करायला सांगितलं. त्यावर 'मानकार फकीर मंडळ, पूना' असं लिहिलं होतं. वर सातशे शहाऐंशी आकडा होताच.

मी विचारलं, 'मानकार फकीर मंडळ' म्हणजे काय ?'

'पुणे विभागाचं हे मंडळ आहे. मुंबईचं वेगळं, साताऱ्याचं वेगळं. आमचा सभासद असला म्हणजे आम्ही सांगू त्या भागातच त्यानं फिरायचं. सांगू तितके दिवस. मानकार म्हणजे आम्ही मानकरी आहोत. मानानं आम्हाला बोलावलं जातं.'

'हे बिल्ले कशासाठी ?'

'उद्या इथं खूप गर्दी होईल जरब लावून घ्यायला. आम्ही आमच्या फकिरांना हे बिल्ले लावणार. लोकांना बिल्ले असलेल्या फकिराकडनंच टोचून घ्यावं. कारण इथं बाहेरगावाहून अनेक फकीर येणार. त्यांना टोचायची माहिती नसते. त्यांनी कसंही टोचलं तर उगाच आमच्यावर नको !'

मधाचा डफ वाजवणारा म्हणाला, 'साहेब, आमच्यात असे बाजारू फकीर फार शिरलेयत. त्यांचा काय बंदोबस्त करता येईल ?'

एकदोन फकिरांनी माना डोलावल्या.

'तुम्ही ठरलेल्या भागातच फिरता, म्हणजे तिथल्या ओळखीच्यांच्याकडेच जाता का ?'

'कुणी सत्यनारायण घातला की पाच फकिरांना जेवण घालतं. कुठलंही चांगलं कार्य झालं की फकिरांना जेवण म्हणा किंवा काहीतरी जमेल ते घालतात. अशा लोकांकडेच आम्ही जातो. बहुतेकजण हिंदूच असतात. आमचे बऱ्याच वर्षांचे प्रेमाचे संबंध आहेत.'

मला आठवलं : एका दुकानात एक फकीर आला होता. दुकानदारानं त्याला आत बोलावलं. फकिरानं हातातल्या धूपदानात धूप टाकला. त्यातून भरपूर धूर निघू लागला. हातातल्या मोरपिसाच्या कुंच्यानं वारा घालून त्या फकिरानं दुकानात धूर पसरवला. दुकानदारानं गल्ला उघडला. फकिरानं त्यातही धूर पसरवला. दुकानदारानं रुपया त्याच्या हातावर ठेवला. दुवा देत फकीर निघून गेला.

मी विचारलं, 'तुम्हाला कुठल्या गोष्टीचा त्रास असतो ?'

एक म्हातारा फकीर म्हणाला, 'साब, ती भिकारीप्रतिबंधक गाडी येते ना, तिचा लई तरास होतो. ते सरळ आत उचलून टाकतात. आम्ही काय भिकारी आहोत काय ? पण त्यांना काय, सगळे सारखेच ! उचलून येरवड्याला भिकारी सुधार केंद्र आहे, तिथं नेऊन टाकतात.'

'तिथून पुढं ?'

इमदाद अली म्हणाले, 'कोर्टापुढं उभं करतात. शिक्षा होते, दंड होतो. काहीतरी करून परत यायचं. कारण आम्ही पोरंबाळंवाली माणसं. आम्ही रस्त्यावर कुणाकडेही मागत नाही. आमच्या ठरलेल्या घरांपुढं जाऊन उभे राहतो. पण रस्त्यानं फिरताना या गाडीवर सारखं लक्ष ठेवावं लागतं. गाडी दिसली की आम्ही लगेच एखाद्या बोळात शिरतो. गल्लीबोळ बदलत आम्ही काही वेळानं रस्त्यावर आलो की तिथं गाडीवाले वाटच पहात असतात. ते आम्हाला अगदी अलगद पकडतात.'

इमदाद अलींचा पांढरा आणि चकणा डोळा दीनवाण्या कोकरासारखा वाटला. त्या गाडीवाल्याला माहीतसुद्धा नसेल, की आपण इमदाद अली मेहताबअली शाह सदर सर खलिफे रफाईला पकडत आहोत !

शनिवार संध्याकाळ.

उद्या मुख्य दिवस असल्यानं आज दर्ग्याला चादरी वाजतगाजत आणायचे कार्य-

क्रम सुरू झाले होते. ज्यांच्यातर्फे चादर यायची ते यजमान दर्ग्यात येऊन उभे रहायचे. इमदाद अली दोनचार फकिरांना सांगायचे, ' जा यांच्याबरोबर. ' की ते त्यांच्याबरोब जाऊन ती चादर वाजतगाजत, भजनं म्हणत घेऊन यायचे. मी विचारलं, ' हे चादरी देणारे कोण लोक आहेत ? '

ते म्हणाले, ' कसब्यात अनेक घरांत पीर असतात. त्या समाध्या शेख सल्लयाच्या शिष्यांच्या, शिष्यांच्या, शिष्यांच्या कुणाच्या तरी असतात. त्यांवर आता घरं बांधली गेली आहेत. पण घरमालक त्या पीराची शांती म्हणून ही चादर चढवत असतात. '

मागे मी कसब्यातल्या एका मित्राकडे गेलो होतो. तो पिंपरीच्या एका छोट्या कारखान्याचा मालक होता. जातीनं ब्राह्मण. संध्याकाळी त्यानं अंधारातल्या जिन्यातल्या कोनाड्यापुढचा पडदा बाजूला सारला. डोक्यावर मुसलमानांसारखा रुमाल अडकवला. धूप उजळला. मुसलमान पसरतात तसे हात पुढं पसरून दोनचार क्षण डोळे मिटून गप्प उभा राहिला आणि परत आला. मी विचारलं, ' ही काय भानगड आहे ? '

तो म्हणाला, ' पीराची सवारी आहे. माझी जी काही भरभराट दिसते आहे, ती या सवारीमुळं आहे. '

मी तिथल्या बॅटरीच्या प्रकाशात पाहिलं. तिथं अर्धा पाऊण फूट आकाराचा पीराचा दगड आणि त्यावर छोटी हिरवी चादर अंथरलेली होती.

इमदाद अलींनी एक त्यातल्या त्यात मोठी मिरवणूक बघायला नेलं. कुंभार समाजाच्या एका घरातून दर वर्षी ही चादर येते. त्यांच्या घरावर लायटिंग केलेलं होतं. मिरवणुकीसमोर फकिरांमधली तरुण मुलं तल्वारीचे खेळ खेळत होती. गर्दीमुळं नुसत्या वरच्या वर तलवारी फिरताना दिसत होत्या. धूप भरपूर पेटवला गेल्यानं सगळीकडे धूर झाला होता. इमदाद अली म्हणाले, ' आज रात्री हेच खेळ बघायला मिळतील. रातीबुलरफाई नावाचा कार्यक्रमच असतो. '

रात्री दहा–साडेदहाला दर्ग्याच्या आवारातल्या अंगणात रातीबुलरफाई कार्यक्रम सुरू झाला.

एका छोट्या लाकडी स्टेजवर पाचसात फकीर डफ, चिमटे इत्यादी वाद्यं घेऊन बसले होते. हे चार विभागांचे खलिफाही तिथंच दाटीदाटीनं बसले होते. डफावर सगळे जोरदार ऱ्हिदममधे म्हणत होते, ' ला इलाही अल्लल्लाह मुहम्मद उर रसूलील्लाह... '

आवारात खच्चून माणसं भरली होती. मागे पायऱ्यापायऱ्यांवर स्त्रिया आपल्या पोरांना उंच करून आतले खेळ दाखवत होत्या.

मधल्या रिंगणात चारपाच तरुण मुलांनी वरचे कपडे काढलेले होते. खालचे मळके सुरवारवजा पायजमे तसेच ठेवले होते. कुणी वर हिरवे, ऐतिहासिक नाटकात घालतात तसे वर निमुळते होत गेलेले टोप घातले होते. त्यांवर कलाबतूचं विणकामही केलेलं होतं. त्या सगळ्यांची शरीरं बांधेसूद आणि काटक होती. ज्याचा खेळ व्हायचा असेल तो त्या छोट्या स्टेजपाशी जायचा. इमदाद अली त्याला तलवार काढून द्यायचे. तो तलवारीची धार बोट लावून बघायचा. हातात घेऊन त्या फकिरांपुढं धरायचा. फकीर एक पंजा खाली आणि एक पंजा वर धरून डोळे मिटून तोंडानं काहीतरी पुटपुटायचे आणि 'ठीक आहे' अशी खूण करून आपले हात तिथून काढून घ्यायचे.

रिंगणात जलाली फकीर हातात आसूड घेऊन उतरला होता. पाय जरा वर करून त्यावर हातातला आसूड ओढून फाड्कन आवाज काढत होता. पाठीवरही तो तसाच आवाज काढायचा. दुसऱ्याला उभा करून त्याला हात पुढं करायला लावून त्याच्या-वरही आसूड ओढायचा.

आता तलवार घेऊन दाढी वाढवलेला, पाठीपर्यंत केस राखलेला एक जाडजूड तरुण हातात तलवार घेऊन फिरवत रिंगणभर फिरू लागला. तो अशा रीतीनं आणि इतक्या वेगानं तलवार फिरवत होता, की कुणीही त्याच्या जवळ चारपाच फूट अंतरावर कुठूनही जाऊ शकलं नसतं. फेकलेलं शस्त्रही त्याच्यापर्यंत पोचू शकलं नसतं. मधनंमधनं स्वतःच्याच पाठीवर, छातीवर तो तलवार मारल्यासारखं करायचा. दुसऱ्या एका उघड्या तरुणाला दोघातिघांनी जमिनीवर उताणं झोपवलं. त्याचं तोंड हिरव्या रुमालानं झाकून टाकलं. तलवार फिरवणारा त्याच्या जवळ येऊन नाचत त्याच्या मानेवर तलवारीनं वार करण्याचं ॲक्टिंग करू लागला. लोक शहारून हा आता काय करणार ते पाहू लागले. पण वरून वार करण्याऐवजी त्यानं झोपलेल्याच्या मानेला तलवार टेकवली. तेवढ्यात धूपदान घेऊन एकजण आला आणि त्यानं तिथं फुंकून धूर करून टाकला. दोघेचौघे तरुण फकीर त्याच्या भोवती वाकून बघू लागले. या गडबडीत तलवारीची धार मानेला टेकवली होती, ती त्यांनी आडवी केली असावी. मग सगळेजण मिळून ती तलवार त्याच्या मानेवर दाबू लागले. डफावरचं म्युझिक आणखी जोरजोरात सुरू झालं होतं. काही वेळानं ती तलवार आपण ओढून बाहेर काढतोय असं ॲक्टिंग करीत काढलीही गेली. झोपलेला माणूस उठून मान खांद्यावर पूर्ण कलती धरून स्टेजपाशी गेला. फकिरानं काहीतरी पुटपुटून हात लावला. त्याबरोबर तो 'बरा' होऊन रिंगणात परत जाऊन फिरू लागला.

हाच खेळ आलटूनपालटून कुणाच्या हातावर केला गेला. कुऱ्हाड फिरवत अशीच परत मानेवर ठेवली गेली. या खेळाचं 'रहस्य' सगळ्यांनाच ठाऊक असावं. पण तरीही रस घेऊन सगळे बघत होते. या सगळ्या खेळांमधे स्वतःला फटके मारून

घेणं, तलवारीनं स्वतःवर घाव मारून घेणं, किंवा दुसऱ्याकडून घाव मारून घेणं, असाच प्रकार जास्त होता.

खेळांच्या मधूनच मी रात्री बाराच्या सुमाराला घरी जायला निघालो. बाहेर सगळी कसबा पेठ झोपलेली होती. आतमधे आवाजाचं काही वाटत नव्हतं. पण बाहेर तोच आवाज लाऊडस्पीकरवर दणदणत होता. वाटलं, गणपतीवाल्यांमधे आणि यांच्यांत या बाबतीत सारखंच दिसतंय.

तिसऱ्या दिवशीची दुपार.

कुंभारवेशीकडनं खाली उतरू लागताच ट्रॅफिक पोलिसानं स्कूटर अडवली. गर्दीमुळं पुढचा सगळा रस्ता बंद होता. स्कूटर बाजूला लावून पायी पुढं जाऊ लागलो. रस्त्याच्या कडेला फिरणारे रंगीत लोखंडी पाळणे दिसल्यावर वाटलं, ही तर अगदी जत्राच दिसत्येय. फुगेवाले फुगे घेऊन फिरत होते. इतर जत्रांपेक्षा वेगळेपण म्हणजे इथं अत्तराच्या छोट्या पेट्या पुढं घेऊन अत्तरवाले बसले होते. लोक त्यांच्याकडून फाया करून घेऊन कानात ठेवत होते. सुरमावाल्यांकडून कुणी सुरमा लावून घेत होते. मुसलमानी पद्धतीच्या टोप्याही विकायला आलेल्या होत्या.

काहीजण कडक इस्त्रीच्या सफारीमधे, आपापल्या छोट्या मुलांना कडेवर घेऊन चालले होते. पेशानं हे औद्योगिक कामगार असावेत. मुलांनाही छोटा सफारी–सूट. डोक्यावर मुसलमानी बुटकी टोपी.

जमावातल्या जवळपास प्रत्येकाच्या हातात जरब होती. तलवारीसारखी ती वर करून धरलेली. बऱ्याचजणांनी जरबेच्या टोकावर गुलाबाचं लालभडक फूल खोचलेलं दिसत होतं. काहींनी तर रुपया भरून जरब टोचण्यासाठी घेतलेली हिरवी पावतीही जरबेत टोचून ओवली होती. त्यामुळं वरून पाहताना गुलाबाची लाल फुलं आणि हिरव्या पावत्या हवेत तरंगत आहेत असं वाटत होतं.

काहींच्या हातात एकेक मोठी जरब, तर काहींच्या हातात पाचपंचवीस जरबांचा जुडगा असे. लहान मुलांच्या हातांत वीतभर लांबीची जरब दिलेली होती. प्रत्येकाच्या गालावर मधोमध पांढुरका अंगारा लावलेला होता. याच ठिकाणी जरब टोचली जाणार होती. इतक्या लहान मुलांना टोचणार कशी आणि ती टोचून घेणार तरी कशी, याचं नवल वाटलं.

दर्ग्याच्या दारात फुलांची दुकानं होती. त्यांत पिवळ्या–लाल दोऱ्यांची पोकळ बंडलं टांगलेली होती. ती कशासाठी आहेत हे मला कळेना. नंतर विचारू कुणाला तरी, असं ठरवलं.

दर्ग्यात दर्शन घेऊन लोक जरबा घेऊन कागदीपुऱ्यातून एका दिशेनं चालले होते.

काल भेटलेला एक फकीर दिसला. त्याला सगळा प्रोग्रॅम विचारला. तो म्हणाला, ‘ देवरकर माळ्याचं घर आहे ना, तिथल्या चौकात सगळे जमतात. तिथं जरबा लावल्या जातात. तिथून सगळे मिरवणुकीनं दारूवाला पुलावरनं, सोन्यामारुती चौकातनं दर्ग्यावर येतात. तिथं जरबा काढल्या जातात. ’

‘ मग तो भाकरीचा नैवेद्य ? ’

‘ त्याच वेळी मिरवणुकीनं भाकऱ्या निघतात. इथं पोचल्यावर त्यांचा नैवेद्य दाखवला की सगळ्यांना प्रसाद वाटतात. ’

देवरकरांच्या घरापाशी खूपच गडबड होती. बँडवाले येऊन आवारात बसलेले होते. एका चिंचोळ्या रस्त्याने पुढं गेलो तर मोठ्या चौकात दोनचार हजार माणसांचा जमाव खच्चून भरलेला होता. बऱ्याच लोकांच्या हातांत वर फूल लावलेल्या जरबा होत्या. जमावात स्त्रिया अजिबात नव्हत्या.

गळ्यात कॅमेरा अडकवलेले दहाबारा फोटोग्राफर्स जमावात फिरत होते. त्यांच्या हातांत प्लॅस्टिकचे छोटेमोठे आल्बम्स होते. लोक ते आल्बम्स पहात होते. ते जरब बसवून घेतलेल्यांचे आदल्या वर्षीचे फोटो होते. मधे एका तरुणानं गळ्यात हार घातलेला, दोन्ही गालांत जरब बसवलेल्या, शेजारी त्याच्या खांद्यावर हात टाकून खास पोजमधे उभे असलेले त्याचे दोस्त, असेच बरेचसे फोटो होते. ज्यांना फोटो काढून घ्यायचाय असे लोक त्यांच्याशी सौदा करीत होते.

ओळखीचे लोकही अधूनमधून भेटत होते. नाना पेठेतला चांभार समाजातला एक दाढी राखलेला, स्मार्ट तरुण मुलगा भेटला. अशोक म्हात्रे त्याचं नाव. त्याच्या कडेवर एक वर्षाचा मुलगा होता. अशोक म्हणाला, ‘ हा पुतण्या. नवसानं झालाय. ’ हातात बोट धरलेला दुसरा चार वर्षांचा मुलगा होता. तो दुसऱ्या भावाचा पुतण्या. हे दोघेही आज जरब लावणार होते.

मी म्हटलं, ‘ हे घाबरून गेले असतील. ’

अशोक म्हणाला, ‘ छे: छे: ! त्यांनाच विचारा की ! ’ असं म्हणून मोठ्या मुलाला त्यानं विचारलं, ‘ काय रे, घाबरला आहेस का ? ’

त्यानं निर्विकारपणं नकारार्थी मान हलवली.

मी अशोकला म्हटलं, ‘ याचा पुढं काही त्रासबिस होत नाही का ? म्हणजे सुजणं, पू येणं...’

‘ छे: छे: ! अजिबात नाही. ते तर देवाचं आहे ! ’

जवळ उभा असलेला एकजण म्हणाला, ‘ एखाद्या वेळी बाईचा पदरबिदर लागला तर सुजतो गाल. या देवाला बाईचं फार वावडं आहे. ’

मनात म्हटलं, ‘ म्हणजे सुजलं तरी या युक्तिवादानं सुटका होऊ शकते. ’

काल दुपारी ओळखीचे झालेले, रात्रीच्या कार्यक्रमात पाहिलेले पाचसहा फकीर

वेगवेगळ्या ठिकाणी उभे दिसले. त्यांनी हसून ओळख दिली. मी एकाला विचारलं, ' जरब कुठं टोचतात— याच चौकात ? '

तो म्हणाला, ' इथंच. आमच्यातले एक सगळ्यांत मोठा खलिफा आहेत. ते आले की काम सुरू होतं. त्यांचा तो मान आहे. इथंच आम्हा प्रत्येकापुढं रांगा लागतात. '

' कुणी कुणाहीकडनं टोचून घेतं का ? '

' हां. पण काहींचं काही फकिरांपाशी वळण पडून गेलेलं असतं. ते त्यांच्याकडेच टोचून घेतात. '

उन्ह कडक पडलेलं होतं. चौकातली गर्दी वाढत चालली होती. घरांच्या ओट्यांवर, पत्र्यांवर माणसं बघायला गर्दी करून बसली होती.

अखेरीस कुणीतरी म्हणालं, ' आ गये वो ! '

पाहिलं, तर एका अतिशय आजारी दिसणाऱ्या हिरव्या टोपीतल्या, साठी–पासष्टीच्या फकिराला दोघेजण खांद्याला धरून आणीत होते. त्यांना स्वतःला चालताही येत नव्हतं. ते आलेयत म्हटल्याबरोबर जमावातल्या प्रत्येक फकिरासमोर त्या गर्दीत खच्चून रांगा लागल्या. जरब टोचण्याचा कारखानाच सुरू झाला.

सुरुवातीला एक तरुण पोरगा होता. फकिरासमोर तोंडाचा ' आ ' करून तो उभा राहिला. फकिरानं त्याच्या तोंडात एका हाताचा अंगठा घातला आणि बाहेरून दुसऱ्या बोटानं गाल चाचपून पाहिला. तो बहुधा स्नायूंचे थर अलग करीत असावा. तसा एक बिंदू त्याला मिळाल्यावर दुसऱ्या हातातली जरब त्यानं त्या तरुणाच्या तोंडात सरकवली आणि त्या बिंदूतून पुढे जोरात ढकलली. पोत्यातून दाभण बाहेर काढावं इतक्या सहजतेनं ते झालं. त्या मुलाच्या चेहऱ्यावर इंजेक्शन देताना होतात तशा वेदना उमटल्या. पण क्षणानंतर त्याचा चेहरा पूर्वीसारखा झाला. त्यानं फकिराला दुसऱ्या गालात जरब घालायची खूण केली. फकिरानं तोपर्यंत त्याची जरब स्वतःच्या तोंडात आडवी धरून ठेवली होती. तीही आधीच्याच पद्धतीनं त्यानं टोचली. तोंडातून जरबेची दोनतीन फूट लांब मागची, चाँदताऱ्याचं डिझाइन असलेली बाजू बाहेर पडलेली आणि टोकं गालाबाहेर तीनचार इंच आलेली. जरबेच्या लांब बाजूंना दोन्ही हातांनी आधार देत तो मुलगा पुढं झाला. जाताना रुपयाचं नाणं त्यानं फकिराच्या हातावर ठेवलं.

लोक गर्दी करून आपला नंबर लवकर लागावा म्हणून धडपडत होते. मागचा तरुण कंबरेच्या वर उघडा होता. त्याच्या हातात बऱ्याच जरबांचा जुडगा होता. त्यानं तर जरबा टोचून घ्यायचा सपाटाच लावला. गालांतनं दोन तर घेतल्याच; शिवाय गळ्यावरच्या स्वरयंत्रापुढची कातडी फकिरानं चिमटीत धरून त्यातही छोटी जरब आडवी खुपसली. छातीवर, पोटावर, पाठीवर अशाच पद्धतीनं त्यानं बऱ्याच

छोट्या जरबा टोचून घेतल्या. टोचलेल्या जरबा सोडल्यावर तशाच तिथं लटकून रहात होत्या. आणखीही दोनचार मोठ्या जरबा उरल्या. मला प्रश्न पडला : हा ह्या कुठं टोचून घेणार ? त्याही अवस्थेत फकिराला त्यानं कानाकडे बोट दाखवलं. फकिरानं त्याच्या कानाच्या पाळीत एकेक आणि पाळीच्या वरच्या आणि मागच्या बाजूलाही एकेक अशा चार मोठ्या जरबा टोचून घेतल्या. त्याचे मित्र त्या मोठ्या जरबा वर धरून ठेवायला मदत करीत होते. एका मित्रानं एकेका बाजूच्या मोठ्या जरबांना दोऱ्यानं एकत्र बांधून दिलं. मग या टोचून घेणाऱ्यानं त्या दोन्ही हातांनी जमिनीला समांतर अशा धरल्या आणि पुढं चालू लागला. इतक्या वेदना आनंदानं सहन करणाऱ्या या माणसाला मी मनातल्या मनात 'वेदनामहर्षी' असं नावही देऊन टाकलं. तो पुढं जाऊ लागला. अनेक बाण घुसलेल्या एखाद्या जखमी योद्ध्यासारखा तो दिसत होता. त्या गर्दीत खरं तर जराही पुढं सरकायला जागा नव्हती. पण याला पाहिल्यावर, मोझेससमोरचा समुद्र जसा दुभंगला तशी गर्दी बाजूला सरकून याला वाट निर्माण झाली.

सर्व वातावरणात भरपूर धुरळा होता. फकीरही जरब घालताना ती साधी पुसूनही घेत नव्हते. खूप जरबा असतील तर स्वतःच्या मळक्या खिशांतही ठेवीत होते. यांना इन्फेक्शन कसं होत नसेल ? एक तर पीरावरच्या श्रद्धेमुळं शरीराची प्रतिकारशक्ती जागृत होऊन लहानसहान इन्फेक्शन आपोआप बरीही होत असतील. आणि झालंच इन्फेक्शन तर मघाचा 'बाईचा पदर लागल्या'चा युक्तिवाद आहेच !

लहान पोरांना टोचायच्या वेळी ते अगदी रडण्याचा कहर करीत. इंजेक्शनच्या वेळी जसं मूल धरून ठेवावं लागतं, तसं इथंही करावं लागे. पण इथं बरोबर आई नाही. बापाला एकट्याला जमत नसे. मग रांगेतली मागची माणसं धरायला मदत करायची. मुलाचं तोंड उघडून ती जरब आत सरकवायला ते मूल संधीच देत नसे. एकदा जरब आत घातली की मग गाल लुसलुशीत असल्यानं जरब सहज दुसरीकडून बाहेर पडत असे. काही मुलं रडून गोंधळ करता करता स्वतःच्या हातानंच ती जरब उपसून टाकीत. तरीही नामोहरम न होता हताश चेहऱ्यांनी बाप आणि फकीर मुलाच्या दुसऱ्या गालावर परत एकदा प्रयत्न करीत. काही मुलं वर जरब बसवताना खाली बापाच्या अंगावर मुतीही करीत. 'अरे रे रे रे' असं म्हणून बाप त्याला जरा बाजूला धरीत असे. काही मुलं तर पाचसहा महिन्यांची तान्ही होती. टोपडी घालून छानपैकी दुपट्यात गुंडाळून आणलेली होती. त्यांना काय होतंय हे कळायच्या आतच जरब टोचली जायची.

गर्दीत सरकायला जागा नव्हती. त्यातही फकिरांसमोर रांगा. जरा कुठं वाट काढत पुढं जावं, तर जरबा लावलेला माणूस समोरनं येत असला की त्याला आपला धक्का लागू नये म्हणून धडपडून मी मागे सरायचो. ती माणसं गर्दीतनं व्यवस्थित वाट

काढायची. जाताना तोंड समोर न ठेवता ते बाजूला वळवायची. त्यामुळं जरबा रस्त्याच्या दिशेला रहायच्या. कमीत कमी जागेतनं ते पुढं जाऊ शकायचे. एकजण असाच पुढं चालला असता मी समोरनं आलो. मला सरकायला जागाही नव्हती. त्याला जरबेमुळं बोलता येत नव्हतं. त्यामुळं तो क्रुद्ध चेहरा करून घशातून आवाज काढून जनावरासारखा ओरडला, तेव्हा मी दचकून मागे हटलो.

देवरकरांच्या घराकडनं त्या चौकात येणाऱ्या बोळाकडे मी सरकत होतो. कारण तिकडनं बँडचा आवाज येत होता. नाचणीच्या भाकरीची मिरवणूक निघालेली होती. तिथं पोचलो तर निराशाच झाली. बँडच्या मागं पाचपंचवीस माणसं होती. देवरकरांच्या तरुण खेडूत मुलानं डोक्यावर एक मोठ्या आकाराचा हारा घेतलेला होता. त्यावर सगळीकडनं गुलाबी रेशमी कापड गुंडाळलेलं होतं. त्यात भाकरी असाव्यात. मिरवणुकीत बाकी काहीच नव्हतं. या समोरच्या गर्दीतनं ही छोटी मिरवणूक जाणार कशी, हा प्रश्नच पडला.

गर्दीत परत मिसळून तो चौक पार केला.

चौकाच्या दुसऱ्या टोकाकडनं जरब लावलेले लोक बाहेर पडत होते, त्यांच्याबरोबर मी चालू लागलो. कसब्यातल्या त्या छोट्या अरुंद रस्त्यावरही बाजूला बघेलोकांची दाटी झालेली होती. बायका मात्र लांबून, उंचावरून हे दृश्य पाहत होत्या. मधे एका घरापाशी बरेच हंडे, कळश्या पाण्यानं भरून ठेवलेले होते. तिथल्या बायकांच्या वेषावरनं ते हिंदू कुटुंब होतं. घरातला एक चाळिशीचा पुरुष जरब लावून आलेल्यांना पाणी पाजीत होता. पक्षी जशी चोच उघडतो तसा जरब लावलेला माणूस वर पाहून तोंड उघडीत असे. हा माणूस त्यात ग्लासानं पाणी ओतीत असे. तोंडानं कधी कधी म्हणायचा, ' पाणी पिऊन घ्या इथं; म्हणजे चक्कर येणार नाही. '

काही ठिकाणी मुलं प्लॅस्टिकच्या पिशव्यांमधून लिम्लेटच्या गोळ्या घेऊन उभी होती. ती जरबवाल्यांच्या तोंडात त्या गोळ्या टाकीत होती.

कसब्यातून नागझरीपाशी रस्ता दारूवाला पुलाकडे वळतो. तिथं जरा मोठी जागा आहे. तिथं जरब लावलेले लोक मघाच्या धंदेवाईक फोटोग्राफरकडनं फोटो काढून घेत होते. गळ्यातले हार तसेच. मित्रांच्या चेहऱ्यांवरचे भावही तसेच. अगदी आल्बममधल्या फोटोसारखे.

मी तिथं उभा असताना मध्यम वयाचा, पांढरी कडक पँट–शर्ट घातलेला, जरब लावलेला माणूस चक्कर येऊन खाली पडला. मी धावणारच होतो; पण तेवढ्यात त्याच्या बरोबरच्या माणसानं त्याला सावरलं. जरबेवर तो पडला असता तर काय झालं असतं त्याची कल्पनाही करवेना. बरोबरच्या माणसानं त्याला खांद्याला धरून उचललं आणि तशाच स्थितीत तो त्याला चालवू लागला. एकदोन पावलं गेल्यावर

परत तो चक्कर येऊन खाली घसरला. वरनं ऊन्ह आणि याच्या तोंडातल्या जरबा, यामुळं त्याला चक्कर आली असणार. त्याच्या शरीरावर रक्ताचे दोनचार थेंबही पडलेले दिसत होते.

परत त्या माणसानं त्याला उठवलं आणि त्याला तो चालवू लागला. परत घसरल्यावर मी पुढं होऊन म्हणालो, ' अहो, त्याला बाजूला घ्या. झोपवा. नाहीतर मरायचा तो ! '

बरोबरच्या माणसानं माझा पुढं केलेला हात झिडकारला आणि तो म्हणाला, ' तुम्ही मधे पडू नका. हे भुताखेताचं आहे. हा चालत कसा नाही ? ही फेरी त्याला पुरी केलीच पाहिजे ! सुटका नाही त्याला. '

नाइलाज होऊन पुढं निघालो. आता या सगळ्याला मिरवणुकीचं स्वरूप राहिलेलं नव्हतं. ट्रॅफिक-पोलिसांनी ट्रॅफिक बंद केली होती. मोकळ्या रस्त्यावर दोहो बाजूंनी गर्दी. पण रस्त्यावर मात्र जरब लावलेले लोक तुरळक-तुरळक संख्येनं चाललेले. वाटेत अशोक परत भेटला. त्याच्याबरोबर त्याचे दोन्ही पुतण्ये होतेच. त्याच्याबरोबर चालू लागलो. त्याच्या खांद्यावरच्या छोट्या पुतण्यानं जरब काढून टाकलेली होती. पण ती छोटी जरब लॉलीपॉपसारखी त्यानं हातात धरलेली होती. पायी चाललेल्या पुतण्यानं मात्र जरब अजून गालात ठेवलेली होती. मी त्याला विचारलं, ' त्रास होतोय का ? ' त्यानं मघासारखी निर्विकारपणं नकारार्थी मान हलवली.

अशोक म्हणाला, ' या वेळी अडीच-तीन हजार लोकांनी जरब लावली असणार. त्यांतले ऐंशी टक्के तरी हिंदू असतील. बाकीचे मोमेडियन. '

मला मात्र पन्नास-पन्नास टक्के वाटले.

मी विचारलं, ' गालावर या जरबेची खूण राहते का रे ? '

तो म्हणाला, ' छे: ! दोनचार दिवसांत होत्याचं नव्हतं होऊन जातं. '

चालत चालत फेरी मारून दर्ग्याकडे आलो. तिथं मघासारखंच जत्रेचं स्वरूप होतं. आत जाण्यासाठी जरब लावलेल्यांच्या रांगा लागल्या होत्या. रांग टाळून आत पोचलो. आत मुख्य दर्ग्यासमोरच्या भागात फकीर जरबा काढून देत होते. त्या काढताना कुणाच्या गालातून रक्तही येत होतं. एका ठिकाणी तर तांब्याभर रक्ताचा सडा पडला होता. जरब काढल्यावर फकीर लोक तिथल्या एका दगडी भांड्यातली राख मंत्रून, जरब काढलेल्या ठिकाणी लावून देऊन लोकांना पुढं ढकलीत होते. तिथंही लोक फकिराच्या हातात काहीतरी दक्षिणा ठेवीत होते. फकीर त्यांना अंगाऱ्याची पुडी देत होता.

त्या दर्ग्यासमोरच्या भागात थोडी मोकळी जागा होती. तिथं गादी टाकून पीरजादे बसले होते. पीरजाद्यांपाशी जाऊन बसलो. मला पाहून ते हसत म्हणाले, ' बघा- सगळ्या धर्मांचे लोक किती गुण्यागोविंदानं एकत्र येताहेत ! देवासमोर सगळे

सारखेच. आता हे बघा, हे तर वडार समाजाचे आहेत. पण त्यांचा या दर्ग्यावर आल्याशिवाय एक दिवस चुकत नाही.'

शेजारी काळ्या कुळकुळीत रंगाचे पांढरा शर्ट, धोतर आणि वर पांढरी टोपी घातलेले, पहिलवान–टाइप गृहस्थ बसले होते. हे धोत्रे. बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर आहेत. ते म्हणाले, 'मला जरा मेंटलचा त्रास होता. सगळीकडे हिंडलो. शेवटी गाणगापूरच्या अलीकडे सैलानीबाबाचा दर्गा आहे, तिथं बरं वाटलं. नवस तिथं बोल्लो; पण तिथला फकीर म्हणाला, तो फेडा मात्र पुण्याच्या धाकट्या शेखसल्ल्याला. म्हणून इथं आलो. आणि इथंच चिकटलो. घरातनं बाहेर पडलो तेव्हा जवळ काही नव्हतं. आता माझ्याकडे दोन ट्रक, एक 'फियाट', दोन 'याझदी', एक 'टी व्ही एस्' आहे. माझा कर्वे रोडला फ्लॅट आहे. मुलीलाही घेऊन दिला आहे. मुलाला मूल होत नव्हतं. नवस केला होता. मुलगी झाली. बोला, बाबानं आणखी कायकाय द्यायचं?'

'मुलगी झाल्यावर काय करतात हो नवसाचं? कारण मुलीला तर जरब लावायची बंदी आहे ना?'

'मुलीच्यासाठी आज मी जरब लावून घेतली ना! उगाच रागवायला नको हा बाबा.' समोरच्या शेखसल्ल्याच्या कबरीकडे बोट दाखवून तो म्हणाला, 'याचा रागही तसाच वाईट असतो बरं का! नवस फेडला नाही तर गरगरा फिरवून आपटेलसुद्धा आपल्याला तो!'

कुणीकुणी येऊन पीरजाद्यांना नमस्कार करून जात होतं. मला ते म्हणायचे, 'हा माणूस बघा, सातारहून येतो. दर वर्षी. शेतकरी आहे.'

मी त्याला विचारलं, 'नवस पुरा होतो का?'

'नवसाला पावल्याशिवाय नवस फेडायचाच नसतो. इतके लोक येतात त्या अर्थी पावत असलाच पाहिजे!'

एक म्हातारा फकीर पीरजाद्यांच्या जवळ येऊन काहीतरी सांगू लागला. पीरजाद्यांनी जरा नाराज होऊन विचारलं, 'ते तिथं एवढं रक्त सांडलं कसं? तुम्ही लोक नीट कामं करत नाही का?'

तो फकीर जरा अजीजीनं म्हणाला, 'जरब काढणाऱ्याचा काही दोष नाही. टोचणाऱ्याचा आहे. तिकडे नवखी माणसं कसंही टोचतात. गालाच्या भागात त्यानं टोचली होती. रक्त निघणारच.'

बाहेर पडलो. निघताना पीरजादे म्हणाले, 'आता नाचणीची भाकरी येईलच. प्रसाद घेऊन जा. बघा कशी झुंबड उडते तुकडा मिळवायला!'

मी मनात म्हटलं, हे सगळं हिंदूंच्या आधीच्या अनेक उत्सवांत पाह्यलंच आहे. त्यांना म्हणालो, 'नको. जरा काम आहे.'

बाहेर पडलो तेव्हाही गर्दी ओसरली नव्हती. जरब लावून येणारी माणसं पाहून

पाहून मळमळू लागलं होतं. कसब्यातच रहाणाऱ्या एका स्नेही कुटुंबाकडे गेलो आणि म्हणालो, ' जरा चहा द्या बुवा. म्हणजे बरं वाटेल. '

दुसऱ्या दिवशीची सकाळ.

दर्ग्यावर फकिरांचं आज जेवण असतं. नंतर ते आपापल्या गावी घरी निघून जातात. दर्ग्याच्या आवारात दगडांच्या चुलीवर मोठं पातेलं चढलेलं होतं. खाली लाकडं जळत होती.

आत दर्ग्यात गेलो. कालचा हाऊसफुल्ल दर्गा आज रिकामा होता. देवळात जसे देवदर्शनाला लोक येतात तशी इथंही लोकांची ये-जा चाल्लेली होती.

काल फुलांच्या दुकानात पाहिलेला पिवळ्यालाल दोऱ्याचा गुंडा हातात घेऊन एकजण दर्ग्याच्या देवळाभोवती फिरत होता. वटपौर्णिमेला जसा वडाला दोरा गुंडाळतात, तसा या देवळालाच तो गुंडाळत होता. मी तिथल्या एका माणसाला विचारलं, ' हे काय करताहेत ? ' तो म्हणाला, ' तो नवस करतोय. '

' दोरा कशाला गुंडाळतोय ? '

' त्यानं शेखसल्ल्याला नवसानं बांधून घेतलं असा याचा अर्थ. त्याचा नवस पुरा होईपर्यंत शेखसल्ल्याची सुटका नाही. नवस पुरा झाला की मग हा माणूस धागा तोडेल, तेव्हाच याची सुटका. '

बघितलं तर देवळाभोवती असे खूपच धागे गुंडाळले गेले होते. त्यांचा एकमेकांत गुंताही झाला होता.

मी विचारलं. ' पण मग तोडताना आपला धागा ओळखायचा कसा ? '

तो हसला नि म्हणाला, ' कुठलाही एक तोडला तरी चालतं. '

बाहेर आलो. एका फकिरानं मला ओळखलं आणि आग्रह करून त्याच्या शेडमधे नेलं. काही फकीर वर्तुळ करून बसले होते. काही पहुडले होते.

बसल्यावर मी विचारलं, ' काल खूप गर्दी होती, नाही ! '

इमदाद अली म्हणाले, ' दर वर्षी वाढतच चाल्लीय. '

' या उरसात एकेका फकिराची कमाई किती होते ? '

सगळे एकमेकांकडे बघू लागले. एकजण म्हणाला, ' शंभर रुपये पडतात एकेकाला. आमच्या फाटक्या संसारात वर्षातनं एकदाच एवढी कमाई होते. '


दोनचार तरणेबांड फकीर सोडले, तर सगळ्यांच्या तब्येती खप्पड. चेहरे सुरकुतलेले. मळकी, फाटकी चिरगुटं अंगावर घातलेले. परवाच्या रात्रीचे तलवारींचे खेळ करणारे फकीर आठवले. कालचे खसाखस जरबा टोचणारे फकीरही आठवले. आमच्या गावी लहानपणी तमाशे यायचे. रात्र ते लोक गाजवायचे. दुसऱ्या दिवशी सकाळी चावडीसमोर उतरलेले त्यांचे फाटकेतुटके संसार पाहायला आम्ही जायचो,

तसं आता वाटलं.

इमदाद अलींनी हातावर एक पुडी ठेवली. दोन्ही हातांत माझा हात धरून ते काहीतरी पुटपुटले. म्हणाले, ' घ्या. '

मी पुडी उघडून पाहिली. काळपट लाल रंगाचा नाचणीच्या भाकरीचा तुकडा, त्यावर कांद्याच्या एकदोन लांब फोडी आणि मेथीच्या भाजीचे दोनचार कण असं होतं. ठेवून, उबून त्या सगळ्याला आंबट–कुजट वास येत होता. मघापासून इथं आल्यावर कसला वास येतोय ते कळलं. काहीतरी मौल्यवान दिलंय असा भाव चेहऱ्यावर आणून ते म्हणाले, ' अपनी बिब्बी, बालबच्चे उनको दे दो. सब अच्छा हो जायगा. '

मी निरोप घेऊन निघालो. पुलावरून जाताना नदीत पुडीचं विसर्जन केलं आणि घराच्या दिशेनं परतलो.



# देवदासी एक मागोवा

निपाणीला गेल्यापासून सुभाष जोशीला म्हणत होतो, मला तुमच्या या सुशीलाबाई नाईकांशी सविस्तर बोलायचंय. पण सुभाषने सांगूनही त्यांना वेळच मिळत नव्हता. एरवी एखाद्या देवदासीची मुलाखत घ्यायची इच्छा बोलून दाखवली तरी त्या त्या भागातले कार्यकर्ते दहापाच देवदासी समोर आणून बसवायचे. त्याही देवदासी कुणीतरी शहरातला साहेब आपली माहिती घ्यायला आलाय म्हटल्यावर हरखून जायच्या. काहीतरी सरकारी मदत मिळेल अशा आशेने थोडा लाचार भावही चेहऱ्यावर आणून बसायच्या. मग मला तो गैरसमज आणि लाचारी दूर करण्यासाठी काही वेळ प्रयत्न करावा लागायचा. पण सुशीलाबाईंच्या बाबतीत वेगळंच. बाई बाई म्हणतोय त्यांना, पण ती एक तिशीची मुलगीच. त्या भागातल्या पद्धतीचं लाल काठाचं, निळं जर्द नऊवारी लुगडं नेसलेलं होतं, त्यामुळे ते मुलगीपण लपून जायचं. इतर देवदासी काळ्या-सावळ्या, कानडी वळणाच्या चेहऱ्याच्या. तर सुशीलाबाई गोऱ्या. चेहरा बदामाच्या आकाराचा. कपाळावर पावलीच्या आकाराचं कुंकू. गालाचा वरचा भाग, नाकाचा पुढचा भाग उन्हाने रापून काळपट लाल झालेला. त्यांना पहिल्यांदा पाहिलं ते पुण्याला, विषमता निर्मूलन शिबिरात. त्यावेळी एका खोलीत देवदासींच्या ' सावली ' या संस्थेसंबंधी पत्रकार परिषद चालली होती. सगळ्या देवदासींमध्ये सुशीलाबाईच धीटपणे उत्तरं देत होत्या. जट कशी असते असं कोणी विचारताच त्यांनी डोक्यावरचा पदर खांद्यावर सोडला आणि जवळपास सहा इंच रुंदीची, दीडदोन इंच जाडीची आणि अडीच फूट लांब अशी जट पाठीवरनं समोर घेऊन दाखवली तेव्हा सर्वजण दचकलेच होते.

सुशीलाबाई ' सावली ' संस्थेच्या अध्यक्ष आहेत. ' सावली'तर्फे निपाणीमध्ये देव-

दासी आणि तंबाखू कामगार स्त्रियांच्या मुलांसाठी पाच-सहा पाळणाघरं, अंगणवाड्या चालतात. सकाळी आठ वाजताच सुशीलाबाई सुभाषच्या घरी येतात. तिथं एक खोली कोठीसाठीच दिलेली आहे. मी उठून, आवरून वरच्या खोलीत वाचत बसलेलो असायचो. खालून भांड्यांचे, डब्यांचे, बोलण्याचे आवाज येऊ लागत. त्या बोलण्यातही सुशीलाबाईंचा खणखणीत मोठा आवाजच अधिक वेळा असायचा. खाली जाऊन पाहिलं तर ते शिधावाटप होतं. अंगणवाड्यांमध्ये दुपारी मुलांना एखादा पदार्थ बनवून दिला जातो. त्यासाठी स्टोव्हच्या रॉकेलपासून सगळं सामान रोजच्या रोज दिलं जातं. अंगणवाडीत शिकवणाऱ्या तरुण मुली ते घेऊन जातात. दिवसभर सुशीलाबाई या अंगणवाडीतून त्या अंगणवाडीत फिरत असतात. कुणाची काय अडचण आहे ते बघतात. एखाद्या वस्तीतली मुलं या शिक्षिकेला त्रास देतात, मग त्यांचा 'बंदोबस्त' करून येतात. कुठल्या वस्तीतले लोक आपल्या मुलांना धाडत नसतील तर त्यांना भेटून, पाठवायचा आग्रह करून येतात. मध्येच जाऊन घरचा स्वयंपाक करून येतात. बहिणीच्या मुलीला शाळेत जाऊन आणतात. परत संध्याकाळी सगळा हिशोब करायला सुभाषच्या घरी. या सगळ्यात माझ्याशी बोलायला खरोखरीच वेळ तरी कसा काढणार ?

शेवटी सुभाषने त्यांना सांगितलं, 'सुशीलाबाई, ती कामं आम्ही करतो. तुम्ही वरच्या खोलीत जाऊन बसा बरं.' तेव्हा कुठे आमचं निवांतपणे बोलणं सुरू झालं.

'तुम्ही आता पूर्णवेळ 'सावली'चंच काम करता ?'

'हो.'

'याच्या आधी काय करत होता ?'

'तंबाखू कुटायच्या कामावर होते. देसायांच्या वखारीत होते. तिथं संप झाला. वर्षभर चालला होता. शेवटी ती वखारच बंद झाली. इतर बाया दुसऱ्या वखारीत कामाला बी लागल्या. पण मग सरांनी ( सुभाष जोशींचं हे निपाणीतलं प्रचलित नाव ) ही 'सावली' संस्था काढली, आमच्यासारख्या देवदासींसाठी. मग त्याच्यात काम करू लागले.'

आदल्या दिवशीच सुभाषचं आणि माझं या देसाईंविरुद्धच्या लढ्याविषयी बोलणं झालं होतं. साध्या मागण्या पुढं केल्या म्हणून मालकानं वखारच बंद करून टाकली. मग यांच्या युनियनने वर्षभर त्यांच्या वखारीसमोर बैठा सत्याग्रह केला होता. मालक इतका निर्दय की त्याने सुभाषला मारायला दोनदा मारेकरी घातले. एकदा तर स्वतःच सुभाषच्या अंगावर मोटार घातली. सुभाषने बाजूला उडी मारून जीव वाचवला. त्यावर हिंदी सिनेमासारखी मालकाने परत गाडी वळवून आणली. पण तोपर्यंत बरोबरच्या कामगार स्त्रिया सावध झाल्या आणि त्यांनी ती गाडी अडवून सुभाषचे प्राण वाचवले होते.

सुभाष म्हणाला, ' त्या लढ्यातच सुशीलाबाई खऱ्या तयार झाल्या. एखाद्या वेळी लढाऊ कृती करणं त्या मानानं सोपं असतं. पण वर्षभर कामगार स्त्रियांचं नीतिधैर्य टिकवून धरणं हे अवघड काम. त्यात सुशीलाबाई आमच्या लक्षात आल्या. '

मी सुशीलाबाईंना विचारलं, ' त्या संपात खूप हाल झाले ना तुमचे ? '

' काय सांगायचंय. सरांचा आधार होता म्हणून लढलो. युनियनची धान्याची सहकारी सोसायटी आहे ना, सोसायटीने आम्हाला वर्षभर धान्य पुरवलं म्हणून आम्ही जगलो. '

' मग तुम्ही देवदासी प्रश्नाकडं कशा आलात ? '

' निपाणीला परिषद नव्हती का झाली ? तेव्हापासनं. '

मी त्या परिषदेला आलेलो होतोच. १९८१ साली ती झाली होती. त्यावेळी सुभाषने तंबाखू कामगारांमधल्या देवदासी एकत्र केल्या होत्या. सभेमध्ये एकीच्या अंगात आल्याने इतर देवदासी घाबरल्याही होत्या.

' तुम्हाला सोडलं कधी देवाला ?'

' लई लहान होते. माझा बाप हमाली करीत होता. आम्ही जातीचे बेरड. आई तंबाखू कुटायचं काम करायची, माझ्यासारखं. तीनचार वर्षांची असतानाच जट आली. लोक म्हनायला लागले, हिला देवाला सोडा. पन माझा बाप तयार नव्हता. आमच्या घरात ही देवी नव्हती, प्रथा नव्हती. पन माझी आजी फार खट्याळ. तिनं बापामागं धोसाच लावला. आईनं माझी जट एकदा फोडायचा प्रयत्न केला. पन नेमकी त्याच वेळी माझ्या भावाला खांडकं ( खरूज ) झाली. आजी म्हनाली, बघा, देवीच्या जटेला हात लावला म्हणून असं झालं. तरी बापानं हट्टानं मला देवाला सोडलं नाही. आनि काही वर्षांनी आईनं परत जट फोडून बगितली. त्या येळंला नेमका दुसऱ्या भावाला थंडी ताप आला. तो टायफाइड निघाला. माज्या आजीच्या अंगात यायचं. तिनं इतका गोंधुळ घातला की बाप म्हनला, तुजं म्हननं असंल तसं होऊ दे. '

जरा थांबून त्या म्हणाल्या, ' आत्ता विचार करते तेव्हा कळतंय, जट सोडवली तवा भावाला खांडकं झाली, टायफाइड झाला, यात चमत्कार काही नाही. तो निस्ता योगायोग, पन तेव्हा आमचं घर सगळं अडाणी. त्यांनी इतरांना घाबरवलं. तरी बाप विरोध करत राह्यला होता. '

' तुम्हाला सोडायचा विधी सौंदत्तीला झाला का इथं झाला ? '

' दोन्हीकडंबी झाला. त्या वर्षी आमच्या शेजारच्या लोकांचा टेंपू चालला होता डोंगरावर. ( सौंदत्तीला ). त्यातनंच आमीबी गेलो. बाप मात्र तिकडं आला नाही. तो रागावून घरीच बसला. डोंगरावर गुरवानं कपाळावर भंडारा लावला, कुकू लावलं. पाच मणी ओवलं, ते दर्शन गळ्यात बांधलं. आधी लिंब नेसवला होताच. डोईवर भंडारा शिपडला. झालं माजं देवाबरूबर लग्न. आता मध्ये तुमी लोकांनी ओरडा केला

ना, आता अजून तिथं लग्नं लागतात. पन गुपचूप. मागं मी गेलंते तवा गुरव म्हनला इथं यल्लम्माच्या पाया पडा. खाली गावातल्या घरी या. अंगावर भंडारा पन दिसू देऊ नका. खाली आपन लग्न लावून टाकू. दोनचार वर्षांमागं तर एका गुरवाला पोलिसांनी अटक करूनश्री नेलंतं. आम्हाला सगळे सांगत होते की त्या गुरवांमधली आपसातली भांडणं आहेत म्हनून नेलंय. पन आम्हाला ठावूक होतं की त्यांना देवाला सोडवल्यावरनंच नेलंय. '

'मग गावाकडं परत कसं लग्न लावलं तुमचं ?'

'नंतर काही वर्षांनी आमच्या भावकीतल्या लोकांनी या भागातल्या जोगतिनींना जेवण घातलं. हजार माणूस जेवलं. मांडव घातला होता.'

'त्यावेळी तुमच्या वडलांनी भाग घेतला का त्यात ?'

'हो. त्यावेळी मात्र त्यांनीच अंगावर घेतलं. ते म्हणायचे, एकदा सोडली ना देवाला, मग आता सगळं करू. आमच्या घरात तशी जोगतिणीची प्रथाच नव्हती. आजीनं, आईनं मला कधी घराबाहेरसुद्धा सोडलं नाही, कुणाची नजर माझ्यावर पडू दिली नाही, माझं कुठं पाऊल घसरू नाही म्हणून सारखी आपल्या नजरेसमोर ठिवायची.'

'मग जोगवा कशा मागायच्या तुम्ही ?'

'ठरलेली थोडी घरं मागून लगेच माघारी यायचं. मी बाळ जोगतीण होते. मला खूप ठिकाणांहून बोलावणी यायची. कुणाचा लिंब नेसवायला, कुणी नवस केला म्हणून जेवायला. पण आज्जी अगदी मोजक्या ठिकाणी पाठवायची.'

'बाळ जोगतीण म्हणजे काय असतं ?'

'तीन परकार हायेत. गरती जोगतीण म्हंजे लग्नानंतर जिला देवाला सोडलंय. येधव जोगतीण म्हंजे नवरा मेल्यावर जी जोगतीण झालीय. या सगळ्यात बाळ जोगतिणीला फार मानतात. ती शुद्ध असती म्हनून.'

सुशीलाबाईना विचारलं, 'त्यावेळी, ही प्रथा वाईट आहे, त्यातनं बाहेर पडायला पाहिजे असं कधी वाटायचं का ?'

'नाही'चा आडवा हात हलवून त्या म्हणाल्या, 'अजिबात नाही. उलट वाटायचं, आपल्या अंगात देव आहे. आपण वावगं वागून चालणार नाही, असं वाटायचं. सगळीकडनं मान मिळायचा. पण नंतर काही जोगतिणींची परिस्थिती पाह्यली तेव्हा शंका यायला लागली. एक जोगतीण माझ्याबरोबरची. मैत्रीण होती ती. वयात आल्यावरोबर एकाबरोबर राहिली. झुलवा लावून. पोटात मूल राह्यल्यावर गेला ना तो पळून. यल्लुआईनं त्याला का नाही अडवला ? दुसऱ्या एका जोगतिणीच्या गालात किडं पडलं होतं. क्यानसर का काय म्हणतात ते झालं होतं. ती जिवाला इतकी कंटाळली होती की तिनं दोनदा विहिरीत उडी घेतली, तरी जीव गेला

नाही. एकदा ढेकणाचं औषध प्यालं, त्यातनंबी वाचली. शेवटी त्या रोगानंच मेली. तवा वाटलं, यल्लुआई आमच्या पाठीशी हाय असं म्हनतो, तिनं या जोगतिणीचा रोग का नाही बरा केला ?'

'मग तुम्ही इतर जोगतिणींना हा प्रश्न विचारला का तेव्हा ?'

'मी मनात ठेवला तेव्हा. पन काहींना नंतर विचारलं तर त्या मलाच उलट म्हनाल्या, तू आयच्या इरुद्ध बोलू नको, आय शाप दील. एकदा सौंदत्तीच्या डोंगरावर आम्ही सरकारी जग घेऊन गेलो होतो.'

'सरकारी जग ?'

'आमच्या इथलं निपाणकर देसाई जहागीरदार हायेत. त्यांचा जग मानाचा असतो. तो ठराविक बाळ जोगतिणीच नेतात. तर तो जग मध्ये ठेवला होता. भोवती आम्ही बसलो होतो. एक जोगतीण सारखी डोक्यातल्या जटेतल्या उवा काढायची आणि टचाटच मारायची. म्या इचार केला, आम्ही यल्लुआईचं येवढं सगळं करतो, तिच्यापायी सगळा संसार सोडून दिला तरी ती आम्हाला सुख का लागून देत नाही ?'

पुण्याच्या शिबिरात पाहिलेली सुशीलाबाईची जट आठवली. ती नंतर त्यांनी काढून टाकल्याचंही कळलं होतं. विचारलं, 'तुमचीही जट खूप मोठी होती ना ? त्याचा काय त्रास व्हायचा ?'

'अहो, ते तीनचार किलोचं वजन चोवीस तास डोक्यावर वहायचं. काही जणींना केसाच्या शेवटी शेवटी किंवा एका बाजूला जट असते. माझी अगदी पुढून इथपासून जट होती.'

'पण एवढी वाढली कशी ? वडाचा चिकबीक घालायचात का ?'

'आमच्याकडं ती पद्धत नाही. आम्ही हळद आणि तेल घालतो. विंचरलं नाही की जट वाढत राहते. माझी तर इतकी वाढली की त्याच्यासाठी मी पिशवी करून घेतली होती. जटांची घडी करायचे आन् पिशवीत ठिवून ती दोन्ही खांद्याला अडकवायचे. मी तंबाखूत काम करायचे. तवा तिथली धूळ जटंवर बसू नाही, कुणाचा पाय जटंला लागू नाही म्हणून पिशवी वरी पडायची.'

'कुणाचा पाय लागला तर तुम्हाला त्रास व्हायचा ?'

'मला कसला त्रास. उलट ज्याचा पाय लागला असंल तोच घाबरून जायचा. माझ्या परत परत पायावी पडायचा. या जटेच्या ओझ्यानं डोकं दुखायचं, मान दुखायची, कंबर दुखायची. म्हणून मी इथं सरांकडं कामगारांच्या मीटिंगला यायची तेव्हा कधी पुढं बसायची नाही. मागं भिंत बघून, भिंतीला टेकून बसायची. तरच मग पाठ दुखायची नाही. सुट्टं बसलं का लगे लागलीच पाठ दुखायला. साधी मान वळवता यायची नाही. आता आपल्याला बाजूचं बघायचं असलं तर आपण पटकन मान वळवतो की नाही, पण त्यावेळी असं बघावं लागे...' असं म्हणून त्यांनी सगळं

शरीरच हळूहळू वळवून नव्वद अंश कोनात फिरवून दाखवलं.

'डोकं तर इतकं दुखायचं की सांगता येत नाही. केसांच्या मुळांना हा सगळा ताण बसायचा. झोप लागायची नाही. आडवं नेहमीसारखं झोपता यायचं नाही. ते ओझं एका बाजूला ठेवायचं आणि कुशीवर झोपायचं. आपण या कुशीचं त्या कुशीवर होऊ शकतो, तसंही जमायचं नाही. परत असं उठावं लागे. जट इकडची तिकडं उचलून ठेवायची आणि मगच कुशी बदलता यायची.

मला हे ऐकताना मणामणाच्या बेड्या घातलेल्या जुन्या काळच्या कैद्यांची वाचलेली वर्णनं आठवली. किंवा सिंदबादच्या पाठीवर बसलेला, कधीही न उतरणारा म्हातारा आठवला.

त्या पुढे म्हणाल्या, 'मी सतत फडक्याने डोस्कं आवळलेलंच असायचं. या डोकेदुखीसाठी माझ्या भावानं मला कोल्हापूरच्या डॉक्टर कारंड्यांकडे नेलं. मी डोकं इतकं आवळलं होतं, की तिथंच चक्कर आली. डॉक्टर म्हणाले, तुम्ही हे आवळल्यामुळे मेंदूला रक्त कमी पडलं म्हणून चक्कर आली. तुम्ही ही जट उतरवा, तुम्हाला मी औषधाशिवाय बरी करतो. एक पैसा मला फी म्हणून देऊ नका. पण मी त्याला तयार झाले नाही.'

'का बरं?'

'माझी श्रद्धाच होती. मला आसपासचे लोकसुद्धा म्हणायचे, जट उतरव. पण मी उलट त्यांना म्हणायचे, माझ्या जटेचं तुम्हाला ओझं उचलावं लागतंय का? मंग कशाला बोलता? मी जट काढली आन् काय झालं तर तुमी जिम्मेदार राहता का? असं बोलल्यावर लोक गप व्हायचे. पन नंतर इथं देवदासी परिषद झाली. तिथं अरगडे डॉक्टरने जट काढलेली मुलगी आनली होती. तिचा जट असतानाचा फोटु पन दाखवला. तेव्हा आमी काहीजणींनी नावं दिली. पन धीर होत नव्हता. बाबा आढाव, सुभाष जोशी सर हे परत परत सांगत राह्यले आन् ते पटत गेलं.'

'मग जट सोडवली कधी?'

एका वेळेला अशी सोडवलीच नाही. पुढं मग आम्ही जोगतिणींची जट सोडवायला लागलो. तिला धीर यावा म्हणून मी माझी जट थोडी कापून दाखवायचे. असं करता करता शेवटी कधी तरी माझी जट पुरती कापली गेली.'

असं म्हणून तिने पदरातनं मानेखाली हात घालून लहान मुली घालतात तशी छोटीशी वेणी काढून दाखवली.

'आता खूपजणींची आम्ही जट उतरवली. पहिल्या पहिल्यांदा सोडवत बसायचो. त्यात खूप वेळ जायचा. खर्चही यायचा. दोन हंडे गरम पाणी लागायचं. आता सरळ कातरीने जट कापून टाकतो. परवा बंगलोरचा एक मुसलमान माणूस मुलीला घेऊन आला होता. त्या मुलीच्या डोक्यात जट होती. त्याला तिथल्या हॉस्पिटलच्या

गळ्यात मोठ्या डॉक्टरनं सांगितलं का जट सोडवू नका, देवीचा त्रास होईल. पण त्यानं आमच्या इकडची बातमी पेपरात वाचली तसा पत्ता काढत इकडं आला. तिची जट सोडवली. कुणी देवदासीबरोबर लग्न ठरवतात, लग्न लावायला सुद्धा इथं घेऊन येतात. आम्ही लग्न लावून देतो. पलीकडं कणगलं गाव आहे, ते म्हणजे जोगतिणींचा मोठा अड्डाच आहे. तिथल्या पण जोगतिणी परवा जट सोडवून घ्यायला आल्या होत्या. '

' ' सावली 'तर्फे तुम्ही अंगणवाड्याही चालवता ना ? '

' हो. सहा आहेत. '

' उद्या अंगणवाड्या बघू या आणि नंतर तुमच्या घरी पण जाऊन येऊ. '

' आमच्या घरी ? ' सुशीलाबाई हसल्या व म्हणाल्या, ' ठीक आहे. जाऊ उद्या. '

म्हणून निरोप घेतला.

सुशीलाबाईंबरोबर फिरून अंगणवाड्या पाहिल्या. निपाणीच्या वेगवेगळ्या भागात भाड्याने घेतलेल्या खोल्यांमध्ये त्या चालतात. कुठं दहा बाय बाराची खोली, तर कुठं आठ बाय दहाची दगडी, म्युनिसिपाल्टीची आधी कोंडवाडा म्हणून वापरत असलेली जागा. एकीकडे दोनचार पाळणे टांगलेले. कुठं एकेका पाळण्यात दोनदोन मुलं झोपलेली. खेळणी अपुरी, त्यांतली बरीचशी तुटलेली. पण बाया म्हणून नेमलेल्या तरुण मुली हसतमुख. एका ठिकाणी आम्ही आत जाताच मुलं उभी राहिली आणि बेंबीच्या देठापासून ओरडली, ' एक साथ...नम ऽऽ स्ते ' आणि पुढे लगेच हात वर करून हलवून म्हणाली, ' टा...टा. ' मी दचकले आणि हसूही आलं. सगळी खाली बसली आणि टकमक माझ्याकडे बघत बसली. चार वर्षांच्या आतली मुलं. काही तर सहा महिन्यांचीच. एका ठिकाणी दोन बाया. प्रत्येकीच्या कडेवर शाळेतली एक किंवा दोन मुलं असायचीच.

सुशीलाबाई म्हणाल्या, ' या पोरांना बाईंचा आईपेक्षा जास्त ओढा आहे. कारण दिवसभर यांच्याकडं ती पोरं असतात ना. सकाळी यांची शाळा साडेआठला सुरू होते ना, त्याच्या आतच ही पोरं पायरीवर येऊन बसतात. शाळा सुटली तरी घरी बळं बळं धाडावं लागतं. एरवी बाई रस्त्यानं जात असल्या आणि पोरांनी पाहिलं, तर ' बाई...बाई ... ' करीत ओरडत धावतात. '

बाई लाजत होत्या. एक म्हणाली, ' अहो, सुट्टीच्या दिवशी आम्हाला घरी करमत नाही अगदी. '

भिंतीवर कागदावर हाताने लिहिलेला चार्ट होता. वार आणि त्यापुढे उपीट, इडली, शिरा....अशा पदार्थांची यादी होती. एका कोपऱ्यात दोनतीन स्त्रिया पाठ करून बसल्या होत्या. या कोण असं विचारताच सुशीलाबाई म्हणाल्या, ' तान्ही मुलं

आहेत ना, त्यांच्या आया. आता एक वाजता वखारीला एक तासाची सुट्टी असते. तेवढ्यात येऊन मुलांना पाजून जातात. '

बाईंनी मुलांना उठून मला गाणं म्हणून दाखवायला सांगितलं. छोटी, पिटुकली पोरं उभी राहिली आणि कल्ला करीत गाणी म्हणू लागली. आतापर्यंतच्या दबकलेल्या चेहऱ्यांवर एकदम चैतन्य दिसू लागलं. ' शाळेची घंटा वाजे घण ... घण .... घण ' हे म्हणताना मुलं घंटेची ॲक्शन करीत. पाटीलबुवाचा उल्लेख येताच मिश्यांची ॲक्शन करून दाखवीत. सर्कसवाल्याच्या गाण्यात विदूषकाची ॲक्शन करायची. कुठल्यातरी गाण्यात हाताची बंदूक करून एक डोळा मिटून ' ठ्ठो ' असा जोरात आवाजही काढला. वास्तविक बाईंनी एकच गाणं म्हणायला सांगितलं होतं, पण एक संपलं की कुणीतरी दुसरं सुरू करायचं. अशी आठदहा गाणी झाल्यावरच ते सगळं संपलं.

अंगणवाड्या पाहून सुशीलाबाईंच्या घराकडे निघालो. निपाणीतली घरं दगडी, बुटकी आणि कौलारू. कौलं अर्ध्या नळीच्या आकाराची, जुनी. रस्त्याच्या दोन्ही बाजूला गटारं. घरांना बाहेरून टोपल्याच्या संडासची काळी छोटी दारं. त्यातून येणारी सौम्य दुर्गंधी.

एका घरापाशी आत थोडी चौकासारखी जागा होती. तिथं चारपाच स्त्रिया एका नळावर धुणं धूत होत्या. त्यांच्यातनं वाट काढीत आत गेलो. एक चारसहा खोल्या लायनीत असलेलं लांबुळकं, पुढं पडवी असलेलं घर होतं. पडवीत सगळीकडे अडगळ, पसारा पडलेला होता. एका खोलीसमोर सुशीलाबाई थांबल्या. खोलीपुढं खाटेवर एक सत्तरीचा, धोतर आणि वर कोपरी घातलेला म्हातारा बसलेला होता. मी सुशीलाबाईंना विचारलं, ' वडील का ? ' त्या म्हणाल्या, ' हो. ' वडिलांनी हात जोडले.

आत आठ बाय दहाची खोली होती. सगळीकडे अव्यवस्थितपणा होता. कोपऱ्यात चूल आणि चारसहा भांडी होती. एका दोरीवर वाकळी टाकून पार्टिशन केलं होतं. त्या पलीकडे यल्लम्माचा देव्हारा होता. पितळी मुखवटे, मळकी वस्त्रं... असा एकूण पसाराच होता. सुशीलाबाई म्हणाल्या, ' पहिलं मी पूजाअर्चा रोज करायचे. आता हे काम सुरू झाल्यापासून मी पूजा सोडूनच दिलीय. बापाला वाटलं तर आठ दिवसांतनं एकदा करतो तो पूजा. पहिलं किती भीती वाटायची देवीची. आता घरात जशी वाळवी लागलेली लाकडं पडलीत तसेच देव. '

बाहेर येऊन बसलो.

भिंतीवर फ्रेम केलेले चारसहा फोटो लावलेले होते. तरुण नवरा-बायकोंचे दोन होते. मी विचारलं, ' हे कोण ? ' सुशीलाबाई म्हणाल्या, ' हे दोन भाऊ आणि त्यांच्या बायका. ' भाऊ वेषावरून आणि दिसण्यावरून बऱ्यापैकी शिकलेले वाटत होते. वडिलांचा आणि आईचाही एक या वयातला फोटो दिसला. कोपऱ्यात एक

फोटो लावला होता, तो मी बघू लागलो. तर सुशीलाबाई म्हणाल्या, 'माझा फोटो हाय त्याच्यात.' स्टुडिओत काढलेला फोटो होता. खुर्चीत एक पन्नाशीची, नऊवारी लुगड्यातली बाई बसलेली, आणि मागे दोघीजणी उभ्या. त्यांतल्या एक सुशीलाबाई. मी विचारलं, 'ह्या बाई कोण?'

'माझी गुरू होती ती जोगतीण, आणि उभी आहे ती मैत्रीण.'

'तुम्ही दोघींनी हे खांद्यावर गदेसारखं काय घेतलंय?'

'चवऱ्या आहेत त्या.'

शेजारच्या खोलीतनं एक बाई बाहेर येऊन बसली. काजळतीट लावलेल्या मुलाला मांडीत घेऊन पाजू लागली.

मी म्हटलं, 'शेजारी कोण राहतं?'

सुशीलाबाई म्हणाल्या, 'माझे भाऊच राहातात. ही वहिनीच हाय. दोघा भावांचे संसार वेगळे वेगळे आहेत. ते मालकाकडं दिवाणजी म्हणून आहेत. मी कामगारांच्यात काम करते, ते त्यांना पसंत नाही. त्यांनी मला वेगळं काढलं. पण बापानं मला सोडलं नाही.'

वडील म्हणाले, 'मी किती दिवस पुरणार आहे हिला? आता हिनं स्वतःच्या लग्नाचं बघावं का नाही?'

मला जरा अवघडल्यासारखं झालं. पण सुशीलाबाई म्हणाल्या, 'माझं मी बघून घेईन.'

मी विचारलं, 'पण तुम्ही लग्नाचा विचार का करत नाही?'

'अहो, हे देवदासीचं काम मी अंगावर घेतलंय ना, आता मीच लग्न करून बाजूला झाले तर इतर देवदासी काय म्हणतील?'

वडील नाराजीने म्हणाले, 'अग, पण तुझे हातपाय थकले तर कोण बघणार तुला?'

सुशीलाबाई जोरात म्हणाल्या, 'मी संघटनेसाठी कष्ट करते, संघटना माझ्या म्हातारपणी माझ्याकडं नक्की बघेल. आमचे सर आहेत. आमच्याकडनं गिन्नीही कधी त्यांनी घेतली नाही, का आमच्याकडचा चहा बी घेतला न्हाई. जीव धोक्यात घालून तो बाबा आमच्यासाठी काम करतोय. मग आम्हीच का मागं राहायचं?' माझ्याकडं वळून त्यांनी विचारलं, 'का हो, बघलंच का नाही संघटना माझ्याकडं म्हातारपणी?'

मला काय बोलावं ते समजेना. संघटनांची आयुष्यं किती कमी असतात, हे त्यांना मला सांगता येईना. पण त्यांच्या आशावादाला मोडता घालणंही जमेना. म्हणून म्हटलं, 'हो, हो. बघेलच की.'

सुभाषच्या घरी येताना मनात विचार येत होता, सुशीलाबाईंना मागं पाहिलं होतं, त्याच्यापेक्षा त्या कितीतरी बदलल्या. आता त्यांना केवढा आत्मविश्वास आला. मागे पुण्याला बघितल्या, तेव्हा नाही म्हटलं तरी बुजल्या होत्या. काल वरच्या खोलीत आल्या तेव्हा तिथे सतरंजी घालून त्यावर एकच तक्क्या ठेवलेला होता. मी समोर बसून त्यांना तक्क्याशी बसा म्हटले, तर इतर देवदासींसारखं, ' नाही साहेब, आम्ही इथंच बरे आहोत ' असं काही न म्हणता त्या व्यवस्थित तक्क्याला टेकून बसल्या. संध्याकाळी मध्येच पाचदहा मिनिटं लाईट गेले. पण जराही विचलित न होता त्याच खणखणीत आवाजात त्यांनी बोलणं चालू ठेवलं. दुपारी अंगणवाड्या पाहताना तिथल्या एका बाईंना काहीतरी सुनावत होत्या. ते मला कळलं नाही म्हणून नंतर त्यांना विचारलं. अंगणवाड्यात सर्वसाधारण मुलांना महिना एक रुपया फी आणि ज्यांची परिस्थिती चांगली त्यांना दोन रुपये महिना फी आहे. ज्यांना हेही परवडत नाही त्यांना फीच नसते. पण नास्ता तर सर्वांनाच देतात. त्या बाईंनी अशी काहीच फी न देणाऱ्या एका मुलाला येत जाऊ नको सांगितलं. ते कळलं म्हणून सुशीलाबाई त्यांना झापत होत्या. ' उलट अशासाठीच तर आपण ' सावली ' काढलीय. पैसे मिळवायसाठी नाही. पैसे कमी पडतील की नाही हा विचार तुम्ही कशाला करताय ? आम्ही स्वतःला विकू, पण मुलांना कमी पडू देणार नाही. '

माझ्या आसपास अनेक संघटना आहेत. त्यांतल्या काहींची प्रगती, विस्तार खूपच झालाय. पण ' संघटना कशासाठी ? ' हा प्रश्न त्या संघटनांमधून जवळपास पुसला गेलाय. आता त्या संघटना वाढण्यासाठी, एवढंच उत्तर राहलंय. सुशीलाबाईंपाशी मात्र ती समज एवढी जागृत कशी ? सुभाषच्या बायकोने–सुनीताने–सहकारी सोसायटी काढून त्यामार्फत एक मोठं किराणा आणि इतर सामानाचं दुकान काढलंय. त्याच्या निपाणीत चार शाखाही निघाल्यात. सुशीलाबाई त्या संस्थेतही उपाध्यक्ष किंवा तत्सम पदाधिकारी आहेत. अंगणवाड्यांच्या ' राउंड ' बरोबर या दुकानांचीही राउंड त्या घेतात. ती सर्व दुकानं दुथडी भरून चालली आहेत. सुभाषला विचारलं, ' सुशीलाबाई शिकल्यात किती ? '

तो हसला. म्हणाला, ' या वर्षी त्या सही करायला शिकल्या आहेत. इतके दिवस अंगठाच करायच्या. ' त्याने फायलीतल्या एका कागदपत्रावरची त्यांची किरट्या अक्षरांतली, ओळ सोडून खालीवर धावणारी सही दाखवलीही.

सुशीलाबाईंमध्ये ही समज, हे बळ कुठून आलं असावं ? सुभाष म्हणाला होता, ' सुशीलाबाईंना आपण ब्रह्मचारी असल्याचा फार अभिमान आहे बरं का. आपण इतर जोगतिणींसारखं बहकलो नाही, याच्यातून त्यांच्यात ताकद येत असावी. आमच्या लढ्यातसुद्धा त्यामुळेच त्यांचं वजन इतर जणींवर पडायचं. '

तेव्हा ऐकताना हे जरा हास्यास्पद वाटलं होतं. अशा शारीरिक गरजा मारून

विकृती निर्माण झाल्याची अनेक उदाहरणे पाहिलेली, ऐकलेली होती. सुशीलाबाईंचं दुसरं टोक असलेल्या कोल्हापूरच्या सोनाबाई नावाच्या एका देवदासीचं उदाहरण आठवलं. या बाई देवदासी चळवळीच्या सुरुवातीपासून आमच्याबरोबर होत्या. सभेमध्ये तडफदार, घणाघाती बोलत. आम्हा सर्वांनाच वाटलं, देवदासींना एक त्यांच्यातलंच चांगलं नेतृत्व मिळालं. काही वर्षांनंतर त्यांच्याविषयी स्थानिक लोकांकडनं वेगळं ऐकू येऊ लागलं. त्या परत जोगवा मागू लागल्याचं कळलं तेव्हा वाटलं, त्या जीवनातल्या दारिद्र्याची आपल्याला काय कल्पना येणार ? आपण त्यांना समजून घेतलं पाहिजे. पण मागच्या खेपेस आलो, तेव्हा ज्यांच्यावर माझा विश्वास आहे अशांकडनं कळलं की त्या स्वतः जरी पन्नास–पंचावन्न वर्षांच्या असल्या तरी वीस वर्षांच्या मुलापासून साठ वर्षांच्या माणसांपर्यंत त्यांचे शरीरसंबंध आहेत. तीस-चाळीस तोळे सोनं, एकदीड किलो चांदी आणि लाख रुपयांची रोकड त्या बाळगून आहेत. आसपासच्या झोपडपट्टीतल्या देवदासींकडून त्या टॅक्सही गोळा करतात.

सुशीलाबाईंचं एकूण जाज्वल्य रूप पाहता त्यांची सोनाबाई नक्कीच होणार नाही, याची खात्री वाटली आणि बरंही वाटलं.

संध्याकाळी माझी दुसऱ्या गावाला निघायची घाई सुरू झाली. सुभाष पोहोचवायला स्टॅंडवर येणार होता. खाली अंगणवाडीच्या बायांची गडबड, ॲल्युमिनियमच्या डब्यांचे आवाज, सुशीलाबाईचा खणखणीत आवाज... हे सगळं ऐकू येऊ लागलं. जिना उतरून खाली आलो. मला वाटलं, त्या खोलीबाहेर येऊन निरोप घेतील. पण त्या कामाच्या रगाड्यात गुंतलेल्या होत्या. म्हणूनच मीच आत डोकावून म्हटलं, ' येतो बरं का. '

त्या प्रसन्नपणे हसून म्हणाल्या, ' या, या. '

## गारगोटी

संध्याकाळची वेळ.

गारगोटीहून शेळोलीला निघालो होतो. हिरव्यागार डोंगरांनी वेढलेला परिसर. समोर उंच, पण वरनं सपाट दिसणारा भुदरगड. संध्याकाळच्या उन्हात डोंगरावरची हिरवळ चमकून उठत होती. त्या पार्श्वभूमीवर गडद रंगाचे मोठे वृक्ष मधूनमधून उभे होते. एका जीपमध्ये राजन गवस होता.–उंच, शिडशिडीत, दाढी राखलेला–तिथला मराठीचा प्राध्यापक. ' चौंडक ' नावाच्या देवदासीवरच्या कादंबरीचा लेखक. त्याला विचारलं, ' शेळोली किती अंतरावर आहे ? ' तो म्हणाला, ' दहाबारा

किलोमीटर असेल. अर्ध्या--पाऊण तासात पोहोचूच. डोंगरातला रस्ता आहे.’ बरोबर पुष्पाताईही होत्या. सावळ्या, हसऱ्या चेहऱ्याच्या. वयाने पंचविशीच्या. या डॉक्टर आनंद वासकरांच्या पत्नी. दोघंही नवराबायको गारगोटीच्या मौनी विद्यापीठात हिंदीचे प्राध्यापक. देवदासींच्या जटा उतरवण्याच्या कामात (या भागातला लोकप्रिय शब्द म्हणजे ‘जट निर्मूलन’) दोघांनीही वाहून घेतलंय.

पुष्पाताई म्हणाल्या, ‘आज दोन केसेस आहेत. डॉक्टर दुपारीच गेलेत. एक झाली असेल, एक आपल्याला पहायला मिळेल.’ मनात आलं, यांनी सगळी मेडिकल-परिभाषा उचललेली दिसत्येय.

जीप डोंगराच्या चढावरच्या रस्त्याने धावू लागली होती. झाडी दाट होत चालली होती. खाली दरीतून वाहणारी नदी चमचमत होती. राजन म्हणाला, ‘ही वेदगंगा. पलीकडेच उगम आहे तिचा. आणखी वीस किलोमीटर पुढं गेलं की कोकणकडाच आहे, तिथून सावंतवाडी दिसते.’

वळणं घेत घेत शेवटी आम्ही एका गावात शिरलो. चिंचोळ्या, खाचखळगे असलेल्या रस्त्यानं एका घरासारख्याच दिसणाऱ्या भैरोबाच्या देवळासमोर जीप जाऊन उभी राहिली. पंचवीसतीस छोट्या पोरांचा घोळका तिथं होता. तिथं वासकर दिसत नव्हते. पण समोर रस्त्यावरच केसांची जट पडलेली होती. बहुधा आधीच्या कार्यक्रमामधली असणार. आधी ती जट आहे हे कळलंसुद्धा नव्हतं. एखादा भीतिदायक छोटा, काळा प्राणीच पडलाय असं वाटलं होतं. जटेकडे पाहत भोवती मुलं उभी होती.

समोर गावातल्या मोठ्या शेतकऱ्याचं भलंमोठं घर होतं. तिथं बाकावर वासकर बसले आहेत असं कळलं. म्हणून तिकडं गेलो. वासकर बाहेर आलेच. तिशीचे, मध्यम उंचीचे, काळ्या बारीक काड्यांचा चष्मा लावलेले. ते म्हणाले, ‘आत्ताच एक केस संपवली, दुसरी सुरू करायच्या आत एक सिगरेट मारावी म्हणून इकडं येऊन बसलो होतो.’ मला दोन राउंडमध्ये विश्रांती घेणाऱ्या खेळाडूंची आठवण झाली. पडवीत आठदहा फूट व्यासाची, वरनं उघडी असलेली भात साठवायची कणगी होती. भिंतीवर भातशेतीसाठी लागणारे लाकडी नांगर अडकवलेले होते. या शेतकऱ्याचा मुलगा वासकर, गवस यांचा विद्यार्थी. गावातली बहुतेक तरुण मुलं त्यांची विद्यार्थीच होती. ते ‘सर’ ‘सर,’ म्हणत आम्हा लोकांची चांगली सरबराई करीत होते. मौनी विद्यापीठाचं प्रौढ शिक्षणाचं केंद्र या गावात आहे, त्या मार्फतच हा कार्यक्रम आज चाललेला होता.

वासकर म्हणाले, ‘आजच्या दोन केसेसपैकी आधीची लहान मुलगीच होती. तिची जट बरीचशी कट केली. तशा आणखीन चार केसेस येणार होत्या. पण आल्या नाहीत.’

त्यांचा विद्यार्थी म्हणाला, ' सर, त्या पळवून लावल्या गेल्या. बाजूच्या गावातल्या चारपाच जोगतिणी आहेत ना, त्यांनी यांना खूप घाबरवून सोडलं. म्हणून अर्ध्या वाटेतनं त्या परत गेल्या. '

दुसरा एक विद्यार्थी म्हणाला, ' आताची ती पोरगी होती ना, तिचा बाप कार्य-क्रमाच्या इथं कुठं आला होता ? जट काढली आणि मुलगी जिवंत आहे, असं कळल्यावर धावरत तिथं आला. खात्री करून घेतली. आणि मग मुलीला घेऊन घरी गेला. '

सगळे हसू लागले.

मी म्हटलं, ' गर्दी बरीच जमलेली दिसते. '

वासकर म्हणाले, ' उत्सुकता फार असते लोकांना. जटेला नुसता हात लावला तरी रक्त येतं अशी एक समजूत असते. म्हणून लोक मधे मधे डोकं घालू घालू पाहतात. '

चहा झाला आणि आम्ही भैरोबाच्या देवळाकडे चालू लागलो. आता मुलांबरोबर मोठी माणसंही देवळासमोरच्या चौकात वावरताना दिसत होती. कॉलेजची मुलं, पँट आणि वर चट्ट्यापट्ट्याचे बुशशर्ट घातलेली. ही मोठी माणसं, खाली लंगोटी आणि त्यावर शर्ट सोडलेली. डोक्याला वर छोटं मुंडासं गुंडाळलेलं. उघड्या उघड्या पायांचं कुणाला काहीच वाटत नव्हतं. मनात आलं, हेच बरं आहे– पँटचं लफडं आपण उगाच मागे लावून घेतलंय.

उन्हं कधीच संपून गेली होती. संधिप्रकाश तेवढा उरलेला होता. विद्यार्थ्यांनी आधी जिची जट काढली, त्या मुलीला मला दाखवायला पुढं आणलं. पांढरा ब्लाऊज आणि निळा स्कर्ट अशा शाळेचा युनिफॉर्म घातलेली ती दहा वर्षांची सावळी मुलगी होती. आता ती न्हाऊन आली होती. वीतभर लांबीचे केस उरले होते. वासकर म्हणाले, ' पुष्पा, वेणी घाल तिची. ' वासकरांनी खांद्यावरच्या पिशवीत हात घालून चारसहा कंगवे काढले. त्या सगळ्यांवरचे कागदाचे पॅकिंगही तसेच होते. त्यांतला एक काढून पुष्पाताईच्या हातात दिला. हिरव्या रंगाच्या रिबिनीचं बंडल काढून हातभर रिबीन कापून, त्याचे दोन तुकडे करून तेही त्यांच्याकडे दिले.

मी म्हटलं, ' तुमच्या पिशवीत सगळी जय्यत तयारी असते. '

ते म्हणाले, ' जी जट काढून घेईल तिला आम्ही कंगवा आणि रिबीन भेट देतो. लगेच वेणी घालून छान बो बांधला की एकदम त्या मुलीलाही बरं वाटतं. '

पाच मिनिटांतच पुष्पाबाईंनी तिला आणून समोर उभं केलं. ती मुलगी लाजून हसत होती. वासकरांनी तिला पाठमोरं वळवलं. चपचपीत तेल लावलेल्या केसांवर मोठमोठे बो उठून दिसत होते.

मधेच एक खुर्ची ठेवली होती. वासकर तिथे उभे राहून म्हणाले, ' अरे कुठंय ती बाई ! कां गेली पळून ! रस्त्याच्या कडेला हिरवं विटलेलं लुगडं नेसलेली भिकाऱ्या-

सारखी दिसणारी एक बाई पुढं आली. विद्यार्थ्यांनी तिला आणून खुर्चीत बसवलं. ती एकीकडे घाबरलेली होती; तर दुसरीकडून गावासमोर इतका भाव मिळाल्याने ती गांगरून आणि मोहोरूनही गेली होती. चेहरा कुरूपात जमा होईल असा. तिच्या डोक्यावरचा पदर काढला तेव्हा एकाच बाजूला भलंमोठं टेंगूळ यावं तशी जट वाढलेली होती. ती खाली वेणीसारखी लोंबत नव्हती. तर गुठळ्यागुठळ्या होऊन एकमेकींत मिसळून गेलेली होती. झाडाच्या बुंध्याशी वेडंवाकडं वाढलेलं बांडगूळ असतं तसं ते दिसत होतं. जटेत केसांची चमक जरासुद्धा नव्हती. सगळा काळपट, मातट पृष्ठभाग दिसत होता.

वासकर म्हणाले, 'या बाईच्या बाबतीत पूर्ण तयारी करायला काही वेळच मिळाला नाही. नाहीतर आम्ही आदल्या दिवशीच खोबरेल तेल, उवांचं औषध घालून ठेवतो. म्हणजे हे सगळं काढायला सोपं जातं. आता हिची जट आम्ही कापूनच काढणार. कारण ही सोडवत बसलं तर चारपाच तास लागतील. तुम्हाला पाहायला मिळावं म्हणून थोडीशी सोडवून पण दाखवतो.'

सर्जन जशी ट्यूमरची पाहणी करतो, तशी त्यांनी जट दाबून उचलून पाहिली. दुसरी खुर्ची मागवून तीवर खांद्यावरची पिशवी ठेवली. तिच्यातनं दोनतीन कातऱ्या बाहेर काढल्या. एक तर शिंप्याचीच कातरी होती. दोन, न्हाव्याकडे असतात तशा लांब व बारीक आकाराच्या होत्या.

मी म्हटलं, 'तुम्ही तर न्हाव्यासारख्याच सरंजाम जमवलाय.'

'हो, ना. या कातऱ्यांना कामही इतकं पडतं की आठवड्याला सगळ्या कातऱ्यांना धार काढून घ्यावी लागतेच.'

माझ्या हातात बॅटरी देऊन त्यांनी जटेवर लाईट पाडायला सांगितलं. त्यांनी जटेच्या वरच्या भागात कातरी थोडी खुपसून एक दोरखंडाएवढा पदर सोडवला. तो उचलून त्याच्या टोकाला कातरीने थोडा कट घेऊन ती दोन्ही टोकं हातात धरून विरुद्ध बाजूला ओढून टराटरा दोन भाग केले. परत त्यातल्या एकेका पदराचे असे दोन भाग ओढताना खच्चून जोर लावून ओढत होते. घोंगडी किंवा जाड ब्लँकेट फाटल्यावर होईल तसा आवाज येत होत होता. त्या बाईच्या चेहऱ्यावर किती वेदना उमटत असतील, हे अंधारामुळे दिसत नव्हतं, पण कल्पना करता येत होती. पुष्पाताई, शेळोलीच्या पुजारी नावाच्या नर्सबाई आणि एक विद्यार्थी हे सगळीकडनं अशाच जटा सोडवून त्या काढून केस सुटे करीत होते. मोठाच कारखाना सुरू झालेला होता.

जरा थांबून वासकर म्हणाले, 'पहिल्या पहिल्यांदा आम्ही असं सोडवत बसायचो. कारण या बायांच्या मनात जट सोडवून घ्यायचीसुद्धा भीती होती, तर कातरी लावणं दूरच. एकेका बाईला चारपाच तास लागायचे. सगळेजण घामाने निथळून जायचे.

आता खूप केसेस झाल्यामुळे भीती पण निघून गेली. आता आम्ही सरळ कट करतो. अर्थात तिला बारीक वेणी घालायइतपत केस सोडवून ठेवतो. म्हणजे तिलाही बरं वाटतं.'

वासकरांनी कातरी हातात घेतली. जट उचलून कातरीने कापायला सुरुवात केली. थोडं कापल्यावर जटेखालचे नेहमीची चमक असलेले, कापून इंचभर राहिलेले केस दिसले. बॅटरीच्या प्रकाशात त्यात हालचाल दिसू लागली. त्या उवा होत्या हे काही सेकंदांनी लक्षात आलं. ऊ एरवी बघितली होती, ती मुंगीपेक्षा थोडी लहान आकाराची. या ज्वारीमधल्या टोके किड्याहूनही थोड्या मोठ्या, टपोऱ्या होत्या. जंगलात वणवा पेटल्यावर जनावरं जशी सैरावैरा धावतात, तशा त्या धावत सुटल्या होत्या. मागं एकदा एक ऊ माझ्या डोक्यात शिरली होती. दोनतीन दिवस मी किती हैराण झालो होतो. फणीने खराखरा विंचरून एकदाची ती निघाली, तेव्हा किती बरं वाटलं होतं. इथं तर केसागणिक ऊ होती. या बाईनं हे कसं अंगावर काढलं असेल याची कल्पना करवेना.

पुष्पाताई म्हणाल्या, 'या खालच्या थोड्या जटा सोडवू. म्हणजे तिला वेणी घालता येईल.' वासकरांनी ट्यूमर सगळीकडनं सोडवावा तशी ती जट सगळीकडनं कापत आणली होती. ती एका विद्यार्थ्याला हातानं उचलून धरायला सांगितली आणि मागचा थोडा भाग, आधीच्या पद्धतीप्रमाणे फाडून सोडवू लागले.

भोवती मुलांनी खूपच दाटी केली होती. मोठ्या बायकाही येऊन तोंडापुढे पदराचं टोक धरून एखाद्या अपघाताचं दृश्य पाहताना जसा चेहरा होतो तशा चेहऱ्याने या बाईकडे न्याहाळून पहात निघून जात होत्या.

शेवटी एकदाचं ते डबोलं केसांपासून कातरीने अलग केलं. जवळपास फूटभर व्यासाचं, तीनचार इंच जाडीचं आणि आतून खोलगट असलेलं ते प्रकरण होतं.

मी विचारलं, 'याचं काय करता? हे फेकून देता?'

वासकर म्हणाले, 'हो, जनरली आम्ही फेकूनच देतो. काही वेळा तर त्यात इतकी घाण आणि किडे असतात की रॉकेल टाकून ते जाळलेलं सुद्धा आहे.'

राजन म्हणाला, 'काही बाया या जटेला देव्हाऱ्यात ठेवून पुजतात सुद्धा.'

'कायमचं?' अंगावर काटा येऊनच विचारलं.

'हो. त्यात देवी आहे अशीच समजूत असते ना. काही जणी त्यावर फुलं, नैवेद्य घालतात, विधी करतात आणि विधीपूर्वक नदीमध्ये विसर्जन करतात. देवी आपल्याकडं आली होती, जाताना सन्मानाने पाठवली पाहिजे, अशी त्यांची कल्पना.'

विद्यार्थ्याला म्हणाले, 'दोन हंडे पाणी गरम करायला सांगितलं होतं हिच्या घरी.

ते तापवलंय का बघा.' तो मुलगा पळत गेला. जट कापून झाल्यावर एक म्हातारी वाकून या बाईचा चेहरा बघत म्हणाली, 'अग बया, ही हसतीय बघा.' सगळे हसले. वासकर म्हणाले, 'आता हसणारच. ओझं गेलंय डोक्यावरचं.'

गल्लीच्या टोकाला एक कौलारू घर होतं. आतल्या ओसरीत गुरं बांधली होती. ती या बाईच्या भाऊबंदांची असावीत. एका खोलीत बाई आणि म्हातारी राहत होती. गावात वीज होती. पण या घरात फक्त एक रॉकेलची चिमणी होती. वासकर विद्यार्थ्याला म्हणाले, 'शांपूची बाटली कुठे? आणून ठेवायला सांगितली होती ना?' एकाने ती आणून दिली. ती त्यांनी पुष्पाताईकडे दिली. वासकर म्हणाले, 'शांपू लावल्यावर बाईना डोळे घट्ट मिटायला सांगा बरं का.'

पुष्पाताई म्हणाल्या, 'बाई, तुम्हाला न्हाऊ घालायचंय, नंतर नेसायला धुतलेलं लुगडं घेऊन या.' यावर घरातलं कुणी काही बोलेना. तेव्हा सगळ्यांच्या लक्षात आलं की अंगावरचं तेवढं एकच लुगडं तिला आहे. मग पुजारीबाई म्हणाल्या, 'निदान आंघोळीपुरतं आड लावायला काही तरी द्या.'

शेजारच्या भाऊबंदांपैकी एका बाईनं आड लावायला काहीतरी आणून दिलं. त्यांची आंघोळ होईपर्यंत आम्ही बाहेर रस्त्यावर येऊन थांबलो. या बाईची माहिती तिथल्या एकाला विचारली. या बाईचं लहानपणीच तिच्याहून वयाने खूपच मोठ्या असलेल्या माणसाशी लग्न लावून दिलं, इस्टेटीच्या लोभानं. त्या नवऱ्याला आधीच्या तीन बायका होत्या. तिघी आधीच मेलेल्या होत्या. तिथं गेल्यावर हिला जट आली आणि पुढे वेड लागलं. किंवा वेड लागलं, घाणेरडी राहू लागली आणि त्यामुळे जट आली. त्यानंतर नवऱ्याने इकडं आणून सोडली होती.

चालत चालत परत मधल्या चौकात आलो. भैरोबाच्या मारुतीसारख्या दिसणाऱ्या पण उग्र ओबडधोबड मूर्तीसमोरच टेबल, खुर्च्या आणि माइक मांडले गेले होते. सभेत आधी प्रौढ शिक्षणावर लीला पाटील बोलल्या. नंतर वासकर बोलले. आवाज खणखणीत. शिक्षकी पेशामुळे बोलण्यात कुठं चाचपडणं नव्हतं. त्या भागातलेच रहाणारे असल्याने हेलही त्या भागातल्यासारखेच होते.

ते म्हणाले, 'कुणाला जट आली असली आणि आम्ही विचारायला गेलो की नेहमीचे संवाद होतात. केस गुंतले, मग गुरूला विचारायला गेले. गुरू म्हनाली, हे केस माझे हायेत. त्याला कंगवा लावू नगं, कातर लावू नगं. ती देवी हाय. तिला खाऊपिऊ घाल. दूध म्हणून वडाचा चीक घाल. अन्न म्हणून भंडारा घाल...बरोबर आहे ना?'

सभेतल्या बाया हसू लागल्या.

पुढं ते म्हणाले, 'अवो असं केलं तर या वासकराला पण जट येईल. माझं केस

दाट हायेत, कुरळंबी हायेत. मी घाणेरडा रहायला लागलो तर मला जट येईल. गुरू लोकांचा असं सांगण्यात काय फायदा ? त्यांचा संप्रदाय वाढतो. या बाया त्या जोगतिणीच्या शिष्या व्हत्यात. तिला दरवर्सी दक्षणा देत्यात. लुगडं नेशिवत्यात. मी लोकांच्या जटा काढाया लागलो तवा या बायांनी लई घाबरवलं. त्या म्हनाल्या, हा वासकर उताना पडंल. पन मी अजून उभाच हाय. '

मुलं हसू लागली.

' आतापर्यंत मी चारशे पंचवीस बायांच्या जटा उतरवल्या. पन त्यातली एकबी मेली न्हायी का रगत वकली न्हायी. एकीलाबी परत जट आली न्हायी. सगळ्या ठणठणीत बऱ्या हायेत. उलट, डोक्यातलं किडं गेल्यानं तब्येत सुधारलीच हाय. तवा देवीचा याचा काय संबंध न्हायी. देवी काय सांगत न्हायी का तुमी घाणेरडं रहा, डोक्यात किडं पाळा. हे कुणीतरी माणसानीच शोधून काढलं हाय. '

परत येताना खूप रात्र झाली होती. येताना जीपमध्ये वासकरही होते. डोंगरातून वळणं घेत घेत जीप चालली होती. खाली दरीत गारगोटीतले दिवे दिसले. वास्तविक गारगोटी हे छोटं गाव. पण दिव्यांवरून मोठ्या शहराचा आभास होत होता. अर्ध्या तासातच गारगोटीत वासकरांच्या घरी येऊन दाखल झालो.

मौनी विद्यापीठाच्या गेटबाहेरच एका बैठ्या बुटक्या, कौलारू, तीन खोल्यांच्या घरात वासकर राहतात. पुढच्या खोलीला भिंतींना, छताला, दोन खुर्च्यांवर टाकलेल्या फळीला डिझाईन पेपर चिकटून गेटप आणलेला होता. समोर पुस्तकांचं मोठं काचेचं कपाट होतं. त्यात हिंदी पुस्तकांचा मोठा संग्रह होता. एका थप्पीत वासकरांचा हिंदी काव्यांतील दलितांच्या दर्शनावरचा आणि पुष्पाताईंचा धर्मवीर भारतींवरचा असे दोन जाडजूड थिसिस दिसत होते. घरात टी. व्ही. नव्हता. तेव्हा कळलं की गारगोटी डोंगरांनी वेढलेलं असल्याने तिथं टीव्हीचं कुठलंही स्टेशन दिसतच नाही.

सकाळची दोघांची कॉलेजं उरकली होती. राजनही आला. मी म्हटलं, ' तुमचं हे जट काढण्याचं काम भलतंच किळसवाणं आहे. '

वासकर म्हणाले, ' पण तुम्ही पाहिलेली कालची केस तर अगदी क्लीन केस म्हणावी लागेल. सुरुवातीला आम्ही जट सोडवत बसायचो तेव्हा फार त्रास व्हायचा. जट काढताना उवा हातावर चढायच्या. नंतर आंघोळ घालताना इतकी घाण निघायची की मोरीत नुसता चिखल व्हायचा. ज्या दिवशी जट काढायचो त्या दिवशी रात्री जेवण जायचं नाही. आता सवय झाली. पण तरीसुद्धा घाण केस आली की अजून तसं होतं. '

पुष्पाताई म्हणाल्या, ' परवाची केस तर फारच घाण होती. त्या मुलीला जटेखाली सगळीकडे जखमा झाल्या होत्या. त्यातच पू झाला होता. आणि त्यात पांढरे किडे झाले होते. '

‘ किडे ?’

वासकर म्हणाले, ‘ तुम्ही लोक मॅगट का काय म्हणतात ते. पोरांच्या डिसेक्शन बॉक्समधला चिमटा मागवला. चिमट्याने ते काढू लागलो तर ते संपेचनात. त्या जखमा आतून एकमेकींना जोडलेल्या होत्या. मोजून मी एकशे वीस किडे काढले. मग डॉक्टरांना बोलावलं. आमच्या इथं सुरेश देशपांडे म्हणून डॉक्टर आहेत. ते अशा केसेसचं ड्रेसिंग, औषधं फुकट करतात. त्यांनी पट्टी केली. ही दहा वर्षांची मुलगी होती अवघी. या जटेपायी ती मेंटल केस झाली होती. ’

‘ असल्या घाण कामाकडे वळलात तरी कसे ? ’

‘ तुम्ही लोकांनी निपाणीला ती देवदासी परिषद घेतली होती ना, तिच्यात कोल्हापूरच्या अरगडे डॉक्टरांनी जट सोडवून दाखवली होती. मी परिषदेला आलो नव्हतो, पण ते ऐकलं होतं. पुढं आपण सौंदत्तीला मीटिंगमध्ये भेटलोच. याबाबतीत काहीतरी करावं असं वाटायला लागलं होतं. पण काय ते सुचत नव्हतं. दुसऱ्याच एका कारणावरनं या सगळ्याची सुरुवात झाली. आमचे प्राचार्य चांडके म्हणून आहेत. त्यांच्याकडं भुजबळ नावाचे सब इन्स्पेक्टर आले होते. ते आरळगुंडी गावची केस सांगत होते. एका जोगतिणीला अनौरस मूल झालं. त्यांच्याविषयी कुणीतरी पोलिसांकडे तक्रार केली. भुजबळांनी त्या बाईला विचारलं, तर तिनं गावातल्या पाचसहा प्रतिष्ठितांबरोबर तिचे संबंध असल्याचं सांगितलं. ते लोक कबूल होईनात. मग भुजबळांनी सांगितलं की या बाईच्या नावावर जमीन आहे. या मुलाच्या बापाला ती मिळेल. असं म्हणताच ते पाचसहाजण मीच त्या पोराचा बाप असं म्हणू लागले. प्राचार्य आणि आम्ही काही प्राध्यापक सहज म्हणून, गावच्या देवदासींना भेटावं म्हणून तिथं एका रात्री गेलो. त्या तेराशे वस्तीच्या गावात सव्वीस देवदासी पुढं आल्या. आमच्या या भागात देवदासींचं एवढं प्रमाण आहे, याची सुद्धा कल्पना नव्हती. आम्ही पुनर्वसनाची चर्चा केली. त्या गावचा मुंबईला असलेला संप कामगार उठला आणि म्हणाला, ‘ माझ्या मुलीची जट तुम्ही सोडवता का ? ती इतकी हैराण झालीय की भिंतीवर डोकं आपटून टकरा घेतीय. ’ आम्ही ती जट उचलून पाहिली तर त्यात जखमा झालेल्या. तिच्या बाबतीत तेव्हा आम्ही काही करू शकलो नाही. पण या सगळ्या कार्यक्रमाची ठिणगी तेव्हा पडली. पिंपळगावहून पुनर्वसनासाठी तीन केसेस आल्या होत्या. आम्ही कोल्हापूरहून डॉक्टर अरगड्यांना बोलावून घेतलं. तिन्ही केसेसमध्ये त्यांच्याबरोबर आम्ही जट सोडवू लागलो. आणि नंतर तर ओघच चालू झाला.’

तेवढ्यात बाहेरनं दोघंजण येऊन बसले. एक पंचेचाळिशीचे, गंभीर चेहऱ्याचे विजय निंबाळकर आणि दुसरे सावळे, तरतरीत जयंत कळके. दोघेही प्राध्यापक. वासकरांनी ‘ अंधश्रद्धा व देवदासी मुक्ती केंद्र ’ नावाची संस्था काढली आहे, त्याचे हे पदाधिकारी.

मी विचारलं, ' एक जट काढायला खर्च किती येतो हो ? '

पुष्पाताई विचार करत म्हणाल्या, ' मोठा खर्च खोबरेल तेलाचा. मोठी जट असेल तर दीड–दोन किलो तेल लागतं. आम्ही सुरुवात केली त्या दिवसात तर ते चाळीस रुपये किलो होतं. नंतर उवांचं औषध. '

' उवांचं औषध कुठलं ? '

' लायसिन, सायब्रान, उना...'

मला ही नावंही माहीत नव्हती.

' त्याची किंमत पाचसात रुपये. शांपू बारा ते वीस रुपयांपर्यंत असतो. साबणाची वडी चारसहा रुपयांपर्यंत. '

निंबाळकर म्हणाले, ' फोटोग्राफरचा खर्च विसरू नका, तो चाळीसपन्नासपर्यंत जातोय. जट काढायची त्या बाईला, तिथल्या गावकऱ्यांना, आमच्या विद्यार्थ्यांना फोटोची हौस असतेच. तो फोटोग्राफरही टरून गेलाय. आमच्यातलाच झालाय. आता तोही आमच्याकडे जटेच्या केसेस आणतो. '

मी म्हटलं, ' म्हणजे हा शंभरेक रुपये खर्च असतो. हा कोण करतो ? '

कळके म्हणाले, ' त्या गावचे लोक, कार्यकर्ते करतात. '

वासकर म्हणाले, ' पण सुरुवातीच्या पन्नासेक केसेसचा खर्च प्राचार्यांनी केला. आणि तोही स्वतःच्या खिशातून. ' मला आश्चर्य वाटलं.

वासकर म्हणाले, ' आता आमच्या प्रसिद्धीमुळे आमच्याकडे डायरेक्ट घरी केसेस येतात. मागच्या परड्यातच आम्ही जट काढतो. जिथं शक्य होईल तिथं आम्ही त्या गावाला जाऊन लोकांसमोर जट काढतो. कारण त्याचा परिणाम खूप चांगला होतो. भीती नाहीशी होते. '

कळके म्हणाले, ' काही देवऋषीसुद्धा जट काढतात, हे तुम्हाला माहीत आहे का ? '

मी चाटच पडलो. ते म्हणाले, ' त्या देवऋषींनी असा प्रचार केला की यल्लम्मा-कडनं मी जट सोडवायची खास परवानगी काढलीय. तो जट काढायचे शंभर रुपये घेतो. पण एका वेळी पुरती कधी काढत नाही. या अवसेचं त्या अवसेला असं करत काही वर्षं त्या बाईला रेंगाळत ठेवतो आणि कितीही पैसे काढतो. आता तो माणूस मोटारसायकलीवर फिरत असतो. '

वासकर म्हणाले, ' त्याने मला दम देऊन पाहिला. पण त्याचा उपयोग झाला नाही. आमच्या घरात उतारा आणि लिंबं येऊन पडायची. मी त्याला निरोप पाठवला, पुढच्या वेळी रसाळ लिंबं टाकत जा. म्हणजे आम्हाला त्याचं सरबत करून पिता येईल. त्यानंतर ते बंद झालं. '

राजन म्हणाला, ' वासकरांविषयीसुद्धा आता समज पसरलाय की त्यांना देवीनं

परवानगी दिलीय म्हणून त्यांना काही होत नाही. म्हणून मुंबईपासनं लोक पत्ता काढून त्यांच्याकडे येतात आणि जट सोडवून घेतात.'

वासकर म्हणाले, 'त्या मांगनूरची बाई मुंबईला असते. तिनं इथं येऊन जट तर काढून घेतलीच, पण गळ्यातलं दर्शनही काढून माझ्या हातात ठेवलं. तेव्हा मला तर चळवळीतला एक टप्पा गाठला असं वाटलं.'

'तुमच्या घरनं काही विरोध नाही का झाला?'

'माझ्या आईला या भागातल्या एका बड्या जोगतिणीनं खूपच घाबरवलं. ती कापशी खोऱ्यातली कांबळे नावाची बाई. अंगात आणून ती आईला म्हणाली, 'तुझ्या पोरानं माझी कळ काढलीया. तुझ्या दिव्यात कुत्रं मुतंल (निर्वंश होईल.). तुझा नष्टावा होईल, तुझ्या घरादारावरनं कुळव फिरंल, राखरांगोळी होईल...' यांची भाषासुद्धा फार भयंकर असते. आई तर इतकी घाबरून गेली—ती घरी न जाता परस्पर गारगोटीला आली. एव्हाना मी मेलोच असणार अशी तिची खात्रीच होती. मला पाहिल्यावर तिनं मला मिठीच मारली. ती म्हणाली, 'ती कारी आई हाय, तिची तू कळ काढू नको.'

'मग पुढं?'

'त्या वेळी मी आईला शांत केलं. नंतर एकदा अगदी जखमा झालेली एक केस माझ्याकडे आली. त्या केसला मी एकदोन दिवस थांबवून घेतलं. आईला गावाहून बोलावलं. तिच्या देखत त्या जटा कापल्या, किडे काढले, जखमा साफ केल्या, पट्टी करून घेतली. नंतर आईला म्हटलं, ही बाई म्हणजे यल्लूआईची भक्त होती ना, या भक्ताची मी सेवा केली, तिच्या डोक्यातला रोग काढून टाकला. आता यामुळं यल्लूआई शाप देईल का आशीर्वाद देईल?' आई म्हणाली, 'तुझं काम चांगलं आहे, ते चालू दे असंच.'

पुष्पाताई म्हणाल्या, 'नंतर स्वतः सासूबाईंनीच एक बाई जट सोडवायला आणली.'

आम्ही हसलो. मी म्हटलं, 'निपाणीच्या परिषदेत एका देवदासीच्या अंगात आलं, तसा प्रकार तुमच्या कार्यक्रमात कधी झाला का होता नाही?'

'झाला होता. खूप वेळा होतो. एका कार्यक्रमाला कणबरकरसाहेब (शिवाजी विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरू) होते. एका बाईच्या जोरात अंगात आलं. जट सोडवून घ्यायला पंधरा-सोळाजणी जमलेल्या. त्या कावऱ्याबावऱ्या झाल्या. स्वतः कणबरकरही हादरले. ते त्या बाईंना समजून सांगायचा प्रयत्न करू लागले. आम्ही यल्लमाच्या विरोधी नाही, मी पण यल्लमाचा भक्तच आहे, वगैरे. पण ती कुठलं ऐकतीय. मग मीच उठले आणि त्या जसं अंगात आणतात तसे आवाज आणि ॲक्शन करत तिच्या जवळ गेलो. ती पण घाबरली. कारण माझ्या अंगात आलेली

देवी खरी असली तर काय घ्या, असं तिला वाटलं असणार. मी घुमता घुमता म्हणालो, ' माझी काय थट्टा लावलीयंस ? गप बसते का नाही, का पोलीसच्या ताब्यात देऊ ? ' त्यावर लगेच तिने घुमता घुमताच, ' बसते...बसते...बसते...' असं करत अंगात येणं संपवलं. '

निंबाळकर म्हणाले, ' आता विरोधाचा फारसा प्रश्न येत नाही. आम्हाला देवीची परवानगी आहे, असा समज सगळीकडे पसरलाय. लांबून लांबून लोक येतात. कोल्हापूरची एक खिश्चन बाई आमच्याकडं आली होती. नानूबाई तिचं नाव. लग्ना-नंतर बऱ्याच वर्षांनी तिला जट आली. नवरा म्हणाला, ' आपल्या धर्मात असं काही नसतं. ' म्हणून तिला घराबाहेर हाकलून दिलं. ती बाई पत्ता काढत आमच्याकडं आली. आम्ही जट सोडवली. नवऱ्याने तिला परत घरातही घेतलं. आता तर देव-ळातच आम्ही सभा घेतो. वाघापूरला जोतिबाच्या देवळात सभा घेतली होती. हा जोतिबा साप उतरवण्यासाठी प्रसिद्ध. तिथं जटेच्या एकोणीस केसेस निघाल्या. तिथले कारंडे सरपंच, संभाजी पाटील, शुक्ल हा विद्यार्थी, या सगळ्यांनी मनावर घेतलं. मग आम्ही ते गाव जटमुक्त केलं. '

या शब्दाची खूप गंमत वाटली. चळवळीच्या सुरुवातीला जट येणं हा शब्द वापरला तरी त्याचा अर्थ द्यावा लागायचा. आता त्यातनं जट-निर्मूलन, जट-मुक्त असले शब्द सर्रास होऊन बसले आहेत. हे सगळं दोनचार वर्षांत. हा कार्यक्रम एन. एस. एस. ने स्वीकारला, प्रौढ शिक्षणवाल्यांनी स्वीकारला. पुढाऱ्याच्या हस्ते जट निर्मूलन असे पेपरातनं फोटोही येऊ लागले लायन्स क्लबसारख्या उच्चभ्रूंच्या क्लबांनीही हे कार्यक्रम घेतले.

अशाच एका समारंभाची हकीकत वासकर सांगत होते, ' लेडी लायन ॲक्से-लरीज 'नी हा कार्यक्रम ठेवला. मला बोलावलं. जटवाल्या पंधरा ते वीस बाया आल्या होत्या. आधीचा समारंभ झाला. हारतुरे, फोटो झाले. कामाला सुरुवात व्हायची, तशा एकेक लेडी लायन बाहेर जाऊन गाडीत बसून निघू जाऊ लागल्या. शेवटी मी वैतागलो. त्यांच्या प्रमुख लेडीला म्हटलं, ' अहो, तुम्ही जाताय, पण हे काम करणार कोण ? ' त्या म्हणाल्या. ' सॉरी, आत्ता आमचं डिनर आहे. ' असं म्हणून त्या गेल्याही. शेवटी मी ते चारसहा तास घालवून काम पुरं केलं. '

वासकरांकडचा फोटोचा जाडजूड आल्बम पाहिला. मेडिकलच्या पुस्तकात एखाद्या रोगाचे ' बिफोर ' आणि ' आफ्टर ' असे फोटो असतात, तसे जटेच्या आधी आणि जट काढल्यावरचे फोटो होते. भली मोठी जट खांद्यावरून पुढं घेतलेले काही फोटो, तर ऋषींच्या जशा अनेक बारक्या, दोऱ्यासारख्या जटा असतात तशा जटांचे काही फोटो. जट सोडवतानाचे अनेक फोटो. वासकर तर काही फोटोत एप्रन घालूनच जट सोडवताना दिसत होते. घामाघूम झालेले होते. चष्मा

नाकावर पुढं सरकलेला होता. काही फोटोत जाडजूड उंच आणि अर्धवट डार्क चष्मा लावलेले प्राचार्य चांडकेही दिसत होते. खासदार कल्लप्पा आवाडे वगैरे पुढाऱ्यांच्या उपस्थितीत चाललेल्या समारंभाचे फोटो होते. एका फोटोत तर पंधरावीस देवदासी लायनीने बसवलेल्या आणि त्यांच्या जटा सोडवणारे पाचपन्नास विद्यार्थी, कार्यकर्ते... या सगळ्यांचा वरून घेतलेला फोटो पाहताना कारखान्यातला एखादा प्लँट पाहतोय असंच वाटत होतं.

जट सोडवल्यानंतर आखूड, तेल लावून चपचपीत केसांचे, बारक्या वेण्यांचे आणि मुख्य म्हणणे रिबिनीचा तो फेमस बो बांधलेले पाठमोरे फोटो होते. काही काही फोटो कायमचे लक्षात राहतील. वरनं सगळे जट सोडवताना खाली वेदनेने आकसलेल्या एका छोट्या मुलीचा चेहरा. आणि दुसरा फोटो एक बाई आपली कापलेली जट हातात घेऊन उभी आहे त्याचा. ती जट म्हणजे दोनतीन फूट लांब असा लाकडी भरीव ओंडकाच वाटत होता.

दोनतीन लग्नांचे फोटो होते. नवरा-नवरी डोक्याला भलं मोठं बाशिंग बांधून उभे आहेत. गळ्यात हार, कपाळाला मुंडावळ्या.

वासकर म्हणाले, ' आम्ही काही जोगतिणींच्या जटा सोडवून त्यांची लग्नंही लावून दिलेली आहेत. '

' त्यांचा आता काय अनुभव आहे ? '

' उत्तम चाललं आहे. मांगनूर नावाचं गाव आहे जवळच. तिथं एक आर. एम. पी. डॉक्टर आहे. त्यांनी असं लग्न केलंय. हा त्यांचाच फोटो. मुलीची नि त्यांची आधीची ओळख. पण ही देवाला सोडलेली. तेव्हा यांच्या घरचा विरोध. या मुलीची तयारी होती म्हणून आम्ही सगळे हे लग्न घडवून आणू शकलो. आता त्यांना तीन मुली झाल्या आहेत. संसार चांगला चाललाय. '

' तुमच्या आतापर्यंत कितीजणींच्या जटा कापून झाल्यात ? काही रेकॉर्ड ठेवलंय का ? '

एक वही दाखवून ते म्हणाले, ' यात सगळ्यांची नोंद आहे. बाईचं नाव, वय, जट कितव्या वर्षी आली, देवाला सोडलंय किंवा नाही, एवढे कॉलम आहेत. '

निंबाळकर म्हणाले, ' आता हे काम आसपासच्या भागात पसरतंय. आजऱ्याला प्राध्यापक नागनाथ शिंदे म्हणून आहेत. मराठवाड्यातून आलेले आहेत. ते आजऱ्यात हे काम करतात. साताऱ्याच्या डॉक्टर शैला दाभोळकर आहेत. त्यांनी वासकरांना पहिल्या वेळी बोलावलंही होतं, त्याही हे काम करतात. कोल्हापूर जिल्हा परिषदेतले चौगुले आणि पाटोळेही हे काम करतात. आम्ही लवकरच हा भुदरगड तालुका जटमुक्त करू. पण प्रश्न राहतो तो पुनर्वसनाचा. आणि तो अवघड आहे. '

वासकर म्हणाले, ' आम्ही या कार्यक्रमात पुढाऱ्यांना मुद्दाम इन्व्हॉल्व्ह केलं.

खासदार आवाड्यांनी कबूल केलं की त्यांच्या डेक्कन सूत गिरणीत दरवर्षी पाच जोगतिणींना किंवा त्यांच्याशी लग्न करणाऱ्यांना नोकऱ्या देऊ. तसे आम्ही लोक पाठवले. ते त्यांनी लावूनही घेतले. पण या बायांना जोगवा मागून पोट भरायची सवय. आठ तास एका ठिकाणी काम करायची सवय नाही. त्या तिथल्या नोकऱ्या सोडून परत आल्या, म्हणजे जोगतिणीचा पेशा तर सुटला पाहिजे. त्यासाठी त्यांना पर्याय दिला पाहिजे. तो त्यांना पचला पाहिजे. हे सगळंच अवघड आहे.'

गारगोटीहून गडहिंग्लजला जाताना घाट लागला तेव्हा हेच मनात आलं. गारगोटीवाल्यांनी आतापर्यंत मजल चांगली मारली, पण त्यांना ही आता सपाटी संपून अवघड घाट लागतो आहे.

## कलेक्टर

पुण्यातल्या गणेशखिंड रोडवर 'उद्योग भवन' नावाची चारपाच मजली, बाहेरून जवळपास काचांनीच वेष्टिलेली इमारत आहे. तिथं गेलो. लिफ्टने दुसऱ्या मजल्यावर आलो. सौम्य बफ रंगाची पार्टिशन्स असलेली पॉश ऑफिसेस दिसू लागली. लीना मेहेंदळ्यांचं ऑफीस विचारलं. एकानं बोटानं दिशा दाखवली. पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ अशी अक्षरं व कंसात डब्ल्यू. एम. डी. सी. अशी अक्षरं लिहिलेली. बाहेर सेक्रेटरी बसलेली. काल फोन केल्याचं सांगितलं. चिट्ठी आत गेली. पाचदहा मिनिटांत आतून बोलावणं आलं.

ऑफिसात शिरल्यापासून खाली कार्पेट सुरू झाली होती. ऑफीस एका बाजूने संपूर्ण काच बसवल्यानं उघडंच होतं. तिथून युनिव्हर्सिटीच्या टेकडीचं दृश्य दिसत होतं. मोठं, वर काच घातलेलं टेबल, त्यामागे उंच पाठीची, ऑफ व्हाईट व्हेलवेट चढवलेली फिरती खुर्ची, त्यावर लीना मेहेंदळे बसलेल्या. पस्तिशीच्या, निमगोऱ्या, तल्लख चेहऱ्याच्या, कलकत्ता साडी नेसलेल्या. उठून बाजूच्या सोफ्याकडे येत म्हणाल्या, 'इकडेच बसू या.' शिपायाला कॉफीही आणायला सांगितली.

या लीना मेहेंदळ्यांचं नाव मी दोनतीन वर्षांपूर्वी ऐकलं होतं. सांगलीच्या या कलेक्टर होत्या. आय. ए. एस. अधिकारी. त्यांनी देवदासी प्रश्नात खूप रस घेतला आणि त्या जिल्ह्यातल्या देवदासींसाठी प्रसिद्ध असलेल्या जत या गावी काही उपक्रम केले असं ऐकलं होतं. आमच्या एकदोन समान स्नेह्यांमार्फत मी त्यांना भेटायचा प्रयत्नही केला होता. पण ते राहून गेलं होतं. शेवटी काल स्वतःच फोन करून ही वेळ घेतली होती.

त्या समान मित्रांची चौकशी झाल्यावर मी विचारलं, 'तुम्ही या प्रश्नाकडे कशा

वळलात ? '

त्या म्हणाल्या, ' मी कलेक्टर होते ना, तेव्हा जतच्या देवीच्या देवळात जाऊन आले. बरोबर पोलीस फोर्स नेलेला होता. पण तो गावाबाहेरच ठेवला. तिथल्या पुजाऱ्यांची, देवदासींची बैठक घेतली. काही गावकरीही होते. त्यांना विचारलं, ' या देवळात देवीला मुली सोडतात, ते खरं आहे का ? ' ते ' नाही ' म्हणू लागले. ' इथं तसं काही नाही. ' मी बरोबर देवदासी ॲबॉलिशन ॲक्ट घेऊनच गेले होते. तो वाचून दाखवला. त्यात असा विधी करणारे पुजारी, मुलीचे आईवडील, साहाय्य करणारे अशा सर्वांना काय काय शिक्षा आहेत ते वाचूनच दाखवलं. '

' किती जणी या मीटिंगला आल्या होत्या ? '

' पन्नासएक जणी असतील. कारण मला माहीत होतं की या जुन्या देवदासी या प्रथेला खतपाणी घालतात. कारण नव्या मुली या पंथात आल्या तर त्यांना त्यानिमित्ताने थोडेफार पैसे मिळतात. मान मिळतो. त्यांना जरा सुनवायचं होतंच. या सगळ्याला कुणी विरोध करणं शक्य नव्हतं, पण तरी कुणी म्हणालं, ' ही देवाची प्रथा आहे. आपण कोण त्या बंद पाडणार ? ' मी म्हणाले, ' जो देव कुमारिकांची मागणी करीत असेल तो देव तुम्ही पाण्यात बुडवून टाका. जसं देवाविषयी बोलायला तुम्हाला अधिकार आहे तसाच तो मलाही आहे. मीही देव मानते. देव कुणा मुलीचं नुकसान करायला कधीच सांगत नाही. '

' देवदासी काय म्हणाल्या ? '

' त्या म्हणाल्या, ' आम्ही जोगवा मागितला नाही, तर खायचं काय ? ' आणि हा प्रश्न बरोबर आहे. आपण जोपर्यंत त्यांना काही पर्याय देत नाही तोपर्यंत केवळ आमच्या एलिट भावनांना हे प्रकार असंस्कृत वाटतात म्हणून ते त्यांनी बंद करावेत असं म्हणणंही बरोबर नाही. मी त्यांना म्हटलं, इथं जतमध्ये आमचं पोल्ट्रीचं शिक्षण केंद्र आहे. कोंबड्यांच्या छोट्या पिलापासून मोठी कोंबडी कशी करायची हे तिथं शिकवतात. यातल्या कोण मुली हे काम शिकायला तयार आहेत ? तीनचार मुली तयार झाल्या. मी त्यांना म्हटलं, तुम्ही केंद्र पाहून या. मी तासभर इथं थांबते. तुम्हाला सहा महिने स्टायपेंड मिळेल. इतर देवदासी म्हणाल्या, आम्ही शिकणार नाही, पण ते काम पाहून येतो. त्या सगळ्या ते काम पाहून आल्या आणि वीस पंचवीस जणी तयार झाल्या. मी त्यांना बजावलं, ' माझी एकच अट. तुम्हाला हे काम दिलं ना, आता डोक्यावर जग घेऊन जोगवा मागायचा नाही; पण याचा अर्थ तुम्ही तो फेकून द्यावा असंही नाही. पोल्ट्रीमध्ये तुम्ही तो ठेवून द्या. कामावर याल तेव्हा त्याच्या पाया पडा आणि मग कामाला लागा. ' त्या तशा कामावर यायला लागल्या. त्यांनी जग एका बाजूला ओळीने मांडून ठेवले होते. '

लीना मेहेंदळे शासकीय अधिकारी असल्याने ' त्यांचा स्टायपेंड ' ट्रायसेम '

योजनेत बसवला.' 'अमुक आय. डी. पी. त बसवलं.' अशी शासकीय गूढ भाषा त्यांच्या तोंडी होती. असल्या योजनांची नावं कानावर पडून गेलेली होती, पण त्यांचा अर्थ माहीत नव्हता.

'मग ट्रेनिंग झाल्यावर पुढं काय झालं ?'

'पुढचं काम जिल्हा परिषदेचं, बँकांचं होतं. त्यांना धंद्यासाठी भांडवल देणं, वगैरे. तिथं बँकेच्या लोकांनी गॅरंटीच्या बऱ्याच अडचणी काढल्या. झेड. पी नेही तसंच केलं. मी कलेक्टर व्हायच्या आधी तिथंच झेड. पी. ची मुख्य कार्यकारी अधिकारी (सी. ओ.) होते, आता कलेक्टर होते. कलेक्टर या नात्याने मी त्यांना सांगू शकत होते. पण सी. ओ. असताना मी तिथं गेले असते आणि हे काम झाल्याशिवाय मी इथून परत जाणार नाही असं म्हटलं असतं, तर तिथंच सगळी कामं झाली असती. तसं आता होऊ शकत नव्हतं. कलेक्टरच्या हातात जेवढं होतं, तेवढं केलं. पोल्ट्री-साठी दोन गुंठे जमीन मी सरकारी जमिनीतनं प्रत्येकीला मंजूर करून घेतली. पुढं पोल्ट्री आणि मागे रहायला दोन खोल्यांची जागा. त्याचा सगळा लेंग्दी प्रोसीजर पूर्ण करीत आणला, अगदी सात-बाराच्या उताऱ्यावर नाव चढवण्यापर्यंत स्टेज आली. आणि नंतर माझी बदली झाली.'

'मग पुढं ?'

'ते काम रेंगाळलं. तिथल्याच लोकांनी, त्या जागा आपसांत बदलून घ्यायचं ठरवलं. पुढचं आता काय स्टेजला आहे ते माहीत नाही.'

'तुम्ही स्वेटर विणायची नीटिंग मशिन्स त्यांना घेऊन दिल्याचं ऐकलं होतं. ते काय होतं ?'

'त्या ट्रेनिंगमध्ये देवदासींबरोबर इतरही काही स्त्रिया घेतल्या होत्या. त्यांना स्वेटर विणायचं ट्रेनिंग 'ट्रायसेम'खाली दिलं. त्यातसुद्धा खूप अडचणी. ट्रेनिंगच्या वेळी लागणारी लोकर त्या खर्चात बसणारी नव्हती. झेड. पी. वाले म्हणाले, ट्रेनिंग झाल्या-वर धंद्यासाठी रॉ मटेरिअलसाठी आम्ही कर्ज देऊ शकतो, पण ट्रेनिंगसाठी नाही. मधल्या काळात माझी डब्ल्यू. एम. डी. सी. त बदली झालेली होती. इथून माझ्या अधिकारात दहा हजार रुपये मंजूर करणं असतं, ते मी त्यांना लोकरीसाठी दिले. खरं म्हणजे आमचं ते कार्यक्षेत्र नाही, पण ओढूनताणून ते बसवलं. त्यांनी विणलेले स्वेटर आम्ही आमच्या प्रदर्शनात मांडले, ते सर्व विकले गेले. त्यातनं आमचे दहा हजार रुपये आम्हाला परत मिळाले.'

मी म्हटलं, 'या सगळ्यांतून त्यांना केवढा आत्मविश्वास आला असणार! आपण एखादं कौशल्य शिकू शकतो, उत्पादन करू शकतो, ते विकलं जाऊ शकतं.'

लीना मेहेंदळे मला थांबवून म्हणाल्या, 'नाही, नाही. त्यानं खरं तर मला आत्म-विश्वास आला, की अशा कामातनं काही होऊ शकतं. त्यांना तर आलाच असेल.

सरकारी यंत्रणेत अनेक योजना असतात, पैसे पडून असतात. काही केंद्र सरकारच्या, काही राज्य सरकारच्या. पण कुणी काही करायला गेलं की अमक्या योजनेत अमकं बसत नाही, तमकं बसत नाही, अशा अडचणी पुढं येतात. परत सगळंच काम सरकारी यंत्रणेतनं होऊ शकत नाही. काही स्वयंसेवी संस्था, माणसं पुढं आली पाहिजेत. दक्षिण महाराष्ट्रात भगिनी निवेदिता प्रतिष्ठान म्हणून संस्था आहे. गोव्या-पर्यंत त्यांची केंद्रं आहेत. मी त्यांना इनव्हाल्व्ह केलं.'

'आता त्या जतच्या देवदासींची ही नीटिंग मशिनची कर्जं फिटली का?'

'नाहीत अजून. स्लो रि-पेमेंट चालू आहे. पण फिटतील.'

'त्यांचे स्वेटर्स विकले कुठं जातात?'

'मी असं ऐकलंय की जतमध्येच त्यांचा माल विकला जातो. पण ती यंत्रणा उभी करावी लागेल.'

'आता तुमचं डब्ल्यू. एम. डी. सी. चं केंद्र गडहिंग्लजला होणार असं ऐकलंय. त्यात काय करणार आहात तुम्ही?'

'हाच, नीटिंग प्रोग्रॅम घेणार आहोत.'

लीना मेहेंदळे अस्खलित मराठी बोलत होत्या. पण ऐकताना मघापासून जाणवत होतं की यांचं बोलणं काहीतरी वेगळं आहे. याला कुठलीच स्थानिक अशी ढब नाही. या मराठी नसतील का?

मी विचारलं, 'तुमचं गाव कोणतं?'

व्यक्तिगत प्रश्न एकदम विचारल्याने त्या जरा थांबल्या. हसल्या. म्हणाल्या, 'मूळ जळगावची आहे मी. पण लहानपण, शिक्षण बिहारमधल्या दरभंगा गावी झालंय.'

'वडील सर्व्हिसनिमित्त तिकडे होते का?'

'हो.' म्हणून त्या गप्प झाल्या.

या प्रश्नामुळे संभाषण थोडं अडखळलं. मी आदल्याच दिवशी समाज कल्याण खात्याच्या एका अधिकाऱ्याशी एका योजनेबद्दल बोललो होतो. त्याबद्दल यांनाही विचारावं म्हणून मी म्हटलं,

'अलीकडे सरकारने, देवदासीने लग्न लावल्यास तिला दहा हजार रुपये बक्षीस देण्याची योजना काढलीय, ती तुम्हाला कशी काय वाटते?'

त्या गप्प बसल्या व सौम्य हसल्या.

माझ्या लक्षात आलं की त्या सरकारी अधिकारी आहेत. त्यांचं मन त्या योजनेविषयी ठीक नसलं तरी त्या ते व्यक्त करणार नाहीत. म्हणून मीच माझं मत सांगितलं. म्हणालो, 'परवा मी त्या वाटपाच्या समारंभास गेलो होतो. सगळ्या पुण्यातल्याच देवदासी होत्या. मी समाज कल्याण अधिकाऱ्यांना काल म्हटलं की तुम्ही एखादी

स्त्री देवदासी आहे याची खात्री कशी करता? तर ते म्हणाले, याची आम्हालाही कल्पना नाही. पुण्यातल्या दोन देवदासी संघटनांनी नावं सुचवली, त्यांना आम्ही ही मदत दिली.'

लीना मेहेंदळे म्हणाल्या, 'कोल्हापूर, सांगली जिल्ह्यांतल्या ग्रामीण भागातल्या देवदासींच्या बाबतीत क्रायटेरिआ ठरवणं शक्य आहे. सगळ्या गावाला माहीत असतं की कोण देवदासी आहे. त्या काही घरी रोजच्या जोगवा मागत असतात. सरपंच आणि गावातल्या चार प्रतिष्ठित लोकांच्या साक्षी काढल्या तरी ही देवदासी आहे की नाही, ते सहज ठरवता येईल.'

'हे खरंय. पण पुण्या-मुंबईतल्या वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रिया गळ्यात चार पांढरे मणी घालून देवदासी म्हणवून घ्यायला लागल्या, तर सरकारला पैसे पुरणारच नाहीत.'

'नाही, नाही. ही योजना ग्रामीण भागातल्या देवदासींपुरतीच मर्यादित ठेवली पाहिजे. पुणे, मुंबई तर यातून स्ट्रिक्टली वगळलंच पाहिजे.'

मी म्हटलं, 'पण सरकार बाकी सगळं करेल, पण देवदासी म्हणून सोडल्याबद्दल पाचसात केसेस हुडकून त्यांच्यावर खटले का भरत नाही? त्यामुळे नवीन मुली सोडण्यावर आळा बसेल.'

मान हलवीत त्या म्हणाल्या, 'असं नाही करू असं मला वाटतं. कारण ह्या मुली सोडल्या जातात त्या दारिद्र्यापोटी. घरातलं एक खायचं तोंड कमी करण्यासाठी, लग्नासाठी ऐपत नसते म्हणून. अशा दरिद्री लोकांवर खटले भरून, त्यांना तुरुंगात टाकून आपण काय मिळवणार आहोत?'

मला हे नवीन होतं. ते पटत नव्हतं. कारण त्याशिवाय या प्रथेला आळा कसा बसणार होता! पण एकीकडे मन हे मान्य करीत होतं की या बाईचा दृष्टिकोण माझ्यापेक्षा अधिक सहृदय आहे.

मी विचारलं, 'तुम्ही काही देवदासींची योग्य माणसांबरोबर लग्नं लावून दिलीत, असं ऐकलं आहे. ती कशी काय लावून दिलीत?'

'सात जणींची लावली. खरं तर आमच्या या सगळ्या प्रोग्रॅमचं बहुतेक सगळं श्रेय एकदोन स्थानिक अधिकाऱ्यांना आहे. पोल्ट्रीचं काम बघणारे कळगी नावाचे व्हेटर्नरी ऑफिसर होते. त्यांनी या सगळ्या प्रोग्रॅममध्ये जीव तोडून काम केलं. सोनार नावाचे तहसीलदार होते जतला, त्यांनीही खूप इंटरेस्ट घेतला. पोल्ट्रीचं ट्रेनिंग चालू असताना कळगींनीच ही लग्नं जमवली.'

'कशी काय?'

'एक तर काय, देवदासीविषयी शहरातल्या लोकांना जे माहीत असतं, त्यापेक्षा तिकडे खूप वेगळं असतं. त्या वेश्याव्यवसाय करत नाहीत, थोड्या लोकांशीच संबंध

मर्यादित ठेवतात. त्यांतल्याही काही एकाशीच संबंध ठेवतात. त्यांच्या रखेली-सारखीच ती असते. तिला मुलं होतात, तर सगळ्या गावाला माहीतच असतं की ही मुलं कुणाची. या सात देवदासींपैकी दोघी जणी अशा होत्या की ज्यांचे संबंध दोन वेगळ्या अविवाहित माणसांशी होते. त्यांना बोलावून कळगींनी सांगितलं, 'नाहीतरी तुम्ही नवराबायकोसारखे संबंध ठेवता, तुम्ही लग्न का करून टाकत नाही?' आमचा आधार आहे म्हटल्यावर ते तयार झाले. उरलेल्या देवदासींची त्या भागातल्याच तरुण मुलांशी लग्नं जमली. एकतर त्यातला शिक्षक आहे. तो म्हणाला, 'मी तयार आहे, पण मी गावात राहिलो तर घरचे लोक येऊन माझा खून पाडतील.' मी त्याला म्हटलं, 'तुला आम्ही तुझं समाधान होईपर्यंत पोलीस प्रोटेक्शन देऊ. दोन महिने, चार महिने, काय वाटेल तितका काळ. पाहिजे तर आम्ही तुझी दुसऱ्या गावाला बदली करून देतो. ते अगदी आमच्या हातातलं आहे.' मग तो कबूल झाला.'

'या कार्यक्रमाला गावचा विरोध नाही का झाला?'

'पहिल्या लग्नाला विरोध होता. त्यामुळे आम्ही पैसे जमवून मांडव घालून लग्न केलं. कुणी फारसे लोक लग्नाला आलेही नाहीत. नंतरच्या लग्नाला लोक येऊ लागले. पुढं पुढं तर वर्गणी द्यायला लागले. अहेरही करू लागले. त्यावेळी या लग्नाचे फोटो पेपरमध्ये यायचे. खूप पत्रं यायची. या सर्व पत्रांना मी पर्सनली उत्तरं द्यायचे. काहीजण लिहायचे, 'आम्ही देवदासीशी लग्न करायला तयार आहोत, पण ते गुपचूप. समाजात ते कळता कामा नये.' मी त्यांना लिहायचे, 'नाही. लग्न हे जाहीरपणे होणार, पेपरमध्ये फोटो येणार. कारण गुपचूप लग्न करून कुणी नंतर तिला सोडून गेलं तर?' सामाजिक दडपण अशा वेळी हवंच. एकाने तर लिहिलं की मी देव-दासीशी लग्न करायला तयार आहे. पण या बदल्यात शासन मला काय देणार आहे? मी त्याला लिहिलं, तुम्हाला देवदासी ही आपल्यासारखीच एक व्यक्ती आहे आणि तिला आपल्याइतकेच समान अधिकार आहेत असं खरोखरीच वाटत असेल तर या लग्नाचा आपण विचार करा. लग्न हा बारगेन करण्याचा प्रकार समजू नका.'

मी म्हटलं, 'कर्नाटकात महालिंगपूरम येथल्या एका पोलीस अधिकाऱ्याने अशी देवदासींची बरीच लग्नं लावून दिली होती. त्यात काहीतर आंतरजातीय, आंतर-धर्मीयही होती. पण त्याची बदली झाल्यावर त्यातली बरीच लग्नं मोडली, असं ऐकलं.'

लीना मेहेंदळे जरा जोरातच म्हणाल्या, 'त्याबद्दल मी त्या अधिकाऱ्याला अजिबात दोष देणार नाही. एकतर हा काही त्यांच्या कामाचा भाग नव्हता. पण या प्रश्नाशी संबंध आल्यावर आऊट ऑफ वे जाऊन आपला इन्फ्ल्यूएन्स, यंत्रणा वापरून त्यांनी हे काम केलं. एकदा बदली झाल्यावर तो माणूस तिथे इर्रेलेव्हंटच होतो. मी काम करत होते किंवा आमचे तहसीलदार करीत होते, त्यावेळीही आम्हाला आमची

नेहमीची कामं भरपूर होतीच. हे काम म्हणजे एक्स्ट्रॉ करिक्युलर होतं. त्यात बदली झाल्यावर आमचा काहीच इलाज चालत नाही.'

'पण तरी तुम्ही डब्ल्यू. एम. डी. सी. तर्फे त्या कामाशी संबंध ठेवलाच आहे!'

'अहो, या क्षेत्राचा आजच्या माझ्या पोस्टचा ओढून ताणून तरी संबंध आणता येतो. पण अगदीच, वेगळ्या क्षेत्रात बदली झाली असती म्हणजे? मी काहीच करू शकले नसते. ते काम त्या भागातल्या सामाजिक संस्थांनी हातात घेतलं पाहिजे. म्हणून मी अशा संस्थांना सुरुवातीपासून इन्व्हॉल्व्ह करीत असते. आता गडहिंग्लजचं आमचं काम उभं राहणार आहे ते अशाच एखाद्या संस्थेच्या सहकार्याने उभं राहावं अशी संस्था मी शोधतच आहे. नंतर येणारा अधिकारी या कामात रस घेणाराच असतो असं नाही. माझ्यानंतर आलेले कलेक्टर जतला गेले तेव्हा त्या देवदासींनी त्यांच्याकडे मोर्चा नेला. 'आम्ही ट्रेनिंग घेतलं, आम्ही जोगवा मागत नाही, आता काय करता, बोला!' असं त्यांना या देवदासींनी ठणकावून विचारलं. मला कुणीतरी हे सांगितलं तेव्हा मी म्हटलं, 'त्यांचा ट्रेनिंग प्रोग्रॅम, पुनर्वसन किती यशस्वी झालं याची शंका आहे. पण मी हे अपयश मानत नाही. स्त्रिया आत्मविश्वासाने, धीटपणाने कलेक्टरना जाब विचारायला आल्या, हे मी या कार्यक्रमाचं यशच समजते.'

मनात आलं, आता या अगदी एखाद्या कार्यकर्त्यासारखं बोलल्या. गावोगाव फिरताना प्रतिकूल परिस्थितीत काम करणारे कार्यकर्ते भेटतात. बोलताना ते वाईटातूनही चांगलं पुढे ठेवत असतात. आणि ते नीतिधैर्य टिकण्यासाठी आवश्यकही असतं. एरवी अनेक सरकारी अधिकाऱ्यांशी संबंध येतो. प्रमोशन, स्टेटस या पलीकडे त्यांचं सहसा विश्वच नसतं. भ्रष्ट आणि लाचार अधिकाऱ्यांचं तर सोडून द्या. पण अशा यंत्रणेत या बाई कशा काम करत असतील? एकतर या प्रश्नात सरकारला अजिबातच रस नाही, दिसतंच आहे. आपल्यासारख्या बाहेरच्या माणसांची सरकारकडनं फार अपेक्षाही नसते. पण या यंत्रणेत काम करणाऱ्या या बाईंना सरकारच्या सामर्थ्याची कल्पना नक्कीच असणार. एकीकडे ती ताकद किती वाया जाते हेही दिसत असणार.

परतताना वाटलं, या बाई खाली कार्पेट घातलेल्या काचेच्या ऑफिसात बसत असल्या तरी आपल्यासारख्याच आहेत.

**प्रतिक्रिया**

सुभाष जोशी, सुशीलाबाई नाईक, बाबा आढाव यांचा देवदासी प्रश्नावर टीव्ही-

वर चर्चेचा कार्यक्रम झाला. ‘ सावली ’ या देवदासी पुनर्वसन केंद्राची माहिती त्यांनी चर्चेत सांगितली. मुंबईत त्यांची प्रेस कॉन्फरन्स झाली. त्याचेही रिपोर्ट सगळीकडे आले. त्यानंतर अनेकांनी ‘ सावली ’कडे छोट्यामोठ्या देणग्या पाठवल्या. पत्रांचा तर पाऊस पडला. परवा सुभाष जोशीकडे बसलो असताना समोर पत्रव्यवहाराच्या फायली पडलेल्या होत्या. त्या सहज म्हणून चाळू लागलो. आईवडिलांच्या श्राद्धा-निमित्ताने बऱ्याच जणांनी पन्नास–शंभर रुपयांच्या देणग्या पाठवलेल्या दिसत होत्या. बरीचशी अभिनंदनाची पत्रं होती.

या सगळ्यात काही पत्रांनी लक्ष वेधून घेतलं. मुंबईत राहणाऱ्या काहीजणांनी लिहिलं होतं, ‘ घरकामासाठी आमच्याकडे एक देवदासी पाठवा. आमचीही गरज भागेल; तिचाही उद्धार होईल. ’ मी सुभाषला विचारलं, ‘ अशा पत्रांच्या बाबतीत तुम्ही काय करता ? ’

तो म्हणाला, ‘ आम्ही घरकामासाठी देवदासी पाठवायच्या विरुद्ध आहोत. ’

‘ का बरं ? ’

‘ एकतर या देवदासी हा परिसर सोडून इतक्या लांब जायला तयार नसतात. दुसरं म्हणजे, ही माणसं कोण, कशी आहेत ते आपल्याला माहीत नाही. तिचा त्यांनी गैरफायदा घेतला तर त्याला कोण जबाबदार ? अगदी आपल्या ओळखीच्यातलं खात्रीचं घर असलं आणि तिथं कुणी देवदासी जायला तयार असली तर पाठवूसुद्धा. पण एकंदरीत आम्ही ह्याला उत्तेजन देत नाही. ’

पुढे एक पोस्टकार्ड दिसलं. सोलापूरच्या साळवी नावाच्या गृहस्थाचं होतं. ‘ मी एका निराधार, प्रौढ, परित्यक्ता, विधवा, अशिक्षित, वय तीस ते चाळीस असलेल्या देवदासीशी दत्तक विधान किंवा विवाह करून वैवाहिक जीवन समृद्ध करू इच्छितो. एका देवदासीचं जीवन फुलवू इच्छितो. मी मराठा, वय पंचावन्न, पेन्शनर, एकटा, सधन, कुटुंबवत्सल, भाविक, सन्मार्गी व हरिभक्त आहे. ’ या पत्रातील विवाह, एकटा, सधन व हरिभक्त या शब्दांखाली लाल पेनने दोनदोन रेघा ओढलेल्या होत्या. मी हसून सुभाषला म्हटलं, ‘ दत्तक विधान किंवा विवाह, यांपैकी काहीही करायला हे तयार आहेत. ’

‘ आणि परत ते हरिभक्तही आहेत. ’

पुढे एका ठिकाणी दोनतीन फुलस्केप कागदांवर लिहिलेलं, चांगल्या अक्षरांतलं पत्र होतं. पुण्याच्या श्रीरंग पाटील नावाच्या मुलाने लिहिलं होतं. ते वाचू लागलो : ‘ अनेक चित्रपट व कादंबऱ्या वाचून देवदासीबद्दल प्रेम व सहानुभूती निर्माण झाली. तिच्यासाठी समाजकार्य आपल्या हातून व्हावे या हेतूने पुण्यातील शुक्रवार पेठ, बुध-वार पेठ येथे वास्तव्य करून असलेल्या, देवदासींच्या नावाखाली वेश्याव्यवसायास प्रवृत्त करणाऱ्या एका आक्काकडे गेलो. तेथे असलेल्या रत्ना नावाच्या जयसिंगपूर-

हून जबरदस्तीने पळवून आणलेल्या एका मुलीला या व्यवसायापासून परावृत्त करण्याचा चंग बांधला. त्यासाठी कष्ट उपसून पैसे मिळवून तिला या व्यवसायापासून परावृत्त करण्यात यश मिळवलं. परंतु हे सर्व करीत असताना मी तिच्या इतका जवळ आलो की, माझ्यापासून तिला एक मुलगी झाली.'

मी वाचताना थबकलोच. असं काही वाचायला मिळेल अशी अपेक्षाच नव्हती. पुढं पत्र वाचू लागलो : 'मी तिच्याही पालनपोषणाची जबाबदारी घेत आहे. परंतु हे सर्व करीत असताना मला समाजाचा, मित्रांचा फार त्रास सहन करावा लागला. माझ्या आईलाही ही गोष्ट माहीत आहे. रत्नाला तुम्ही पुण्यात कोणता व्यवसाय काढून देऊ शकाल?' मी थांबलो.

सुभाष म्हणाला, 'एवढंच नाही, पुढं तो काय म्हणतोय बघ.'

मी वाचू लागलो. 'यापुढे मलाही, माझे मत नसले तरी, आईसाठी माझ्या जातीतल्या मुलीशी, पाहून, रिवाजाप्रमाणे लग्न करावे लागेल. ही गोष्ट मी रत्नाला सांगितली आहे. तिचं काहीही म्हणणं नाही. मी तिला येथून सोडवावं हीच तिचीही इच्छा आहे. माझं लग्न झाल्यावर मी तिच्या देखभालीत अंतर देणार नाही. आपण या गरीब देवदासीस इथं व्यवसाय काढून द्यावा. तसेच तिच्या मुलीची निपाणीतल्या आपल्या 'सावली' संस्थेत सोय करावी, ही विनंती.'

सुभाष म्हणाला, 'काय हद्द आहे की नाही अगदी?'

मी म्हटलं, 'बघ, लोक देवदासी उद्धारासाठी कसे आपण होऊन पुढं येत आहेत. तुम्ही अशांचं स्वागत करायला पाहिजे.'

आम्ही हसलो.

सुभाषने फायलीतली बरीच पत्रं चाळून एक पत्र काढून दाखवलं. ते एका जादूगाराचं पत्र होतं. त्याने लिहिलं होतं, 'मी एक अभिनव प्रयोग बसवीत आहे. त्यात जाळातून उडी मारण्यासाठी मला स्त्रिया हव्या आहेत. त्यासाठी पन्नास देवदासी ताबडतोब पाठवा.'

मी थक्कच झालो.

पुढं स्वतःविषयी माहिती लिहून पुढं लिहिलं होतं, 'पन्नास देवदासी पाठवणं शक्य नसल्यास बावीस तरी पाठवा.' शेवटी लिहिलं होतं, निदान चार देवदासी तरी पाठवा. तेही शक्य नसल्यास दोन पाठवाच.'

मी सुभाषला म्हटलं, 'तू आता 'देवदासी सप्लायर्स, सोल एजंट' अशी पाटी लावायला हरकत नाही.'

मुंबईच्या एका आर्किटेक्टचं इंग्लिशमध्ये टाइप केलेलं पत्र होतं. लेटरहेड अगदी पॉश होतं. आडनावावरून हा महाराष्ट्रीय ब्राह्मण होता. त्यांनी लिहिलं होतं, 'तुम्ही माझ्याशी सहमत व्हाल की नाही ते मला माहीत नाही, पण भारतीय परंपरेतल्या

काही चालीरीतींमध्ये नक्कीच मोठा अर्थ असतो. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावाने त्या चालीरीती आपल्याला रानटी वाटतात. पण वेश्याव्यवसाय ही समाजाची मोठी गरज आहे. हा व्यवसाय नष्ट करता कामा नये. नाहीतर आपल्याला सुरक्षित कौटुंबिक जीवन उपभोगणं अशक्य होईल. अर्थात हा धंदा व्यावसायिक पातळीवर केला जावा. वेश्यांना प्रशिक्षण द्यावं. स्वच्छ व निरोगी सेक्स लोकांना उपलब्ध व्हावा.' इत्यादी.


मी म्हटलं, 'आमच्याकडेही गोखले नावाचे गृहस्थ आहेत. ते देवदासींमध्ये भाषणं करतात. त्यांची एक संघटना चालवतात. त्यांनी एके ठिकाणी देवदासींमध्ये भाषण केलं होतं. ते माझ्या डायरीत लिहिलेलं आहे.' मी ते वाचून दाखवलं, 'तुम्ही या पंथाला वाहून घेतलेल्या भाग्यवान स्त्रिया आहात. ज्या देवीची पूजा करतात त्या शक्तिहीन असणं शक्य नाही. म्हणून आम्ही हीनदीन असणं शक्य नाही. आमची गरिबी गौण आहे. देवीच्या भक्तीचा ठेवा महान आहे. या संस्कृतीत श्रद्धेला महत्त्व आहे. श्रद्धेपोटी देवासाठी आपण सर्व सोसतो. देव झोपलेला नसतो. आमच्या कर्माने आम्ही भोगतो. आमचा देह कःपदार्थ म्हणून आम्ही गळ्यात कवडी घालतो. आपण जटा कशासाठी वाढवता? जटेमागे अर्थ आहे. ऋषिमुनी त्या वाढवत. त्यामागे वैराग्य आहे. देवदासींना पाहिल्यावर लोक नाक मुरडतात. आपण आपली प्रतिष्ठा वाढवली पाहिजे. तुम्ही उपेक्षित असलात, तरी अनाथ नाहीत. घृणास्पद जीवन जगत असलात, तरी तुम्ही श्रद्धा टाकलेल्या नाहीत. विकृती टाकून द्या, रेणुकादेवी आपल्याला सुखी करणार आहे. वैगुण्यातही देवदासीत्व आपण स्वीकारले आहे. तो ठेवा आहे. शक्ती आहे.'

मी डायरी मिटली तेव्हा दिसलं दोन-तीन कार्यकर्ते, एकदोन देवदासीही येऊन बसलेल्या होत्या. त्या हे ऐकत होत्या. त्यांतली एक बोलकी देवदासी उसळून म्हणाली, 'या बामनाच्या पोरीला जट आली, तर तो काय करील हो? तो गुपचूप काढूनच टाकील ना?'

कार्यकर्ता म्हणाला, 'देवदासींमध्ये अंधश्रद्धा असणं साहजिक असतं. पण शिकली सवरलेली आणि तीही बाहेरची माणसं असं म्हणायला लागली तर काय करायचं?'

मी म्हटलं, 'त्यांना या देवदासींनीच उत्तर द्यायचंय.'

□



# झपाटलेलं गाणगापूर

पुण्यातल्या मंडईच्या कोपऱ्यावर एका जुन्या वाड्यावर दत्तभक्त करंदीकर अशी पाटी दिसली. तेव्हा कुतूहल म्हणून आत, वरती गेलो. चाळीतल्या जुन्या दोन खोल्यांच्या घरात ते राहत होते. पुढच्या खोलीत दोनचार माणसं खाटेवर बसलेली. दत्तभक्त करंदीकर आतमध्ये असावेत.

मी एका मध्यमवयीन माणसापाशी करंदीकरांविषयी चौकशी केली. मी नवा आहे समजताच तो माणूस खुलला. म्हणाला, ‘ काय सांगू आमच्या महाराजांची माहिती ! अहो, त्यांना प्रत्यक्ष दत्तगुरूंचं दर्शनच झालं आहे. त्यांना काही अशक्य नाही. त्यांना सर्व कळतं. या गेल्या महिन्यातलीच गोष्ट सांगतो. महाराजांनी आज्ञा केली आम्हा नवरा–बायकोला. येत्या गुरुवारी गाणगापूरला जाऊन या. मी म्हटलं, महाराज, कसं जाणार हो ? लग्न–सीझनची एवढी गर्दी ! आज रविवार ! गुरुवारचं रेल्वेचं रिझर्वेशन मिळणार तरी कसं ? महाराज नुसते हसले. मी समजलो. दुसऱ्या दिवशी सक्काळीच स्टेशनवर गेलो. नेमकी दोन रिझर्वेशन्स उरलेली. काय कृपा बघा ! त्या दिवशी गाडीला निघालो. आमचा खरा तर वाहता रस्ता—पण रिक्षाच मिळेना. कोपऱ्यापर्यंत चालत गेलो. कुठेही रिक्षा दिसेना. कशी कोण जाणे, पण एकदम एक रिक्षा समोर येऊन उभी. स्टेशनावर पोहोचतोय तो अर्धा तास उशीर झाला होता. मनात दत्तगुरूंचं नाव घेत होतो. म्हटलं, आपली राहली गाणगापूर यात्रा इथंच. पण आत जातो तो काय, महाराजांनी गाडी थांबवून धरलेली. आम्ही आत चढलो आणि गाडीने शिट्टी दिली. ’

त्यांची बायको पलीकडे बसलेली. तीही हे ऐकताना भक्तीने मान आडवी हलवीत ‘ बघा ना,’ ‘ हो ना,’ असं म्हणत होती.

तिथं एक काळपट रंगाचा, अर्धवट दाढी वाढलेली, कपाळावर आडवं तीन बोटांचं भस्म लावलेला, पँट-शर्टमधला माणूस होता. त्यांना विचारलं, ' तुम्ही काय नोकरी-धंदा करता ? '

' मी हेड-कॉन्स्टेबल आहे. पण माझी दत्तभक्ती पाहून मला कमिशनर ऑफिसात क्लार्कचं काम दिलंय. '

आत्ता दुपारचे बारा वाजत आलेले होते. म्हणून त्यांना विचारलं, ' मग आज काय रजा का ? '

' छे: छे ! अजून जायचंय ना ऑफिसला. पण खरं सांगू का—' आत बोट करून ते म्हणाले, ' महाराज माझी सगळी काळजी घेतात. मी कितीही उशिरा गेलो तरी ऑफिसातले बडे अधिकारी असोत, नाहीतर छोटे अधिकारी असोत, मला आज-पर्यन्त एका शब्दानंही कुणी बोललं नाही. '

आतनं काही आवाज आला तसे आम्ही सगळे उठून आत गेलो. बऱ्याच उघड्या स्वामींचे फोटो लावलेले. समोर निरनिराळ्या रंगांच्या फडक्यांत गुंडाळलेल्या पोथ्या ठेवून भिंतीशी पाटावर, पाटाला टेकून करंदीकर बसलेले. काळ्या रंगाचे, चाळिशीचे गृहस्थ होते. डोक्याला पूर्ण टक्कल-पण साइडचे केस होते, ते बरेच वाढलेले. दाढी-मिश्या मात्र तुळतुळीत. कपाळावर आडवं भस्म. अंगात भगवा शर्ट. डोळे सतत रोखून पाहणारे होते. बुबुळाच्या खालून-वरून दोन्हीकडनं पांढरा भाग दिसत होता.

नमस्कार करून बसलो. करंदीकरांनी माझी बारकाईने चौकशी केली. गुरुचरित्र वाचल्याने कुणाला कसा फायदा झाला आहे, कसे साक्षात्कार झाले, वगैरे गोष्टी सांगितल्या. शेवटी एक डबी काढून ती उघडून माझ्यासमोर धरली. आत राख होती. म्हणाले, ' वास घ्या. ' मी घेतला. उदबत्तीसारखा वास येत होता. ' काय, कस्तुरीचा वास येतोय की नाही ? '

मी मान हलवली. ते म्हणाले, ' हे गाणगापूरहून आणलंय भस्म. जमिनीच्या पोटातनं भस्म काढलंय. याला कस्तुरीचा वास यायचं काही कारण आहे का ? पण ही गुरूची कृपा. तुम्ही गाणगापूरला जाऊन या. तुम्हाला अनुभव येतील. '

त्यांचे डोळे रोखून पाहणे, मधूनच गूढ हसणे यामुळे थोड्याच वेळात माझं डोकं दुखू लागलं. त्यांना नमस्कार करून बाहेर पडलो.

एका मित्राच्या दुकानात बसलो होतो. मित्र नव्हता. गल्ल्यावर त्याचा धाकटा भाऊ होता. सहज कशावरून तरी गाणगापूरचा विषय निघाला. तो म्हणाला, ' आई-बरोबर मी गाणगापूरला गेलो होतो. इतका घाबरलो म्हणताय ! इतर वेळी समोर तलवारी घेऊन माणसं उभी राहिली तरी मला कधी भीती वाटली नाही. पण

गाणगापूरला ती बाया, माणसं अंगात येऊन नाचतात, खांबावर चढतात, खाली आपटतात, पायऱ्यांवर चढतात ते पाहून मला धडकीच भरली!'

'तू काय दत्तभक्त का?'

'छे हो. आईनं आग्रह करून नेलं. मला काही माहिती नाही. तिथं दुपारी माधुकरी मागून खायचं असतं. आपल्याला काहीतरीच वाटतं हो ते. पण सगळेच मागतात. तिथले लोक घालतात. आईनं मला बजावलं होतं, की कुणी भिकारी आला आणि भिक्षा मागू लागला तर असेल त्यातलं थोडं घालायचं. नसेल द्यायचं तर त्याला नमस्कार करायचा—पण हाकलून लावायचं नाही. कुत्रं समोर आलं तरी 'हाड्' करायचं नाही. कारण दत्तगुरू कुठल्या रूपात तुमच्या समोर येईल हे काही सांगता येत नाही. खरं सांगतो, या सगळ्या प्रकारानं मी तर घाबरूनच गेलो होतो.'

रात्री आठ–साडेआठला एस. टी. ने गाणगापूरला पोहोचलो. सोलापूरपासून पाच तास खराब रस्त्याने प्रवास केलेला होता. खाली चारपाच पोरं होती. खोली पाहिजे का, खोलीत ट्यूबलाईट, पंखा आहे. संडास आहे, बाथरूम आहे.' मुजावर नावाच्या पोराने खोली दाखवली. म्हणाला, 'साहेब, इथंच चपला ठेवा आणि मग देवळात जा. खाली किल्ली आहे. तिने संडास, बाथरूम उघडून घ्यायचं. कुलूप–किल्ली पण आत न्यायची. आंघोळीला जाताना चपला आत न्यायच्या. इथं कुठली वस्तू कधी जाईल त्याचा नेम नाही. कुणावर विश्वास ठेवायचा नाही.'

जवळ दोन मैलांवर संगम आहे. तिथं राहणाऱ्या एका माणसाच्या नावाने चिठ्ठी आणली होती. जमलं तर रात्री भेटू या, असा विचार होता. मुजावरला म्हटलं, 'संगम किती लांब आहे? तिथं एक ओळखीचा माणूस आहे. त्याला भेटायचं आहे.'

तो आश्चर्याने म्हणाला, 'रात्री जाणार? दोन मैल लांब आहे. बिल्कूल जाऊ नका. लई डेंजर आहे तिकडे. परवाच एक मर्डर झालाय तिथं.'

देवळाच्या दिशेने चालू लागलो. छोटा वेडावाकडा जाणारा, खाली फरशी घातलेला रस्ता होता. बाजूची दुकानं बंद होती. एखादं पानपट्टीचं दुकान उघडं होतं. दुकानांवर मराठी, कानडी पाट्या होत्या. गाणगापूरऐवजी काही ठिकाणी गांडगापूर, तर काही ठिकाणी घाणगापूर लिहिलेलं होतं. भिंतींवर महादेव भट, गोविंद भट उपाध्ये किंवा पुजारी अशी अक्षरे लिहिलेली होती. त्या टपऱ्याटपऱ्यांच्या दुकानां-मधून एकदम भव्य घडीव दगडाचं प्रवेशद्वार दिसलं. त्यावर मद्रास साइडला गोपुरं

असतात तसं पिवळट रंगाचं, वर अनेक मूर्ती बसवलेलं गोपुर होतं. दहाबारा फूट उंच प्रवेशद्वारातनं आत गेलो.

आत गेल्यावर एकदम दृश्यच पालटलं. समोर फरश्या घातलेलं प्रचंड मोठं आवार होतं. तिथं चारपाचशे माणसं बसली होती, फिरत होती. सगळीकडे कोलाहल माजला होता. त्या आवारात सातआठ मोठमोठे लोखंडी गर्डर्सचे खांब उभे होते. चाळीस–पन्नास फूट उंचीवर त्यांच्यावर लोखंडी पत्र्याचं छप्पर केलेलं होतं. आवाराच्या पलीकडे जुन्या पद्धतीचं नक्षीकामाचं दगडी देऊळ होतं. पुढच्या ओट्यावर गोल, त्यावर चौकोन, परत गोल असे नेहमी जुन्या देवळात असतात तसे दगडी नक्षीकाम केलेले खांब दिसले. आतल्या दगडी भिंतीवर दगडी मूर्ती कोरलेल्या. त्या भिंतीला चांदीच्या नक्षीचा पत्रा मढवलेले चकचकीत दार चमकत होते.

मी पुढे झालो.

बहुतेक सगळी खेड्यातली माणसं होती. घोळक्या–घोळक्याने बसलेली होती. संध्याकाळची आरती साडेसातला होऊन गेलेली होती. त्या वेळी अंगात आलेली चार-सहा बायामाणसे इकडे तिकडे पडलेली होती. कुणी पालथं, कुणी उताणं. चेहरे बेभान आणि दमलेलेही. त्यांच्याभोवती त्यांची नातेवाईक मंडळी आपसांत बोलत बसलेली होती.

समोर एक तरुण आला. उघडा, खाली पंचा लावलेला, अंगावर भस्माचे पट्टे ओढलेला, दाढी राखलेला. वर केसांचा भांग पाडलेला, कपाळावर आडवे तीनचार भस्माचे पट्टे मध्ये शेंदरी ठिपका लावलेला. गळ्यात जानवं, काळा गोफ. खांद्यावर टॉवेल टाकला होता. काखेत छोटी रेक्झिनची बॅग होती. हातात आरतीची बारीक पुस्तकं घेऊन विकत घ्या, म्हणत होता. मी हातानेच नको म्हटलं. असे निदान दहा-पंधरा तरुण जमावात फिरत होते. कुणी पायरीवर आपसांत गप्पा छाटीत बसले होते. इतकी कोवळी तरुण मुलं या वेषात पाहायची सवय नव्हती. त्यांचा वेष ऋषिकुमारां-सारखा असल्याने सगळ्या वातावरणाला एखाद्या पूर्वकालीन सिनेमाच्या सेटचे स्वरूप आले होते. काही ऋषिकुमार कोवळे होते, तर काही रेड्यासारखे माजलेले होते. एकाचे पोट तर एवढे मोठे होते, की त्याचा व्यास तीनेक फूट तर सहज असेल. सगळीकडून तुकतुकीत, सावळ्या रंगाचे पोट शिल्पासारखेच दिसत होते. बरे, तो चेहऱ्यावरून वयाने पंचविशीचा, कोवळा वाटत होता. पण गालात नाक लपून गेले होते. स्वतःच्या पायापासून तीन फुटांवरची वस्तू त्याला दिसत नसणार !

व्हरांड्याच्या कोपऱ्यावर दोन पांढऱ्या शुभ्र दाढीची, उघडी, खाली मळकट धोतरं नेसलेली, गळ्यात मोटमोठ्या रुद्राक्षाच्या माळा, जानवे घातलेली माणसं बसली होती. समोर चारपाच फूट व्यासाचे भलेमोठे ताम्हन घेतले होते. त्यात चांदीच्या मूर्ती, उपकरणे राखेने धूत बसली होती. व्हरांड्याच्या खालून खेडूत

माणसे प्रदक्षिणा घालताना थांबत. भक्तिभावाने हात खोलगट करून पुढे करीत. दाढीवाला खालच्या ताम्हनात साठलेले पाणी पळीने त्यांना तीर्थ म्हणून घालीत असे. त्यातला काळा, मिश्या न ठेवता फक्त दाढी ठेवलेला म्हातारा लोकांवर एकदम वस्सकन ओरडतही असे.

चांदीच्या सामानात एक मुखवटा, कोपरापर्यंतचे हात, गुडघ्यापर्यंतचे पाय असं विचित्र वाटेल असं सामान होतं. मी म्हाताऱ्याला हे काय आहे म्हणून विचारलं. तसा तो माझ्याही अंगावर तसाच वस्सकन ओरडला.

रात्री दहा वाजत आले होते. देवळाच्या आवारात उघड्यावर शेकडो खेडूत झोपले होते. गाभाऱ्याचे चांदीचे दार लावून पुजाऱ्याने कुलूप लावले. आता पहाटे तीनच्या काकड आरतीला ते उघडले जाणार होते.

पहाटे चारला जाग आली. आंघोळ उरकून देवळात गेलो. तर काकड आरती उरकूनही गेली होती. देवळाच्या गाभाऱ्यात पुजाऱ्यांशिवाय कुणालाच जाता येत नाही. दारातून आत गेल्यावर डाव्या बाजूच्या भिंतीला सहा इंच बाय सहा इंच असा एक झरोका आहे. तिथून दर्शन घेता येतं. तिथून आत पाहिलं तर सोन्याचे आठनऊ इंच उंचीचे लंबवर्तुळाकार दोन वरनं उघडे असलेले डबे होते. त्यांत दोन लांबट, वरनं फुगीर शेंदरी रंग लावलेले गुळगुळीत दगड ठेवलेले दिसत होते. या निर्गुणी पादुका. पादुकांसारखा आकारही नव्हता. किंवा त्याला वर आलेला अंगठाही नव्हता. मागे चांदीचे, वरून भगवा रंग लावलेले, वर काळ्या मिश्या काढलेले तीन मुखवटे ठेवले होते.

बाजूला लोखंडी, सरकत्या जाळीचे पार्टिशन होते. त्याच्या आड एक गोरे, पंचा लावलेले पुजारी बसले होते. त्यांचं नाव दत्तात्रेय दीक्षित. हे मित्राचे मामा. ते काल धुऊन साफ केलेले चांदीचे मुखवटे, हातपाय रंगवत बसले होते. चांदीच्याच एका पसरट भांड्यात दोनतीन प्रकारचे रंग कालवून चांदीच्याच काडीने ते रंग देत होते. मी त्यांना ओळख सांगितली. ते हसले. बाजूला पडलेलं, ढिगाऱ्यातलं वाळलेलं तुळशीपत्र उचललं– माझ्या हातावर ठेवलं. म्हणाले, 'खाऊन टाका.' मी ते खाल्लं. नंतर म्हणाले, 'आता संगमावर जाऊन आंघोळ करून या. नऊनंतर समोरच्या धर्मशाळेत मला भेटा. मग तुम्हांला काय अभिषेक वगैरे करायचा असला तर त्याची व्यवस्था करू.'

मी बाहेर आलो. प्रदक्षिणा-मार्गावरून चालू लागलो. त्या मार्गावर लोक गुरुचरित्राचं पारायण करायला बसले होते. काही बसत होते. प्रत्येकाने समोर छोट्या तसबिरी मांडल्या होत्या, नारळ ठेवला होता. त्या नारळाच्या शेंड्यांमध्येच दोनचार

उदबत्त्या खोवून लावल्या होत्या. रेशमी, मळलेल्या वस्त्रात काही पोथ्या गुंडाळून ठेवल्या होत्या. ॲल्युमिनियम किंवा काचेच्या ग्लासमध्ये निरांजने पेटवून ठेवली होती. सीरियस चेहरे करून सगळे गुरुचरित्र वाचीत होते. प्रदक्षिणा मार्गावरून बरीच बायकामाणसे प्रदक्षिणा घालत होती. ठराविक ठिकाणी दगडी भिंतींवर सगळे डोकं टेकत असल्याने तिथली दगडी भिंत तेलकट व गुळगुळीत झालेली होती. गाभाऱ्याच्या बाजूच्या दारासमोर एक पुजारी लोकांचे नारळ थडाथ्थड फोडून एक वाटी आपल्याकडे ठेवून एक प्रसाद म्हणून त्या माणसास परत देत होता. नारळाच्या पाण्याने आसपास सगळीकडे चिकचिक झाली होती. प्रत्येक यात्रेच्या ठिकाणी येतो तसा नासक्या नारळाचा वास तिथे पसरला होता.

आतल्या पूजा संपवून बाहेरच्या फोटो आणि मूर्तींच्या पूजा करायला चारसहा पुजारी बाहेर आले. एकाने तिथे कोपऱ्यात उभा असलेला बांबू प्रदक्षिणामार्गात तिरपा करून ठेवला. लोक थांबले. एकदोन मिनिटांत पूजा संपल्यावर बांबू काढून घेतल्यावर रेल्वे फाटकाच्या वेळी होते तशी गर्दी परत वाहू लागायची.

बाहेर उजाडू लागलं होतं. चिदानंद धर्मशाळेसमोर संगमावर जायला टांगे मिळतात असं कळलं, म्हणून तिथे गेलो. टांग्यात बसलो. मला वाटलं होतं, मागे दोन आणि पुढे दोन अशी माणसं तो पोरगा घेईल. पण आणखी दोन माणसं भरली. चालवणारं पोरगं दहाबारा वर्षांचं. घोडं मरतुकडं. पोरगा घोड्याच्या बाजूच्या दांड्यावर जाऊन जवळपास त्याच्या तोंडाजवळ जाऊन बसलेला. तो मागे वळून हातातल्या छोट्या काठीने घोडयाच्या पुठ्यावर एखाद्या लाकडी टेबलावर काठी जोराने आपटावी तसे मारीत असे. आतले लोक टांगा सुटताना मध्येच एखादं देऊळ दिसल्यावर 'गुरुदेव, गुरुदेव दत्त' असं म्हणत असत. रस्त्याच्या बाजूने लांबून नदी वाहताना दिसत होती. संगमाजवळ आलो तसे देवळं, रस्त्याने भिकारी वगैरे दिसू लागले. एके ठिकाणी भस्माचा डोंगर अशी कमानीवरची पाटी दिसली. तिथे उतरलो.

या डोंगराविषयी फार ऐकलं होतं, पण डोंगर कुठं दिसेना, एक वीस-पंचवीस फूट उंचीचं टेकाड होतं. कमानीपासून आतल्या टेकाडापर्यन्त दुतर्फा भिकारी बसले होते. सगळ्या अंगाला राख फासलेला, दाढी वाढवलेला, उग्र चेहऱ्याचा भिकारी म्हणाला, 'पुण्यक्षेत्र आहे, धर्म करा.' मी त्याच्याकडे बघत पुढे जाऊ लागलो, तसा तो म्हणाला, 'काय, पैसे नाहीत का?'

मी चमकलोच. काही बोलायला सुचलेच नाही.

तो म्हणाला, 'पैसे नसले तर इतक्या लांब, क्षेत्राला आलाच कशाला?' जरा थांबून तोच परत म्हणाला, 'आणि पैसे असले तर देत का नाहीस? चिक्कूपणा करतोस?'

त्याचे रोखलेले डोळे पाहून मी झटकन पुढेच झालो.

मी पुण्याला असताना ‘ गाणगापूरला जातोय ’ असं कुठं तरी म्हणालो, तेव्हा एका मित्राच्या वहिणीने तिथून भस्म आणायला सांगितलं होतं. तेव्हा कागदाच्या पुडीत थोडं भस्म न्यायचा विचार होता; पण लोक हातातून प्लॅस्टिकच्या मोठमोठ्या पिशव्याभर भस्म घेऊन येताना दिसत होते. टेकाडावर गेलो. सगळीकडे माती उकरल्याचे खड्डे होते. भस्म म्हणजे राख असं वाटलं होतं. पण ती पांढरट रंगाची मातीच होती. एकदोन ठिकाणी कुणी विष्ठा करून ठेवली होती. बायका, पुरुष खड्डे उकरून भसाभस अधाशीपणाने ती माती भरून घेत होते. माझ्याकडे एक छोटी प्लॅस्टिक पिशवी होती. तिच्यात ती माती भरून घेतली आणि खाली आलो. परत टांग्यात बसलो. दोघंजण बारदानाची मोठी पिशवी भरून भस्म आणत होते. शेजारी श्रीराम जयरामाची शाल पांघरलेले पन्नाशीचे गृहस्थ बसले होते. आश्चर्यानं मी त्यांना म्हटलं, ‘ किती भस्म चाल्वलंय यांनी ! ’ ते म्हणाले, ‘ हे तर काहीच नाही, मुंबई-हून एक जण मागे आला होता, त्याने ट्रक भरून भस्म नेलं. ’

मी चाटच झालो. मी म्हटलं, ‘ एवढ्या भस्माचं काय करतात ते ? ’

तो गृहस्थ म्हणाला, ‘ अहो, हे भस्म साधं नाही. ही त्या काळची यज्ञभूमी आहे. परशुरामाने यज्ञ केला, त्यात सगळ्या राक्षसांची आहुती दिली. त्या सगळ्या राक्षसांचं हे चिताभस्म आहे. फार पॉवरफूल असतं. तुम्ही काय करा, हे भस्म घरी जाऊन कुटा, वस्त्रगाळ करा. त्यात गोमूत्र टाका. कालवून त्याचे लाडूसारखे गोळे करून ठेवा. म्हणजे काय, भस्म वाया जात नाही. घरात कुणी मूल आजारी असलं, कसली बाधा झाली तर तो गोळा नुसता उगाळायचा, कपाळावर त्याची रेष मारली की सगळं अंगातलं निघून जाणार. अहो, नव्या घरात वास्तुशांतीच्या वेळी हे भस्म नेऊन ठेवतात. कुठली जागा कशी असेल ते काय सांगता येतंय का ? पण भस्म असलं तर भुतं, पिशाच्चं—काय असतील ते ती जागा सोडून जातात. म्हणून जरा जास्तीचं भस्म घरात असलेलं बरं. हे कुठंही टाकू नका बरं का. देवघरात ठेवा— म्हणजे कशाची सावली पडणार नाही. या भस्माला विटाळ अजिबात चालत नाही. ’

हातातल्या त्या छोट्या पिशवीत माती नसून काहीतरी स्फोटक भरलेलं आहे असं एव्हाना वाटू लागलं होतं.

संगमावर एक परळीकर नावाचे गृहस्थ राहतात. त्यांची सोलापूरहून ओळख काढलेली होती. त्यांना शोधून काढलं. ते छोटंसं दुकान चालवतात. मागच्या बाजूला छोट्याशा घरात आम्ही जाऊन बसलो.

मी म्हटलं, ‘ काल रात्री उतरलो, तेव्हा तुमच्या नावाची चौकशी केली. तेव्हा तिथला एकजण म्हणाला, हे गावात नाही राहत, तीन मैलांवर संगमावर राहतात. मग तरी मी यायचं ठरवलं तेव्हा तो माणूस म्हणाला, तिकडे या वेळी जाऊ नका.

नुकताच परवा तिथे मर्डर झाला आहे.'
परळीकर म्हणाले, 'हो, खरं आहे ते.'
'मी विचारलं, 'कुणाचा मर्डर झाला?'
'अहो, काय सांगू? आमच्या गाणगापूरच्या लोकांची बुद्धी फिरलीय. इथं काय लहान पोरसुद्धा यात्रेवर पैसे कमावतं. यात्रेकरूंना हे दाखव, ते दाखव, इथं संगम, तिथं भल्लेश्वर...असं केलं की सहजच कुणीही पाचदहा रुपये हातावर ठेवतंच. अशी चारपाच गिऱ्हाइकं रोजची कशीही मिळतात. त्यामुळं प्रत्येक जण पैसा कमावून राह्यलाय. मग व्यसनं करतात. त्याच्यातूनच हा खून झाला. पिऊन तर्रर्र झाले होते. रात्री अकराला मालीशवाल्याला हा म्हणत होता, मालीश कर. तो म्हणत होता, बाबा, मी दमलोय दिवसभर काम करून. पण तो काय ऐकतोय? आपलं मालीश करत नाही म्हणून हा एवढा दगड उचलला आणि त्याच्या डोक्यात घातला. सगळे आवाज ऐकत होतो—पण तोंडाला कुलूप लावून बसलो. कारण साक्ष द्यायचं लफडं नको आपल्या मागे लागायला.'
'पण अशी व्यसनं करणारे ठराविकच लोक आहेत की जास्त लोक आहेत?'
'फार प्रमाण वाढलंय. गाणगापूर रोड स्टेशनवर मटक्याचा अड्डा आहे. कोण आकडा लावत नाही, हेच शोधायला पाहिजे. सकाळी काकड आरतीच्या वेळी पुजारी लोक एकीकडे देवापुढे आरत्या ओवाळत असतात. आपल्यासारखा बाहेरचा माणूस गेला की हळूच विचारतात, काय रे, काल रात्री क्लोज काय लागला? आता काय बोलायचं सांगा. मी आपला इथं जीव मुठीत धरून दिवस काढतोय.'
'का बरं?'
'मी महाराष्ट्रातला. इथं येऊन राह्यलो. पुढं बुद्धी झाली– तुळजापूरला जाऊन धंदा करावा. तिथं गेलो तर तिथलं धाब्याचं घर कोसळून मुलगा गेला. मी तिकडं जावं हे महाराजांना आवडलं नव्हतं. त्यांनी बरोब्बर फटका दिला. मग जवळ पैसे नव्हते. मंडळींचं मंगळसूत्र विकून इथं आलो. महाराजांनी दृष्टांत दिला, इथं संगमावर रहा. जवळ पैसे नव्हते. पण एक दिवस एक भक्त आले. त्यांना हे समजलं. त्यांनी गावी जाऊन हजार रुपयांची मनीऑर्डर केली. दुकान घातलं. महाराजांच्या कृपेने आता गावात दोन घरं घेतली आहेत.'
'का हो, तुम्ही आला त्यापेक्षा आता यात्रा वाढतेय की आहे तशीच आहे?'
'खूपच वाढली आहे. याचं कारण लोकांना शांती मिळत नाही. लोकांकडे पैसा वाढलाय, त्याच्याबरोबर काळज्याही वाढल्यात. चार घास सुखाने खात नाहीत. हाव फार. सरकारी खात्यातले पैसाखाऊ लोकही शांतीसाठी इथंच येणार.'
'देवळासमोर अंगात भुतं येतात, ते कोण लोक असतात?'
'त्यांच्यातल्यासुद्धा काही लोकांच्याच अंगात खरी भुतं असतील. बाकीची सगळी

बोगस भुतं. अहो, दुपारची आरती झाली की माधुकरी असते. तुमच्यासारखे लोक उपाध्याय लोकांना पैसे देऊन भात, शिरा, लाडू असं अन्नदान करायला लावतात. पत्रावळी घेऊन फिरलं की दोन्ही वेळचं तुडुंब अन्न मिळतं. म्हणून इथं कायम राहिलेले लोक आहेत. थोडं अंगात आणलं की बहाणा होतो. त्यांना सेवेकरी समजून लोकांमध्ये थोडा मान मिळतो.'

मी विचारलं, 'का हो, त्या निर्गुण पादुका कसल्या आहेत? दगडाचे गोटे आहेत का?'

'नाही. त्यांना हाताने दाबून पाहिलं तर आपलं अंग जसं नरम लागतं ना तशा त्या नरम लागतात. त्यांना पाण्याची आंघोळ कधी घालत नाहीत. केशर, गंध आणि अत्तर यांचं लेपन करतात. मागे पन्नासएक वर्षांपूर्वी एक ब्राह्मण पुजाऱ्याच्या हाताखाली होता. त्याने पंचवीस वर्षं सेवा केली होती. पण कुठून दुर्बुद्धी झाली त्याला! पादुकांच्या आत काय ते पाहण्यासाठी त्याने नखाने खरवडून पाहिलं. झालं! रात्री उशिरा पुजाऱ्याच्या स्वप्नात महाराज गेले. त्याला म्हणाले, झोपतोस काय? माझ्या पायाला वेदना होत आहेत. असं म्हणून अंतर्धान पावले. पुजाऱ्याने उठून गाभारा उघडून पाहिला तर पादुका जिथं खरवडली होती तिथून रक्ताची धार लागलेली. तो खालचा सगळा डबा भरून जाऊन रक्त वाहत होतं. पुजाऱ्याने हे करणाऱ्या ब्राह्मणाला तावडतोब देवळाबाहेर हाकलून दिलं. परत देवळात यायची बंदी केली. बंदी म्हणजे अर्थ ठरलेलाच होता. त्याला कुष्ठरोग फुटला. तो नंतर इथं गाणगापूरलाच राहिला आणि मेला.'

'गुरुचरित्र वाचायचं पण फार कडक तंत्र आहे ना?'

'आता काय कोणीही गुरुचरित्र वाचतं. स्त्रियांना का बंदी, तर विटाळाचा त्यांना त्रास असतो म्हणून. (जरा हलक्या आवाजात) सांगू का, ही पोथी फक्त ब्राह्मणांनीच वाचावी असं आहे. एका अध्यायात अगदी महाराजांनी म्हणून ठेवलंय, की हे ब्रह्मकार्य आहे. पण आता कुठल्याही जातीचे लोक वाचतात. त्याचा फटका त्यांना बसतोच; पण त्यांना याचा तो फटका आहे हे कळत नाही, त्याला आपण काय करणार!'

बाहेर पडलो.

थोडं खाली गेल्यावर औदुंबराचं झाड दिसलं. त्याच्याभोवती फरशीच्या बाजूने चढत जाणाऱ्या स्टेडियमसारख्या पायऱ्या होत्या. ह्या वृक्षाखाली महाराजांनी एकाचा कुष्ठरोग बरा केला होता, असे गाणगापूर माहात्म्यात लिहिलं आहे. त्याच्याभोवती लोक प्रदक्षिणा घालत होते. स्टेडियमच्या पायऱ्यांवर गुरुचरित्राची पारायणं चालली होती. त्या तीस-चाळीस लोकांपैकी चार–सहाच ब्राह्मण दिसत होते. इतरांना परळी-

करांच्या म्हणण्याप्रमाणे कधीतरी या अपराधाचा फटका बसणार होता.

तिथून दिसणारं संगमावरचं दृश्य मात्र रमणीय होतं. अनेक पायऱ्यांच्या घाटावर सगळ्यांत वरच्या पायरीवर उभा होतो. बाजूला एक चिंचेचं अती जुनं झाड होतं. पावसाळ्यामुळं पाणी गढूळ झालेलं होतं. मध्ये एक वाळूचं बेट झालं होतं. त्यावर गर्दी होती. संगमात बायामाणसं न संकोचता आंघोळ करीत होती.

बाजूला काचा निखळल्याचा आवाज आला. ओट्यावर एका विक्रेत्याने बाटल्यांचे एक पोते सोडून जमिनीवर ओतले होते. चपट्या, वर सोनेरी फिरकीचे बूच असलेल्या बाटल्या. काहींवर 'थ्री–एक्स रम' ची लेबलेही होती. मी विचारलं, 'बाटल्या कशाला विकता ?'

त्याने आश्चर्याने पाहिलं. म्हणाला, 'संगमाचं पाणी लोक घरी नेतात. काशीच्या गंगेइतकंच ते पवित्र आहे.'

दारूच्या बाटल्यांत तीर्थ या प्रकाराची गंमत वाटली.

परत येईस्तो दहा वाजून गेले होते.

दीक्षित देवळासमोरच्या धर्मशाळेत एकटेच भिंतीला टेकून उपरण्याच्या आत हात घालून जप करीत बसले होते. बाजूच्या व्हरांड्यात एक लाकडी आणि एक चांदीची पालखी ठेवलेली होती.

मी विचारलं, 'या देवाच्या पालख्या का ?'

ते म्हणाले, 'हो. तुम्ही एकशे साठ रुपये दिले तर तुमच्यातर्फे लाकडी पालखी निघू शकेल. पाचशे एक रुपये दिले तर चांदीची पालखी निघू शकेल. त्यात महाराजांची मूर्ती असेल. नुसत्या मुखवट्याची चांदीची पालखी काढायची असेल तर दोनशे एकावन्न रुपये.'

मी जरा चक्रावलोच. 'पण आपल्यातर्फे पालखी काढण्यात पालखी काढणाऱ्याला काय फायदा असतो ?'

'त्याला प्रत्यक्ष हात लावून दर्शन घेता येतं. महाराजांचे चरण डोक्याला लावून प्रत्यक्ष आशीर्वाद दिला जातो.'

सकाळी दीक्षित मुखवटे रंगवत होते, त्यावरून विचारले, 'तुम्ही रोज हे काम करता का ? आणि ते रंग चांदीवर बसतात कसे ?'

'रंगाची पावडर पाण्यात कालवून आम्ही ते रंग देतो. रोज देवाचं वेगळं रूप असतं. आज गुरुवार म्हणून यतिवेष देतो. म्हणून सगळ्या भगव्या रंगाचं काम करतो. काल एकादशी होती म्हणून विष्णूचा निळा रंग दिला होता. मंगळवार, शुक्रवार देवीचं रूप, शनिवारी मारुती, रविवारी खंडोबा, सोमवारी शंकर असं ठरलेलं असतं. शिवाय तुम्ही पाचशे रुपये देऊन पालखी ठरवली असेल त्या दिवशी तुमच्या मना-

प्रमाणे वेष देतो.'

'ते हात–पाय कसे लावता मूर्तीला ?'

'सांगाडा असतो, त्यावर मुखवटा ठेवायचा. हात–पाय जोडायचे आणि ड्रेस त्याच्या रूपाप्रमाणे द्यायचा.'

दीक्षित पुण्याच्या साइडचे निघाले. त्यांना विचारले, 'तुम्ही इकडे कसे काय आलात ?'

ते हसले. म्हणाले, 'आठ वर्षं मिलिटरीत होतो मी. उपरती झाली. इकडे आलो, राहिलो.'

'पण इथल्या उपाध्ये लोकांनी तुम्हाला सामावून बरं घेतलं! कारण हक्कासाठी भांडणं खूप असतात असं ऐकलंय.'

'पण त्यांचा–आमचा संबंध येत नाही. आम्ही फक्त देवाची सेवा करतो.'

'तुमचा पहाटेपासूनचा कार्यक्रम काय असतो ?'

'पहाटे दोनला उठतो. नदीवर जाऊन आंघोळ. तीनला काकड आरती. पुढे पूजा. मग सकाळी देवाचं रूप तयार करायचं. मग मध्ये हा थोडा वेळ मिळतो. परत अकराला जाऊन आरतीची तयारी. बाराला आरती. पुढे दुपार मोकळी. सहाला रात्रीच्या आरतीची तयारी. साडेसातला आरती. नंतर पालखी. सर्व आवरून दहाला कुलूप घालून इथं धर्मशाळेत परत.'

मी म्हटलं, 'तुम्हांला हे सगळं करून इथं उपाध्ये लोकांना जे मिळतं त्यातलं काहीच मिळत नाही ?'

'आम्हाला नैवेद्याचं ताट मिळतं.'

'मग इतर खर्चाचं काय ?'

'ते असंच. कुणी ओळखीचा आला गेला तर हातावर दक्षिणा ठेवतो ती पुरते.'

अभिषेकाची चौकशी करायची होती म्हणून दीक्षितांनी धर्मशाळेबाहेर, त्याच इमारतीत बाहेरच्या बाजूने असलेल्या मेडिकल स्टोअर्समध्ये नेले. काउंटरच्या आड वर उघडा, बऱ्यापैकी पोट सुटलेला, वर जानवं, रुद्राक्षमाळ घातलेला चाळिशीचा माणूस आल्यागेल्याला प्रिस्क्रिप्शनप्रमाणे औषधे विकत होता. या वेशातला सेल्समन किंवा मालक कधी पाहिला नव्हता.

त्याचं नाव पुरुषोत्तम पुजारी. इथल्या सगळ्या पुजाऱ्यांची भाषा कानडी. तरी ते मराठी चांगलं बोलतात. परळीकर म्हणाले ते आठवलं, की गुरुचरित्र मुळात मराठीत असल्याने त्यांना मराठी यावंच लागतं. शिवाय गाणगापूरला येणाऱ्यांत नव्वद टक्के मराठी लोकच असतात.

त्यांनी प्रत्येक गोष्टीचे दर सांगितले. ते म्हणाले, 'साधा अभिषेक सव्वा अकरा

रुपये. तो आम्ही परस्पर करतो. स्वतः करायचा असेल तर एकावन्न रुपये. त्यात एक आवर्तन. आत पूजा, बाहेर अभिषेक. एकादष्णी करायची असेल, त्या वेळी दूध घालतो, तीन ब्राह्मण बसवतो. त्याचे एकशे एक रुपये होतात. लघुरुद्र करायचा असेल त्याला अकरा ब्राह्मण बसवतो, त्याचे तीनशे एक रुपये. त्यात त्या ब्राह्मणाचे जेवण, दक्षिणा, नैवेद्य– सगळं आलं. याच्या उप्पर जाऊन महारुद्र करायचा झाला तर आठशे एक रुपये. त्याला तेहतीस ब्राह्मण बसवावे लागतात.'

मी चाट पडत चाललो होतो. याउप्पर काही नसणार. तरी विचारलं, 'यापेक्षा आणखी काही ?'

ते हसले. म्हणाले, 'असतं ना, अतिरुद्र. एक अतिरुद्र म्हणजे अकरा महारुद्र. पण हा कुणी आमच्या आठवणीत घानला नाही.'

दीक्षित म्हणाले, 'संतत धार असते तिचं सांगा.'

पुजारी उत्साहाने म्हणाले, 'सात दिवस संतत धार देवावर धरता येते. अगदी रात्रंदिवस. चोवीस ब्राह्मण सांगावे लागतात. त्यांच्या तीन पाळ्या आम्ही करतो. त्यांचा रोजचे जेवण देतो. म्हणून त्याचा खर्चही तसाच आहे. चार ते पाच हजार.'

मी म्हटलं, 'बाप रे!'

पुजारी म्हणाले, 'इथं माधुकरीची चांगली प्रथा आहे. दत्तगुरू माधुकरी मागून जातात म्हणून आपण जर सांगितलं तर आपल्यातर्फे आम्ही माधुकरी घालतो. एकावन्न रुपयांची साधी वरण-भाताची माधुकरी. एकशे एक दिले तर भात आणि शिरा. तीनशे रुपये दिले तर भात आणि लाडू. याउप्पर कराल तेवढं. महाराज आपल्या हातून करवून घेतील तेवढं.'

मला पेशवाईत पेशवे आपल्याला पुण्य लागावे म्हणून ब्राह्मणांना दक्षिणा देऊन उपासाला बसवीत असं वाचल्याचं आठवलं.

पुजारी म्हणाला, 'दरवेळी तुम्ही यायची जरुरी नाही. आलात तर दुधात साखर. पण नाही जमलं तर पोस्टाने पैसे पाठवा. ते कार्य इकडे करून तुम्हाला प्रसाद पोस्टाने पाठवून देऊ.'

मनात आलं, हे ब्राह्मण अभिषेक, लघुरुद्र वगैरे करीत असले तरी यांनी धंद्यात आधुनिक मॅनेजमेंटचं तंत्र अवगत केलेलं दिसतंय.

बाहेर आलो.

देवळाच्या आवारात आता काही हजार माणसं तरी साठली असतील. आवारात अनेक विक्रेते फिरत होते. गाणगापूर सचित्र, गुरुचरित्रकथासार वगैरे पुस्तिका, आरतीसंग्रह, दत्त नवनाथ इत्यादींची चित्रं, असं सगळं घेऊन काही जण ते विकत होते, तर काही गळ्यातले ताईत, तांब्याची लॉकेटं विकत होते. लॉकेटच्या पदकावर

पादुकांचा छाप होता. कुणी मुलं मध्ये खोलगट केलेल्या पत्रावळी विकत होते. बहुतेक लोकांच्या हातात पत्रावळी दिसत होत्या. आरतीनंतर माधुकरीसाठी त्या लागणार होत्या.

गाभाऱ्यापुढच्या व्हरांड्यात तीनचार ठिकाणी अभिषेक चालले होते. सगळीकडे सरदार रास्त्यांनी दिलेली चांदीची ताम्हनं-भांडी दिसत होती. चांदीच्या मोठ्या ताम्हनात एका पितळी पत्र्यावर चांदीच्या पातळ पादुका बसवल्या होत्या. मध्ये चांदीची शंकराची पिंडी होती. त्या पितळी पत्र्याला कडेला एक नळासारखी पितळी चावी बसवलेली होती. त्यातून वर येणारा चांदीचा रॉड काटकोनात वळून पिंडीच्या डोक्यावर आला होता. तिथं त्याची गोल कडी झालेली होती. त्यात चांदीचं अभिषेकपात्र बसवलेलं होतं. त्यातून पाण्याची धार खालच्या पिंडीवर पडत होती.

देवळाच्या वरच्या पायरीवर बसून फरसबंदीवरचे दृश्य पाहू लागलो. त्या समोरच्या जागेला दत्ताचा राजदरबार म्हणतात, असं कुणीतरी सांगितलं होतं.

अंगणात मधला भाग भुताखेतांसाठीच मोकळा ठेवलेला होता. प्रत्येक ठिकाणची अंगात यायची पद्धत वेगवेगळी असते. इथं एखादा माणूस डोळे मिटून 'स्सऽऽ' असे लांब लांब सुस्कारे सोडायला लागला की समजायचं, की याच्या अंगात येतंय. नंतर इथे आणखी एक दिसलं, की अंगात आल्यावर कोलांट्या मारायचे. अजून आरतीला अवकाश होता तरी काही जणांच्या अंगात यायला सुरुवात झालेलीच होती. बसलेल्या घोळक्यात एकदम गडबड सुरू होऊन बाजूचे लोक उठायला लागले की तिकडे बघायचो. एखादा माणूस 'स्स्स्सऽऽ' करीत डोलताना दिसायचा आणि मग एकदम डोकं खाली टेकवून कोलांट्या मारायला सुरुवात करायचा. अशा माणसांच्या तंगड्या लागू नयेत म्हणून ही पळापळ व्हायची. कोलांट्या मारणाऱ्या बायांचा थोड्याच वेळात अवतार होऊन जायचा. केस सुटायचे, धुळीने भरून जायचे.हात, पाय, कपडे–सगळे मळून जायचे. बायांनी पदर खोचलेला असे. पायरी-जवळ तीनचार बाया पालथ्या पडून ओरडत होत्या —

'अरे दत्त्या...मला सोड ना! दत्त्या...का त्रास देतोस?'

एक जण किंचाळून म्हणत होती, 'दत्त्या भडव्या–किती मारशील? अरे तिकडे शिवलीलामृत कोण वाचतंय...मला त्रास होतोय नाऽऽ!'

एक बाई तर दत्ताला त्याच्या आईवरून मी पूर्वी कधीही ऐकल्या नव्हत्या अशा शिव्या देत होती.

एक गोरी, देखणी, गोल साडीतली तरुण मुलगी जमिनीवर पालथी पसरली होती. बहुधा तिचा नवरा असलेला एक तरुण खाली वाकून तिचा सुटलेला पदर परत साडीत खोचत होता. पायापाशी मरून रंगाच्या नऊवारी साडीतली बाई दोन्ही पायांना साडीची गाठ मारायचा प्रयत्न करीत होती. अंगात आल्यावर साडी वर

जाऊ नये म्हणून ही खटपट असावी. पाठीवरच्या ब्लाऊजखाली तिच्या अंगावर कोड दिसलं. चरकलोच. मग पायांकडे पाहू लागलो. ती मरून साडीची बाई गाठ मारताना दिसलं, तिथं पायावरही कोड होतं. कदाचित हे तिच्या मानसिक अवस्थेचं कारण असावं. कदाचित तिने लग्नाआधी हे लपवलं असेल आणि नंतर उघडकीला आलं असेल. नाहीतर लग्नानंतर खरोखरीच एकदम आलं असेल. पण कुठल्याही प्रकारे झालं तरी तो ताण किंवा धक्काच. बरोबरचा तरुण नवरा असेल तर तो हिची इतकी काळजी घेतोय, हा केवढा मोठेपणा !

एक मळक्या नाइट पायजम्यातला विशीचा पोरगा खूप एक्सायटेड होता. तो चेहऱ्यावरनं मतिमंद वाटत होता. मोठा झाल्यावर सेक्ससारखे आणखी मानसिक प्रश्न निर्माण झाले असणार. तो मुळ्गा सारखा इकडून तिकडे धावत होता. खांबाला पाठ लावायचा. तशीच पाठ लावून खांबाभोवती फिरायचा.

बारा-तेरा वर्षांच्या, दोनचार परकरातल्या मुलींच्याही अंगात आलं होतं. एक मुलगी डोळे गच्च मिटून चेहऱ्यावर वेदनेचे भाव ठेवून ' नाही, नाही ' अशी सारखी मान हलवत होती. एक बारा वर्षांची मुलगी तर इतक्या वेगाने लोळत इकडून तिकडे जात होती की लोकांच्या पायातनं सापच गेलाय असं वाटत होतं. एक मुलगी बेभान होऊन खाली पडून हुंदके देऊन बोलत होती. तिच्याबरोबरची बायामाणसं बसल्या बसल्या वाकून तिच्या तोंडापाशी कान नेऊन ऐकत होती. बाहेरून एक तरुण एका तरुण मुलीला घेऊन आला. चेहऱ्यावरून ती बहीण असावी. त्याचा चेहरा घाबरलेला होता, तर बहीण मंडपात आल्या आल्या डोळे वटारल्यासारखे करून फिरवू लागली होती. त्याने सावकाश तिला धरून बसवले. मग पुढे तिचे नेहमीसारखे अंगात येणे सुरू झाले.

मघा कोडवाल्या मुलीच्या पायाला साडी बांधणारी मरून साडीवाली बाईही आता स्थिर बसली होती. मघाचा घरगुती, कामसू बाईसारखा चेहरा आता बदलला होता. चेहऱ्यावरचे भाव निघून गेले होते. चेहऱ्याचा रंगही लालसर होत चालला होता. हळूहळू ती डोलायला लागली होती. पुढं मग तिच्याही हालचाली वाढून सगळ्या आवारभर ती कोलांट्या घेत फिरू लागली.

आरतीचा नगारा सुरू झाला तशा अंगात आलेल्यांच्या हालचाली खूपच वाढल्या. दत्ताला शिव्या देणाऱ्या त्या बाया कोलांट्या खाऊन पायऱ्याही चढू लागल्या. बाईचा उभ्याचा नाच पाहून तिची कंबर आता तुटणार की काय, वाटू लागलं.

तेवढ्यात नगारा वाजायचा थांबला.

लोक एकदम उठून मध्याकडून बाजूला पळू लागले. मोठा आवाज झाल्यावर पाखरांचा थवा उडतो तसं वाटलं. जो तो पत्रावळी हातात धरून माधुकरीकडे पळू लागला. मंडपात फक्त अंगात आलेली बायामाणसं पालथी पडून प्राण्यासारखी

वळवळत पडलेली होती.

देवळाच्या बाजूला जुन्या वाड्यांची दारं आहेत. त्यावर ' अमका भट, तमका भट पुजारी ' अशी भिंतीवर रंगवलेली अक्षरे आहेत. तिथं उघडी ब्राह्मण मंडळी ओट्यावर उघड्या खिडक्यांमध्ये किंवा जरा उंच असलेल्या पडक्या भिताडावर बसलेली होती. जवळ भाताच्या पराती, वरणाची पातेली होती. लोकांनी एकमेकांसमोर खूप गर्दी केली होती. पाण्यात कणकेचे गोळे टाकत राहिल्यावर मासे जसे तोंड वर करून झेलायला उभे राहतात तसे सगळे हातातल्या खोलगट द्रोणासारख्या पत्रावळी उंच धरून वर वर करीत होते. एक ब्राह्मण बचके भरून भात घालत होता, तर त्याच्या शेजारचा ब्राह्मण ओगराळ्याने बिनहळदीचं वरण ओतत होता. इकडचं घेऊन झालं की लोक दुसरीकडे पळत होते. ब्राह्मणांच्या शेजारी, त्या दिवशी पैसे भरून झालेले यजमान उभे राहून समाधानाने या धावपळीकडे पाहत होते. मधूनच स्वतः पुढे येऊन आपल्या हाताने लोकांच्या पत्रावळीत भात टाकीत होते.

मी पुरुषोत्तम पुजाऱ्यांकडे जेवायला गेलो. त्यांचं घर देवळापासून दूर आहे. त्यांचा मेव्हणा जेव्हा भाताचं घमेलं घेऊन ओट्यावर बसला तेव्हा मला वाटलं, या निर्जन भागात याच्याकडे माधुकरी मागायला कोण येणार ? पण एक-दोन लोक आले. आणि तिकडल्या लोकांना कळलं तसे तेही धावत आले. माधुकरी फस्त झाली.

जेवायला पंढरपूरचे तिघे तरुण बरोबर होते. हे तिघेही तिथल्या इलेक्ट्रिसिटी बोर्डात नोकरीला होते. त्यांच्यातर्फेच त्या घराबाहेर आत्ता माधुकरी वाटली जात होती.

त्यांतल्या एकाने मला विचारलं, ' तुम्ही करता की नाही पारायण ? '

मी म्हटलं, ' नाही बुवा ! '

' मग सुरू करा की ! काही अवघड नसतं त्यात. घरात एखादी वेगळी जागा करा पारायणासाठी. सात दिवसांतच संपवायला पाहिजे असं काही नाही. रोज तासभर करायचं. नंतर सवय होते. नेहमी करून करून आम्ही तीन दिवसांत संपवतोच. '

मी बधत नाही म्हटल्यावर ते तिघेही आग्रह करू लागले. शेवटी मी म्हटलं, ' पुण्याला गेल्यावर करतो प्रयत्न. ' असं म्हटल्यावर मग ते पुढं नीटपणे जेवू लागले.

जेवण चांगलं होतं, पण पाणी अतिशय गढूळ होतं. त्यात चिलटंही तरंगत होती. पुजारी म्हणाले, ' इथं पाण्याची फार दैना आहे. नदीचं पाणी जसंच्या तसं घ्यावं लागतं. महाराजांच्या कृपेनंच जगतो आहोत. '

माझ्यावर ती कृपा नसल्याने मी पाणी न पिताच जेवण उरकलं.

सकाळी परळीकरांच्या तोंडून ऐकलं होतं, की इथं देवस्थान कमिटीवर सरकार-

तर्फे डिसोझा नावाचे गोव्याचे ख्रिश्चन असलेले, तहसीलदार लेव्हलचे गृहस्थ सुपरिं-टेंडेंट म्हणून नेमले गेलेले आहेत. ख्रिश्चन असून या देवस्थानचा कारभार कसा चालवत असतील याचं मला कुतूहल वाटलं. कदाचित असं असेल, आपल्यावर सोपवलेलं काम उत्तम पार पाडायचं, अशा भावनेने ते करीत असतील. पण एकूण ही भुतंखेतं, या समजुती याविषयी तटस्थपणे आपल्याला सांगू शकतील, म्हणून त्यांना भेटायचं ठरवलं. ते चिदानंद धर्मशाळेतल्याच खोल्यामध्ये राहतात आणि तिथेच त्यांचं ऑफीस आहे असं कळलं म्हणून तिकडे वळलो.

चिदानंद धर्मशाळा ही सिमेन्ट काँक्रिटची, गुलाबी रंगाची, दुमजली मोठी बिल्डिंग होती. खालच्या चौकात आणि बाजूच्या हॉलमध्ये मोफत उतरायची सोय असल्याने तिथे भरपूर माणसं पथाऱ्या टाकून पसरली होती. तिथं जाऊन विचारलं, ' डिसोझासाहेब आहेत का ? त्यांना मला भेटायचंय. '

खुर्चीत बनियन, धोतरातला एक चाळिशीचा काळा माणूस ' तरुण भारत ' वाचत बसला होता. कपाळावर केशरी आडवा वेडावाकडा टिळा लावलेला होता. केस, दाढी, मिश्या– सगळंच भरपूर वाढलेलं. गळयात रुद्राक्षाची माळ. डोळ्याला मोठ्या फ्रेमचा नाकाच्या शेंड्यापर्यंत घसरलेला चष्मा. त्या गृहस्थाने माझ्याकडे मान वर करून पाहिलं. म्हणाला, ' मीच डिसूझा. काय पाहिजे आपल्याला ? '

मी उडालोच ! परत कपाळावरच्या टिळ्याकडे, गळ्यातल्या रुद्राक्ष माळेकडे लक्ष गेलं. पण मग सावरलो. ओळख करून घेतली. कुतूहलाने विचारलं, ' तुम्ही ख्रिश्चन ना ? मग टिळाबिळा कसा काय ? '

' का नसावा ? मी अगदी सच्चा दत्तभक्त आहे. '

गोव्याच्या ख्रिश्चनांमधली सनातनी मला माहीत होती. म्हणून विचारलं, ' तुम्ही गोव्याचे ना ? '

' हो. मूळचा गोव्याचा. पण शंभरएक वर्षांपूर्वी आमचे वडील बेळगावात येऊन राहिले. तरी आमचे अनेक नातेवाईक गोव्यात आहेत. '

' मग त्यांना ही तुमची दत्तभक्ती चालते का ? '

' त्यांना मी विचारीतच नाही. तसं सांगा, इथं मुळात प्युअर ख्रिश्चन कोण आहे ? सगळे मूळचे इथलेच– हिंदू ! '

' इथं किती वर्षं झाली, आहात ? '

' चार वर्षं. '

' मग तुमची ही दत्तभक्ती इथं आल्यापासून चालू झाली की आधीपासूनच होती ? '

' तसा आधी मी गणेशभक्त होतो. नंतर माझी बदली सुपरिंटेन्डेन्ट म्हणून

सौन्दत्तीला झाली, तिथे मी यल्लम्माभक्त होतो. इथे आल्यावर दत्तभक्त झालो. इथल्या लोकांनी सरकारकडे अर्ज करून मला मागवून घेतलं. मी आता देवस्थान स्पेशालिस्टच झालो आहे.'

'इथं आल्यावर तुम्ही सुधारणा केल्यात, असं बरेच लोक म्हणत होते.'

हात जोडून डिसोझा म्हणाले, 'आमचे महाराज माझ्याकडून करून घेतात. पहिल्यांदा आल्या आल्या देवळाभोवतालची घरं प्रेमानं खाली करायला लावली. आवार वाढवलं. कंपाउंड केलं. गोपुरी महाद्वार केलं. पुढच्या दरबारात फरशी घातली. संगमावर घाट बांधला.'

'हे सगळं फक्त चार वर्षांत?'

हसून म्हणाले, 'हो.'

'महाद्वाराला काय खर्च आला हो?'

'आठ लाख. मद्रासचे कारागीर आणले होते. आणि दुसरं म्हणजे, या सगळ्या कामाला सरकारने काही पैसा दिला नाही. सरकारचं या क्षेत्राकडे लक्षच नाही. इथल्या अभिषेकाचं जे उत्पन्न येतं त्यातलं बासष्ट टक्के देवस्थान कमिटीला, उरलेलं त्या त्या उपाध्यांना. या बासष्ट टक्क्यांत इथला सगळा खर्च चालवायचा.'

'तुम्ही उपासना म्हणजे नेमकं काय करता?'

'सकाळी देवळात जाऊन पादुकांची पूजा केल्याशिवाय माझा दिवसच सुरू होत नाही. तिथं गेल्यावर पादुका समोर आल्या तरच पूजा करतो.'

'समोर आल्या तर म्हणजे?'

'एखाद्या भक्ताने पूजेसाठी पावती फाडल्यामुळं त्या बाहेर आल्या असल्या तरच. मी मागवत नाही. पादुकांची पूजा करायला मिळाली तरच पुढं दिवसाचा कार्यक्रम. नाहीतर सरळ महाराजांचा आदेश समजून घरी येऊन बसतो. त्या पादुकांचं माहात्म्य काय सांगू तुम्हांला?'

असं म्हणून पुजाऱ्याने नख लावल्याची फेमस स्टोरी त्यांनी सांगितली. पुढं म्हणाले, 'त्या पादुका कधी कधी त्या डब्याच्या वर येतात, कधी कधी जरा कमीही झालेल्या दिसतात. कधी माझ्याकडे बघून त्या हसतात. कधी रडतात.'

'साक्षात्कार, दर्शन झालंय का कधी?'

'कितीतरी वेळा. रोज रात्री कितीही उशिरा झोपा, मध्यरात्री बरोबर अडीचला जाग येतेच. मग सुरू होतो टीव्ही.'

'टीव्ही?' मी आश्चर्यानं विचारलं.

'अहो, महाराजांचा टीव्ही हो. उद्या काय होणार ते महाराज रात्रीच टीव्हीवर दाखवून ठेवतात.'

मनात विचार आला होता की विचारावं, मी येणार हे काल टीव्हीवर पाहिलं

होतं का ? पण तो मोह आवरला.

पुढं ते सांगत होते, ' महाराजांचा तसा रागही वाईट आहे हां. मध्ये काय झालं, आमच्या धर्मशाळेच्या मागे कोपऱ्यातल्या कचऱ्यात एक नारळाचं झाड उगवलेलं पाहिलं. मी ते उपटून टाकायचं ठरवलं. समोरचा वखारवाला म्हणाला, उपटणार असाल तर मला द्या, मी लावतो. मी शिपायाला सांगितलं, उद्या त्यांना ते उपटून दे. त्या रात्री झोपलो तर बसायला लागल्या ना डोक्यात काठ्या. मी चुकवतोय, चुकवतोय. मग महाराज म्हणाले, ' अरे, ते माझं झाड होतं. कशाला उपटतोयस ?' मी त्यांना म्हटलं, ' अहो, ते मला काय माहीत ? ' सकाळी गडबडीने शिपायाला बोलावलं आणि सांगितलं, ते झाड उपटू नकोस. पण त्यानं आधीच उपटलं होतं आणि त्या वखारवाल्याला दिलंही होतं. ते परत आणून लावलं, तरी ते जगलं नाही. असा असतो महाराजांचा राग. '

असं म्हणताना त्यांचा दाढी-मिश्यांनी व्यापलेला चेहराही अगदी प्रेयसीसारखा लाडिक झाला होता.

' हे चिदानंद कोण हो ? ज्यांच्या नावाने ही धर्मशाळा आहे. '

' हे फार मोठे योगी होऊन गेले, पन्नास-साठ वर्षांपूर्वी. त्यांच्यात फार पॉवर होती. ते इथे तप करीत होते. तिकडे तीन मैलांवर संगमावर एक गोसावी तप करून करून यांच्या तपात विघ्न आणत होता. थोडक्यात, त्यांची कुरापत काढत होता. यांनी आपल्या योगसामर्थ्याने इथं बसून तिथं संगमावरच्या त्या गोसाव्याला अडीचशे फूट उंच उडवला आणि नदीत टाकला. असं त्यांचं सामर्थ्य! पण हे चिदानंद म्हणजे आमच्या महाराजांचे कॉम्पिटिटर. ते असा पण करून आले होते, की महाराजांना गाणगापुरातून उखडून काढीन. पण त्यांना महाराज का ऐकणार आहेत ? शेवटी चिदानंद वारले. संन्याशाचा देह जाळत नाहीत. महाराजांनी आपल्या प्रभावाने गाणगापुराच्या परिसरात समाधी होऊ दिली नाही बघा. तेव्हा मग चिदानंदांचं मुंडण करून त्यांना जलसमाधी देण्यात आली. ते प्रेत नदीबरोबर दोनतीन मैल वाहत गेलं. परत माघारी आलं. असं आठ दिवस चाललं होतं. मग नदीपलीकडच्या गावातल्या कुलकर्ण्याला स्वामींनी दृष्टांत दिला. त्यांनी स्वामींना काढलं. मग त्या गावी त्यांची समाधी बांधली. तिथं त्यांनी सिद्धीच्या जिवावर कुणाला डोळे दे, कुणाचा कुष्ठरोग बरा कर, असं काय काय सुरू केलं. तिथे भरपूर गर्दी व्हायला लागली. गाणगापूर ओस पडलं. इथले ब्राह्मणही पोट भरायला तिकडे जाऊ लागले. मग आमच्या महाराजांनी चिदानंदस्वामींना दृष्टांत देऊन सांगितलं, की हे सगळे चाळे बंद कर. तेव्हा कुठे ते बंद झालं. मग गर्दी ओसरली. आज तिकडे कुणी फिरकतही नाही. तर त्या वेळी मुंबईच्या व्यापाऱ्यांनी, ठिकठिकाणच्या श्रीमंतांनी तिकडे एवढा पैसा ओतला, की सगळ्यांनी त्यात चरून घेऊनसुद्धा बराच उरला. त्यातनं ही धर्मशाळा उभी राहिली.'

या सगळ्या अद्भुत जगाने माझं डोकं दुखू लागलं होतं. आणखी थांबलं तर महाराजांचे तडाखेही सुरू व्हायचे, म्हणून निरोप घेऊन बाहेर पडलो.

रस्त्याने दुकानं बघत चाललो. शिर्डीला सगळं साईमय झालेलं असतं, तसं इथं दत्तमय झालेलं आहे. दवाखान्याचं नाव कल्याणदत्त दवाखाना, मेडिकल स्टोअर्सचं नाव त्रिमूर्ती, खानावळीचं नाव नृसिंह-सरस्वती खानावळ. दुकानांची नावेही गुरू, दत्त, श्रीपाद वल्लभ, यांतलीच आलटून-पालटून.

संध्याकाळ झालेली होती. आरती आणि पालखीची वेळ जवळ येत होती. म्हणून देवळात जाऊन बसलो. गाभाऱ्यासमोरच्या पायरीवर. व्हरांड्यात बाहेरगावांहून आलेल्या भजनी मंडळाचे भजन चालू होते. अलीकडे संथ भजन ऐकायलाच मिळत नाही. मुंबईच्या वेस्टर्न साईडच्या लोकलमध्ये झंझक झंझक, झंझक झंझक असे फास्ट टाळ वाजवून लोक भजनं म्हणत येतात, तीच स्टाईल सगळ्यांनी उचलली आहे. इथेही तसंच होतं.

शेजारी नेहरूशर्ट–धोतर–टोपीतले गृहस्थ येऊन बसले. ते काल आमच्या एस. टी.त असल्याने ओळखीचं हसले. त्यांना विचारलं, ‘ कुठल्या गावचे ? ’

‘ इथं जवळचाच. अक्कलकोटचा. ’

‘ काय करता ? ’

‘ मुख्याध्यापक म्हणून नुकताच निवृत्त झालोय. ’

‘ मग तुम्ही जवळचे म्हटल्यावर नेहमी येत असाल. ’

‘ छे हो. खरं सांगू का, पहिल्यांदाच येतोय. मी दहा वर्षं अक्कलकोटला आहे. माझी बहीणही इथं दिलेली आहे. पण एवढ्या वर्षांमध्ये येऊ शकलो नाही. ’

‘ का बरं ? ’

‘ कोण जाणे ! महाराजांच्याच मनात नसणार, की मी इथं यावं. ज्याअर्थी आत्ता येणं झालं त्याअर्थी आज्ञा झालेली आहे. ’

मी हसलो.

ते म्हणाले, ‘ अहो, खरंच आहे मी म्हणतो ते. आपल्याकडनं गुरुचरित्राचं पारायण व्हावं की नाही हेसुद्धा त्यांच्यावरच अवलंबून आहे. ’

समोर दरबाराचा भाग सकाळप्रमाणेच भरत होता. मध्ये मोकळी जागा सोडून कडेने सकाळची मरून साडीवाली, उभ्याने नाचणारी वगैरे ओळखीची मंडळी शांतपणे बसलेली होती. आमच्या गावी यात्रेतल्या कुस्तीच्या हंगाम्याच्यावेळी आधी रिंगणाच्या कडेने पहिलवान डफ सुरू व्हायची वाट पाहत शांतपणे बसलेले असतात, त्याची आठवण झाली.

खांबाजवळ टेकून बसलो असता अनेक लोक खोबऱ्याचा तुकडा, एखादा

पेढ्याचा तुकडा प्रसाद म्हणून आणून देत होते. एका म्हातारीने मला नारळाचा तुकडा दिला. मी खाल्ला. माझ्या शेजारी पलीकडे एक कुत्रं वेटोळं घालून झोपलं होतं. त्याच्या पुढं तिनं खोबऱ्याचा तुकडा धरला, पण कुत्रं जाम बधेना. मग ती बोटाने त्याच्या पोटाला डिवचू लागली. कुत्र्याने थोडी मान वर करून पाहिलं. खोबरं पाहताच परत मान खाली घालून झोपलं. म्हातारीनं एकदोनदा त्याला जागं करून पाह्यलं आणि शेवटी नाद सोडून दिला.

माझ्या समोरनं प्रदक्षिणेचा प्रवाह वाहत होता. मी गाभाऱ्यासमोरच्या पायऱ्यांवर बसलो असल्याने सगळे त्या पॉइंटपाशी आल्यावर देवाला नमस्कार करून पुढे जात. तऱ्हेतऱ्हेचे चेहरे पहायला मिळत. काही जण आरामात हसतखेळत प्रदक्षिणा घालत, तर काही टेन्स होऊन तडातड चालत प्रदक्षिणा घालत. एवढ्या गर्दीतही तेच ते चेहरे पाहून ओळखीचे झाले. कुणाकुणाची किती सेकंदांत प्रदक्षिणा घालून होते याचं घड्याळात पाहून टायमिंगही घेऊन झालं. काही वेळाने हे पाहता पाहता ते फिरत नसून मीच फिरत आहे असं वाटू लागलं.

इकडे पालखीची तयारी सुरू झाली होती. समोरच्या धर्मशाळेतून चांदीची पालखी आणून उजवीकडच्या व्हरांड्यात ठेवली गेली. त्यामध्ये ऑरेंज वेलवेटच्या गाद्या, लाल वेलवेटच्या फोमच्या उशा ठेवल्या गेल्या. चांदी मढवलेल्या जाड काठ्यांवरचे चांद, अब्दागिरी आणून उभ्या करून ठेवल्या गेल्या. ज्यांच्यातर्फे पालखी निघणार ती चारपाच माणसं तिथे पालखीजवळ कृतार्थ चेहऱ्याने बसली होती.

अंगणापलीकडच्या महाद्वारातल्या साईडच्या कोनाड्यात नगारावाले चढून बसत होते. इथली प्रत्येक गोष्ट ही कुणा ना कुणातर्फे असते. तसा हा नगाराही हैद्राबादच्या एका श्रीमंतातर्फे असतो; असं कळलं. या नगारेवाल्याला कदाचित असं वाटत असेल, की काय आपल्या टिपरीत पॉवर आहे ! टिपरी खालीवर झाली की माणसं जमिनीपासून खांबाच्या टोकापर्यंत वरखाली करतात.

शेवंतीचे हार विकणारी अनेक मुलं फिरत होती. त्यांच्याकडून हार विकत घेऊन लोक पालखीच्या दांड्यांना घालत होते. दोन फूट आकाराचं एक छोटं काचेचं कपाट एका सेवकाने आणून पालखीत पुढं ठेवलं. त्याच्या खाली फळी, वरनं फळी, वरच्या फळीला तीनचार इंच व्यासाचं भोक, त्याला लोखंडी जाळी, साईडला तीन बाजूंनी काचा. हे काय असणार, असा प्रश्न पडला. वरच्या भोकावरून यात दिवा ठेवत असणार.

नगारा वाजू लागला. आत आरती सुरू झाली असावी. इकडे भुतांमध्ये कल्लोळ उडाला. नेहमीच्या अंगात येणाऱ्या लोकांच्या नेहमीच्या हालचाली सर्वांसमोर पेश होऊ लागल्या. गुरुवारची रात्रीची आरती म्हणून हालचालींचा वेग जास्त. त्याचा परिणाम म्हणून दुपारी शांत असलेले आसपासचे इतर लोकही उचक्या देऊ लागले.

'स्ससऽऽ' आवाज सगळीकडे पसरू लागले. बारातेरा वर्षांची परकरी मुलगी सापासारखी जमावाच्या पायांमधून सळसळत फिरू लागली.

पण त्यांच्या या हालचालींकडे कुणाचं फारसं लक्ष नव्हतं. सगळे त्यांच्याकडे पाठ करून पालखीकडे डोळे लावून बसले होते. गाभाऱ्याच्या दारातून महाराजांना आणले जाणार होते. पालखीत ठेवल्यानंतर पूर्ण साईज बघायला मिळणार नाही म्हणून काही जाणकारी शहरी लोक स्ट्रॅटेजिक जागा पकडून तिथे उभे होते. तसेच झाले. दरवाज्यातून हातात दोन फूट उंचीच्या मांडी घालून बसलेल्या महाराजांना लहान मुलासारखं हातात घेऊन दीक्षित आले आणि झर्रकन पालखीकडे नेऊन तिच्यात ठेवले. लगेच त्यावर हारतीर घातले जाऊन त्यातून महाराजांचे फक्त तोंडच दिसू लागले. पण तेवढ्या सेकंदात योग्य ठिकाणी उभ्या असलेल्यांना पूर्ण रूप दिसले. डार्क लाल रंगाची शाल डोक्यावरून घेऊन अंगावरून पांघरलेली होती. जमाव पालखीकडे यायला अधीर झाला होता. पण देवस्थानच्या सेवक असलेल्या, मळकट नऊवारी लुगडी नेसलेल्या तीनचार बायांनी हातात आडवे बांबू धरून तो अडवला होता. लग्नाच्या मिरवणुकीतल्या एखाद्या माणसाला वाहत्या रस्त्यावर आल्यावर ट्रॅफिक कंट्रोलचा उत्साह चढतो, तसे इथंही प्रेक्षकांतला एक तरुण माणूस अंगात आल्यासारखे इकडून तिकडे धावून पालखीपुढच्या रस्त्यावर रेटारेटी करून लोकांना मागे ढकलीत होता.

पालखीत हारांच्या गर्दीत महाराजांचं डोकं दिसत होतं. चांदीवर पांढरट गुलाबी रंगानं रंगविलं होतं. पांढरे, मध्ये काळं बुब्बुळ काढलेले टक्क डोळे. समोर ती मघाची काचेची पेटी ठेवली होती, त्यात भलेमोठे निरांजन ठेवून त्यात कापूर जळत ठेवलेला होता. पालखीच्या आसपास उघडे ब्राह्मण तरुण ऋषिकुमार मोठ्या संख्येने वावरत होते, काम करीत होते. दोघे पुढे दोन पलिते घेऊन उभे होते. त्यावर दुसरे दोघे तेलाचे लांब नळीचे बुधले घेऊन तेल टाकत होते.

व्हरांड्यातून पालखी उचलली गेली. दीक्षितांनी पालखीबरोबर राहून समोर एकटक पाहणाऱ्या महाराजांना दायीसारखं धरलं होतं. पालखी खाली आली. लोक अनावर होऊ लागले. एकदम काय झालं कुणास ठाऊक, पलितेवाले, अब्दागिरीवाले, पालखी वाहणारे पालखीसह प्रदक्षिणेच्या वाटेने जोरात धावू लागले. लोक त्यांच्या मागे धावू लागले. समुद्रात वेगाने जाणाऱ्या लाँचसारखी ती पालखी दिसत होती. काही क्षणांनंतर फेरी मारून परत मूळ ठिकाणी आली. ब्राह्मणांनी जवळच ठेवलेल्या तीन फूट काठी असलेल्या कुबड्या काढून त्या पालखीच्या पुढच्या व मागच्या दांड्याखाली ठेवल्या आणि पालखी तीन फूट उंचीवर उतरवली गेली. बाजूंनी इतरांनी धरले होतेच, पण त्याचा भार पडत नव्हता. प्रत्येक गोष्टीचे साधन त्यांच्यापाशी तयारच होते. लोक पालखीपाशी दर्शनासाठी झुंबड करू लागले. रुपया-दोन रुपयांच्या नोटा

पालखीत टाकू लागले. बाजूला उभा असलेला तरुण ऋषिकुमार पटकन हाताने, बगळा जसा मासा टिपतो तशी ती नोट उचलून घेत होता. बहुधा आज त्याचा हक्क असणार.

तिथं आरती होऊन पालखी परत मघासारखी वेगात चक्कर मारून व्हरांड्याच्या साईडने वर आणून खाली ठेवण्यात आली. व्हरांड्याच्या दगडी ओट्यावर खाली उभे राहून लोक नारळ तडातड फोडू लागले. एक वाटी पुजाऱ्याकडे फेकू लागले. माझ्या शेजारच्या बाईने एक नारळ पुजाऱ्याकडे दिला. त्याने फोडून तिच्या हातात दिला. तो उघडताच संपूर्ण नासका असलेला दिसला. तिचं तोंड वाईट झालं. नासका निघाला तर देवाला पावला म्हणायची पद्धत आहे– पण हा प्रसाद म्हणून कसा वाटणार ! एव्हाना नारळ फोडण्याचा वेग एवढा वाढला होता, की ' फड फड फडा-फफड...' असा एखादा फटाक्यांचा सर कडकडावा इतक्या वेगाने आवाज येत होता. शेवटी महाराज आत गेले तेव्हा कुठे आवाज संपला.

लोकांची गर्दी सरली तसं समोरचं अंगण आणि त्यात नाचणारी भुतं परत दिसू लागली. म्हणजे इतक्या वेळ हे नाचतच असणार. किती यांची शरीरं दमलेली असणार, किती ठिकाणी यांना लागलं असणार ! मी खाली अंगणात फिरू लागलो. अंगात येऊन पडलेल्या बायांजवळ त्यांचं कोणी ना कोणी उभं होतं. त्यांच्यावर गर्दीतल्या कुणाचा पाय पडू नये याची ते काळजी घेत. मरून लुगड्याच्या बाईजवळ एक पांढरा पायजमा, शर्ट आणि पांढरी टोपी घातलेला पस्तिशीचा माणूस उभा होता. त्याची ओळख करून घेतली. त्याचं नाव वायकर. आमच्या जुन्नर भागातलाच तो निघाल्याने अधिक मोकळेपणाने बोलू लागला.

मी विचारलं, ' ह्या बाई तुमच्या कोण ? '

' मंडळी आहेत. पलीकडं पडला आहे तो भाचा. या दोघांनाही घेऊन आलोय. '

' मंडळींना किती दिवस त्रास होतोय ? '

' सात–आठ वर्षं तरी झाली असतील. ती सुरुवातीपासून म्हणत होती– पण माझा याच्यावर विश्वास नव्हता. '

' डॉक्टरी उपचार केले की नाहीत ? '

' अहो, देवऋषी झाले, डॉक्टर झाले, मांत्रिक झाले. शेवटी आता इथं आणलंय.'

वायकरांनी देवऋषी आणि मांत्रिकांमध्ये डॉक्टरला ब्रॅकेट करून टाकलं, त्याची गंमत वाटली.

मी विचारलं, ' याच्या मागे काय कारण असावं ? '

' याच्यामागे कोण आहे ते आम्हाला पक्कं ठावं आहे. आमचाच चुलता आहे. तो हे सगळे उद्योग करतो. '

‘ कशावरून ? ’

‘ अहो, आमच्या भावाला चार मुलं झाली. ती चारी पांगळी निघाली. एक मूल पांगळं निघेल, दोन निघतील, पण चारीही ? पहिलं मूल तर गेलंच. त्याच्या वेळीच इथं आलतो. म्हणून याची माहिती तरी झाली. नाहीतर आपल्याला तरी काय माहीत ? मग मंडळींचा त्रास संपेना तवा ठरवलं, की आता सोक्षमोक्षच लावायचा. गेले दोन महिने इथं खोली घेऊन राह्यलोय. अजून एक महिना राहावं लागेल. ’

‘ रोज काय काय करता इथं ? ’

‘ पहाटे नदीवर आंघोळ करून काकडआरतीपासून रात्रीच्या शेवटच्या आरतीपर्यंत इथंच सेवा करतो. ’

‘ पण किती कष्ट पडत असतील तुमच्या मंडळींना. या कोलांट्या खाताना खूप मुका मारही बसत असेल नाही ? ’

‘ छे छे ! जो त्रास होतो तो त्यांना होत नाही, त्यांच्या अंगातल्या भुताखेताला होतो. इथं लाड नाहीत. जगात तुम्ही इतर ठिकाणी चुकवाल, पण इथं या दरबारात सुटका नाही. हे म्हणजे अगदी सुप्रीम कोर्ट आहे ! याच्या पुढे कोर्टच नाही. आता खांबाच्या मागे तो बैरागी बसलाय ना, त्याच्या शेजारी जाऊन तो काय बडबड करतोय ती नुसती ऐका ! ’

मी पाहिलं तर काटकुळा, काळा, राख फासलेला बैरागी तिथं बसला होता. वायकर म्हणाले, ‘ त्याने आतापर्यंत आठदहा माणसं संपवली आहेत. त्याचा झाडा तो इथं रोज देत बसतो. ’

‘ इथं आल्यावर अशा लोकांमध्ये काही फरक दिसतो का हो ? ’

वायकरांनी एका बाईकडे बोट दाखवलं. एका पन्नाशीच्या बाईला दोनतीन माणसं खांद्याला धरून आणत होती. लोळागोळा झालेलं शरीर, डोळ्यांत कसलीच चमक नाही, कसलंच भान नाही असा चेहरा. वायकर म्हणाले, ‘ ही बाई इथं आली तेव्हा हिला बांधून आणावं लागलं होतं. आता किती शांत झालीय बघा ! ’

मला कसंतरीच झालं. ह्या अवस्थेला ते सुधारणा म्हणत होते, याने पोटात कालवलं गेलं. मी म्हटलं, ‘ पण सतत या कोलांट्या मारून त्रास होत असणार हो. ’

वायकर म्हणाले, ‘ अहो, हा रिमांड आहे. रिमांडमध्ये पोलीस काय करतात, गुन्हेगारांना असा हिसका दाखवतात, की गुन्हा कबूल झालाच पाहिजे. आता आम्ही येऊन दोन महिने झाले. परवा आमोशा आहे ना, त्या दिवशी तीन महिने होतील. त्या आमोशेला भस्माच्या डोंगरावर आमच्या मंडळींचं सगळं उतरून जाणार आहे. मला ते पक्कं ठावं आहे. अन् ते जेव्हा उतरेल तेव्हा करणी करणाऱ्याच्या म्हंजे आमच्या चुलत्याच्या डोक्यावर जाऊन बसणार. आता त्याची सुटका नाही. ’

मला वायकरांची दया आली. अमावास्येला भूत नाही उतरलं तर ?

सकाळी साडेसहाच्या गाणगापूर–पंढरपूर एस. टी. ने परत निघालो. पहिलं खेडेगाव लागलं, तिथं स्टँडची शेड, मागं शाळा, पडकी घरं पाहून हायसं वाटलं. मनात आलं, चला, झपाटलेल्या गाणगापुरातून आपण आपल्या नेहमीच्या जगात आलो.

गाणगापूरला जाण्याआधी गाणगापूरविषयी अनेक चमत्कारांच्या हकीगती सांगितल्या होत्या. त्या आपण डोळ्यांनी पाहिल्याचं ते सांगायचे. अंगात भुतं आलेली माणसं, बाया गुळगुळीत, लाकडी खांबावर सरास्सर चढतात, उतरतात, असं सारखं वरखाली करीत बसतात. प्रत्यक्षात ते खांब म्हणजे गर्डर्स होते. हाताने धरायला आणि पाय रोवायला तिथं भरपूर मार्जिन होतं, तसं चढणं अवघड असलं तरी अशक्य नाही. काही दत्तभक्तांनी सांगितलं की भिंतीवर हे लोक सरासर चढतात, पालीसारखं. एकाने तर सांगितलं, भिंतीला पाठ लावून चढतात, तिथं देवळासमोर, जिथं लोकांच्या अंगात येतं तिथं भिंतच नाही.

आता एखाद्या किरकोळ शरीराच्या बाईने इतक्या कोलांट्या माराव्या किंवा नाचावं हे आश्चर्य नाही का ? माझी बायको सुनंदा ही मेंटल हॉस्पिटलमध्ये सायकियाट्रिस्ट आहे. तिने अंगात येणे या विषयावर संशोधनही केलेले आहे. अंगात येणे हे मानसिक रोगाचं लक्षण आहे, असा तिचा निष्कर्ष आहे. सतत, ठराविक दिवशी अंगात येणाऱ्या अनेक व्यक्तींची तिने तपासणी केल्यावर तिला काही ना काही मानसिक ' प्रॉब्लेम ' आढळला. कित्येक व्यक्तींच्या बाबतीत पहिल्यांदा जेव्हा कधी अंगात आलं त्याच्या आधी जोरदार मानसिक धक्का बसलेला होता. गाणगापूरला कोलांट्या खाणारी माणसं नंतर बराच वेळ दमून, बराच वेळ प्रेतवत पडत होती. अंगात यायच्या काळात इतकी शक्ती, कसल्याही बंधनाशिवाय बाहेर फेकली जाते, की तो लोकांना चमत्कार वाटतो. पण नंतर शरीराला त्याची किंमत मोजावी लागते हे कुणी पाहायला जात नाही. अंगात एरवीही ती शक्ती असतेच, पण आपण त्या त्या वेळी आवश्यक असेल तेवढीच बाहेर काढतो. हे नियंत्रण मानसिक रोग्यांमधले कित्येकदा निघून जाते. मेंटलमध्ये ॲडमिट करायला आणलेले पेशंट काही वेळ इतके एक्सायटेड असतात, की ते चारचार, सहासहा, धष्टपुष्ट आणि या कामाची सवय असलेल्या अटेंडंट्सनाही आवरत नाहीत.

आता काहीजण विचारतात गुरुवार, मंगळवार, शुक्रवार अशा ठराविक दिवशीच का अंगात येतं ? मेंटल हॉस्पिटलमध्ये अनेक स्त्री पेशंटस् आहेत, की ज्यांना दर मंगळवारी, शुक्रवारी अंगात यायचं. पण मेंटलमध्ये आणल्यावर तारखेचे, तिथीचे, वाराचे भान जाते. ( तसे जेलमध्येही बहुतेकांचे जाते. ) मग कित्येक मंगळवार येतात तरी त्यांच्या अंगात येत नाही. काहींना गाणगापूरला दोनतीन महिने

राहिल्यावर बरे वाटते, असा अनुभव आहे. यातही तथ्य आहे. प्रत्येक पेशंटच्या रोगाचं एक चक्र असतं. महिना दोन महिने मानसिक दुखण्यानंतर वर्ष, काहींच्या बाबतीत जास्त काळ नीट जातं. परत त्रास व्हायला लागतो. तेव्हा वायकरांच्या म्हणण्याप्रमाणे दत्ताचे सुप्रीम कोर्ट, पोलीस, रिमांड, फटके, असं काही नसून ठराविक काळानंतर त्या माणसाला त्याच्या रोगाचं स्वरूप म्हणून आपोआपच बरं वाटणार असतं. पण या मार्गात सतत राहिल्यावर त्या रोग्याचा मूळ प्रश्न बाजूला राहून या अद्‌भुत जगाचा तो भाग बनून रोगी मनाने आणखीच बिघडतो. यातनं त्या रोग्याला बाहेर काढण्यासाठी आसपासच्या माणसांनी चांगल्या डॉक्टरच्या मदतीने त्याचं मूळ दुखणं हेरून त्यातनं बाहेर पडायला त्याला मदत केली, आत्मविश्वास निर्माण केला तर ही भुतं आपोआप पळतील.

गाणगापूरला जायच्या आधी गुरुचरित्र कथासार वाचलं होतं. आल्यानंतर मूळ गुरुचरित्र वाचलं. गो. नी. दांडेकरांनी तर वाचकांच्या सोयीसाठी ते मूळच्या ओवी आणि जुन्या भाषेतलं गुरुचरित्र आजच्या गद्य भाषेत लिहून प्रसिद्ध केलं आहे. या गुरुचरित्राच्या वाचनाचा एवढा बाऊ का करतात ते कळत नाही. वि. के. फडके–संपादित गुरुचरित्राच्या प्रस्तावनेतच लिहिलेलं आहे की सात दिवसांच्या या पारायणात ब्रह्मचर्य पाळावं, हजामत-दाढी करू नये, पांढऱ्यावर झोपावं, पांढरं पांघरावं, दूध-भात खावा, डाव्या कुशीवर, उजवा कान वर करून झोपावं. का, तर श्रीगुरूचा आदेश उजव्या कानातून येतो. स्त्रियांनी गुरुचरित्र वाचू नये इत्यादी. प्रस्तावनेत गुरुचरित्र वाचून कुणाकुणा भक्तांना काय अनुभव आले याची ही यादी दिली. आणि हे अनुभव जीवनातल्या सर्वसामान्य गरजांबाबतचे आहेत. प्रत्यक्ष गुरुचरित्रात श्रीपाद वल्लभ आणि नंतर नृसिंह सरस्वती यांनी केलेल्या चमत्कारांच्या कथा खचाखच भरलेल्या आहेत. साठ वर्षांच्या स्त्रीला श्रीगुरूंनी संतान दिले. ब्रह्मराक्षसास मुक्त केले, ब्राह्मणाच्या अंगणातील घेवड्याची वेल उपटून धनकुंभ प्राप्त करून दिले, वांझ म्हशीकडून दूध काढविले, तीन माणसांच्या स्वयंपाकात चार हजार माणसांचे भोजन करविले, देवीसमोर जीभ कापून घेतलेल्या ब्राह्मणावर वरदहस्त ठेवताच ती जीभ पूर्ववत झाली, इत्यादी इत्यादी.

श्रीगुरूंना (नृसिंह सरस्वतींना) वेदपठणात जिंकायला आलेल्या ब्राह्मणांसमोर श्रीगुरूंनी चमत्कार करून दाखवला. तिथून जाणाऱ्या चांडाळाला हाक मारली. शिष्यांना त्याच्या समोर सात रेषा आखायला सांगितलं, आणि चांडाळाला रेषा ओलांडत यायला सांगितलं. एकेक रेषा ओलांडली, तसा त्याला एकेक जन्म आठवत गेला. शेवटची रेषा ओलांडल्यावर तो चारी वेद घडघडा बोलू लागला. त्याची चांडाळ बायका-पोरं धावत आली. त्यांना तो शिवून घ्यायला तयार होईना. श्रीगुरूंनी सांगूनही

'आता मी ब्राह्मणच राहणार', असा तो हट्ट धरून बसला, तेव्हा श्रीगुरूंनी एका लोभी ब्राह्मणाकडून त्याला स्नान घालविले. त्याच्या अंगाचे भस्म धुऊन गेल्यावर परत तो चांडाळ झाला आणि आनंदाने आपल्या बायका-मुलांबरोबर निघून गेला. हा चमत्कार पाहून गुरूंना जिंकायला आलेले ब्राह्मण खजील झाले. मग श्रीगुरूंनी त्यांना बारा वर्षं राक्षस योनीत पाठवले.

या तऱ्हेच्या चमत्कारांच्या कथांचे पारायण करून कोणतं नवं ज्ञान माणसाला होणार, हा प्रश्न एका गुरुचरित्राच्या आवृत्तीची प्रस्तावना लिहिताना संपादक वि. के. फडके यांनी उपस्थित करून स्वतःच उत्तर दिले, की सगळं गुरुचरित्र हाच एक मंत्र आहे. त्याच्या पारायणाने आपोआपच फायदे मिळतात. या स्पष्टीकरणाने मोठीच पळवाट त्यांनी शोधली असली तरी गुरुचरित्रात काय आहे आणि ते कितपत महत्त्वाचे आहे असे शोधणाऱ्याचे त्याने समाधान होणार नाही.

गुरुचरित्र हे सरस्वती गंगाधराने इ. स. चौदाशे ऐंशीच्या सुमारास लिहिले. (असे संशोधकांचे सर्वसाधारण मत आहे.) त्याच्याही आधी लिहिल्या गेलेल्या ज्ञानेश्वरी व इतर संतसाहित्यापेक्षा कितीतरी संकुचित स्वरूपाची विचारसरणी गुरुचरित्रात आली आहे. पत्नीने कसे वागावे याबद्दल एकतिसाव्या अध्यायात म्हटले आहे की, पुरुष भाग्यहीन, अनाचारी, दुष्ट, नपुंसक, व्याधीग्रस्त असला तरी त्याला पूज्य मानावे. पतीला टाकून बोलणाऱ्या स्त्रीला श्वानयोनीत जन्म येतो. ती स्त्री कोल्ही होऊन गावाजवळ येऊन भुंकते. जी स्त्री पुरुषाला टाकून अन्न खाते ती गावडुकरी होते. तोही जन्म भोगून ती वटवाघूळ होते. आपलीच विष्ठा खाऊन ती वृक्षावर लोंबते.

नवरा वारल्यावर बायकोने सती गेले पाहिजे याचा जोरदार पुरस्कार गुरुचरित्रात आहे. 'देहाची सावली नाही का देहाबरोबर जात? चंद्राबरोबर चांदणे हरपते, किंवा मेघाबरोबर वीज जाते तसे पतीबरोबर सहगमन करणे हा मुख्य धर्म. पापी पतीला मरण आले आणि जरी त्याला यमदूतांनी नरकी बांधून नेले तरी जर त्याच्या पत्नीने सहगमन केले तर सर्पाला घारीने उचलावे, तशी ती पतीला स्वर्गास नेते. तिच्या डोक्यावरचे जेवढे केस तिने अग्नीला दिले त्या एकेका केसागणिक ती शतकोटी वर्षे स्वर्गात पतीसह राहते.'

विधवा स्त्रियांनी जगात कसे राहावे याचेही मार्गदर्शन गुरुचरित्रातल्या बत्तिसाव्या अध्यायात आहे. पुरुष गेल्यावर तिने केशपाशाचा त्याग करावा. ज्या विधवा केस राखतात त्यांचे ते केस पतीला बांधून नरकास घेऊन जातात. तिने चांद्रायण व्रत करावे; म्हणजे शुद्ध बीजेला एक घास, असा रोज एक घास वाढवीत पौर्णिमेला पंधरा घास. ते उतरवीत परत अमावास्येला एक घास. विधवा जर मंचकावर झोपली तर ती पतीला नरकात घालते, पतीसह ती निरंतर नरक भोगते.

या विधवांविषयीच्या सगळ्या आदेशांमध्ये ब्राह्मणांची भरपूर धन होत होती.

आपण सुवासिनी असता ज्या ज्या वस्तूवर आपले प्रेम होते ती ती विद्वान ब्राह्मणास द्यावी. ब्राह्मणाचे घरी पाणी भरावे, ते तीर्थयात्रेला निघाले तर त्यांना छत्री व पायतणे द्यावीत. माघामध्ये तिळाचे लाडू, खजूर, पक्वान्ने विप्रवर्गास द्यावीत. तिळाचे लाडू, खजूर, पक्वान्ने, साखर, मिरी, वेलदोडे इ. घालून वडे तळावेत व ते विप्रवर्गास द्यावेत. थंडीपासून बचाव होण्यास उष्ण औषधे द्यावीत, पलंग द्यावा, ब्राह्मणाला लाकडे द्यावीत, हेमंतऋतू येताच ब्राह्मणांना वस्त्रे द्यावीत, गृहदान करावे.

गुरुचरित्रात चांडाळांचाही बऱ्याचदा उल्लेख विशेषतः अठ्ठाविसाव्या अध्यायात आहे. ' ब्राह्मण स्त्रीशी शूद्राचा संबंध आला की चांडाळाची उत्पत्ती होते ' असे सूत्र सांगितले असले तरी अनेक कारणांनी तो माणूस चांडाळ होईल, असा शापही दिलेला आहे. जो शूद्राच्या हातचे भोजन करतो किंवा घोड्यांचा व्यापार करतो, जो शूद्रांशी संपर्क करतो तो चांडाळ होतो. योग्य ब्राह्मणाची निंदा करतो, दुसऱ्या जातीची पूजा करतो, तो वृत्तीलोपामुळे चांडाळ होतो.

या संप्रदायाची महत्त्वाची खूण म्हणजे भस्म. या भस्माचे फायदेही एकोणतिसाव्या अध्यायात दिलेले आहेत. क्षत्रिय, वैश्य, शूद्र, स्त्री, गाय यांचा वध केला किंवा वीराला मारले तरी भस्म लावल्याने तो पुरुष पुण्यात्मा होतो.... परस्त्रीशी व्यभिचार करणारा, परनिंदक, परक्षेत्राचा अपहार करणारा, धान्य कापणारा, बाग तोडणारा, परपीडा करणारा, तोही पवित्र होतो. भस्माच्या माहात्म्यासाठी एक कथाही या अध्यायात आहे. ' एक आचारहीन, शूद्र स्त्रीशी संबंध ठेवणारा द्रविड ब्राह्मण होता. त्यास शूद्राने ठार करून त्याचे प्रेत गावाबाहेर उकिरड्यावर टाकले. त्या ठिकाणी एक कुत्रा भस्मराशीत बसला होता तो प्रेतावर बसून प्रेत मजेत खाऊ लागला. कुत्र्याच्या पोटाचे भस्म त्याच्या कपाळी, बाहूंना लागले. ब्राह्मणाचा प्राण घेऊन यमदूत यमपुरीला जात असता कैलासपुरीच्या शिवदूतांनी ते हिरावून त्या ब्राह्मणास विमानात बसवून कैलासास नेले. यमाने तक्रार केल्यावर शिवाने बजावले, ज्याच्या शरीरी भस्म असेल त्याला यमदूतांनी स्पर्शू नये. भस्म चर्चिलेल्या पुरुषास पाप नसते. '

गायत्री मंत्रानेही कसली कसली पापं नष्ट होतात ते पाहण्यासारखं आहे. ओम भुर्ववः स्वाहा....या सगळ्या मंत्रातल्या प्रत्येक अक्षराने कोणकोणती पापं जातात ते छत्तिसाव्या अध्यायात आहे. ' र्व ' अक्षराने भ्रूणहत्येचा दोष नाहीसा होतो. ' रे ' मुळे व्यभिचारदोष, ' ति ' मुळे अभक्ष्यभक्षणाचा दोष, ' य ' वर्णामुळे देहहत्येचा दोष, ' भा ' मुळे गुरुहत्येचा, ' गे ' मुळे गोहत्येचा, ' स्य ' मुळे खोटी मापे वापरल्याचा, ' ही ' मुळे पितृहत्येचा, असे अनेक दोष नाहीसे होतात. जो मनुष्य ह्या मंत्राचा जप करीत नाही त्याचा जन्म डुकराप्रमाणे व्यर्थ होय.

कुठे जेवू नये याची अनेक ठिकाणे सांगितली आहेत. गर्विष्ठ, चित्रकार, शस्त्रधारी, ब्राह्मण असून कुस्ती करतो, जो वीणा वाजवून जगतो त्याचे घरी जेवू नये.

चोर, द्वारपाल, कुंभार यांच्या घरचे अन्न दूषित आहे. जो शूद्राकडून द्रव्य घेऊन त्याला शिकवतो, जो घोडी विकतो त्याच्या घरी जेवू नये. बहिरा, व्यंग असलेला, स्मरणहीन, स्वयंपाकी यांच्या घरी जेवू नये.

अनेक लहानसहान बाबतीतलेही नियम यात आले आहेत. शौचाला कसे जावे, कसे बसावे, कुठल्या दिशेला तोंड करावे, हे सांगून झाल्यावर पुढे म्हटले आहे की, शौच झाल्यावर ब्राह्मणाने आठ वेळा चूळ भरावी, क्षत्रियाने सहा वेळा, वैश्याने चारदा तर शूद्राने दोनदा चूळ भरावी.

हे सगळं वाचल्यावर गुरुचरित्रात मांडली गेलेली विचारसरणी लक्षात येते. वारकरी संप्रदायातील संतसाहित्यात जाती किंवा वर्णव्यवस्थेच्याविषयीचे समर्थनपर तुरळक उल्लेख येतात, पण सूर समतेच्या दिशेने आहे. पण इथे गुरुचरित्रात मात्र त्या व्यवस्थेचे, त्यातल्या उच्चनीचतेचे, स्त्रीच्या कनिष्ठ स्थानाचे, गुलामगिरीचे अगदी उघडेनागडे समर्थनच केले आहे. कुठलेही पातक करा, भस्म लावून किंवा गायत्री मंत्राचा जप करून त्यातून मुक्त व्हा, अशी मूल्यनिरपेक्ष वहिवाटही पाडून दिलेली आहे.


अशा जुन्या साहित्याविषयी या दृष्टीने कुणी काही पाहू गेले की काहीजण म्हणतात, 'तुमची आताची मूल्ये त्या वेळच्या साहित्यावर का लादता?' एका दृष्टीने खरेच आहे. पण त्यावेळच्या मूल्यांचा नकळत प्रभाव पडलेलं साहित्य आणि त्या मूल्यांच्या समर्थनासाठीच लिहिलेलं साहित्य, हा फरक उरतोच की. आणि त्या काळाशी ते जुळणारे मानले तरी त्यानंतर एवढ्या उलथापालथी घडल्या, इंग्रजी राज्य येऊन गेले, प्रबोधनाचे युग आले, स्वातंत्र्य आले, एवढी परिस्थिती बदलली, विचारप्रवाह विकसित होत गेले तरी आज ते गुरुचरित्र घेऊन त्याची पारायणे करण्यात काय अर्थ आहे? ज्ञानेश्वरी, गाथेत तत्त्वज्ञान आहे, काव्य आहे, भाषेचे सौंदर्य आहे, ते ग्रंथ परत वाचल्याने काही वेगळ्या तऱ्हेचा आनंद मिळू शकतो. तसं गुरुचरित्रात 'चांदोबा' मासिकात शोभतील अशा कथा आहेत. आणि नंतर कालबाह्य आणि अमानुष नियम आहेत. आणि हे सगळं लोक परत परत वाचतात!

गाणगापूरहून परत आल्यावर माझ्या मित्राची ती सुशिक्षित, नोकरी करणारी बहीण भेटली. तिनेच मला भस्म आणायला सांगितलं होतं. मी तो पुडा तिच्या हातात दिला आणि म्हणालो, 'तू म्हणालीस म्हणून मी आणलंय हे भस्म. खरं तर मला ही मातीच वाटतीय. पण एक सांगतो, तू एकदा गुरुचरित्र वाच आणि स्त्रियांविषयी काय लिहिलंय ते पाहा.'

ती म्हणाली, 'पण स्त्रियांनी गुरुचरित्र वाचू नये असं शास्त्र आहे. मग कशी वाचू शकणार मी?'

मी तिला नमस्कार करून म्हटलं, 'धन्य आहे तुझी!'

□



# बुवा वाघमारे

एका मित्राच्या दुकानात उभा होतो. रात्री आठची वेळ. रस्त्यावर पोलीसची निळी जीप थांबली. जीपमधून मलाच कुणीतरी डॉक्टर, डॉक्टर म्हणून हाका मारीत होतं. मी पायऱ्या उतरून खाली आलो आणि पाहिलं तर इन्स्पेक्टर पंडितराव पुढच्या सीटवर बसलेले. गुबगुबीत चेहऱ्यावर भरपूर मोठ्या मिश्या पिंजारलेल्या. पट्टा पोटावर गच्च आवळलेला. कसेबसे उतरत म्हणाले,

'तुम्हालाच शोधत होतो. चला येता का ? तुम्हाला तो आरोपी बघायचा होता ना ? त्याला दुसऱ्या एका तपासासाठी बंडगार्डन लॉकअपला आणलंय.'

मी म्हटलं, 'वाः चला की !'

हा आरोपी म्हणजे भाऊ वाघमारे ऊर्फ वाघमारे बुवा. पेपरमध्ये काही दिवसांपूर्वी बरंचसं आलेलं होतं. हा स्त्रियांना नादी लावतो, योनिपूजा करतो....वगैरे. तेव्हापासून मला या माणसाला बघायची उत्सुकता होती. याच्यात स्त्रियांना नेमकं काय आकर्षण वाटत असेल, हा देखणा असेल का, तब्येतीने कसा असेल, असे अनेक प्रश्न.

नाव बंडगार्डनचं असलं तरी पोलीस स्टेशन आहे ससूनच्या चौकात. जीप आतमध्ये आली. आम्ही उतरलो. दुमजली दगडी इमारतीच्या खालच्या मजल्यावर एका बाजूला तिथल्या पी. आय. (पोलीस इन्स्पेक्टर) चं ऑफिस आहे आणि बाजूला एक अंधारी बोळकांडी आहे तिकडं आहे लॉकअप. पंडितरावांच्या मागोमाग तिकडं जाऊ लागलो. लघवीच्या घाणीचा भपकारा आला. दगडी भिंतींमध्ये गजांचं दार होतं, आत अंधार होता. दूरच्या कुठल्यातरी लाइटच्या अर्धवट प्रकाशात आत पसरलेले दोनचार कैदी दिसले. मी बरोबरच्या कॉन्स्टेबलला विचारलं, इथं दिवे का

नाहीत ? तो कुजबुजत म्हणाला,

‘ कैदी आत्महत्या करतात, ते आमच्यावर येतं. वायर, करंट असला की काहीही करता येतं. ’

तिथल्या हवालदाराने रजिस्टर काढून एन्ट्री केली. पंडितरावांनी सही ठोकली. खटाखट कुलूप उघडलं गेलं. खडाखड कड्या सरकवल्या गेल्या. हवालदाराने बॅटरी मारली. एक कैदी आत फरशीवर पसरलेला दिसला.

‘ वाघमारे, बाहेर ये. ’

एक मळक्या पायजमा–शर्टातला माणूस आत दारालगत उभा होता तो बाहेर आला. आमच्या पाठोपाठ त्याला पी. आय. च्या ऑफिसात आणलं.

उजेडात आणल्यानंतर त्याला नीट बघितलं तर तो अगदी सामान्य दिसणारा माणूस वाटला. रस्त्याने शेकडो माणसं जात–येत असतात, त्यांतलाच वाटावा असा. वयाने चाळीस–पंचेचाळीस. मध्यम उंचीचा. किंचित पोट सुटलेला. केस थोडे कुरळे, मागे फिरवलेले. सावळा मातट रंगाचा. उभट, खडबडीत चेहरा. डोक्याचा आकार शरीराच्या मानाने मोठा असलेला.

मी, पंडितराव खुर्चीत बसलो. मी वाघमारेंना एका खुर्चीकडे बोट दाखवून म्हणालो, ‘ बसा. ’

पंडितराव म्हणाले, ‘ छेः छेः त्याला खुर्ची कशाला ? बस रे खाली. ’

वाघमारे भिंतीला पाठ सरकवत खाली उकिडवे बसले. मीच त्यांना मग शेजारच्या बाकड्यावर बसवलं.

मी म्हटलं, ‘ तुमचं हे सगळं प्रकरण मला समजावून घ्यायचंय. मी पोलिसांपैकी नाही. तुम्ही सविस्तर सांगा. तुमचं नाव, गाव, शिक्षण, सगळं सांगा. ’

‘ सांगतो. ’ असं म्हणून त्यांनी सुरुवात केली. त्याचा आवाज बसका, दबलेला होता. ‘ माझं नाव भाऊसाहेब चव्हाण. ’

पंडितराव उडालेच. म्हणाले, ‘ चव्हाण ? मग आम्हांला वाघमारे काय सांगितलंस ?’

‘ साहेब, सांगतो. श्रावण वाघमारे म्हणून एक गृहस्थ होते. ते मंचरच्या स्टँडवर पैसे मागत फिरायचे. माझ्याकडेही एकदोनदा मागितले. मी विचारलं, कशाला ? ते म्हणाले, भिमाशंकरला जायला. आमची ओळख झाली. मग ते घरी येऊ लागले. त्यांना वैद्यकीचं चांगलं ज्ञान होतं. ते त्यांनी मला दिलं. आमच्या घरातही वैद्यकी होतीच. वडील वैद्यकी करायचे. पण श्रावण वाघमाऱ्यांकडून मी फार शिकलो. मग मी त्यांचं नाव लावू लागलो. आता माझं नाव भाऊसाहेब श्रावण वाघमारे, जात : नवबौद्ध, शिक्षण : मॅट्रिक, वय एक्केचाळीस. ’

‘ वैद्यकी कसली करता ? ’

‘ मधामधून औषध देतो. माझ्याकडे एक औषध आहे. सर्व रोगांवर तोच

इलाज आहे. फक्त प्रमाण कमीजास्त करायचं. स्वतःच्या लघवीतून ते घ्यायला लावतो. पहिली लघवी सोडायची, शेवटची सोडायची. मधल्या लघवीतून ते घ्यायचं. याने महारोग, कोड, कॅन्सर मी बरा करू शकतो. अनेकांना अनुभव आलेला आहे. शेकडो पत्रं माझ्याकडे आहेत.'

'काय असतं त्या औषधात?'

वाघमाऱ्यांनी बरंच काही सांगितलं. अमक्याच्या रक्तात तमुक कालवायचे. ते तमक्यावर तळायचे...असलं बरंच काही.

'तुमचं लग्न झालंय का?'

'होय. आधी एक लग्न झालं होतं. पण सासरे मला घरजावई करून घ्यायला पहात होते. मला ते मान्य नव्हतं. म्हणून ते मोडलं. आताची मंडळी सरकारी नोकरीत आहेत. आंबेगावला आधी तलाठी होत्या. आता सर्कल अधिकारी आहेत.'

पंडितरावांनी कॉन्स्टेबलला कागद काढायला लावला. आधीच्या बायकोचं नाव काय, कुठं राहते, पत्ता सांग...असं विचारून कॉन्स्टेबलला ते लिहून घ्यायला सांगितले. पुढंही संभाषणात कुठंही कितीही कमी महत्त्वाच्या माणसांची नावं आणि गावांची नावं आली तरी पंडितराव कान टवकारत. नाव, पत्ते विचारीत आणि कॉन्स्टेबलला खूण करून लिहून घ्यायला सांगत.

'बरं, या प्रकरणाची सुरुवात कशी झाली?'

'मी आधी कळंबला होतो. नंतर नारायणगावला गेलो. तिथं अर्धवट बांधकाम केलेलं एक घर विकत घेतलं. पुण्याला येऊन बेकरीचा तीन महिन्यांचा कोर्स पुरा केला, आणि तिकडं बेकरी सुरू केली. महिन्याला पंचेचाळीस पोती मैद्याचं माझं लायसन्स होतं. मुलं ठेवली, ती आसपासच्या गावांना जाऊन माल विकायची. आपला माल म्हणजे नंबर वन. खारी करणं फार अवघड. रोज खारी करायची नाही. कारण बर्फ मिळायचे वांधे. पण आठवड्यातनं एकदा करायचो. रोजचा पोतंभर मैदा लागायचा. शेदीडशे रुपये रोज तर हसत मिळायचे. माझ्या मंडळींची आंबेगावला नोकरी, त्या शनिवार-रविवार नारायणगावला यायच्या. तिथं असताना मी वैद्यकी करायचो. खूप लांबलांबून लोक यायचे. त्याचा कधी नवा पैसा कोणाकडे मागितला नाही की घेतला नाही. त्यात या वहिनींचा संबंध आला आणि मग हे प्रकरण सुरू झालं.'

'वहिनी?'

'हो, म्हणजे शकुंतलाबाई कासार. त्यांना सगळे वहिनीच म्हणतात. त्यांच्या नवऱ्याला दमा आहे, म्हणून औषधासाठी येऊ लागल्या. घरात कोणी नसताना, आमच्या स्वयंपाकघरातच त्यांचा आमचा पहिला संबंध झाला.'

मी हादरलोच. असे संबंध माणूस सहसा नाकारतो, पण हा माणूस चेहऱ्यावरचे

भाव जराही न बदलता, फक्त आवाज थोडा खाली आणून पण स्वच्छपणे सांगत होता.

'पुढं मग संबंध वरचेवर आला. एकदा त्यांनी मला जुन्नरला बोलावलं. तिथं एक पंधरासोळा वर्षांची मुलगी होती. तिच्या पायावर कोड आलेलं आहे. वहिनींनी मला सांगितलं, एक गुप्त पूजा आहे, त्याच्यासाठी तुमची जरुरी आहे. त्यांनी खोली आतून बंद केली. एक कोरा कागद स्टोव्हच्या जाळावर धरला. त्याच्यावर अक्षरं दिसायला लागली. 'तुला योगिनी पूजा केली पाहिजे. वहिनी सांगतात ते ऐक,' असं त्याच्यावर लिहिलं होतं. मग वहिनींनी त्या मुलीच्या अंगावरचे कपडे काढायला सुरुवात केली. ती मुलगी संकोच करायला लागली. वहिनींनी तिला पटवलं. तिचे कपडे काढल्यावर त्यांनी स्वतःचे कपडे काढले. माझेही काढले. ही पूजा काय असते ते मला माहीतही नव्हतं. मग मला त्या मुलीशी संभोग करायला लावलं. तिला खूप रक्तस्राव झाला. नंतर तिला डॉक्टरकडे ट्रीटमेंट घ्यावी लागली. पुढे मग नेहमीच पूजा व्हायला लागल्या. वहिनी एकेका वेळेस पंधरावीसजणी जमवायची. जिची पूजा असेल तिच्याशी संभोग करायला लावायची. ती क्रिया अर्धवट असताना मला त्या बाईपासून तोडून स्वतःशी संभोग करायला लावायची. या सगळ्याचा अर्थ मला नंतर कळला. आधी वहिनीच्या शरीराची भूक फार मोठी, पण नंतर नंतर दुसऱ्याचा संभोग पाहिल्याशिवाय तिच्या भावना पेटत नसत. म्हणून तिने हा सगळा बनाव घडवून आणला, आणि मी त्यात सापडलो.'

'का, तुम्ही नकार देऊ शकत नव्हता ?'

'तिने माझ्या बायकोला हे सगळं सांगेन, असा मला दम दिला होता. पुढं तर प्लँचेटमागची ट्रीकही तिनं सांगितली.'

'प्लँचेट ?'

'हो. तेच हो. कागदावर अक्षरं उमटतात ते. कांद्याच्या रसाने कागदावर मजकूर लिहायची. कागद वाळला की काही कळत नाही. पण तापवला की ती अक्षरं तेवढी काळी पडतात. मग तर मला ह्या फसवणुकीबद्दल फारच अपराधी वाटायला लागलं. मी वहिनीच्या नवऱ्याला एकदा फिरायला नेलं. तो फार गरीब माणूस आहे. त्यांना म्हटलं, मी तुमच्याकडे येतो, बसतो. तुम्ही माझ्यावर विश्वास टाकता. पण खरा प्रकार असा आहे. ते ऐकल्यावर त्यांनी घरी जाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाही.'

'पण मी तर वाचलंय, तुमच्या या पूजा विधिपूर्वक चालायच्या. काय विधी होता तो ?'

'योनिपूजा किंवा भैरवीपूजा म्हणतात त्याला. गणपतीची मूर्ती समोर ठेवायचो. ज्या पंधरावीस जणी जमल्या असतील, त्यांनी संपूर्ण नग्न व्हायचं. मध्ये रांगोळी

घालून चौक केलेला असायचा. त्यात जिची पूजा असेल तिला नग्न करून बसवायचं. तिच्या प्रत्येक पॉइंटवर हळदकुंकू लावायचं. योनीपासून ते थेट कपाळापर्यंत गंधाची रेघ काढायची. मग मी पायापासून डोक्यापर्यंत चुंबने घ्यायचो, आणि मग ती क्रिया.'

'हे चाललं असताना इतर स्त्रिया काय करायच्या?'

'त्यांना एकेक फोटो दिलेला असायचा भैरवी देवीचा. त्याकडे त्यांनी पहात बसायचं. एका मुलीला अथर्वशीर्ष यायचं, ती अथर्वशीर्ष म्हणत बसायची.'

'एका वेळी एकच पूजा व्हायची?'

'हो. कधी कधी दोनतीन पण व्हायच्या.'

'एका बाईची एकदाच पूजा व्हायची?'

'नाही, प्लँचेटमध्ये लिहून येईल तितक्या. कुणाला पाच पूजा करून घ्या असं लिहून यायचं, तर कुणाला दहा, कुणाला पंधरा.'

'जास्तीत जास्त किती?'

'त्या अमक्या बाईच्या मी वीस पूजा केलेल्या आहेत.'

आतापर्यंत शरीरसंबंधांविषयी जे काही उघडपणे बोलणं चाललं होतं, ते कॉन्स्टेबल मंडळी ऐकत होतीच. साहेबासमोर असं ऐकायला त्यांना थोडं अडचणीचंच वाटत असणार, पण चेहरे मात्र त्यांनी दगडासारखे ठेवलेले होते. 'पूजा' या शब्दाने एक सोय झालेली होती. शरीरसंबंधांविषयी आम्ही अडचण न होता बोलू शकत होतो.

'जिच्या पूजा संपल्या असतील, तिची शेवटच्या पूजेनंतर समातीची योनिपूजा असायची. त्या बाईला गरम पाण्याने आंघोळ घालायचो. मग दुधाने आंघोळ आणि परत पाण्याने आंघोळ घालायचो. मग सगळ्यांना फराळ-चहा द्यायचो.'

'कुठल्या वयाच्या स्त्रिया होत्या यात?'

'बारातेरा वर्षांच्या मुलींपासून तो अगदी साठ वर्षांच्या बाईपर्यंत पूजा केलेल्या आहेत. त्यांत कुमारिका आहेत, संसारी स्त्रिया आहेत, विधवा आहेत.'

वाघमारे धडाधड स्त्रियांची नावं घेत होते. मी जुन्नरजवळच्या ओतूर गावचा असल्याने मला ती कुटुंबे ऐकून माहीत होती. त्यांतली बरीचशी जुन्नरमधील प्रतिष्ठित कुटुंबे होती. मला धक्काच बसला. त्यांत ब्राह्मण होते, गुजराथी-मारवाडी होते, शिक्षक होते, खालच्या जातीपर्यंतच्या कुटुंबांतल्या स्त्रिया होत्या.

'कशासाठी या स्त्रिया पूजा करून घ्यायच्या?'

'लग्न जमत नाही, मूल होत नाही, नोकरी मिळत नाही....' मंत्र म्हटल्यासारखा त्यांनी बराच मोठा पाढा वाचून दाखवला.

'त्यांच्या घरच्या पुरुषमंडळींना याची कितपत कल्पना होती?'

‘ अजिबात नव्हती. काही स्त्रियांबरोबर तर त्यांचे नवरे, घरची माणसं यायची. पण त्यांना बाहेरच्या खोलीत बसवायचो. कडी लावून आत पूजा. बरं, कोण बाई घरी असं चालतं म्हणून सांगणार ? ज्यांच्या घरात पूजा आहे, त्यांना सुद्धा कल्पना यायची नाही. आपण बाहेर बोल्लो तर भैरवी शिक्षा करेल अशी त्यांना भीतीही असायची. ’

मनात आलं, याच जातींमध्ये अगदी कायदेशीर रीतीने कोणी आंतरजातीय विवाह करायचं ठरवलं तर कसला गदारोळ होतो ! त्यात परत वाघमाऱ्यांची जात नवबौद्ध, यांतल्या बऱ्याच स्त्रिया विवाहितही.

पंडितराव म्हणाले, ‘ मग त्याच्यानंतर तू इकडं वडगाव–शेरीला कधी राहायला आलास ? ’

‘ जुन्नर–नारायणगावला माझ्या बऱ्याच पूजा झाल्या. पण बाहेरच्या काही लोकांना कुणकूण लागायला लागली. त्यांतला एखादा कुणी आपला खूनबीन पाडायचा, अशा भीतीने पुण्याला आलो. वडगाव-शेरीला जागा घेऊन घर बांधलं आणि इथं राहू लागलो. मिसेस आंबेगावहून शनिवार–रविवार इकडेच येऊ लागली. ’

पंडितराव मला म्हणाले, ‘ पण इथं आल्यावर या हरामखोराचे धंदे चालूच राहिले. हो की नाही रे ? का मी खोटं सांगतोय ? ’

‘ खरं आहे साहेब. इथं वैद्यकी सुरू केली. आसपासची बायामाणसं औषधाला यायला लागली. एक ख्रिश्चन मुलगी तिच्या बहिणीसाठी औषधाला यायची. एकदा खूप पाऊस आला तेव्हा ती आमच्या घरीच अडकून पडली. मग आम्ही रात्रभर बोलत बसलो. त्या वेळी आमचा संबंध झाला. मग वरचेवर येऊ लागली. एकदा आमच्या मंडळींनी तिला हात धरून बाहेर काढली.

बापरे, साध्या ओळखीनंतर कुठल्याही स्त्रीशी याचा शरीरसंबंधच जुळतो ! संबंध हा शब्द आपण साध्या अर्थाने वापरतो. पण याचं सगळं वेगळंच !

पंडितराव म्हणाले, ‘ त्या सरदेशपांडेंकडच्या पूजा कधी सुरू झाल्या ? ’

मी विचारलं, ‘ हा सरदेशपांडे कोण ? ’

‘ ते पुण्यातल्या अमक्या शाळेत शिक्षक आहेत. ते माझ्याकडे नारायणगावला यायचे. त्यांचं एका मुलीबरोबर प्रेम जमलं होतं, पण त्यांचं लग्न होऊ शकलं नाही. मी काहीतरी करणी करावी अशी त्यांची इच्छा होती. नारायणगावला मीच वहिनींची आणि सरांची ओळख करून दिली. मग वहिनी परस्पर त्यांच्याकडे पुण्याला जाऊ लागल्या. त्यांचं नारायणपेठेत घर आहे. खाली म्हातारी आई, भाऊ राहतात. वर यांची खोली आहे. क्लासेस घेतात. मग या वरच्या खोलीत पूजा सुरू झाल्या. मी अधूनमधून जायचो. पण वहिनी पूजेचा दिवस ठरवायच्या. त्या दिवशी त्यांच्याबरो-बर जुन्नर-नारायणगावच्या नेहमीच्या स्त्रियाही यायच्या. मग हळूहळू पुण्याच्याही

स्त्रिया यायला लागल्या. पिंपरीची बँकेत काम करणारी एक पंजाबी मुलगी यायची. मुंबईच्या एक डॉक्टरीणबाई पण पूजा करून घ्यायला यायच्या.'

आतापर्यंत इतके आश्चर्याचे धक्क्यावर धक्के बसले होते की नंतरच्या अशा या गोष्टींचं आश्चर्यच वाटेनासं झालं होतं.

' त्यांच्या घरच्यांना काही संशय नाही आला ? '

' त्यांना वाटायचं कसल्यातरी पूजा आहेत, धार्मिक विधी आहेत. आंघोळीला पाणी आम्ही भांडीच्या भांडी वरती न्यायचो, पण त्यांना संशय आला नसावा. '

पंडितरावांनी विचारलं, ' काय रे, तुला जेलमध्ये मारहाण झाली ते खरं आहे का ? '

हात जोडून वाघमारे म्हणाले, ' होय साहेब, पोलिसांनी लॉकअपमध्ये काही त्रास दिला नाही, पण जेलमध्ये गेल्यावर आंदेकर गँगच्या लोकांनी मला फार मारलं. '

' का ? तुमची आधीची ओळख होती ? '

' नाही हो. त्यांनी पेपरमध्ये हे प्रकरण वाचलं होतं. ते माझी वाटच पहात होते. आल्यावर संडास-मुतारीच्या बाजूला नेलं. सगळीकडं मार तर बसलाच पण त्यांनी पोटात खूप मारलं. माझं आधीच पोटाचं ऑपरेशन झालं आहे. मला गेले आठ दिवस एक घास जेवता आलं नाही. मी जेलरच्या पाया पडलो. तेव्हा त्यांनी मला सेपरेटमधे ठेवलं. नाहीतर मी मेलोच असतो. '

' कसलं ऑपरेशन झालं होतं ? '

' किडनीचं. मला अजूनही तो त्रास होतो. लघवीच्या जागी रक्त येतं. स्त्रीशी शरीरसंबंध झाल्यावर मला शेवटी खूप वेदना होतात आणि रक्तस्राव होतो. डॉक्टरांनी सांगितलं आहे, तुम्ही शरीरसंबंध वर्ज्य करा. नाहीतर मराल ! '

' मग तरी का करता ? '

' मजबुरी आहे साहेब. रात्रभर तळमळत असतो. मिसेसना डॉक्टरांनी सांगितल्यामुळे त्या शरीरसंबंधाला तयार होत नाहीत. मग माझी तगमग पाहून पहाटे पहाटे त्यांना शेवटी दया येते. मग त्या परवानगी देतात, पण मग परत त्रास सुरू होतो. '

' हे सगळं प्रकरण बाहेर आल्यावर तुमच्या मिसेसची काय प्रतिक्रिया ? '

' त्या तुरुंगात भेटायला आल्या होत्या. एवढंच म्हणाल्या की तब्येतीला जपा. '

शनिवारवाड्याच्या उजव्या बाजूला रस्त्यापलीकडे कसबापेठ पोलीसचौकी आहे. व्हरांड्यात बाकड्यावर खाली लोक बसलेले दिसतात. कोपऱ्यातल्या टेबलावर चष्मा घातलेला सिनियर हेडकॉन्स्टेबल काहीतरी लिहीत असतो. आतल्या खोलीत एका

बाजूला ' रायटर 'चं टेबल. मागे दोनतीन कपाटं. भिंतीवर भलामोठा काळा फळा. त्यावर ऑईल पेंटने चार्ट आखलेला असतो. खून, दरोडे, चोरी, उचलेगिरी, विश्वासघात, ठकबाजी, घरफोडी, सरकारी मालाची चोरी...अशा दुनियेतल्या तमाम वाईट गोष्टींची यादी लिहिलेली व त्यापुढच्या रिकाम्या चौकटीत खडूने लिहिलेले आकडे, खाली बेरीज. दुसऱ्या कोपऱ्यात पी. एस. आय. टेमघऱ्यांचे टेबल. मागे खिळ्याला हँगरवर सफारी सूट अडकवलेला. खाली खुर्चीत तरुण, बळकट व बांधेसूद यष्टीचे, तरतरीत चेहऱ्याचे टेमघरे बसले होते. टेमघरे मुळशी भागातले. कॉन्स्टेबल म्हणून भरती होऊन गुन्हा अन्वेषणाच्या बाबतीत बक्षिसं मिळवीत, परीक्षा पास होत, पी. एस. आय. झालेले. बोलण्यात थोडं ग्रामीण वळण. वागणूक सरळसोट.

वाघमारे प्रकरण बाहेर कसं आलं, याचं कुतूहल होतं. कारण त्यांना बळी पडलेल्या कुणाही स्त्रीने किंवा नातेवाईकाने त्यांच्या विरुद्ध तक्रार केलेली नाही, असं कळलं होतं.

टेमघरे म्हणाले, ' हे प्रकरण पुढं आलेलंच नव्हतं. एकदम योगायोग बघा. त्या नवगिऱ्याला आम्ही धरला नसता ना तर हा वाघमारे बाबा अजून मजा करत बसला असता. '

' कोण नवगिरे ? '

' हा आहे जुन्नरचा एक पुढारी. घरचा व्यापार आहे, शेती आहे. अगदी तरुण पोरगं आहे ते. उडाणटप्पू. आमच्या कसब्यात राहणारी एक मुलगी आहे. सरोजिनी तांबे. लग्न झालेली आहे. तिचे सासरे इथं राहतात. नवरा आणि ती औंधला राहतात. ती नवरा–बायको इथं दुपारी तक्रार नोंदवायला आली. तिथून सगळी सुरुवात. '

' तक्रार कसली ? '

' ही मुलगी जुन्नरची. ती शकुंतला कासारबाई. तुम्ही बातमी वाचली असेलच ना, तीच कासारबाई यांच्या तिकडच्या घरोब्याची. कासारबाई हिच्या औंधच्या घरी आली. ही कसब्यात आली होती. मग कासारबाई कसब्यात आली. सरोजिनीला म्हणाली, माझ्या साडयांचं सिलेक्शन करायचंय, लक्ष्मी रोडला. तर चल. ही आली पण रिक्षा स्टेशनकडे जाऊ लागली. हिनं विचारलं. कासारबाई म्हणाली, स्टेशनवर एक पाव्हणे आहेत, त्यांना भेटून मग जाऊ. त्या लॉजवर गेल्या. तिला खोलीत बसायला सांगून कासारबाई निसटल्या. नवगिऱ्या तिथे होता. त्यानं ह्या मुलीचा विनयभंग करायचा प्रयत्न केला. पण ही मुलगी निसटली. आणि घरी जाऊन तिनं नवऱ्याला सांगितलं. तो म्हणाला, आपण पोलीस कम्प्लेंट करू. म्हणून ते आमच्याकडे आले. '

' मग पुढं ? '

‘ मी लॉजवर गेलो. मॅनेजर, रूमबॉय सगळ्यांचे जबाब घेतले. तोपर्यंत नवगिऱ्या, कासारबाई जुन्नरला गेले होते. मी त्यांना तिकडून पकडून आणायचं ठरवलं. आमच्या पोलीसस्टेशनला सांडभोरसाहेब पी. एस. आय. आहेत; ते त्या भागातलेच आहेत. ते म्हणाले, जपून काम करा, कारण ही पार्टी तिथली फार बडी आहे. मी म्हटलं, बडा असो नाहीतर कुणी असो. आम्ही रात्री मुद्दाम उशिरा गेलो. दिवसा गेलं की ते गडबड करू शकतात; वकिलामार्फत हरकत घेऊ शकतात. रात्री दोनला पोचलो. स्थानिक शिपाई बरोबर घेतला. नवगिऱ्याला झोपेतनं उठवलं आणि जीपमध्ये टाकलं. त्याचे वडील आड आले. आम्ही त्यांना सांगितलं, सरकारी कामात अडथळा करू नका. कासारबाईकडं गेलो. ती कांगावा करायला लागली. नवगिऱ्याला तर मी कारण सांगितलंच नव्हतं. पण कासारबाईला म्हटलं, काल अमक्या लॉजवर काय घडलं ? त्याबरोबर तिचा सूर एकदम खाली आला. आम्ही पहाटे तिथून निघालो. तर नवगिऱ्याच्या घरच्या गाडीनं आमचा पाठलाग केला. आम्ही कुठले आहोत, कुठं जातो ते पाहण्यासाठी. मोशीला त्यांनी आम्हांला गाठलं. पण आम्ही न थांबता सरळ आपल्या पोलीस स्टेशनला आलो. त्याला सोडा म्हणून सांगायला जुन्नरमधले मोठमोठे पुढारी, वकील आले होते; पण उपयोग झाला नाही. ’

‘ यात वाघमारेचा संबंध कुठं आला ? ’

‘ सांगतो ना. या दोघांची आम्ही तपासणी सुरू केल्यावर कासारबाईंना मी जरा लागेल अशा रीतीनं म्हटलं, तुम्ही एवढ्या सुशिक्षित, पुढारीपणा करणाऱ्या बाई, तुम्ही असले धंदे करावेत ? त्यावर ती बाई बोलून गेली, हे तर काहीच नाही. असे प्रकार जुन्नरमध्ये चालतात. वाघमारे बुवाच्या पूजांपुढं काहीच नाही. मग मी लगेच विचारलं, कोण हा वाघमारे बुवा ? मग एकातनं एक बाहेर पडलं. ’

‘ पण मग या नवगिरे प्रकरणाचा फक्त वाघमारे प्रकरण बाहेर पडण्यापुरताच संबंध होता की आणखी काही ? ’

‘ वाघमाऱ्याच्या पूजा चालत. कासारबाईचे या पुढाऱ्याशी पण शरीरसंबंध होते. ती या नवगिऱ्यापाशी बोलली, आज अमुकअमुक बाईची पूजा झाली. नवगिरे म्हणायचा, तो वाघमाऱ्या एकटा काय म्हणून चान्स घेणार ? मला पण चान्स पाहिजे, नाही तर हे सगळं मी बाहेर काढतो. या मुलीवर त्याचा डोळा होताच. तिची पूजा झाल्याचं कळल्यावर या कासारबाईला त्यानं दडपण आणलं, म्हणून तिनं या मुलीला फसवून इकडं आणलं. ’

लुटीमध्ये चोर-दरोडेखोर एकमेकांना वाटा मागतात तसंच हे सगळं वाटतं.

पुढं टेमघरे सांगू लागले, ‘ कासारबाईला वाघमारेचा इथला पत्ता माहीत नव्हता. त्याला गाठायचं कसं ? तिनं त्याच्या इथल्या एका मारवाडी भक्ताचं नाव सांगितलं. माझा थोरला भाऊ शिक्षक आहे. त्याला मारवाड्याकडं पाठवलं. त्यानं औषध-

पाण्याचा बहाणा करून बुवाचा पत्ता मिळवला. आम्ही तिघंचौघं तो पत्ता शोधत अपरात्री तिथे पोहोचलो. रात्रभर वॉचवर राहिलो आणि सकाळी त्याच्याकडे गेलो. त्याला पकडला. घराची झडती घेतली. आणि अटक करून इकडं आणलं. सरदेशपांडेही लगेच सापडला.'

मी म्हटलं, 'वाघमाऱ्यांनी काल मला असं सांगितलं की, कासारबाईमुळे मी यात अडकला गेलो. हे खरं आहे का?'

'छे छे. हा बुवा आधीपासून बनेलच आहे. हा नारायणगावला जायच्या आधी कळंबला होता. चांदोलीला होता. तिथे यानं हेच प्रताप केलेत. तिथल्या गावकऱ्यांनी त्याला मार देऊन हाकलून लावलं आहे.'

त्यांनी रायटर कांबळ्यांना सांगितलं, 'तो बुवाच्या घरनं जप्त करून आणलेला पत्रांचा गठ्ठा दे रे.' रायटरनी मागच्या कपाटातनं काढून दिला. त्यात चांदोलीहून कुणीतरी वाघमाऱ्यांना निनावी पत्रं पाठवली होती. बहुतेकांमधला मजकूर असा होता : महारड्या, तुझे उद्योग थांबले नाहीत तर तुझ्या गोट्या कापून त्या ××× बाईच्या तोंडात घालणार आहोत. तुझा खून करणार आहोत. इ.

टेमघऱ्यांना विचारलं, 'या बाई कोण?'

ते म्हणाले, 'त्यांचा पत्ता नाही लागला. त्या गावी मी त्यासाठी मुद्दाम गेलो होतो.'

पत्रांचा गठ्ठा मोठा होता. मी विचारलं, 'बघू का ही पत्रं?'

'जरूर बघा.'

एक अंतर्देशीय पत्र होतं. वाघमाऱ्यांना आलेलं एका मुलीचं प्रेमपत्र होतं. तिनं लिहिलं होतं : 'भाऊ, तुम्ही याल म्हणून किती मी वाट पहात येरझारा घालून थकून गेले. पण तुम्ही आला नाहीत. तुम्ही इतक्या स्त्रियांच्या गराड्यात होतात की मला तुमच्यापर्यंत पोचताच आलं नाही. तुमची मूर्ती माझ्या हृदयातून हलत नाही...' असं बरंचसं होतं. याच मुलीचं दुसरं पत्र होतं. त्यात तिनं उपरोधिक शैलीत लिहिलं होतं, 'मी आले की तुम्हाला राग येतो नाही का, म्हणूनच मी मुद्दाम येते. तुम्ही वरनं शांत दिसता, पण आतून तुम्हांला किती संताप आलेला आहे हे फक्त मलाच कळू शकतं. तसं झालं की मला खूप आनंद होतो. प्रतिष्ठेला तुम्ही फार जपता, नाही का? ती परविझ इराणी फार गोड आहे, नाही? सध्या तुमचं सगळं लक्ष तिच्यावर असतं. पण मी तुम्हाला मात्र सोडणार नाही.' असं बरंचसं लिहून शेवटी 'आपली कळसूत्री बाहुली' असं लिहून खाली स्वतःची सही केली होती.

समोर टेमघऱ्यांचे एक सहकारी पी. एस. आय. सांडभोर बसले होते. ते गोल चेहऱ्याचे, हसरे, तरुण होते. ते म्हणाले, 'या पत्रावरून त्या गावी गेलो होतो. तिथल्या व्यापाऱ्याची ही मुलगी. तिच्या पायावर थोडं कोड आहे, म्हणून लग्न

जमत नाही. आम्ही पोहोचताच तिनं आम्हाला माडीवर नेलं. म्हणाली, तुम्ही याल असं वाटलंच होतं पेपर वाचल्यापासून. मी बहिणीला म्हणाले सुद्धा की माझी काही पत्रं त्यांच्याकडे आहेत. त्याच्यावरनं आपल्याकडं चौकशी होणार. माझी अब्रू आता तुमच्याच हातात आहे. त्या माणसावर माझं प्रेम होतं. त्याचे माझे सर्व प्रकारचे संबंध झालेले होते. पण मला आता साक्ष द्यायला सांगू नका. मी तिला तसं आश्वासन दिलं.'

'ही परविझ इराणी कोण ?'

'तिचाही आम्ही पत्ता काढला. तिचा नवरा रेल्वेत आहे. तिनं चक्क सांगितलं की मी या वाघमाऱ्याकडे फक्त सेक्ससाठीच जात होते. एक बाई तर मुख्याध्यापिका होत्या. त्या म्हणाल्या, तुम्हाला तर सगळं कळून चुकलेलंच आहे. मला आता काही बोलायला लावू नका, आणि कशावर सहीही घेऊ नका.'

कागदपत्रांतनं एक जाडजूड पाकीट खाली पडलं, त्यातनं काही स्त्रियांचे फोटो बाहेर पडले. ते उचलून माझ्यासमोर ठेवत टेमघरे म्हणाले, 'हे फोटो त्यांच्या घरात सापडले. एकाही फोटोमागे नाव नाही. त्यामुळे कळायला मार्ग नाही.'

काही फोटो स्वतः वाघमाऱ्यांचे होते. उरलेले चाळीसपन्नास फोटो वेगवेगळ्या स्त्रियांचे होते. वेगवेगळ्या वयांच्या, जातींच्या स्त्रियांच्या फोटोंचं ते संमेलनच होतं. अगदी पॉश, बॉबकट केलेल्या मुलीचाही एक फोटो होता.

एक मोठं पाकीट काढून टेमघऱ्यांनी काळजीपूर्वक आतले कागद बाहेर काढले. धुरकटलेले, काही ठिकाणी अर्धवट काळे पडलेले, वहीचे सुटे किंवा फुलस्केप रेघी कागद होते. त्यावर काळी, जाड, मोठमोठी अक्षरं उमटलेली होती. टेमघऱ्यांनी या सगळ्यांच्या झेरॉक्सही केलेल्या होत्या. त्या हातात घेऊन वाचू लागलो :

'शांता, तुझे मागील आयुष्यातील सर्व पाप धुऊन टाक. तू योगिनी पूजा कर. तीच देवी तुला सर्व प्रकारचे सांसारिक, मानसिक सुख मिळवून देईल. परंतु लक्षात ठेव, ही पूजा अत्यंत गुप्त आहे. वाच्यता केल्यास तुला कुष्ठे होतील. तू गुरूकडून योगिनीचे रहस्य समजावून घे. त्याच्याचकडून पूजा करून घे', 'तुझ्या योनीत भैरवीचे स्थान आहे. तिची पूजा करून घे...' 'तुम्हाला भैरवी पूजा कराव्या लागतील तेव्हा तुमचे स्मरण परत येईल व करणी उतरेल. भैरवी पूजेमुळे आयुष्यातील सर्व संकटे निघून जातील. नाहीतर सर्वनाश अटळ आहे.' एका पुरुषाला उद्देशून एक चिठ्ठी त्यात होती. 'नामदेवा, तुझ्या मूर्खपणाने तू दुसऱ्याच्या तोंडावर गुरूचा अपमान केलास, त्याचे प्रायश्चित्त तू भोगतो आहेस. अरे, शेवटी गुरूच तुझा उद्धार करतील. त्यांचे चरण सोडू नकोस. त्यांची सेवा कर.' एका स्त्रीला उद्देशून लिहिलं होतं, 'मंदा, तुला मुलीचा गर्भ आहे. तुला मुलगा होईल. संतान गोपाळाचे व्रत कर. पुत्र होईल.'

वाघमाऱ्यांच्या घरातनं जप्त केलेल्या पुस्तकांचा एक मोठा गठ्ठाच तिथं होता. अस्सल इंद्रजाल, पिशाच्चांच्या परिसरात, मोहिनी विद्या, पंचाक्षरी विद्या, धनप्राप्तीसाठी प्रभावी दैवी साधना व तोडगे, महासिद्ध मंत्रतंत्र, दुर्मिळ अद्‌भुत वशीकरण मंत्र, शाबरी मंत्रांचा संग्रह, शुक्रसंजीवनी विद्या, प्लँचेट आणि परलोक जीवन, गौडबंगाली विद्या....अशी त्यांची शीर्षकं होती. मी विचार केला, अशी पुस्तकं छापतं तरी कोण, तर बहुतेकांचे प्रकाशक होते गजानन बुक डेपो, दादर. त्यांत दिलेले उपाय जबरदस्त होते. 'घुबडाचा उजवीकडचा पंख घेऊन पांढऱ्या सुतात ओवून डाव्या कानाला बांधावा.' पुरुषाला वश करण्यासाठी स्त्रियांना सांगितलेला मार्ग असा होता : 'स्वतःच्या योनीतील रक्त काढून उजव्या हातावर त्या रक्ताने आकृतीत दाखवलेले यंत्र काढावे. तो हात इच्छित पुरुषाला दाखवला की तो पुरुष वश होतो.' एका पुस्तकात 'विंचू तयार करणे' अशा शीर्षकाखाली लिहिलं होतं, 'गोबर व गाढवीचे मूत एकत्र करून खड्ड्यात पुरा. दहा दिवसांनी ती जागा उकरल्यास विंचू तयार झालेले दिसतील.' तसेच 'मांजर, कुत्रा, मेंढी यांचे दात त्यांच्याच रक्ताने भिजवून वेगवेगळ्या भांड्यांत टाकून ठेवा; म्हणजे ती भांडी एकमेकांवर आपटू लागतील.' बेडूक मारून त्यात बऱ्याच सांगितलेल्या वस्तू भरून तो पुरल्यास व पाच दिवसांनी उकरून काढल्यास तो बेडूक बोलू लागतो, असं एका पुस्तकात होतं. काहींची कृती, त्याला लागणारे पदार्थ हे मी कधी ऐकलेलंच नव्हतं. 'माहेश्वरी धूप, ईश्वरी, गाईचं शिंग, मांजराची विष्ठा, सापाची मेंग, गेळफळ, भूतकेशी, जटामाशी, वेळूची साल...वगैरे वगैरे समभाग घेऊन मेंढीच्या मुतात वाटून गोळी करून त्याचा धूप दिल्यास डाकिणी–पिशाच्च यांची बाधा दूर होते.'

हे वाचून माझं डोकंच गरगरू लागलं. एका देवऋष्याचं आतलं विश्व मला या प्रकरणाच्या निमित्ताने पहायला मिळत होतं. हे एरवी कसं बघायला मिळणार ?

पंडितरावांना एकदा म्हटलं, 'मला त्या कासारबाईंना भेटायचंय. कुठं असतील त्या ?'

ते म्हणाले, 'त्या आता जामिनावर सुटल्यात. पण चौकशी करून सांगतो.'

एका दुपारीच त्यांचा फोन आला. 'त्या बाईंना बोलावून घेतलंय. तूर्त इथं त्या मेव्हण्याकडे राहतात. त्या बाईची ट्रॅजेडीच झाली आहे. नवऱ्याने त्यांना घराबाहेर काढलं आहे. माहेरच्या माणसांनी येऊ नको म्हणून कळवलं आहे. या, दुपारी तीनला या.'

माझी बायको सुनंदा इथल्या महिला सेवाग्राम या संस्थेत सायकियाट्रिस्ट म्हणून जाते. तिला मी हे सांगताच ती म्हणाली,

‘ आमच्या संस्थेत सोय करता येईल त्यांची. विचारा त्यांना. ’

दुपारी तीनला फरासखान्यात गेलो. जुनी इमारत पाडून तीनमजली नवी इमारत आता उभी आहे. पहिल्या मजल्यावर पंडितरावांचं प्रशस्त ऑफिस आहे. पोलीस स्टेशनला सुरुवातीला दारावर प्रत्येक ठिकाणी अडवायला कॉन्स्टेबल असतो. पण आपली मोठ्या साहेबांची ओळख आहे असं त्यांना समजलं की पुढच्या वेळेपासून तेच कॉन्स्टेबल सलाम करून आपल्याला स्वतः दार उघडून देतात. आत गेल्यावर पंडितरावांच्या समोरच्या खुर्चीत दाराकडे पाठ करून एक बाई बसल्या होत्या. पंडितराव आणि त्या बाई यांच्याशी काटकोन करणाऱ्या मधल्या खुर्चीत जाऊन बसलो. पंडितराव त्या बाईंना म्हणाले,

‘ हे डॉक्टरसाहेब आहेत. यांना पहिल्यापासून माहिती हवी आहे. ’

त्या बाईंनी मान वर करून माझ्याकडे पाहिलं. परत मान खाली घातली. तीस–बत्तीस वयाच्या, सावळ्या रंगाच्या, दिसायला बऱ्यापैकी म्हणता येतील अशा बाई होत्या. साडी निळी, रंगीत नायलॉनची होती. केस बाजूला थोडे कुरळे होते. मागे चक्कर घातलं होतं. टेमघरे म्हणाले होते, ‘ ही बाई इथं आल्यापासून एका दिवसात दहा वर्षांनी तरी म्हातारी दिसायला लागली. ’

त्या म्हणाल्या, ‘ साहेब, मला दुसरं काही नको. मला माझ्या नवऱ्याला घरात घ्यायला लावा. इतकी वर्षं मी संसाराचा गाडा ओढला. तहानभूक बाजूला ठेवली यांच्या सगळ्या खस्ता काढल्या. आज यांना मला घराबाहेर काढण्याचा काय अधिकार आहे ? ’ बघता बघता त्यांचे आधीच लाल झालेले डोळे पाण्याने डबडबू लागले.

मी म्हटलं, ‘ मला सुरुवातीपासून हे प्रकरण समजावून घ्यायचं आहे... ’

‘ प्रकरण कसलं घेऊन बसलात. मला पोलिसांनी इकडं धरून आणलं तर घरचं कोणी भेटायला आलं नाही. तुरुंगातनं सुटल्यावर मी पहिल्यांदा मिळेल ती गाडी पकडून रात्री दहाला घरी पोहोचले. काय सांगू साहेब, मला दारही उघडलं नाही. मी हाका मारल्या. माझ्या यजमानांनी ओ दिली. ते दार उघडायला बाहेर येतही होते. पण माझ्या दिराने त्यांना मना केलं. ’

‘ कोण दीर ? कुठं असतात हे ? ’

‘ तिथं खरा नसतो तो. तो नाशिकला असतो. पण येऊन राह्यलाय. दारूड्या आहे. सगळ्या गल्लीला त्रास देतो. पण गुंड म्हणून कुणी नादी लागत नाही. साहेब, रात्रभर मी पायरीवर बसून राह्यले. विनवण्या करीत बसले. पण मला कुणी पाणी पण विचारलं नाही. जुन्नरमध्ये इतकी वर्षं राहिले. समाजासाठी इतकं काम केलं. पण कुणी मला पाणी दिलं नाही की आसरा दिला नाही. काय वाटलं असेल मला ? शेवटी पहाटे सहाला पुण्याला येणारी पहिली गाडी धरली आणि परत आले. ’ परत डोळ्याला

पाण्याचा बहाणा करून बुवाचा पत्ता मिळवला. आम्ही तिघंचौघं तो पत्ता शोधत अपरात्री तिथे पोहोचलो. रात्रभर वॉचवर राहिलो आणि सकाळी त्याच्याकडे गेलो. त्याला पकडला. घराची झडती घेतली. आणि अटक करून इकडं आणलं. सरदेशपांडेही लगेच सापडला.'

मी म्हटलं, 'वाघमाऱ्यांनी काल मला असं सांगितलं की, कासारबाईंमुळे मी यात अडकला गेलो. हे खरं आहे का?'

'छे छे. हा बुवा आधीपासून बनेलच आहे. हा नारायणगावला जायच्या आधी कळंबला होता. चांदोलीला होता. तिथे यानं हेच प्रताप केलेत. तिथल्या गावकऱ्यांनी त्याला मार देऊन हाकलून लावलं आहे.'

त्यांनी रायटर कांबळ्यांना सांगितलं, 'तो बुवाच्या घरनं जप्त करून आणलेला पत्रांचा गठ्ठा दे रे.' रायटरनी मागच्या कपाटातनं काढून दिला. त्यात चांदोलीहून कुणीतरी वाघमाऱ्यांना निनावी पत्रं पाठवली होती. बहुतेकांमधला मजकूर असा होता : महारड्या, तुझे उद्योग थांबले नाहीत तर तुझ्या गोट्या कापून त्या ××× बाईच्या तोंडात घालणार आहोत. तुझा खून करणार आहोत. इ.

टेमघऱ्यांना विचारलं, 'या बाई कोण?'

ते म्हणाले, 'त्यांचा पत्ता नाही लागला. त्या गावी मी त्यासाठी मुद्दाम गेलो होतो.'

पत्रांचा गठ्ठा मोठा होता. मी विचारलं, 'बघू का ही पत्रं?'

'जरूर बघा.'

एक अंतर्देशीय पत्र होतं. वाघमाऱ्यांना आलेलं एका मुलीचं प्रेमपत्र होतं. तिनं लिहिलं होतं : 'भाऊ, तुम्ही याल म्हणून किती मी वाट पहात येरझारा घालून थकून गेले. पण तुम्ही आला नाहीत. तुम्ही इतक्या स्त्रियांच्या गराड्यात होतात की मला तुमच्यापर्यंत पोचताच आलं नाही. तुमची मूर्ती माझ्या हृदयातून हलत नाही...' असं बरंचसं होतं. याच मुलीचं दुसरं पत्र होतं. त्यात तिनं उपरोधिक शैलीत लिहिलं होतं, 'मी आले की तुम्हाला राग येतो नाही का, म्हणूनच मी मुद्दाम येते. तुम्ही वरनं शांत दिसता, पण आतून तुम्हांला किती संताप आलेला आहे हे फक्त मलाच कळू शकतं. तसं झालं की मला खूप आनंद होतो. प्रतिष्ठेला तुम्ही फार जपता, नाही का? ती परविझ इराणी फार गोड आहे, नाही? सध्या तुमचं सगळं लक्ष तिच्यावर असतं. पण मी तुम्हाला मात्र सोडणार नाही.' असं बरंचसं लिहून शेवटी 'आपली कळसूत्री बाहुली' असं लिहून खाली स्वतःची सही केली होती.

समोर टेमघऱ्यांचे एक सहकारी पी. एस. आय. सांडभोर बसले होते. ते गोल चेहऱ्याचे, हसरे, तरुण होते. ते म्हणाले, 'या पत्रावरून त्या गावी गेलो होतो. तिथल्या व्यापाऱ्याची ही मुलगी. तिच्या पायावर थोडं कोड आहे, म्हणून लग्न

जमत नाही. आम्ही पोहोचताच तिनं आम्हाला माडीवर नेलं. म्हणाली, तुम्ही याल असं वाटलंच होतं पेपर वाचल्यापासून. मी बहिणीला म्हणाले सुद्धा की माझी काही पत्रं त्यांच्याकडे आहेत. त्याच्यावरनं आपल्याकडं चौकशी होणार. माझी अब्रू आता तुमच्याच हातात आहे. त्या माणसावर माझं प्रेम होतं. त्याचे माझे सर्व प्रकारचे संबंध झालेले होते. पण मला आता साक्ष द्यायला सांगू नका. मी तिला तसं आश्वासन दिलं. '

' ही परविझ इराणी कोण ? '

' तिचाही आम्ही पत्ता काढला. तिचा नवरा रेल्वेत आहे. तिनं चक्क सांगितलं की मी या वाघमाऱ्याकडे फक्त सेक्ससाठीच जात होते. एक बाई तर मुख्याध्यापिका होत्या. त्या म्हणाल्या, तुम्हाला तर सगळं कळून चुकलेलंच आहे. मला आता काही बोलायला लावू नका, आणि कशावर सहीही घेऊ नका. '

कागदपत्रांतनं एक जाडजूड पाकीट खाली पडलं, त्यातनं काही स्त्रियांचे फोटो बाहेर पडले. ते उचलून माझ्यासमोर ठेवत टेमघरे म्हणाले, ' हे फोटो त्यांच्या घरात सापडले. एकाही फोटोमागे नाव नाही. त्यामुळे कळायला मार्ग नाही. '

काही फोटो स्वतः वाघमाऱ्यांचे होते. उरलेले चाळीसपन्नास फोटो वेगवेगळ्या स्त्रियांचे होते. वेगवेगळ्या वयांच्या, जातींच्या स्त्रियांच्या फोटोंचं ते संमेलनच होतं. अगदी पॉश, बॉबकट केलेल्या मुलीचाही एक फोटो होता.

एक मोठं पाकीट काढून टेमघऱ्यांनी काळजीपूर्वक आतले कागद बाहेर काढले. धुरकटलेले, काहीं ठिकाणी अर्धवट काळे पडलेले, वहीचे सुटे किंवा फुलस्केप रेघी कागद होते. त्यावर काळी, जाड, मोठमोठी अक्षरं उमटलेली होती. टेमघऱ्यांनी या सगळ्यांच्या झेरॉक्सही केलेल्या होत्या. त्या हातात घेऊन वाचू लागलो :

' शांता, तुझे मागील आयुष्यातील सर्व पाप धुऊन टाक. तू योगिनी पूजा कर. तीच देवी तुला सर्व प्रकारचे सांसारिक, मानसिक सुख मिळवून देईल. परंतु लक्षात ठेव, ही पूजा अत्यंत गुप्त आहे. वाच्यता केल्यास तुला कुष्ठे होतील. तू गुरूकडून योगिनीचे रहस्य समजावून घे. त्याच्याचकडून पूजा करून घे ', ' तुझ्या योनीत भैरवीचे स्थान आहे. तिची पूजा करून घे... ' ' तुम्हाला भैरवी पूजा कराव्या लागतील तेव्हा तुमचे स्मरण परत येईल व करणी उतरेल. भैरवी पूजेमुळे आयुष्यातील सर्व संकटे निघून जातील. नाहीतर सर्वनाश अटळ आहे. ' एका पुरुषाला उद्देशून एक चिठ्ठी त्यात होती. ' नामदेवा, तुझ्या मूर्खपणाने तू दुसऱ्याच्या तोंडावर गुरूचा अपमान केलास, त्याचे प्रायश्चित्त तू भोगतो आहेस. अरे, शेवटी गुरूच तुझा उद्धार करतील. त्यांचे चरण सोडू नकोस. त्यांची सेवा कर. ' एका स्त्रीला उद्देशून लिहिलं होतं, ' मंदा, तुला मुलीचा गर्भ आहे. तुला मुलगा होईल. संतान गोपाळाचे व्रत कर. पुत्र होईल. '

वाघमाऱ्यांच्या घरातनं जप्त केलेल्या पुस्तकांचा एक मोठा गठ्ठाच तिथं होता. अस्सल इंद्रजाल, पिशाचांच्या परिसरात, मोहिनी विद्या, पंचाक्षरी विद्या, धनप्राप्तीसाठी प्रभावी दैवी साधना व तोडगे, महासिद्ध मंत्रतंत्र, दुर्मिळ अद्‌भुत वशीकरण मंत्र, शाबरी मंत्रांचा संग्रह, शुक्रसंजीवनी विद्या, प्लँचेट आणि परलोक जीवन, गौडबंगाली विद्या....अशी त्यांची शीर्षकं होती. मी विचार केला, अशी पुस्तकं छापतं तरी कोण, तर बहुतेकांचे प्रकाशक होते गजानन बुक डेपो, दादर. त्यांत दिलेले उपाय जबरदस्त होते. 'घुबडाचा उजवीकडचा पंख घेऊन पांढऱ्या सुतात ओवून डाव्या कानाला बांधावा.' पुरुषाला वश करण्यासाठी स्त्रियांना सांगितलेला मार्ग असा होता : 'स्वतःच्या योनीतील रक्त काढून उजव्या हातावर त्या रक्ताने आकृतीत दाखवलेले यंत्र काढावे. तो हात इच्छित पुरुषाला दाखवला की तो पुरुष वश होतो.' एका पुस्तकात 'विंचू तयार करणे' अशा शीर्षकाखाली लिहिलं होतं, 'गोबर व गाढवीचे मूत एकत्र करून खड्ड्यात पुरा. दहा दिवसांनी ती जागा उकरल्यास विंचू तयार झालेले दिसतील.' तसेच 'मांजर, कुत्रा, मेंढी यांचे दात त्यांच्याच रक्ताने भिजवून वेगवेगळ्या भांड्यांत टाकून ठेवा; म्हणजे ती भांडी एकमेकांवर आपटू लागतील.' बेडूक मारून त्यात बऱ्याच सांगितलेल्या वस्तू भरून तो पुरल्यास व पाच दिवसांनी उकरून काढल्यास तो बेडूक बोलू लागतो, असं एका पुस्तकात होतं. काहींची कृती, त्याला लागणारे पदार्थ हे मी कधी ऐकलेलंच नव्हतं. 'माहेश्वरी धूप, ईश्वरी, गाईचं शिंग, मांजराची विष्ठा, सापाची मेंग, गेळफळ, भूतकेशी, जटामाशी, वेळूची साल...वगैरे वगैरे समभाग घेऊन मेंढीच्या मुतात वाटून गोळी करून त्याचा धूप दिल्यास डाकिणी–पिशाच्च यांची बाधा दूर होते.'

हे वाचून माझं डोकंच गरगरू लागलं. एका देवऋष्याचं आतलं विश्व मला या प्रकरणाच्या निमित्ताने पहायला मिळत होतं. हे एरवी कसं बघायला मिळणार?

पंडितरावांना एकदा म्हटलं, 'मला त्या कासारबाईंना भेटायचंय. कुठं असतील त्या?'

ते म्हणाले, 'त्या आता जामिनावर सुटल्यात. पण चौकशी करून सांगतो.'

एका दुपारीच त्यांचा फोन आला. 'त्या बाईंना बोलावून घेतलंय. तूर्त इथं त्या मेव्हण्याकडे राहतात. त्या बाईची ट्रॅजेडीच झाली आहे. नवऱ्याने त्यांना घराबाहेर काढलं आहे. माहेरच्या माणसांनी येऊ नको म्हणून कळवलं आहे. या, दुपारी तीनला या.'

माझी बायको सुनंदा इथल्या महिला सेवाग्राम या संस्थेत सायकियाट्रिस्ट म्हणून जाते. तिला मी हे सांगताच ती म्हणाली,

‘ आमच्या संस्थेत सोय करता येईल त्यांची. विचारा त्यांना. ’

दुपारी तीनला फरासखान्यात गेलो. जुनी इमारत पाडून तीनमजली नवी इमारत आता उभी आहे. पहिल्या मजल्यावर पंडितरावांचं प्रशस्त ऑफिस आहे. पोलीस स्टेशनला सुरुवातीला दारावर प्रत्येक ठिकाणी अडवायला कॉन्स्टेबल असतो. पण आपली मोठ्या साहेबांची ओळख आहे असं त्यांना समजलं की पुढच्या वेळेपासून तेच कॉन्स्टेबल सलाम करून आपल्याला स्वतः दार उघडून देतात. आत गेल्यावर पंडितरावांच्या समोरच्या खुर्चीत दाराकडे पाठ करून एक बाई बसल्या होत्या. पंडितराव आणि त्या बाई यांच्याशी काटकोन करणाऱ्या मधल्या खुर्चीत जाऊन बसलो. पंडितराव त्या बाईंना म्हणाले,

‘ हे डॉक्टरसाहेब आहेत. यांना पहिल्यापासून माहिती हवी आहे. ’

त्या बाईंनी मान वर करून माझ्याकडे पाहिलं. परत मान खाली घातली. तीस–बत्तीस वयाच्या, सावळ्या रंगाच्या, दिसायला बऱ्यापैकी म्हणता येतील अशा बाई होत्या. साडी निळी, रंगीत नायलॉनची होती. केस बाजूला थोडे कुरळे होते. मागे चक्कर घातलं होतं. टेमघरे म्हणाले होते, ‘ ही बाई इथं आल्यापासून एका दिवसात दहा वर्षांनी तरी म्हातारी दिसायला लागली. ’

त्या म्हणाल्या, ‘ साहेब, मला दुसरं काही नको. मला माझ्या नवऱ्याला घरात घ्यायला लावा. इतकी वर्षं मी संसाराचा गाडा ओढला. तहानभूक बाजूला ठेवली यांच्या सगळ्या खस्ता काढल्या. आज यांना मला घराबाहेर काढण्याचा काय अधिकार आहे ? ’ बघता बघता त्यांचे आधीच लाल झालेले डोळे पाण्याने डबडबू लागले.

मी म्हटलं, ‘ मला सुरुवातीपासून हे प्रकरण समजावून घ्यायचं आहे... ’

‘ प्रकरण कसलं घेऊन बसलात. मला पोलिसांनी इकडं धरून आणलं तर घरचं कोणी भेटायला आलं नाही. तुरुंगातनं सुटल्यावर मी पहिल्यांदा मिळेल ती गाडी पकडून रात्री दहाला घरी पोहोचले. काय सांगू साहेब, मला दारही उघडलं नाही. मी हाका मारल्या. माझ्या यजमानांनी ओ दिली. ते दार उघडायला बाहेर येतही होते. पण माझ्या दिराने त्यांना मना केलं. ’

‘ कोण दीर ? कुठं असतात हे ? ’

‘ तिथं खरा नसतो तो. तो नाशिकला असतो. पण येऊन राह्यलाय. दारूड्या आहे. सगळ्या गल्लीला त्रास देतो. पण गुंड म्हणून कुणी नादी लागत नाही. साहेब, रात्रभर मी पायरीवर बसून राह्यले. विनवण्या करीत बसले. पण मला कुणी पाणी पण विचारलं नाही. जुन्नरमध्ये इतकी वर्षं राहिले. समाजासाठी इतकं काम केलं. पण कुणी मला पाणी दिलं नाही की आसरा दिला नाही. काय वाटलं असेल मला ? शेवटी पहाटे सहाला पुण्याला येणारी पहिली गाडी धरली आणि परत आले. ’ परत डोळ्याला

पदर लावून रडू लागल्या.

'तुमचं माहेर कुठं आहे?'

'जळगावला. तिकडनं पण भावाचा निरोप आलाय, इकडं येऊ नको.'

'मग आता कुठं राहता?'

'इथं मेव्हण्यांकडे काही दिवस आहे. पण ते किती दिवस ठेवणार?'

'तुम्ही संस्थेत राहणार का? सेवाग्राम म्हणून इथं एक संस्था आहे. तिथं तुमची विनामूल्य सोय होईल. काही दिवस रहा. मग वातावरण निवळेल.'

'मला संस्था नको, मला घरी पोहोचवा. एकदा संस्थेत ठेवलं की मी कायमची तिथंच राहीन. मला कोणी न्यायला येणार नाही. मला माझं घर पाहिजे. माझी दोन लहान मुलं तिथं आहेत. मुलगी नववीत, मुलगा सातवीत. किती लहान आहेत. घरात दुसरं बाईमाणूस नाही. कोण स्वयंपाक करत असेल? कोण त्यांना शाळेत पाठवत असेल? त्यांची परीक्षा जवळ आली आहे. साहेब, सांगायला पण लाज वाटते. जुन्नरहून ओळखीच्या एक बाई आल्या. त्यांनी सांगितलं की मुलीची पाळी सुरू झालीय. पहिलीच वेळ. तिला कोण समजावून देणार? कोण सांभाळून घेईल तिला? मला तर रात्रभर झोप नाही.'

पंडितराव म्हणाले, 'पण बाई, तुमचा नवरा जर घरात घ्यायला तयार नसेल तर त्याला आम्ही कसं फोर्स करू शकणार?'

'तुम्ही त्या दिराला अटकेत टाका, म्हणजे माझा नवरा बरोबर मला घरात घेईल.'

'पण त्याने गुन्हा काहीच केला नाही. नवऱ्याने त्यांचं म्हणणं ऐकलं एवढंच.'

मी म्हटलं, 'तुमच्या गावातल्या लोकांना मध्यस्थी घाला. नाहीतर तुमच्या जातीतल्या प्रतिष्ठित लोकांशी बोला.'

'कोणी कोणी माझ्या बाजूने उभं राहात नाही. महारोग्याचं जिणं बरं असं माझं झालं आहे.'

'मग संस्थेत का राहात नाही?'

'तिथं कायमचंच राहावं लागेल. आता घरात नाही घेतलं तर कायमचं घर बंद होईल.'

सगळं स्टेलमेट झालं होतं. त्या बाबतीत या बाई आपणहून म्हणाल्या तरच संस्थेतल्या प्रवेशाबाबत आपण प्रयत्न करायचा असं मनात ठरवून टाकलं.

'बरं, या प्रकरणाची सुरुवात कशी झाली ते तरी सांगा.'

'काय सांगायचं साहेब? माझा काही संबंध नाही या सगळ्याशी. मी ही पूजा फक्त पाहिली आहे. जेव्हा प्रकार लक्षात आला तेव्हा मी दूर झाले. हा माणूस नवीन नवीन पोरींना फसवायचा. माझ्याकडे पाठवायचा. पूजा कशी असते हे त्या बाईंना

विचारा म्हणायचा. मी काय सांगणार ? मी त्यांना सांगायचे, तुम्ही देवीचं स्तोत्र म्हणा. भयामुळे मी काही बोलू शकले नाही. '

'का बरं ? तुम्ही तिथल्या काँग्रेस कार्यकर्त्या आहात. तुम्ही कुणालाही हे प्रकार इथं चालतात असं सांगू शकला असतात. तेव्हाच हे प्रकरण बाहेर आलं असतं. '

'नाही हो. कोणी माझ्या बाजूने उभं राहिलं नसतं. छोट्या गावातलं वातावरण कसं असतं ते तुम्हाला माहीतच आहे. '

'निनावी पत्रं पाठवू शकला असतात पोलिसांना किंवा पेपरला. '

'अक्षरावरनं सुद्धा त्यानं ओळखून काढलं असतं मला. पण ठीक आहे. माझ्यामुळे हे प्रकरण बाहेर आलं. इथून पुढं तरी खूप मुलींची विटंबना थांबली. मला त्यात समाधान आहे. '

त्या बाई गेल्यावर पंडितराव म्हणाले, 'ह्या बाईंनी आम्हाला सगळं डीटेलमध्ये सांगितलं होतं. त्यांचा जबाब आम्ही लिहून पण घेतला आहे. तुमच्यापुढं मात्र सगळ्यात आपण नव्हतोच असा बहाणा करताहेत. तो बुवा पहिल्यांदा नवीन आलेल्या बाईचा प्रश्न ऐकून घ्यायचा. पुढच्या वेळी बोलवायचा. मधल्या काळात कागदावर कांद्याच्या रसाने लिहून, वाळवून ठेवायचा. पुढच्या वेळी तो जाळावर धरून उत्तर काढायचा. बाई विचारायची, कशी असते हो ही पूजा ? मग हा म्हणायचा, जा, कासारबाईंना विचारा. त्यांच्याकडे गेल्यावर त्या वेड पांघरायच्या. असं दोनतीनदा झालं की मग या बाई गुप्त ठेवायची शपथ घालून सांगायच्या. थोडक्यात काय, खुंटी हलवून पक्की करायची. पण हे नेहमीचं आहे. आरोपी आमच्या ताब्यात असतो त्या पहिल्या एकदोन दिवसांत सगळं सांगतो. त्याला मॅजिस्ट्रेट कस्टडी मिळाली की मग वकील भेटतात. मग त्यांची भाषा बदलायला लागते. कोर्टात गेल्यावर तर काय, आमच्यासमोरनं ऐटीत जातात. साधी ओळखही देत नाहीत. '

आम्ही हसलो. मी म्हटलं, 'पण या बाईंची खरोखरच पंचाईत झालेली दिसतेय.'

'त्यांच्या मेव्हण्याला बोलावून घेऊन मी समजावून सांगितलंय, चूक कोणाच्या हातून होत नाही ? उद्या इन्कमटॅक्सच्या लफड्यात तुमच्यावर सुद्धा हा प्रसंग येऊ शकतो. तेव्हा सेशनमध्ये केस चालेपर्यंत तुमच्याकडे ठेवून घ्या. तो कबूल झाला आहे. '

एकदा तुळशीबागेपासनं चालली होतो. समोर एक ओळखीची मुलगी दिसली. गोरीपान, चुणचुणीत, विसेक वर्षांची, नुकतंच लग्न झालेली तरुण मुलगी. मला

एकदम आठवलं, वाघमाऱ्यांनी आपण कुणाकुणाच्या पूजा केल्या हे सांगताना या मुलीचंही नाव घेतलं होतं. मला अशा एखाद्या बळी पडलेल्या स्त्रीला गाठायचं होतंच. मी थांबलो. ही इतकी छान, निरागस मूडमध्ये आहे, कशाला डिस्टर्ब करा, असाही विचार येऊन गेला. मी थांबलो. ती हसली. इकडची-तिकडची दोन-तीन वाक्ये बोलल्यावर मी तिला ते विचारताच तिचा चेहरा आणखीनच पांढरा पडला आणि नंतर बघता बघता लालबुंदही झाला. त्या अनोळखी गर्दीतही तिनं इकडंतिकडं बघून घेतलं. मी तिला समजावलं.

'मला तो प्रकार समजून घ्यायचा आहे. अशा माणसांना शिक्षा व्हायला हवी की नाही? तुझं नाव मी माझ्यापाशीच ठेवीन.'

त्यावर ती त्या गर्दीत उभ्याउभ्याच बोलू लागली.

'माझ्या आईचा आणि वहिनींचा (कासारबाईचा) घरोबा. मैत्रिणी म्हणा. त्यांच्यामुळे या माणसाची (भाऊ वाघमारेची) ओळख झाली. वडलांचं जुन्नरमध्ये दुकान आहे. ते फारसं चालत नव्हतं. आईच्या मनात या माणसानं भरवून दिलं की तुमच्या वाड्यात आंब्याच्या झाडाखाली गुप्तधन आहे. आई त्याच्याकडे पूजेला जाऊ लागली. वडलांचा या गुप्तधनावर अजिबात विश्वास नव्हता. पण आई या बाबतीत त्यांचं ऐकत नव्हती. मी त्या वेळेस शाळेत जात होते. नववीत असेन. आईने सहज त्या माणसाला विचारलं, माझी मुलगी दहावी पास होईल का? त्यावर त्यानं प्लँचेट केलं. आईला खूप घाबरवून टाकलं. हिच्या चुलतीने हिच्यावर करणी केली आहे, हिला भैरवी पूजा केल्याच पाहिजेत, नाहीतर तुमच्या कुटुंबावर संकटं येणार आहेत. म्हणजे दहावी राहिलीच बाजूला, हे तिसरंच निघालं. मला नारायणगावला पूजेला नेलं. आईने एकटीला त्याच्या खोलीत बसायला सांगितलं. आणि तो जे सांगेल ते करायला सांगितलं. मग ह्यानं दार लावून खोलीत ते गलिच्छ कर्म केलं. मला काही कळत नव्हतं. अहो, नववीत होते मी. ते झाल्यावर इतकी थकून गेले होते की मला घेरीच येत होती. मला शारीरिक आणि मानसिक धक्काच बसला. परत जाताना नारायणगावच्या स्टँडवर मी आईला आणि शकूवहिनीना सांगितलं की मला झालं ते अजिबात आवडलेलं नाही. त्याच्यावर शकूवहिनी म्हणाल्या, आपल्या चांगल्यासाठी हे सोसावंच लागतं.'

'पण ही पूजा अशी एकेकटीबरोबर तो करायचा?'

'नाही. पुढच्या वेळेपासून सगळ्यांच्या बरोबर मी पूजेला जायला लागले. आईच मला आग्रह करून न्यायची.'

'आईला स्वतःच्या मुलीबाबत हे करताना काही कसं वाटलं नाही?'

'अहो, हे काहीच नाही. तिथं येणारी काही कुटुंबंच्या कुटुंबं होती. आई आणि तिच्या चार मुली यायच्या. आईच्या देखत मुलींबरोबर याचे संबंध. मुलींच्या देखत

आईबरोबर संबंध. आई वय वर्षे साठ. कशाला धरबंधच नव्हता राहिला तिथं. मी त्याला नंतर कधी दाद दिली नाही म्हणून माझ्यावर तो फार खार खाऊन असायचा.'

वाघमारे लॉकअपमध्ये म्हणाले होते की वहिनीच त्यांची भूक भागवण्यासाठी हे प्रकार त्याला करायला लावायच्या. पूजा अर्धवट सोडून स्वतःबरोबर संबंध करून घ्यायच्या यात कितपत तथ्य आहे, हे समजून घेण्यासाठी या मुलीला त्याबद्दल विचारलं. ती म्हणाली, 'माझ्यासमोर असं कधीही झालं नाही. जिची पूजा तिच्याबरोबर शेवटपर्यंत तो संबंध करायचा.'

'वहिनींचा यामधे एकूण कितपत सहभाग असायचा?'

'त्या उत्साहाने बायांना जमवायच्या, तिकडे घेऊन जायच्या.'

'तुझ्या नवऱ्याला याची कितपत कल्पना आहे?'

'आम्हाला तो प्रकार ऐकून माहीत आहे, एवढीच त्यांची कल्पना आहे. पुढचं काही माहीत नाही. पण माझं नाव तुमच्यापाशी त्यानं घेतलं का?'

'हो.'

तिचा चेहरा चांगलाच पडला.

'सध्या तो अटकेत आहे?'

'हो.'

'काही करून त्याला सोडू नका. तो नुसता हे बोलला तरी माझा संसार उद्ध्वस्त होईल. मी आता डायझोनची बाटली घरी आणून ठेवलीय. तो माणूस दारात उभा राहिलाच तर घेण्यासाठी.'

नेहमीसारखी हसून (अगदी खोटं खोटं का होईना) ती निरोप घेऊ शकली नाही. तशीच मंडईकडे जाणाऱ्या गर्दीत मिसळून गेली. एका मुलीच्या आयुष्यातल्या अगदी नाजूक, दुखऱ्या भागाबद्दल किती चव्हाट्यावर तिच्याशी मी बोलतो होतो!

वत्सलाबाई गायकवाड नावाच्या कम्युनिस्ट कार्यकर्त्या आहेत. त्या या सुमारास भेटल्या. या विषयावर बोलणं निघालं तेव्हा त्या म्हणाल्या,

'माझ्या ओळखीची एक शिक्षिका आहे. भवानी पेठेत राहते. ती या बुवाच्या नादी लागली होती. पेपरमध्ये हे प्रकरण यायला लागलं, तेव्हा आपलं नाव तर येणार नाही ना या कल्पनेने घाबरून जाऊन माझ्याकडे आली होती. मी तिला म्हणाले, तू पोलीस कंप्लेंट दे. पण त्याला ती तयार नाही. पण तुम्हाला तिच्याबरोबर बोलायचं असलं तर गाठ घालून देते.'

तसं ठरलं.

त्या बाई फारच घाबरट निघाल्या. एकदोनदा ठरवून आल्याच नाहीत. मग शेवटी भेटल्या. भेटायचं ठिकाण भलतंच ऐतिहासिक होतं. शनिवारवाड्याच्या पायऱ्यांवर. काळ्या, शिडशिडीत, उंच नाकेल्या, पस्तिशीच्या शिक्षिका होत्या. चेहऱ्यावर रया नव्हती. गळ्यात बारीक चेन होती अविवाहित असाव्यात.

बाईंनी त्यांची माहिती सांगितली. त्या चौघी बहिणी आणि एक भाऊ. वडील लहानपणीच गेलेले. तिघींची लग्नं यांनीच लावून दिलेली आहेत. त्यामुळे स्वतःच्या लग्नाचे बघायचे राहूनच गेले. भावाविषयी त्यांना फार काळजी वाटायची. त्याला धोका होऊ नये यासाठी देवदेव करायच्या. या सगळ्यात असताना वाघमाऱ्यांची माहिती कळली. त्या नारायणगावला जाऊ लागल्या. एकदा वाघमाऱ्यांनी त्यांना सांगितलं की तुमच्या भावाला धोका आहे. आणि ते खरंच निघालं. भाऊ प्रवासावरून आल्यावर सांगत होता, त्याची बैलगाडी उलटली. त्यानं हात टेकला म्हणून तो वाचला. तेव्हापासून यांची वाघमाऱ्यांवर भक्तीच बसली. मग यांच्या पूजा सुरू झाल्या.

बाई म्हणाल्या, 'त्यांचं माझ्यावर फार लक्ष असायचं. दुसरं कुणी माझ्याशी बोललेलं त्यांना खपत नसे. त्यांच्या बायकोला मी घरी आलेलं चालत नव्हतं. वडगाव शेरीतल्या घरी मला त्यांच्या बायकोने एकदा हात धरून बाहेर काढलंय. तशी ती अनेक जणींना बाहेर काढायची. मी त्यांच्याबरोबर जाऊन फोटो पण काढून घेतलाय. त्यांनी माझ्यासाठी दोन मंगळसूत्रं तयार करून घेतली होती. कासारबाई पण माझा फार राग राग करायच्या. एकदा गुलटेकडीला भाऊंच्या (वाघमाऱ्यांच्या) एका ओळखीच्या बाईकडं आम्ही तिघं रिक्षानं चाललो होतो. मी सहज भाऊंच्या मांडीवर हात ठेवला. तशी कासारबाई माझ्याशी भांडायला लागली. तुला रांडे नीट नाही बसता येत ?– असं काय काय म्हणायला लागली. मी पण बोलायला लागले. तसे भाऊ म्हणाले, तुम्ही भांडणार असाल तर आपण रिक्षा फिरवू. तिकडं जायचंच कशाला ? मग ती बाई बोलायची थांबली.'

'तुम्ही लग्न करायचं ठरवलं होतंत ?'

बाई म्हणाल्या, 'ठरवलं होतं, पण आता सगळं संपलं. आता हे प्रकरण पेपरमध्ये आल्यापासून माझ्या जिवात जीव नाही. हे पूर्वी नेहमी घरी यायचे जायचे, त्यामुळे सगळ्यांना माहीत आहे. पहिल्या दिवशी पेपरमध्ये त्यांचा फोटो आणि बातमी पाहिली, तसा पेपर पर्समध्ये कोंबून शाळेत गेले. घरी कुणी वाचू नाही म्हणून. पण किती दिवस झाकणार ? रोज पेपरमध्ये काहीतरी येतंच आहे. आता साप्ताहिकात मोठे लेखच येणार आहेत, अशी जाहिरात वाचली. माझं नाव आऊट झालं तर या शहरात राहायची चोरी होईल. शिक्षिकेची नोकरी कशी असते तुम्हाला माहीतच आहे. नोकरीवर जाता यायचं नाही. झोप लागत नाही बघा रोजची.'

शिवाजीनगर स्टँडबाहेर काही टॅक्स्या उभ्या असतात. तिथला एक टॅक्सीवाला माझ्या मित्राचा मित्र आहे. गुगळे त्यांचं नाव. वाघमारे त्यांची टॅक्सी बऱ्याचदा करीत असं कळल्यावर त्यांना भेटलो.

गुगळे म्हणाले, ' हा बुवा वाघमारे नारायणगावहून सकाळी इथे आला की टॅक्सी करायचा. मग ती पुण्यात दिवसभर फिरवून रात्री आठला परत टॅक्सी इथं यायची. साधारण अडीचशे, तीनशे रुपये बिल व्हायचं. '

' कुठं कुठं फिरायचे तुम्ही ? '

' काही ठरलेले लोक होते. प्रभात स्टुडिओच्या समोर एका बंगल्यात जायचो. सगळी सुशिक्षित पॉश लोकं, पण याच्या पटापटा पाया पडायची. अगदी तरुण मुली, बायका, सगळे. बड्या हॉटेलमध्ये खायचा याला शौक. कँपमधलं एक भारी हॉटेल आहे. एकेका वेळी पाचपाचशे रुपये बिल करायचा. त्याला काजू, खिसमिस, बदाम असलं फार आवडायचं. किलो किलोच्या पिशव्या खरेदी करायचा. नंतर नंतर तर या स्टँडवरच्या दुकानदारालाच आणून ठेवायला सांगायचा. '

' बरोबर कोण असायचं ? '

' दरवेळी वेगळी माणसं. गुप्तधनाच्या गोष्टी चालायच्या. एक मुलगी इथं स्टँडवर येऊन वाट बघत बसायची. ती इथं कुठंतरी ऑफिसात नोकरीस आहे. आम्ही नेहमीचे टॅक्सीवाले असल्याचं तिला माहीत होतं. आमच्याकडं चौकशी करायची, भाऊ आले होते का ? तिला टॅक्सीतनं तो कोथरूडला न्यायचा. एक प्लॉट दाखवायचा. म्हणायचा, इथं तुझी खोली करू, इकडं तुझ्या भावाची खोली. नंतर नंतर तिला तो टाळायला लागला. ती मुलगी इथं येऊन तासन् तास वाट बघत बसायची. पण हा बुवा जरी आला तरी तिकडनं बघायचा, ही असली की दुसरीकडनं निघून जायचा. त्या मुलीची जमीन मिरजेकडे होती, ती यानं विकून दिली होती. या मुलीच्या म्हणण्याप्रमाणं हा तो पैसा दाबून बसला. आणि नंतर हिला तो टाळू लागला. '

जुन्नर.

खाली दगड व वर मातीचे बुरूज, तट. सराई-पेठ, सदाबाजार, कल्याणपेठ, या आखीव रस्त्यांच्या पेठा. मातीच्या पडक्या भिंतींच्या बखळीतून मधूनच उभ्या राहिलेल्या, भडक ऑईलपेंट दिलेल्या नव्या इमारती. वेडेवाकडे गल्लीबोळ. मागे भिंतीसारखा शिवनेरी.

गावात कासारबाईंचं घर शोधत गेलो. त्यांच्या नवऱ्याला भेटायला. बाजारपेठेतलं, घडीच्या फळ्यांची दारं असलेलं दुकान बाहेरून बंद होतं. कुलूप लावलेलं होतं.

शेजारी एका दुकानदाराला विचारलं,

'हे कासार कुठं गेलेत?'

त्यानं चोरट्या नजरेने मला पाहून घेतलं. परत खाली मान घालून काम करत म्हणाला,

'ते गावाला गेलेत.'

'कधी येणार आहेत?'

'नाशिकला गेलेत. आणि कायमचे गेले आहेत.'

नंतर काही ठिकाणी चौकशी केली. एकाने सांगितलं, 'ते इथंच आहेत, पण बाहेरून कुलूप लावून मागच्या दाराने ये-जा करतात.' दुसऱ्यानं सांगितलं, 'नाही. ते नाशिकला गेलेत, पण त्यांच्या मुलाला परीक्षा होईपर्यंत शेजाऱ्याने आपल्या घरी ठेवून घेतलंय.'

सदाबाजारात सगळं संशयाचं वातावरण. ज्या घरातल्या स्त्रियांच्या पूजा त्यांच्याच घरात झाल्यात अशांची नावं माहीत होती. पण उघडपणे विचारणार कसं? त्यांच्याशी बोलणं काढल्यावर म्हणायचे, 'इथं पूजा व्हायच्या, पण असला काही प्रकार इथं नव्हता. तो दुसरीकडं झाला असेल.'

पण बोलणारी माणसं आतून कचकलेली आहेत हे जाणवायचं. पुरुषमाणसांसमोर त्या घरातल्या स्त्रियांनाही बोलावून घ्यायचो. सगळी मोघम उत्तरं. पण त्यातनं या घरात स्त्री-पुरुषांमध्ये किती संशयाच्या भिंतीच्या भिंती उभ्या आहेत हे दिसायचं.

नवगिऱ्यांची चौकशी केली. ओळखीचे अनेक लोक जुन्नरमध्ये आहेत. एकाने सांगितलं,

'बाप अगदी सज्जन माळकरी. त्यानं हायच खाल्लीय. पोरगा गावात मोटार-सायकली उडवतोय.'

कासारबाईंच्याविषयी विचारलं. एक जण म्हणाला,

'तिच्या नवऱ्याचं दुकान अगदीच चालत नाही. तरी परिस्थिती बघा, टाम-टुमीत राहतात. ही बाई दिवसातनं सकाळ-संध्याकाळ दोनदा साड्या बदलते. तीच संसार चालवते. कुठनं पैसा आणते देव जाणे, काँग्रेसची कार्यकर्ती आहे. पुढंपुढं करीत असते. मोठा पुढारी आला की निरांजन-तबक घेऊन ओवाळायला हीच पुढं असते.'

पेपरमध्ये वाचलं होतं, कासारबाई स्त्री-संघटनेच्या अध्यक्षा होत्या त्या स्त्रीसम-न्वय समितीच्या संघटक वैद्य नावाच्या बाई भेटल्या. त्या म्हणाल्या,

'अहो, या कासारबाई फार चांगल्या कार्यकर्त्या होत्या. पुण्याहून विद्या बाळ, आणखी कुणी कार्यकर्त्या आल्या. आम्ही त्यांची भाषणं ठेवली. मग कासारबाईंच

म्हणाल्या, आपण नुसती भाषणं ठेवून काय होणार ? प्रत्यक्ष कार्य करायला पाहिजे. म्हणून आम्ही ही समिती स्थापन केली. पण आम्हा सगळ्यांपेक्षा कासारबाईंनाच उत्साह जास्त. आसपास खेड्यांतून स्त्रियांच्या तक्रारी आल्यावर कासारबाई तिकडे जायच्या, प्रश्न सोडवून यायच्या. आम्हाला त्यांच्या ह्या पूजा-प्रकरणाची काहीच कल्पना नव्हती. पेपरमध्ये वाचलं तेव्हा धक्काच बसला. अशा परिस्थितीत अध्यक्ष-पदावर त्यांना ठेवणं शक्यच नव्हतं. म्हणून ठराव करून त्यांना दूर केलं. पण जुन्नर-सारख्या ठिकाणी एखादा उपक्रम सुरू होणं आधीच किती कठीण, त्यात हे असं झाल्यावर आता आमची संस्थाच कोसळल्यासारखी झाली आहे. परत उभारी धरून आम्ही काही काम करू शकू असं मला तरी वाटत नाही. '

कासारबाईंच्या समोर राहणाऱ्या माणसाने सांगितलं,

' ही बाई त्या दिवशी रात्री परत आली. नवऱ्यानं दार उघडलं नाही तेव्हा रात्रभर पायरीवर बसून होती. सगळ्यांना इतक्या शिव्या देत होती की अशा शिव्या या जुन्नरने कधी ऐकल्याच नसतील. मधे आमच्या इथले त्यांच्या जातीतले एक शिक्षक तिला विचारायला गेले. पाणी, जेवण पाहिजे का, तर तिने घेतलं नाही. '

टेमघऱ्यांकडून जुन्नरमधलं आणखी एक प्रकरण ऐकलं होतं. ते या वाघमारे प्रकर-णाशी संबंधितच होतं.

सीताराम चव्हाण हा वडारी आणि शुभदा पुरंदरे ही ब्राह्मण; त्यांचं लग्न जुन्नरमधे खूप गाजलं होतं. ओळखीच्या एका माणसाने मला सांगितलं होतं की हा वडारी शुभदाला मुद्दाम डुकराची चरबी खायला लावायचा. त्याच्या छळाला कंटाळून तिनं आत्महत्या केली. कदाचित यानंच तिला जाळून मारलं असेल. वाघमारे प्रकरणाचा याच्याशी काय संबंध हे पाहण्याकरता सीताराम चव्हाणचं घर शोधत निघालो.

स्टँडकडून गावाला येताना तीनचार बैठी घरं आहेत, तिथं सीतारामचं सायकलचं दुकान आहे. काळ्या छान कुळकुळीत रंगाचा, पंचविशीचा, लाल बनियन, खाली अंडरपँट घातलेला, तीक्ष्ण नजरेचा, पिळदार शरीराचा सीताराम स्टुलावर दोनचार लोकांसह बसला होता. दुकानाला नाव दिलेलं होतं—' शुभदा सायकल मार्ट.'

शेजारीच घर आहे, तिथं आम्ही आलो. कॉटवर, खाली सगळे बसलो. एका खोलीचं घर. मधे सात फूट भिंत घालून आत स्वयंपाकघर केलेलं. भिंतीवर अनेक फोटो लावलेले. सीतारामच्या चेहऱ्याचे म्हातारे वडील भिंतीला टेकून उकिडवे बसलेले.

मी सीतारामला म्हटलं, ' तुमचं सगळं प्रकरण मला ऐकायचं आहे. '

तो मुळातच अबोल असावा. अडखळत सुरुवात करून नंतर सलगपणे बोलू लागला.

‘ माझं शुभदाचं प्रेम जमलं. पण तिच्या आईचा विरोध होता.’

‘ तिची आई कोण आहे ? तुमचा शुभदाचा संबंध आला कसा ? तुमच्या जातीचा आणि ब्राह्मणांचा तसा एरवी सहसा संबंध येत नाही. ’

‘ तिची आई मामलेदार कचेरीत क्लार्क आहे. वडील पण क्लार्कच होते. पण ते वारले. त्यांच्याविषयी गावात फार चांगलं मत होतं. त्यांच्यानंतर या बाईंची सगळी लाईनच चुकली. चार मुली आणि एक मुलगा. मुलगा माझा दोस्त होता, म्हणून यांचा माझा संबंध. शुभदा फारच गोरीपान आणि देखणी होती. सगळ्या जुन्नरमध्ये तिच्याइतकं सुंदर कुणी नव्हतं. ती कॉलेजला जायची तर तिला मुलं त्रास द्यायची. तिच्यामागून वेडंवाकडं बोलायची. म्हणून तिच्या आईनीच मला सांगितलं, तू तिला पोचवायला आणि आणायला जात जा; मग तिचा भाऊ आणि मी तिला सोडायला कॉलेजात जायला लागलो. पुढं मी बऱ्याच वेळा एकटा जायचो. त्या सगळ्यात तिचं आणि माझंच जमून गेलं. ’

‘ वाघमारेचा संबंध कुठं आला ? ’

‘ वडील वारल्यावर तिची आई या वाघमारेच्या नादी लागली. हिच्या थोरल्या बहिणी पण पूजेला जायच्या. वाघमारेने तिला आशा लावली होती, तिच्या घरात गुप्तधन सापडेल म्हणून. घराच्या मागच्या कोपऱ्यात खड्डाही खणला होता, पण काही सापडलं नाही. आमच्या लग्नाला या सगळ्यांचा विरोध होता. त्यात शुभदाला माझ्यापासनं दिवस गेले. मग तर खूपच विरोध सुरू झाला. आईने वाघमारेला सांगितलं. त्याने त्याच्यासाठी शुभदाला पूजा करायला सांगितल्या. शुभदा कधीच त्या पूजेला गेली नव्हती. पण आईने बळंबळं नेलं. पण त्याच वेळी तिचं ॲबॉर्शन सुरू झालेलं होतं. त्यामुळे तिची पूजा होऊ शकली नाही. पण तिने तो प्रकार स्वतः डोळ्याने पाहिला. पोट पडून गेलं तरी आमचं प्रेम तसंच चालू राहिलं. मग आईनं आणि वाघमारेने हिचा नरबळी द्यायचं ठरवलं. त्यांनी हिच्या गुपचूप पाच बाय दोनचा खड्डा बाहेरच्या भिंतीलगत अंगणात खोदून ठेवला. रात्री नऊ साडेनऊला हिला म्हणाले, तुझी पूजा करायची. तिला पांढरं पातळ नेसवलं आणि बाहेर आणलं. तिला म्हणाले, या खड्ड्यात बस. खड्ड्यात बसून ही पूजा असते. हिला काय धोका लक्षात आला असेल, ती जी धावत सुटली ती थेट माझ्या घरी. आम्ही एस. टी. पकडून रातोरात कल्याणला आलो. शहापूरला माझे पाव्हणे राहतात त्यांच्याकडे गेलो. तिकडं आम्ही लग्न लावलं. काही महिन्यांनी हिची भीती गेली. हिने त्या पूजेचा प्रकार मला सांगितला होता. मी म्हणालो, चल, आपण त्यावर पोलीस कंप्लेंट करू. म्हणून नंतर आम्ही परत जुन्नरला आलो आणि पोलिसात या प्रकासबद्दल आई व वाघमारे विरुद्ध तक्रार दाखल केली. ’

‘ मग पोलिसांनी काय ॲक्शन घेतली ? ’

‘ वाघमारेने आणि हिच्या आईने उलट पोलिसांकरवी आम्हा दोघांनाच अटक करवली. मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा आरोप केला. आम्ही दोघंही सज्ञान. कायदेशीर लग्न केलेलं. आम्ही मॅजिस्ट्रेटना कागदपत्रं दाखवली. तशी पाच दिवसांनी आमची तुरुंगातून सुटका झाली. ’

तिथं बसलेला एक माणूस म्हणाला, ‘ सुटका झाल्यावर आम्ही सगळ्यांनी यांची अशी दणक्यात वरात काढली की जुन्नरमध्ये कुणी अशी वरात पाहिली नसेल ! ’

‘ मग पुढं ? तुमच्या कंप्लेंटचं काय झालं ? ’

‘ तिच्या आईनं हिला मेंटल ठरवायचा प्रयत्न केला. पुण्याच्या एका मेंटलच्या डॉक्टरकडनं खोटं सर्टिफिकिट आणलं. मग आम्हाला वाटलं ही बाई हिला मेंटलमधे अटकवायची, म्हणून घाबरून केसला हजरच राहिलो नाही. म्हणून मग कोर्टाने आमची कंप्लेंट काढून टाकली. ’

‘ मग शुभदा जळून गेल्या कधी ? ’

‘ त्यानंतर आठ महिन्यांनी. मी इथं आतमधे जेवलो. बाहेर गेलो. त्या पलिकडच्या रस्त्यावर गेलो असेल तेवढ्यात आरडाओरडा झाला. हेच सगळे लोक मला बोलवायला आले. मी धावतच आलो. तिनं आतनं या दाराला कडी लावली होती. आम्ही भिंतीवरनं उड्या मारून आत गेलो. पण तोपर्यंत खूपच भाजली होती. ’

‘ अपघाताने गेल्या की आत्महत्या ? ’

‘ आत्महत्याच. कारण नाहीतर आतून कडी लावून घेण्याचं काहीच कारण नव्हतं. ’

‘ काही लोक म्हणतात, हा खूनच आहे. ’ मी भीतभीत म्हटलं.

सीताराम गप्प झाला.

तिथं बसलेला एक पलीकडचा दुकानदार म्हणाला, ‘ साहेब, ते लोक वाटेल ते उठवतात. पण आम्ही होतो ना त्या वेळी. आम्हीच याला बोलावलं, आम्हीच तिला बाहेर काढलं. आणि हा नंतर जो वेडापिसा झालाय तो अजून कुठं पुरता सुधारतोय ? ’

‘ पण मग आत्महत्या करायचं कारण काय ? तिचा या घरात छळ होत होता का ? ’

सीतारामचा बाप म्हणाला, ‘ अवो साहेब, सोन्यासारखी पोरगी होती बगा ती. काय तिनं जीव लावलाय आमाला. आमी म्हनायचो, बामनीन तू, तुजं जेवन वायलं करत जा. पण ऐकायची नाई. बामनाची पोर, पन आमच्या बायांसारखी लुगडी घालायची. ’

कुणीतरी भिंतीवरचा फोटो काढून माझ्या हातात दिला. मघाशी इथून नजर फिरलेली असून सुद्धा माझ्याही लक्षात आली नव्हती. चेहरा देखणा, डोक्यावरनं

पदर, लुगडं वडारी स्त्रियांसारखं, गळ्यात त्यांच्यासारख्या माळा.

सीताराम म्हणाला, ‘ तिला सारखी धास्ती पडली होती की माझ्या जिवाला धोका आहे. मला ती एकटी कधी बाहेर जाऊ द्यायची नाही. कारण या वाघमारेंच्या जवळ बरेच गुंड होते. ते मागावरच असायचे. ’

दुकानदार म्हणाला, ‘ अहो, ती गेल्यावर हा काही खाईपिईनासा झाला. आताची तब्येत आहे ना, त्याच्या दुप्पट होता तो. त्यानं पंचलिंगाच्या पुढं तिची समाधी बांधलीय. पुरती पाच वर्षं होऊन गेली ती गेल्याला, पण अजून रोज संध्याकाळी त्या समाधीच्या पुढं हा दिवा लावतो. डोळे मिटून तासन् तास बसतो. ’

एकजण म्हणाला, ‘ आता तर म्हणतोय, तो वाघमाऱ्या आता जेलमधनं बाहेर येऊ दे. माझं आता या जगात काही राह्यलं नाहीच आहे. त्याला खतमच करून टाकतो. मग काय व्हायचंय ते होऊ दे. ’

सीताराम मान खाली घालून बसला होता.

जुन्नरकडून परत येताना वाघमारेंचं नारायणगावातलं घर शोधूया ठरवलं. गावाच्या कडेला मुसलमान वस्तीत एक लांबच लांब कौलारू घर आहे. एका बाजूच्या खोल्यांमधे बेकरीचं सामान, मैद्याची पोती पडलेली होती. शेवटच्या चार खोल्या त्यांच्या घरच्या वापरासाठी केलेल्या दिसल्या. आसपासची घरं याच घरासारखी. बेकरीच्या खोल्या अगदी साध्या, बकाल होत्या. पण यांचं घर जिथून सुरू झालं तिथून सगळं खूप पालटलेलं. कडीकोयंडे चकचकीत स्टीलचे. दारालाही फॉर्मायका बसवलेलं. आत सगळीकडे ऑईल पेंट. खाली भारी फरशी. त्यांची देव्हाऱ्याची खोली पाहिली. देवांचं भलं मोठं संमेलनच होतं. भिंतींवर सर्व धर्मांमधल्या देवादिकांचे फोटो होते. एका भिंतीवर ऑईल पेंटनेच मोठा गणपती काढला होता. त्याला कालिमातेसारखे बरेच हात होते. खाली लिहिलं होतं : युग्म गणपती. बेकरी बरेच दिवस बंद असावी. एकदोन कळकट कपड्यातली पंधरावीस वर्षांची पोरं वावरत होती. एकाने सांगितलं,

‘ भाऊ तिकडं गेल्यापासून बेकरी बंदच आहे. ’

‘ हा गणपती कुणी काढलाय रे ? ’

‘ भाऊंनीच. ते पेंटिंग फार चांगलं करतात. ’

‘ त्या पूजा कुठल्या खोलीत चालायच्या ? ’

तो घुटमळला. पण नंतर त्याने देवघराच्या खोलीला लागून असलेली खोली उघडून दाखवली. प्रशस्त चकचकीत ऑईल पेंट, खाली लिनोलियम. पॅकबंद दारं. व्हेंटिलेटर्स नव्हती. दार बंद केल्यावर कसलाही आवाज बाहेर जाणार नाही, याची दक्षता घेतलेली दिसली.

पुण्याला पोलीस कमिशनर म्हणून भास्करराव मिसर हे आल्यापासून त्यांनी ११० या कलमाचा वापर करून गुन्हेगारीला आळा घालण्याचा प्रयत्न चालवला आहे. एखादा माणूस समाजाला त्रासदायक होत असेल, तशा नागरिकांच्या लेखी किंवा तोंडी तक्रारी आल्या तर पोलीस हे कलम लावून आधी अटक करतात व त्याला समाजातील काही व्यक्तींची हमी आणायला सांगतात. त्याच्या पुढच्या वागण्यावर काही बंधने घालतात. अशी बंधने हा माणूस पाळेल अशी हमी देणारे हमीदार त्याच्या मित्रांनी, नातेवाइकांनी मिळवून आणले की त्याची तुरुंगातून सुटका होते. नंतरच्या काळात त्याचे वर्तन बिघडले आणि हमीदाराने हमी काढून घेतली, किंवा अटी मोडल्या की त्याला परत जेलमध्ये टाकलं जातं. पोलीस ११० कलम लावून असि. कमिशनर ऑफ पोलीस (ए. सी. पी.) पुढे उभे करतात. त्यांना स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट या नावाने कोर्टाचे अधिकार आहेत. त्याविरुद्ध माणूस सेशन कोर्टात अपील करून ११० कलम काढून घेऊ शकतो किंवा अटी शिथिल करून घेऊ शकतो.

वाघमारे प्रकरण पेपरमधनं गाजलेलं असलं तरी त्यांच्याविरुद्ध तक्रार नोंदवायला भक्तांपैकी कुणी स्त्री पुढे आली नव्हती. ( नंतर एक फिर्याद विश्रामबागवाडा पोलीस स्टेशनला नोंदवली गेल्याचं समजलं. ) त्यांच्या घराची झडती घेतली तेव्हा पोलिसांना अश्लील वाङ्मय सापडले व विनापरवाना एक मोठा चाकू सापडला, या आरोपाखाली खटले भरले आहेत, तेवढेच त्यांच्याविरुद्ध खटले. त्या कलमांखाली लगेचच जामिनावर सुटता येतं, आणि नंतर कधी काळी ते खटले उभे राहणार, त्याच्यावर अपिलं होत ते वर्षानुवर्षे निकाल लांबवत राहू शकणार, आणि झाली समजा शिक्षा तरी ती दोन वर्षांपेक्षा जास्त नसते. वाघमाऱ्यांच्या या देवऋषीपणा करून स्त्रियांना फसवण्याच्या उद्योगाला आळा कसा बसणार ? इथं श्री. मिसर यांनी ११० कलमाचा वापर करायचं ठरवलं. त्याप्रमाणे वाघमाऱ्यांच्या विरुद्ध केस तयार करण्यात आली. त्यांना तुरुंगात ठेवलं गेलं.

ए. सी. पी. वसंतराव कांबळे म्हणजे टोकदार मिश्या वर वळवलेले, पहिल्वानी शरीराचे, पस्तिशीतले अधिकारी. पंडितरावांच्या वरच यांचं ऑफीस आहे. शेजारीच एका हॉलमध्ये यांचं ' कोर्ट ' ही आहे. यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते, ' नारी समता मंच ' सारख्या स्त्रीसंघटना यांना बोलावून यांना कुणाची हमी मागावी, कुठच्या अटी घालाव्यात याची चर्चा केली. त्यात मला बोलावलं होतं. विद्या बाळ, नलिनी साळगावकर, वत्सला गायकवाड याही निमंत्रित होत्या. पुराणिक नावाच्या पत्रकारासही बोलावलं होतं. सरदेशपांडे जेलमधे असल्याने मी त्यांना फक्त भेटू शकलो नव्हतो. पण बाकी संबंधितांना भेटलो होतो. मिटिंगमधे म्हणालो,

‘कासारबाईंना सासर व माहेर दोन्हीकडून काढून लावलं आहे, शिवाय आतापर्यंत त्यांनी तुरुंगवासही भोगला आहे. तेव्हा यापेक्षा जास्त शिक्षा त्यांना नको. पण वाघमाऱ्यांशी मी बोललो. कुणाशीही बोलताना ते ज्यांची पूजा केली त्या स्त्रियांच्या नावांचा सर्रास उल्लेख करतात. हे बाहेर आले तर त्या स्त्रियांना ते ब्लॅकमेल करतील अशी भीती वाटते. काही स्त्रियांनी तर आत्महत्येसाठी घरी डायझिनॉन आणून ठेवलं आहे. म्हणून त्यांना शक्यतो बाहेर सोडूच नये. पण सोडायचे झाल्यास जास्तीत जास्त कडक अटी घालाव्यात.’

इतरांनी हे म्हणणं उचलून धरलं.

नंतर समजलं, पोलिसांनी बऱ्याच अटी घातल्या असून एक अंधश्रद्धाविरोधी मोहिमेतला कार्यकर्ता व एक स्त्रीसंघटनेची कार्यकर्ती अशा दोघांची हमी मागितली आहे.

वाघमारे या सगळ्याचा निकाल लागेपर्यंत जेलमध्येच राहणार होते.

नंतर एकदा कोर्टात गेलो असता वकील मित्र भेटला. तो म्हणाला, ‘तुला त्या सरदेशपांडेला भेटायचं होतं ना, तो आज तारखेला आलाय. झाडाखाली बसलाय बघ.’

त्याला भेटलो. शेजारी दोन पोलीस विडी पीत बसले होते. सरदेशपांडे म्हणजे दाढीमिश्या कशाही वाढवलेला, तिशीतला, काळा तरुण मुलगा होता. दिसायला उग्र असला तरी बोलू लागला तेव्हा अगदी गाईहून गाय वाटला.

‘हो. माझ्या हातनं हे सगळं घडलं. मला त्याची शरम वाटते. पहिल्या वेळी मला काही माहीत नव्हतं. पण गुंतत गेलो. मी एकीकडे ती क्रिया करीत होतो, पण आपण देवाच्या नावावर या स्त्रियांना फसवतोय याचं टेन्शनही जबरदस्त यायचं. हे सगळं उघडकीला आलं, हे एक प्रकारे बरंच झालं. माझ्या हातनं हे घडायचं तरी थांबलं. काय शिक्षा होईल ती मी भोगणार आहे. तुम्हाला माझ्यासाठी करता आलं तर एवढंच करा, की मला चांगलं जगण्याची संधी परत देता आली तर बघा!’

‘पण तुम्हाला ती शाळा आता नोकरीवर ठेवू शकणार नाही, असं वाटतं. मग तुम्ही काय करणार?’

‘मी संस्थेच्या लोकांना जाऊन भेटेन. त्यांच्यापुढं माझं म्हणणं मांडीन. त्यांना नाही पटलं तर दुसरं काहीही करून उपजीविका करेन, पण या मार्गाकडे परत वळणार नाही.’

परत येताना वकील मित्र म्हणाला, ‘तुझ्या त्या वाघमारेची तारीख असते ना, त्या वेळी त्याला भेटायला बरेच जण येत असतात. पाचपंचवीस लोक घेऊन तो या कोर्टातून त्या कोर्टात जाताना दिसतो.’

हा गुन्हा पेपरमधे खुप मोठ्या प्रमाणावर फ्लॅश झाला. एका पत्रकाराने एका खूप खपाच्या साप्ताहिकात विस्तृत लेख लिहिला. त्यात अडकलेल्या काही स्त्रियांची नावं जशीच्या तशी छापली. एवढंच काय, प्लँचेटमधल्या चिठ्ठीचा ब्लॉक करून छापला होता त्यात सुद्धा एका मुलीचं नाव आलेलं होतं. (या लेखात सर्व स्त्रियांची नावं बदललेली आहेत.) मी उडालोच. त्या त्या स्त्रियांची किती केविलवाणी अवस्था झाली असेल. टेमघऱ्यांना फोन केला. तेही याच गोष्टीने अस्वस्थ झालेले होते. हे पत्रकार भेटले असता त्यांनी मला उत्साहाने विचारलं,

'काय, कशी काय लावलीय स्टोरी ? वाचलीत की नाही ?'

मी माझी अस्वस्थता सांगताच नर्व्हस होऊन जरा सारवासारव करीत म्हणाले,

'काय आहे, मी नावं बदलायला संपादकांना सांगितलं होतं. पण गडबडीत ते राहून गेलं असावं.'

मधल्या काळात पोलीस कमिशनरांनी या क्षेत्रातील कार्यकर्त्यांची या तऱ्हेच्या प्रश्नाबद्दल एक बैठक बोलवायचं ठरवलं. त्यांच्याबरोबर माझं नावही निमंत्रक म्हणून टाकलं. त्यांत नरेन्द्र दाभोळकर, शाम मानव यांसारख्या अनेकांना बोलावलं. देव-ऋषीपणा करणं, अंगात येणं, उपासना करणं यांना आपण कायदेशीर आक्षेप घेऊ शकणार नाही. पण तिथे गुन्हा घडत असल्यास किंवा गुन्हा घडण्याची शक्यता असल्यास आपण जागरूक राह्यलं पाहिजे. म्हणून पुणे शहरात अशी देवदेवस्कीची किती केंद्रे आहेत, तिथं काय प्रकार चालतात, याची पाहणी नागरिक व पोलीस यांनी संयुक्तपणे करावी, असं त्या चर्चेतनं निष्पन्न झालं.

बराच काळ वाघमारे प्रकरणाचं काही कानावर आलं नाही. टेमघऱ्यांकडून कळलं, 'कासारबाईंवर ११० कलम लावलेलं नाही. त्यांची ती लॉजवरची केस आहे, ती स्टँड होईल. पण आता त्या यातनं सुटल्या आहेत.'

'त्या राहतात कुठं ?'

'जुन्नरला. नवऱ्याने त्यांना परत घेतलं.'

मी म्हटलं, 'बरं झालं ते एक. सरदेशपांड्यांचं काय ?'

'कांबळे साहेबांनी त्याचे हमीदार मान्य करून त्यांना चांगल्या वर्तणुकीच्या बोलीवर सोडलं आहे. वाघमारेचं अपील चालू आहे.'

नंतर एकदा वकीलमित्र भेटला. तो म्हणाला, 'तुमचा वाघमारे बुवा सुटला बरं का ! त्याच्या बाजूने निकाल झाला. कोर्टाने पोलिसांनी मागितलेले जामीन उडवून लावले. त्याला अंधश्रद्धा निर्मूलनामधला कोण कार्यकर्ता हमी द्यायला भेटणार ? मग त्यानं काय कायम तुरुंगातच राहायचं का ? असा त्याच्या वकिलाने युक्तिवाद केला. पाच हजाराचे कोणतेही चार जामीनदार चालतील असा कोर्टाने निकाल दिला. ते

जामीन काय त्याला सहज मिळतील.'

मी हादरलोच. टेमघऱ्यांना फोन केला. ते म्हणाले,

'अहो, आपल्यासारखा निकाल झालाय. जामीनदाराचा पॉइंट जरी विरुद्ध गेला असला तरी आपण घातलेल्या सगळ्या अटी कोर्टाने कायम केलेल्या आहेत. त्यामुळे त्याला रोज वडगाव शेरीहून फरासखान्यात हजेरी द्यायला यावं लागणार. एकही दिवस खाडा चालणार नाही. बाहेरगावी जायचं असलं तर पोलिसांची परवानगी घ्यावी लागेल. आता उलट तो चांगला जाम झालाय. त्याला गडबडच करता येणार नाही.'

हे ऐकल्यावर हायसंच वाटलं.

पोलीस प्रॉसिक्यूटर बी. जी. खत्रींना भेटलो. पोलिसांच्या ११० च्या केसेस ते चालवतात. त्यांना निकालपत्र मागताच त्यांनी बॅगमधनं काढून हातावरच ठेवलं. त्यात वाघमाऱ्यांनी वसंतराव कांबळे (स्पे. ए. मॅजिस्ट्रेट) यांच्यापुढे दिलेला कबुलीजबाब खरा असल्याचं म्हटलं होतं. ज्या अटी घालण्यात आल्यात त्यावरही ऑब्जेक्शन घेतलं नव्हतं. फक्त जामीनदारांविषयी आक्षेप घेतला होता, तो कोर्टाने मान्य केला होता. अटींची यादी पाहून मी चाटच झालो. पोलीस ठाण्यावर रोजची हजेरी हे तर होतंच, पण वर्तनावरची बंधनं बरीच होती. पोलीस बघितल्यावर पळून जाऊ नये. जवळ अगर घरी चाकू बाळगू नये. पोलीस झडती घ्यायला आल्यास हरकत घेऊ नये. गुन्हेगारांशी संबंध ठेवू नये. चमत्कार करणार असल्यास पोलिसांना प्रात्यक्षिक करून दाखवावे. या अटींबद्दल फारसं वाटलं नाही. पुढच्या अटी अशा होत्या. एकांतात, देवळात, घरात त्याने कुठल्याही स्त्रीशी संबंध ठेवू नये. स्त्रीशी बोलायचे झाल्यास, तीनचार माणसांसमोरच बोलावे. कुणाशीही, विशेषतः स्त्रीशी अश्लील पद्धतीने बोलू नये. लज्जास्पद बोलू नये. शेवटी एक अट तर फारच गमतीशीर होती. ती म्हणजे त्याने विवस्त्र राहू नये.

मनात आलं, हे खास पोलिसी डोकं.

काही दिवसांनी वाटलं, वाघमारे अनायासे फरासखान्यात येतातच हजेरीला रोज, तर भेटू या एकदा. त्यांची हजेरीची वेळ संध्याकाळी सातची असते असं कळलं. त्या वेळेला गेलो. भेटलो. वंडगार्डन लॉकअपनंतर प्रथमच पहात होतो. तब्येत सुधारलेली. पांढरा स्वच्छ नेहरू शर्ट-पायजमा. केस काळे, नीट विंचरलेले. तिथल्या बाकड्यावर बसून थोडा वेळ बोललो. मागे लॉकअपमध्ये बोललेल्या काही गोष्टी तपासून घ्यायच्या होत्या. त्या सगळ्या त्यांनी प्रांजलपणे कबूल केल्या. मी त्यांना म्हटलं, 'या सगळ्यांत तुमच्या मिसेसना भेटायचं राहिलंय. कधी भेट होईल त्यांची ? कधी येतात गावाहून त्या ?'

' त्या तेव्हापासून रजेवरच गेल्यात. इथं बदलीचा प्रयत्न करताहेत. पण अजून जमत नाही. कधीही सकाळी या, असतो आम्ही घरी. '

वडगाव शेरी.

नगर रोडला रामवाडीनंतर औद्योगिक परिसर लागतो. एका ठिकाणी कच्च्या रस्त्यावर आत वळलो. मोकळे प्लॉटस, कामगारांच्या अधूनमधून एकमजली कौलारू घरांच्या वस्त्या... शोधत शोधत गेलो. विठाई नावाचं घर विचारत गेलो. एकानं सांगितलं,

' या वाटेनं पुढे जा, ते घर लागेल. '

' कितवं घर आहे ते ? '

' ते दिसेलच तुम्हाला. विचारावं लागणारच नाही. '

तसंच झालं. त्या साध्या, छपरी घरांच्या समुदायात एक रंगीबेरंगी बैठा बंगला दिसला. त्याच्यावर नाव लिहिलं होतं, ' विठाई. ' घराच्या वरच्या गच्चीच्या पॅरॅपिटच्या भिंतीवर रंगीत पडद्यांचं डिझाईन ऑईल पेन्टने रंगवलं होतं. खाली नारायणगावच्या घराला दिलेला खास गुलाबी रंग दिलेला होता. खिडक्यांना निळा. बंगल्याच्या गेटच्या गजांच्या डिझाईनलाही वेगवेगळे रंग दिले होते.

बेल नादुरुस्त होती, म्हणून दार ठोकलं. पण प्रतिसाद आला नाही. म्हणून बाजूने मागच्या अंगणात गेलो आणि तिकडनं पाह्यलं तर हॉलमध्ये एका खुर्चीत वाघमारे बसले होते. अंगात बनियन आणि खाली नुसता जांघ्या घातलेला होता. आणि त्यांच्या पुढं त्यांच्याकडे पाठ करून सौ. डोळे पुसत रडत बसल्या होत्या. मला वाटलं, आपण अगदी चुकीच्या वेळी आलो. पण वाघमाऱ्यांनी उठून गडबडीने ' या ' म्हणून आत बोलावलं, तेव्हा या रडण्याचा उलगडा झाला. ते टीव्ही पहात होते. आणि त्यावर रामायणाचा कार्यक्रम चालला होता.

कार्यक्रम होईपर्यंत वाघमारे आत जाऊन पायजमा-शर्ट घालून आले. त्यांनी सगळं घर आतून दाखवलं. अतिशय स्वच्छता होती. धुळीचा कणही नसेल. फरशा चकचकीत, भिंती चकचकीत. खिडक्यांना गर्द पिवळ्या रंगाच्या काचा बसवल्याने गमतीशीर प्रकाश घरात पडला होता. स्वयंपाकघराच्या ओट्याला संगमरवर, बाथरूमची फरशी, भिंती संगमरवराच्या. एक मोकळा, मोठा हॉल होता. बहुधा हा त्यांच्या खास पूजेसाठी बांधून घेतला असणार.

मी म्हटलं, ' हे बांधकाम चांगल्या दर्जाचं आहे हो. '

' मीच करून घेतलंय. मला सुतारकामाची, गवंडीकामाची चांगली माहिती आहे. मी या भागात जागा घ्यायचो. त्यावर स्वतः प्लॅन करून घर बांधून घ्यायचो आणि

विकायचो. क्वालिटी बेस्ट असल्यामुळे गिऱ्हाईक लगेच मिळायचं. या भागात अशी बरीच घरं मी बांधलेली आहेत.'

'तुम्हाला बऱ्याच कला येतात की. नारायणगावच्या घरातलं गणपतीचं चित्र तुम्हीच काढलंय ना? शिवाय बेकरीची कला येतेच.'

'मग तसा मी चांगला मेकॅनिक आहे. ट्रकचं सगळं इंजिन डाऊन करून, दुरुस्त करून परत चढवू शकतो.'

परत टी. व्ही. च्या खोलीत आलो तेव्हा रामायण संपलं होतं. सौ. वाघमारे उभ्या राहिल्या होत्या. उंच, शिडशिडीत यष्टीच्या होत्या. चेहरा थकलेला, सुरकुत्या पडलेला होता. कपाळावर हळदीचा टिपका लावलेला. बोलताना बाहुल्यांच्या मानेवर डोकं जसं डुगडुगतं, तसं त्यांचं होत होतं. वाघमाऱ्यांनी त्यांची माझी ओळख करून दिली.

मी म्हटलं, 'तुम्हालाच मी भेटायला आलो होतो. सध्या काय रजेवर आहात?'

'काय करायचं! मी जिथं काम करते त्या ऑफिसात काम करणारे लोक, बाया इतक्या आडून आडून टोचून बोलतात. त्यात आम्ही मागासवर्गीय. तिथं मी काम कसं करू शकणार?'

'शिवाय पब्लिकचाही त्रास असणार.'

'पब्लिकचा काहीच त्रास नाही. हा सगळा आदिवासी भाग आहे. इतक्या लोकांना मी कर्ज मिळवून दिली आहेत. त्यांच्याकडनं चहाचा कपही कधीही घेतला नाही. कधी मीच त्यांना चहा पाजला असेल. गरीब लोक. वरनं कर्ज मंजूर होऊन आलं नाही, यांना हेलपाटा पडायचा. घरी जायला पैसे नसायचे. मीच पाच रुपये भाड्याला देऊन त्यांना परत पाठवायची. आता ते सगळं सोडून इथं झेडपीत बसलेय खेटे घालत.'

'काय अडचण आहे बदली होण्यात?'

'इथं ती आदिवासी पोस्ट नाही. इथं यायचं म्हणजे साधी क्लार्क म्हणून यावं लागेल. पगारात फारच फरक पडतोय. मी सत्तावीस वर्षं इमानानं, कष्ट करून नोकरी केली ती काय एवढ्याकरता का?'

'या प्रकरणाचा काय त्रास झाला तुम्हाला?'

त्यांचे डोळे पाणावले. डोळे पुसून म्हणाल्या, 'वेडी व्हायचेच बाकी राह्यलेय. काय बदनामी, काय बदनामी. हे तुरुंगात आणि मी एकटी इथं. बरोबर फक्त सासूबाई. लोक दारावर रात्री अपरात्री धक्के मारून जायचे. दगड टाकायचे. बेल वाजवून जायचे. इथं दारात विष्ठा पण टाकून गेलेत कितीदा.'

वाघमारे म्हणाले, 'इथल्या ग्रामपंचायतीत चर्चा झाली होती, यांच्याशी कुणी बोलू नका, यांना पीठ दळून देऊ नका, दुकानातनं सामान देऊ नका.'

‘मी पहाटे पाचला उठून स्वैंपाक करायचे. सकाळीच डबा घेऊन निघायचे. जेलमधे नऊच्या सुमारास आत यांचा डबा द्यायचे. यांना जेलमधे मारहाण झाली होती ना, तेव्हापासून तिथलं जेवण जायचं नाही, म्हणून घरचं द्यायला त्यांनी परवानगी दिली होती. डबा दिल्यावर तिथून कोर्टात जायचे. पोलिसांनी तर इतका त्रास दिला की विचारू नका. जामीनच मिळू द्यायचे नाहीत. आधी सगळं जग आमच्या विरुद्ध फिरलेलं.’

‘अहो मी महारोग बरे करतो ना, एका डॉक्टरच्या वडलांचा मी महारोग बरा केला. त्यांना नवराबायकोला मुलाने घराबाहेर काढून लावलं होतं, बायकोच्या दडपणामुळं. ते बरे झाले. परत मुलाबाळांत जाऊन नांदायला लागले, त्यांनी जामीन राहणं सोडाच, पण मी म्हटलं, नुसतं यांच्यामुळे मी बरा झालो एवढं लिहून द्या, तरी त्यांनी नाही तर म्हटलंच, पण परत इथं येऊ नका असंही सांगितलं.’

‘तरी काही माणसं माणुसकी म्हणून जामीन द्यायला उभी राहिली. तर पोलिसांनी त्यांच्या घरी जाऊन दम दिला. आमच्या दूधवाल्याने जामीन देऊ केला तर पोलिसांनी त्याला पिटाळून लावलं.’

‘पोलिसांनी त्या वेळी मारहाण केली का ?’

‘इथं पकडायला आले, तर त्यांनी एक माझ्या मुस्कटात मारली तर हा चेहरा एका बाजूने बघता बघता एवढा सुजला. पकडून नेताना रस्त्यावर इथल्या लोकांना मला मारायला सांगितलं. लॉकअपमध्ये मारहाण.’

‘अहो, मी पोलिसांना पैसे नेऊन दिले, त्यानंतर मात्र मारहाण थांबली.’

‘तुम्ही कोणाला पैसे दिले ? आणि किती दिले ?’

त्यांनी एकमेकांकडे पाहिलं आणि म्हणाल्या, ‘ते जाऊ द्या. तो विषय आता संपला आहे.’

(मी नंतर टेमघऱ्यांना याविषयी विचारलं, ते म्हणाले, ‘तो आता असं बोलायला लागलाय काय ? तो काहीही बोलेल. असं काही झालं नाही. मी खरं तर त्याला चांगला मारायला पाहिजे होतं. पण मी हात उगारल्यावर तो म्हणाला, माझं पोटाचं कसलं तरी ऑपरेशन झालंय, मला मारू नका. म्हणून त्याला हात पण लावला नाही. काहीतरी भलतंच झालं तर मरायचा आपल्या हातून. आणि पकडल्यापासून तो सगळी माहिती डीटेलमधे सांगतोय म्हटल्यावर कोण त्याला उगाचच मारेल ?’)

मी वाघमारे बाईंना विचारलं, ‘हे प्रकरण उघडकीला आलं तेव्हा तुम्हाला काय वाटलं ? खूप मानसिक त्रास झाला असेल, नाही ?’

‘प्रकरण सगळं खोटंच आहे. प्रकरण आहे असं कोण म्हणते तर ती एक बदफैली बाई, हो ना ? बाकी कोण तक्रार करायला आलंय का पुढं ? अहो, मी यांची बायको आहे, माझ्या नवऱ्याचं वर्तन माझ्या लक्षात येणार नाही का ? तुम्हाला तरी

खरं वाटतं का, की मोठ्यामोठ्यांच्या घरच्या बायका येतात आणि अशा फसतात! खुट्ट झालं तरी आजकाल लगेच ओरड होते.'

मी गप्पच झालो. त्यांना कसं सांगणार की वाघमाऱ्यांनी स्वतःच दोनदा–त्यांतल्या एकदा तर जवळ दुसरं कुणीही नसताना–हे सर्व प्रकार आपण करीत होतो असं सांगितलं होतं! एक तर कायदेशीर बाजू पक्की करायची म्हणून जाणूनबुजून त्या असं म्हणत असतील किंवा तसं म्हणणं ही त्यांची मानसिक गरजही असू शकेल.

त्या आत निघून गेल्या. मी वाघमाऱ्यांकडे पाहिलं. तसं ते गडबडीने म्हणाले, 'जे काही घडलं ते ऐंशी सालापूर्वी घडलं. नंतर माझ्यात आणि वहिनींच्यात फारकत झाली. मी बाजूला झालो.'

तेवढ्यात बाहेरनं दोन माणसं आली. ती माणसं हे घर विकत घेण्याच्या दृष्टीनं पहायला आली होती. पूर्वीची ओळखीची असावीत. माझी ओळख करून दिल्यावर त्यांतला एक म्हणाला,

'भाऊ, अजून तुमचं हे प्रकरण चालूच आहे का?'

'हो ना, फार त्रास होतो त्याचा.'

तो माणूस मान हलवत म्हणाला, 'काय करणार भाऊ? रामालसुद्धा वनवास चुकला नाही.'

मला गंमत वाटली. वाघमारे आणि राम!

ते गेल्यावर वाघमारे म्हणाले, 'आता इथं रहायला मन होत नाही. बाजूच्या लोकांचा त्रास होतो. हे विकून जास्त मोठी जागा घेणार. रहायला घरही होईल आणि बेकरी सुरू करता येईल.'

'हो. नव्या ठिकाणी तुम्हाला ओळखणारं कुणी नसेल.'

'तसं काही सांगता येत नाही. कारण पोलिसांनी, पत्रकारांनी आमची जगभर प्रसिद्धी करून ठेवलीय. माझ्यावर कुठलाही आरोप शाबीत व्हायच्या आधीच पोलिसांनी एवढी आमची नाचक्की करावी? आरोप सिद्ध झाला ना, तर मग वाटेल तेवढी प्रसिद्धी द्या. माझ्याविरुद्ध कोणाचीही तक्रार नाही. असं असता का हे? साहेब, ही जुन्नर, नारायणगावची लोकंच फार बिघडलेली. काय काय प्रकार तिथं चालतात. ह्या पुढाऱ्यांना तिथल्या चांगल्या घरातल्या संसारी बायका, मुली भोगायला पाहिजे असतात. त्यांची एजंट म्हणजे वहिनी. लॉजवर ही वहिनी तिकडनं या मुली घेऊन येते. तिकडली बागाईतदार, पुढारी मंडळी नंतर येतात. काही ठराविक लॉजवर जाऊन बघा. जुन्नरच्या सातआठ बाया अशा सापडतील. ती अमकी . (असं म्हणून त्यांनी एका प्रतिष्ठिताच्या मुलीचं नाव घेतलं) तिचा रेट तर पाच हजार आहे. तिच्या बापानं मागं एक घर बांधलंय ते हिच्या जिवावर...'

मला ऐकवेना. ती मुलगी, ते कुटुंब मला चांगलं माहीत आहे. अतिशय साधं, सरळ कुटुंब. पण त्यातली ही पूजा भानगडीत फसली होती. हळूहळू बोलत, आवाज न चढवता वाघमारे सरळ काहीही बोलत होते. शब्दातलं विष कसं असतं याचा अनुभव येत होता. वाघमारे जेलमधून बाहेर आल्यावर या स्त्रियांना ब्लॅकमेल करतील असं भय मला त्या वेळी वाटलं होतं म्हणून ते निवेदन ए. सी. पी. ना दिलं होतं, त्याची आठवण झाली. ते भय खरं ठरत होतं.

मधे माझा धाकटा भाऊ भरत ओतूरहून इथं आला होता. तो तिकडे पोल्ट्री चालवतो. तो उत्साहाने म्हणाला,

'आम्ही वाघमारे बाबाविरुद्ध ओतूरमधे मोठं आंदोलन केलं. पन्नास–साठ मुलं चौकाचौकांत उभी राहून, बरोबर अंधश्रद्धाविरोधी पोस्टर्स घेऊन घोषणा देत होती. सगळं गाव फिरून झाल्यावर सभा घेतली. साताऱ्याहून डॉ. नरेन्द्र दाभोळकरांना बोलावलं होतं. सभेला दोन हजार लोक तरी जमले असतील. ओतूरसारख्या ठिकाणी एवढी मोठी सभा म्हणजे आमच्या दृष्टीने कार्यक्रम फारच यशस्वी झालाय.'


मला ऐकताना बरं वाटलं.

पोलिस, कायदा यांची मदत तर घ्यायलाच पाहिजे, पण लोकांमध्ये अशी जाणीव निर्माण झाली तर ती जास्त महत्त्वाची.

वाघमारे प्रकरण जेव्हा पहिल्यांदा पेपरमधनं उजेडात आलं तेव्हा अंधश्रद्धेचा हा प्रकार म्हणून त्याकडे लक्ष गेलं. त्यात भैरवी पूजा होती, कांद्याच्या रसाने केलेलं प्लँचेट होतं. साध्या एखाद्या ट्रिकने लोकांना फसवून ही पूजा करायला भाग पाडलेलं होतं. पण पुढं जशी जास्त माहिती घ्यायला लागलो तेव्हा आढळलं की हे सर्व स्त्रियांच्या बाबतीत खरं नाही. कासारबाईंची शारीरिक भूकच एरवीच्या स्त्रीपेक्षा जास्त असल्याने त्यांची यात सोयच होत होती. त्यांच्याकडे रुग्ण म्हणूनच पहायला पाहिजे. पायावर कोड आलेल्या मुलीचं लग्न लांबलं होतं, किंवा बहिणींची लग्न लावता लावता त्या शिक्षिकेचं लग्न राहूनच गेलं होतं. त्यांच्या शरीराच्या गरजा भागविण्या-साठी समाजात सोय नसल्याने त्यांच्यावर वाघमाऱ्यांनी काही बळजबरी केल्याचं चित्र दिसत नाही. उलट, त्यांचीही गरजच भागत होती. साठसाठ वर्षांपर्यंतच्या स्त्रिया यात सहभागी होत होत्या. गुप्तधन, मुलीचे लग्न जमणे यांसारखे त्यांचे उद्देश असतीलही. पण समूहाने सेक्स उपभोगायची–आणि ती रूढ प्रकारापेक्षा वेगळ्या रीतीने–त्यांना चटकच लागली असावी. वाघमाऱ्यांनी नारायणगाव सोडल्यावर या स्त्रिया एकत्रितपणे सरदेशपांड्यांकडच्या पूजा करायला येत होत्या. या तऱ्हेचे प्रकार आदिम काळापासून चालत आलेले आहेत. तंत्र–मार्गात हे प्रकार सर्रास होते. उत्तर पेशवाईत 'घटकंचुकी' हा यासारखाच प्रकार चालू होता. रोमन–ग्रीक-

सारख्या सुधारलेल्या संस्कृतींमधेही असे प्रकार चालत. रोमन साम्राज्याच्या ऱ्हासाच्या अनेक कारणांपैकी हे कारण असल्याचे गिबनने नोंदवलेले आहे. आता अमेरिकेतही तुरळक प्रमाणात काही ख्रिस्तविरोधी पंथ अस्तित्वात असून मांत्रिक, चेटकिणी बऱ्याच लोकांना सामील करून हे असलेच प्रकार करीत असतात, असं तिथं राहणारा माझा एक मित्र सांगत होता. आपल्याकडे सर्वांसमक्ष एखाद्या स्त्रीला नग्न करून तिच्याशी थोडी धिटाईने दंगामस्ती करण्याचे कॅबरे सुरू झालेले आहेत.

म्हणून ज्यांची फसवणूक झाली आहे–उदाहरणार्थ, तुळशीबागेसमोर भेटलेली मुलगी–अशांच्या बाबतीत ते अनिष्ट आहे, तो गुन्हा आहे, असं मान्य केलं तर मग इतर स्त्रियांच्या बाबतीत तो सगळा स्वेच्छेने चाललेला प्रकार होता, त्यात कुणी 'बळी' नव्हतं, तर मग तुमचा आक्षेप का, असा कुणी प्रश्न करू शकेल. त्या स्त्रिया त्यांच्या नवऱ्यांची, कुटुंबियांची फसवणूक करीत होत्या. समाजात असे प्रकार जेव्हा वाढू लागतात, तेव्हा ते सामाजिक अधःपतनाचं लक्षण मानायला हवं. गिबनने रोमन साम्राज्याच्या बाबतीत म्हटलं तेच उत्तर पेशवाईच्या बाबतीतही म्हणता येईल. जुन्नर-नारायणगाव या भागातल्या सांस्कृतिक जीवनाविषयी काळजी निर्माण व्हावी इतकं अधःपतन होताना दिसतं आहे. या भागातल्या जमिनींना धरणाचं पाणी किंवा धरणामुळे पाणी लागलेल्या विहिरींचं पाणी मोठ्या प्रमाणात मिळू लागलं आहे. शिवाय या भागातले बरेच लोक मुंबईला फळाच्या व्यवसायातही चांगले पैसे कमावीत आहेत. नैतिक बळावर उभ्या असलेल्या स्वच्छ वर्तनाच्या प्रभावी व्यक्ती या भागात कुठं दिसत नाहीत. नवगिरे किंवा त्यांच्या मित्रांनी काहीही केलं तरी त्यांचा हात धरणारा, थोपवणारा जुन्नरमध्ये कुणीही नाही. शिवाजी महाराजांचं जन्मस्थान म्हणून जुन्नरचे पुढारी प्रत्येक सभेत स्वतःची पाठ थोपटून घेतात. पण आज अशा योनिपूजेसारख्या प्रकारांचं ते जन्मस्थान झालं आहे.



३३६३
६०५५
२।३।८०

# इतस्ततः

अंधश्रद्धा हा विषय फार नाजूक आहे. या विषयावर कुठे बोलायला गेलो की त्यावर भरपूर चर्चा होते. लोक तावातावाने प्रश्न विचारतात. त्यांतला नेहमी येणारा प्रश्न म्हणजे, ‘ अंगात येणं हा चमत्कार नाही का ? अतिशय दुबळ्या स्त्रिया सुद्धा अंगात आल्यावर चारचार जणांना आवरत नाहीत, तासन् तास घागरी कशा फुंकू शकतात ? कोणी तरी शक्तीने त्यांच्या शरीरात प्रवेश केल्याशिवाय कसे शक्य आहे ? ’ गाणगापूरवरील लेखात उल्लेख केल्याप्रमाणे माझी बायको सुनंदा ही सायकियाट्रिस्ट आहे. तिने तिच्या पदव्युत्तर शिक्षणामध्ये ‘ अंगात येणे ’ हा विषय घेऊन त्यावर प्रबंध लिहिला आहे. त्या काळात अंगात येणाऱ्या स्त्रीपुरुषांचा ठावठिकाणा काढीत तिच्याबरोबर मी हिंडत होतो. शेकडो केसेस पाहून त्यातून वीस केसेस अभ्यासासाठी निवडल्या. त्यांची व्यक्तिमत्त्वांची पूर्ण तपासणी केली. बहुतेक सगळ्या स्त्रियाच होत्या. प्रत्येकीला, तुमच्या पहिल्यांदा अंगात कधी आले हा प्रश्न विचारायचो. इतकी जुनी आठवण प्रत्येकीला असायचीच असे नाही. अशा वेळी नातेवाईकांची मदत घ्यायचो. सगळ्यांच्या उत्तरांमध्ये एक गोष्ट समान होती, म्हणजे पहिल्यांदा अंगात यायच्या आधी तिला मानसिक धक्का बसलेला होता. किंवा ती मोठ्या मानसिक तणावाखाली वावरत होती. एका ब्राह्मणबाईंनी सांगितले, गांधीवधाच्या वेळी जाळपोळ झाली, त्यात आमचे घरदार जळाले. त्यानंतर आलेल्या पहिल्या शुक्रवारी माझ्या पहिल्यांदा अंगात आलं. एका तरुण मुलीने सांगितलं, दहावीचा एक पेपर अवघड गेला, त्या पेपरानंतर ड्रॉपच घेतला. नंतर माझ्या अंगात येणं सुरू झालं. खेड्यातल्या बहुजन-समाजातल्या स्त्रियांच्या बाबतीत सासूसुनांच्या मधला तणाव हे मुख्य कारण. सून नव्या गावात येऊन पडलेली असते. साधारण १५–१६ वर्षांची असताना लग्न झालेलं,

नवीन गाव. कुणाची ओळख नाही. सुनेला पहिल्या दोनचार वर्षांत 'सरळ' करून घ्यायचं सासरच्या मंडळींचं धोरण. अतिशय कमी खायला द्यायचं. तेही शिळपाकं. भरपूर काम. माहेरी ह्या मुलीवर कधीच इतकं काम पडलेलं नसतं. नदीवर धुणं धुवायला गेली तरी ओळखी नसतात. समजा, घरचा त्रास बोललीच आणि कुणी सासरी चुगली केली तर ? घरी पत्र पाठवायचीही चोरी. नवरा अशा वेळी नेमका मातृभक्त होतो. त्यात लग्नातल्या देण्याघेण्यावरून असमाधान राहिलं असलं तर मग विचारूच नका. अशा परिस्थितीत त्या मुलीचा मानसिक कोंडमारा होतो. तो बाहेर पडायला आपल्या समाजात संधीच नसते. मग हे अंगात यायला लागतं. तिचा परिस्थितीविषयीचा उद्रेक या घुमण्यातून, नाचण्यातून बाहेर पडू लागतो. अंगात देव येणं, या प्रकाराला समाजमान्यता असल्याने ते व्यक्त व्हायला इतर काही अडचण येत नाही. जी सासू छळ करीत असते, तीच हिच्या अंगात आल्यावर तिच्या पाया पडू लागते. या देवीला घाबरून तिचा छळही कमी होऊ लागतो. असा दोन्ही तऱ्हेने तिचा फायदा होऊ लागतो. पण त्याने प्रश्न कायमचा सुटतो का ? तर नाही. दर मंगळवारी किंवा दर शुक्रवारी अंगात यायला लागतं. तो दिवस यायच्या आधीपासून हिची चलबिचल व्हायला लागते. अंगात येऊन गेल्यावर दमून पडते. तिला खरंच वाटायला लागतं की आपल्या अंगात काहीतरी दैवी शक्ती आहे. आपल्याला पुढं काय होणार हे कळतं. मग ती त्या भ्रामक जगात राहू लागते. हळूहळू वास्तवाशी असलेला संबंध कमी कमी व्हायला लागतो. मग मंगळवार, शुक्रवार, अमावास्या–पौर्णिमाच नाही, तर कधीही बसल्याबसल्या अंगात यायला लागतं. अशा वर्षानुवर्षं ज्यांच्या अंगात येतं अशा स्त्रिया बऱ्याच पाहिल्या. त्या सगळ्या कुठल्याच कामाच्या राहिलेल्या नाहीत. त्या धड स्वयंपाक करू शकत नाहीत. संसार करू शकत नाहीत. मुलांना धड वाढवू शकलेल्या नाहीत. त्या जवळपास 'मेंटल केसेस' झालेल्या आहेत.

वर्षानुवर्षे अंगात येणाऱ्यांची अशी स्थिती असली तर क्वचित अंगात येणाऱ्यांचा वर्ग मोठा आहे, आणि त्यांची स्थिती जरा वेगळी आहे. विशिष्ट सणाला देवळात म्हणा, पूजेच्या ठिकाणी विशिष्ट वातावरण तयार झालं की लोकांच्या आपोआप अंगात येऊ लागतं. त्यांना आधीच्या स्त्रियांसारखा मानसिक धक्का, किंवा कोंडमारा असला काही प्रकार नसतो. सांस्कृतिक संकेत समाजात खोलवर रुजलेले असतात. ते सगळ्यांना माहीत असतात. माझ्या लहान मुलांना घेऊन मी आमच्या गावी ओतूरला गेलो होतो. शेजारच्या मुलींबरोबर त्यांची चांगली गट्टी जमली होती. पुण्याला आल्यावर माझी मुलगी, अंगात आल्यावर 'फू ऽ ऽ फू' करून विशिष्ट प्रकारे नाचतात तशी नाचत होती. मी तिला विचारलं, 'तू कुठं शिकलीस हे ?' ती म्हणाली, 'ओतूरला. शेजारची मुलगी अशीच नाचते.' म्हणजे इतक्या लहानपणापासून मुलं हे संकेत टिपत असतात. कुठल्या देवासमोर अंगात आल्यासारखं कसं नाचायचं याच्या

पद्धती ठरलेल्या असतात. आधी आळोखे पिळोखे द्यायचे, एकदम जोरात ओरडून डोक्याला हिसडा देऊन केस सोडून टाकायचे. मग घुमायला, नाचायला सुरुवात. खंडोबाचं नाचणं वेगळं, काळुबाईचं वेगळं. या प्रत्येकाचे वारही वेगळे असतात मेंटल हॉस्पिटलमधे ॲडमिट झालेल्या बऱ्याच स्त्रियांच्या आधी अंगात येत असतं, मेंटलमधे आल्यावर काही दिवसांतच वाराचं भान निघून जातं. असे किती मंगळवार, शुक्रवार येऊन जातात, पण त्यांच्या अंगात येत नाही. विशिष्ट वासाचे, आवाजाचेही संकेत निगडित असतात. दर्ग्यावर अंगात येतं तेव्हा धूप जाळलेला असतो. मोर-पिसांच्या कुंच्याने तो पसरवला जातो. काही ठिकाणी आरती सुरू झाली की घंटेच्या आवाजाने किंवा नगाऱ्याच्या आवाजाने बायका घुमायला लागतात. जगातल्या सगळ्या देशांत अंगात येण्याचे प्रकार आहेतच. आफ्रिकेमधे ताडाची पाने एकमेकां-वर आपटली की लोकांच्या अंगात येऊ लागते. तशी पाने आपल्याकडे आपटली तर अंगात येईल का ? शक्य नाही, कारण तो संकेत इथं रुजलेला नाही.

जोगेश्वरीच्या देवळात दुर्गाष्टमीला स्त्रिया— त्यातही कोंकणस्थ ब्राह्मण संख्येने जास्त— घागरी फुंकून, अंगात येऊन नाचतात. घागरीत त्या फुंकून आपला श्वास सोडतात. परत तीच हवा श्वासाने आत घेतात. घागरीमधे फुंकून फुंकून कार्बन डायॉक्साईड साठलेला असतो. तोच परत श्वासावाटे घेतला की एक प्रकारची गुंगी येते. त्या नशेत स्त्रिया नाचत असतात. ( पूर्वी हीच पद्धत वैद्यकीय शास्त्रात ॲनॅस्थेशिया म्हणूनही वापरली गेलेली आहे. ) आता दुबळ्या असून एवढं नाचू कसं शकतात ? त्यांच्या अंगात ती शक्ती कुठून येते, हा प्रश्न राहतो. आपल्या अंगात आपल्याला वाटते त्यापेक्षा बरीच शक्ती असतेच. आपण सारासार विचार करूनच ती शक्ती वापरतो. काही शक्ती ही राखीव म्हणून ठेवतो. अंगात येणारी माणसं जेव्हा 'ट्रान्स' मधे जातात तेव्हा या शक्तीवरची नियंत्रणं शिथिल होतात. आणि मग सगळी शक्ती बाहेर पडते. अगदी राखीव शक्ती सुद्धा वापरून टाकतात. आपल्या घरी लग्नकार्य असलं की आपण त्या दोनचार दिवसांत सुद्धा किती अचाट काम करतो. कारण त्यावेळी आपण राखीव शक्तीही बाहेर काढतो. पण नंतर मांडव परतणं झाल्यावर बरेचजण आजारीही पडतात. तसंच दुर्गाष्टमीला नाचणाऱ्या स्त्रियाही नंतर अंथरूण धरतात, आमच्या सुनंदाकडे औषधालाही येतात. वापरलेल्या शक्तीची किंमत ही मोजावीच लागते. चार माणसांनाही अशा एका माणसाला आवरता येत नाही, हा दैवी चमत्काराचा पुरावा होऊ शकत नाही. मेंटल हॉस्पिटलमधे दाखल करून घेण्या साठी एक्सायटेड पेशंट्स् आणले जातात, ते आपण बघावेत. पेशंटचे नातेवाईक, पोलिस, मेंटलचे अटेंडंट अशा दहादहा माणसांना ते आवरत नाहीत असे आपल्याला दिसेल.

सतत अंगात येणाऱ्या माणसांच्या अंगात दैवी शक्ती आहे असे मानून त्याच्या

पाया पडतो, हा त्याच्यावर आपण अन्यायच करीत असतो. उलट, त्याचा प्रश्न समजावून घेऊन त्याला योग्य त्या प्रकारची मदत करणे हे आपलं खरं काम आहे. त्यांना खरोखरीच मदतीची जरूर असते. सुनंदा आणि तिच्या सायकियाट्रिस्ट सहकाऱ्यांनी परभणी जिल्ह्यात हिंगोली, राणी सावरगाव या गावी अशा व्यक्तींसाठी शिबिरे घेतली. त्या भागात त्यांना गावेच्या गावे या अंगात येण्याने ग्रस्त झालेली आढळली. एकीच्या अंगात आलं की दुसरीच्या यायचं, असं गावातल्या बहुतेक जातींच्या अंगात यायचं आणि त्याचा त्यांना खरोखर त्रास व्हायचा. अंगात येण्यावर काहीतरी गोळी द्यायला एक बाई आली आहे असे समजताच सगळ्या स्त्रिया धावत आल्या आणि गोळ्या मागू लागल्या. सायकियाट्रिस्ट मंडळींनी त्यांच्यातल्या 'फ्रँक केसेस' बाजूला काढल्या. इतरांना तात्पुरते उपचार केले. फ्रँक केसेसना मेंटलला ॲडमिशनसाठी आणले.

अंगात येण्याला असलेली समाजमान्यता लक्षात घेऊन काही माणसे त्याचा गैरफायदाही घेतात. पुण्यात गुळआळीत एका माणसाच्या अंगात येते. तो माणूस वेडसरच आहे. तो अंगात आल्यावर असंबद्ध बडबडत असतो. त्याच्या भावाने त्यावर भरपूर धंदा करून घेतला आहे. लोक प्रश्न विचारायला जमतात. हा बडबडत असतो. लोकांना त्याची भाषा समजत नाही. फक्त भावाला त्याची भाषा समजते. मग तो प्रश्न विचारणाऱ्याला ती उलगडून सांगतो. समोर कळशी ठेवलेली आहे, तिच्यात लोक पैसे, नोटा टाकून जातात. त्यांच्या घरात सगळीकडे भक्तांनी दिलेले छोटे पितळी घोडे टांगलेले आहेत. एवढ्यात ते केंद्र चांगलेच भरभराटले आहे. काहीजण अंगात 'आणतात.' सेंट्रल बिल्डिंगमधल्या एका क्लार्कच्या रोज सकाळी आठला अंगात येतं. लोक जमतात. प्रश्न विचारतात. याचं साडेदहाला ऑफीस असतं. म्हणून बरोबर पावणेदहाला याच्या अंगातलं उतरतं. काळुबाईच्या जत्रेच्या आधी डोक्यावर देव्हारे, पाण्याच्या घागरी घेऊन छोट्या मिरवणुका निघतात. त्यापुढे दोघीचौघी अंगात येऊन नाचत असतात. एक तरुण मुलगा मला सांगत होता, 'मी यांची परीक्षा पाहण्यासाठी जोरात मोटार सायकल त्यांच्याजवळनं नेली. त्याबरोबर नाचत असताना पटकन सावरून उडी मारून बाजूला झाल्या.' देवदासी, वाघ्यामुरळी हे उपजीविकेसाठी अंगात आणून इतरांना देवीचा किंवा खंडोबाचा धाक दाखवून काहीतरी कमाई करीत असतात.

अंगात येण्याविषयी जसे सगळ्यांना कुतूहल असते तसेच भानामतीबद्दलही असते. अशा विलक्षण प्रकारांची कार्यकर्त्यांनी जिथे जिथे पाहणी केली तिथे त्यामागे एखादी मनोरुग्ण व्यक्ती तरी आढळली किंवा ते हेतुतः घडवून आणणारा कुणीतरी स्वार्थी माणूस तरी सापडला. दांडीवर कपडे आपोआप पेटत नव्हते, तर घरातली लग्न न जमल्याने, वय वाढलेली हिस्टेरिक मुलगी तो प्रकार करीत होती. रात्री घरात, कौलं

न फुटता मोठा दगड येऊन पडत होता. बाहेर, छपरावर पहारे बसवूनही कुणी सापडत नव्हतं. तर तिथं त्या घरातला एक दुर्लक्षित, दहाबारा वर्षांचा, वडील गेल्यामुळे आजोळी येऊन राहिलेला मुलगा तो दगड स्वतःच्याही नकळत टाकत होता. रेठरे येथे आपल्या भाडेकरूला काढण्यासाठी मालकाने हे प्रकार हेतुतः सुरू केलेले आढळले. कित्येकदा छोट्या कौटुंबिक प्रश्नांमध्येही लोक या भानामतीचा उपयोग करून घेतात. त्याचे उदाहरण माझे सासरे, गो. ना. सोहोनी यांनी सांगितले :

'मी आदिवासी भागात काम करीत असताना फिरतीवर होतो. त्या गावात गेल्यावर समजले की, एका घरात मध्यरात्री अचानक घरातील तान्हे मूल अंगणात जाऊन पडते. मी त्यांना म्हटले, मी मोठा मांत्रिक आहे. मी बघतो याकडे. त्यांच्या घरीच मुक्काम केला. जागा राहिलो. मध्यरात्री कधीतरी खुडबूड ऐकली. पाहिले तर मुलाची आई दार उघडून बाहेर उभ्या असलेल्या माणसाच्या (तो त्याच घरचा नोकर होता असं नंतर समजलं) हातात देत होती. नंतर तिने आतून कडी लावून घेतली. त्या माणसाने ते मूल चौकात ठेवून दिले. तिथली गार हवा लागल्यावर काही वेळाने ते मूल रडू लागले. मग सगळे उठले आणि धावत आले. मी काही बोललोच नाही. नंतर त्या बाईला मी शेतात एकटीला भेटलो. तिला म्हणालो, 'मला सगळी सिद्धी प्राप्त आहे. बोल, असा असा प्रकार करतेस की नाही?' ती घाबरून म्हणाली, 'हो. करते.' 'का करतेस?' मग तिने तिची अडचण सांगितली. ती मुंबईची. तिचं लग्न या खेड्यातल्या मुलाशी. इकडलं कुटुंब सधन, पण इथं सिनेमा नाही, छानछोकी नाही. तिनं नवऱ्यामागे धोशा लावला, आपण मुंबईला जाऊ. माझा बाप तुला कामाला लावेल. पण ह्याची वडलांना विचारायची छाती होत नव्हती. तशात मूल झालं. मग ह्या बाईने हा प्रकार सुरू केला. नोकराला सामील करून घेतलं. आणि कांगावा करायला सुरुवात केली की मी या घरात राहणार नाही, माझं मूल काही इथं जगणार नाही. हे तिचं म्हणणं ऐकल्यावर मग मी सासऱ्यांना भेटलो आणि समजावून सांगितलं आणि त्यांची परवानगी मिळवली.'

अशा घटना एखाद्या मनोरुग्णामुळे घडत असोत, किंवा स्वार्थातून काहीजण घडवीत असोत; त्यामुळे या गोष्टी समाजात अधिकच घट्ट रूढ होऊन बसतात. जे काही घडत असते त्यात आणखी आपला मीठमिरची, मसाला घालून लोक एक दुसऱ्याला सांगत राहतात. सभेत प्रश्न विचारणारे ठणकावून सांगतात, मी स्वतः डोळ्यांनी असा प्रकार पाहिलाय, बोला काय आहे याचं उत्तर? त्याला जरा अधिक खोलात जाऊन विचारलं तर तो त्या ठिकाणी गेलाच नव्हता असंही उघडकीला येतं. कारण अशा गोष्टींवर विश्वास ठेवायचा असं आधी ठरलेलंच असतं. मग ऐकलेल्या कुठल्याही बातमीची, अफवेची शहानिशा करायचा प्रश्नच नसतो.

मी नागपूर भागात फिरत असताना एका खेड्याबाहेरच्या पारावर एस. टी. ची

वाट पहात बसलो होतो. पारावर बरेच शेंदूर लावलेले दगड होते. वीसपंचवीस तरी असावेत. मला त्याविषयी जरा कुतूहल वाटले, म्हणून तिथं बसलेल्या एका म्हाताऱ्या गृहस्थांना विचारलं, ' हे कसले देव आहेत ? यांची नावं माहीत आहेत का ? ' तो म्हातारा हसला. म्हणाला, ' खरं सांगू का ? हा मधे आहे ना, तेवढाच देव आधी होता. कोणी याला शेंदूर लावायला आला की लावून झाल्यावर शेंदराचं बोट कुठं पुसायचं ? तर ते शेजारच्या दगडाला. नंतर येणाराला वाटायचं, हा थोडा शेंदूर लावलेला बी देव दिसतोय, मग तो मधल्याला लावल्यावर ह्याला बी फासायचा. आता तो ते बोट कुठं पुसणार ? तर त्याच्या पलीकडच्या दगडाला. असं करत ते इतके देव झालेत बघा. ' तोही हसला आणि मीही खूप हसलो. मनात येत होतं. भक्त देवाला जन्म घालतो असं म्हणतात ते किती खरं आहे !

ही गतानुगतिकता अशिक्षितांमधे असते असा माझा पूर्वी समज होता. पण आता याबाबतीत फिरायला लागल्यावर दिसतं, अशिक्षित एक वेळ परवडले, अशी सुशिक्षितांमधे अंधश्रद्धा आहे. अडाण्यांना समजावून दिलं तर पटू शकते. पण शहाण्यांना समजावायला गेलं तर तेच उलट विज्ञानाची परिभाषा वापरून आपल्याला उलट समजावून देऊ लागतात. साध्या साध्या बाबतीतल्या कार्यकारणभावाला सुद्धा आम्ही किती पारखे झालेलो आहोत. काही वर्षांपूर्वी वाचलेली बातमी आठवली. सुप्रसिद्ध साहित्यिक गो. नी. दांडेकर हे शंकराचार्यांचे दर्शन घेऊन ( बहुधा सातारा मुक्कामी ते त्यावेळी असावेत ) कोल्हापूरला जात असता त्यांच्या मोटारीला अपघात झाला. पण ते बचावले. त्यावर पत्रकारांनी प्रतिक्रिया विचारली असता ते म्हणाले, ' शंकराचार्यांची कृपा म्हणून मी वाचलो ! ' आता शंकराचार्यांची कृपा होती तर मग त्यांनी अपघातच का होऊ दिला, असा प्रश्न त्यांच्या मनात का आला नाही ? की अपघात घडवून आणून त्यातून वाचवायचे आणि आपल्यावरची श्रद्धा बळकट करायची असाच शंकराचार्यांचा मूळ बेत होता ? ' रमा माता ' नावाच्या प्रसिद्ध गुरू होत्या. त्यांच्यावर मी सविस्तर लेख लिहिला होता. (' संभ्रम ' या पुस्तकात तो आहे. ) त्यांचे बोर्डवेकर नावाचे सुशिक्षित भक्त कम कारभारी होते. ते सांगायचे, ' माऊलींची माझी गाठ पडली आणि माझं आयुष्यच बदललं. ज्या धंद्यात मी हात घातला तिथं मला यशच यश मिळत गेलं. माऊली प्रत्येक क्षणाला माझं रक्षण करीत आहेत. ' मी लेख लिहिल्यानंतर मला समजलं की बोर्डवेकर हार्टअॅटॅकने वारले. इतके तरुण, सशक्त गृहस्थ की मला धक्काच बसला. मला वाटलं, आता बोर्डवेकरांच्या बायकोची माऊलींवरची श्रद्धा उडेल. पण तसं झालं नाही. उलट, त्या घरदार सोडून माऊलींच्या मंगलोरच्या आश्रमात जाऊन पूर्ण वेळ माऊलींची सेवा करू लागल्या. पुढे माऊलीही अचानक वारल्या. आता हा आश्रम कोण चालवणार ? तर बोर्डवेकरांच्या भाचीवर ही जबाबदारी सगळ्यांनी टाकलीय. तिची तशी मनातून

इच्छा नाही, पण ती या भोवतीच्या आप्तेष्टांच्या दडपणामुळे बोलू शकत नाही, तिला कोंडमारा असह्य होऊन मानसिक विकृती निर्माण व्हायच्या बेतात आहे असे तिच्या जवळच्या एका व्यक्तीने मला सांगितले.

आपला सुशिक्षित मध्यमवर्ग 'गुरू' या प्रकाराच्या आहारी गेलेला दिसतो. एखादी व्यक्ती 'अवतार' आहे असे मानून तिची कृपा मिळवायची, आणि ही कृपा कशाला? तर आपल्याला भौतिक सुखे, चैनीची साधने, नोकरीतील वरची जागा असल्या गोष्टी मिळवायला. त्यामुळे कोण असा अवतार आपल्या आसपास सापडतोय याच्या शोधात ते असतात. माझ्या मित्राचा पुतण्या त्याला सांगू लागला की मला असा एक अवतारी पुरुष सापडलाय. त्यांच्या अंगात खरंच काही पॉवर्स आहेत. मी त्यांना एकदा घरी चहाला आणू का? मित्र म्हणाला, आमचा काही अशा गोष्टींवर विश्वास नाही. पण तुला घरी आणायचं असलं तर आण. पाहुणा म्हणून त्यांचं आम्ही स्वागत करू. मग पुतण्या त्यांना घरी घेऊन आला. मित्र चाट. कारण त्याला वाटलं त्यापेक्षा माणूस वेगळाच निघाला. सफारी सूट, बूट, भांगपट्टी केलेला. मित्राने घरातून चहा आणला. अवतारी पुरुषाने कपातून चहा बशीत ओतला. एक घोट घेतला आणि उरलेला चहा असलेली ती बशी मित्रासमोर धरली. मित्राला काही कळेचना. त्यावर अवतारी पुरुष डोळे खास आध्यात्मिक करून म्हणाले, 'घ्या. प्रसाद आहे.' मित्राला मळमळूच लागले. त्याने ती बशी घेतली. जरा आलोच म्हणून आत जाऊन बेसिनमधे ओतून टाकली. पण ज्या अर्थी त्या माणसाने उष्टा चहा मित्रापुढे धरण्याचे धाडस केले त्या अर्थी अनेक जण तो प्रसाद म्हणून पीत असणार!

कुठल्याही इतर माणसांपेक्षा डॉक्टरला शरीरशास्त्राची आणि रोगामागच्या कार्य-कारण भावाची जास्त माहिती असणार. पण एका सर्जनने मला या बाबतीत अगदी चाट केले आहे. गरवारे कॉलेजमधे भरणाऱ्या एका क्लबच्या मीटिंगमध्ये मला अंधश्रद्धा या विषयावर बोलायला बोलावले होते. भाषणानंतर प्रश्नोत्तरे सुरू झाली. एक डॉक्टर उठले. ते मॉडेल कॉलनीत सर्जन म्हणून प्रॅक्टिस करतात. त्यांचे स्वतःचे हॉस्पिटल आहे. ते म्हणाले, 'तुमची नजर काळी म्हणून तुम्हाला सर्व काळेच दिसते. माझाही पूर्वी असल्या गोष्टींवर विश्वास नव्हता. पण मला प्रत्यय आला म्हणून मी विश्वास ठेवू लागलो. आमच्या समोर मिटकर महाराजांचा आश्रम आहे. पूर्वी मी इतरांपाशी त्यांची थट्टाही करायचो. माझ्या हॉस्पिटलमधे एक प्रोस्टेट ग्लँड वाढलेला पेशंट ऑपरेशनसाठी दाखल झाला होता. मी या महाराजांची परीक्षा पाहण्यासाठी त्याला घेऊन गेलो. महाराजांना म्हटले, तुमच्यात पॉवर्स आहेत तर याची ग्लँड जिरवून दाखवा. ते हसले. त्यांनी त्या ग्लँडच्या भागावर हात ठेवला आणि काय आश्चर्य! नंतर मी मेडिकली तपासून पाहिलं तर ती ग्लँड खरोखरीच पूर्णपणे जिरून

गेली होती. बोला, यावर तुमचे काय आहे उत्तर ?' मला काय बोलावे ते कळेना. सरळ अविश्वास दाखवता येईना. मी म्हणालो, 'तुमचा अनुभव खराही असेल. फक्त तो पडताळा मला येऊ द्या. आपण ससूनमधून दहा प्रोस्टेटचे पेशंट्स घेऊन जाऊ. त्यांतल्या एकाही पेशंटची ग्लँड जरी त्यांनी जिरवून दाखवली तरी मी त्यांच्या पॉवर्स मान्य करीन.' त्यावर ते गडबडले. हे सिद्धपुरुष नेहमीच चमत्कार करून दाखवतात असे नाही. तुम्ही त्यांची परीक्षा घेणारे कोण ? असे ते बोलू लागले.

आमचे एक ओळखीचे काका आहेत. त्यांच्या घरी आम्ही गेलो होतो. काका म्हणजे या गुरूकडून त्या गुरूकडे असे सतत तेवढ्याच उत्साहाने जात असतात. त्यांच्या घरात अनेक गुरूंच्या फोटोंचे संमेलनच होते. काका आत गेले होते. सुनंदा आणि मी ते फोटो पहात होतो. कुठेही न पाहिलेले हे सगळे महाराज होते. कुणाची मान वाकडी पडलेली, कुणी कुठेतरी डोळे लावलेले, एकाने तर मुकुट घातलेला, खाली भरजरी पोशाख केलेला, पण जीभ लोंबतेय, लाळ गळतेय. वयाने लहान दिसत होते. सुनंदा म्हणाली, 'हे सगळे मतिमंद दिसताहेत की नाही ?' मी दचकून म्हणालो, 'मोठ्याने बोलू नकोस. काकांनी ऐकलं तर ?' तेवढ्यात काका आलेच. आम्ही मुकुटवाल्या महाराजांचा फोटो बघत असल्याचं पाहून ते उत्साहाने म्हणाले, 'अहो, हे फार मोठे सिद्धपुरुष आहेत. त्यांना अन्नाची शुद्ध नसते. भरवावं लागतं.' सुनंदा माझ्याकडे बघून हसली. काका पुढे म्हणाले, 'अहो, कसलंच भान नसतं. शौच्यालासुद्धा नेऊन बसवावं लागतं.' आता तर सुनंदा मोठ्यानेच म्हणाली, 'बघ, मी म्हणत नव्हते का ?' पण काकांना ते काही समजलं नाही. ते इतर गुरूंविषयीही उत्साहाने सांगत होते, 'ते अमक्या गावचे अमके महाराज... दर्शनाला कुणी गेलं की मिठीच मारतात. अगदी पुरुष असो... स्त्री असो... ते अमके महाराज भक्ताला एक मुस्कटातच मारतात. असा प्रत्येकाचा प्रसाद वेगळा असतो. तो आपल्याला समजला पाहिजे, घेता आला पाहिजे.'

अशा तऱ्हेचा खुळचटपणा फक्त हिंदुधर्मातच चालतो असे नाही. तर तो सगळीकडेच आहे. आधुनिक जगात रूढ असलेल्या ख्रिश्चन धर्मातही असा भरपूर मालमसाला भरलेला आहे. मधे पुण्यात होस्टमा नावाचे ख्रिश्चन स्वतःला संत म्हणवून घेणारे गृहस्थ आले होते. त्यांच्या पुणेभर जाहिराती लागल्या होत्या. आंधळ्याला दृष्टी देण्याचं, पांगळ्यांना चालतं करण्याचं, सर्व तऱ्हेच्या व्याधी दूर करण्याचं आश्वासन त्यांनी पोस्टर्समधे दिलं होतं. लाल देवळासमोरच्या ग्राउंडवर प्रचंड मेळावाच भरला होता. तो पहायला गेलो. होस्टमा अगदी सुटाबुटात होते. जमाव बहुतेक इथल्या ख्रिश्चनमंडळींचा. स्टेजवर ते खालून बोलवायचे. काय होतंय असं विचारायचे. एक बाई स्टेजवर चढली. ती म्हणाली, 'चालता येत नाही.' होस्टमा म्हणाले, 'वॉक, यू कॅन वॉक.' ती बाई चालत परत गेली. होस्टमांनी जिंकल्याच्या

आविर्भावात हात वर केले. लोकांनी टाळ्या वाजवल्या. खरोखरीच, त्या बाईला चालता येत नव्हतं का ? ती बाई त्यांनी आधी ठरवून दिल्याप्रमाणे वागणारी नव्हती कशावरून, असे प्रश्न माझ्या मनात आले.

गोव्यात गेलो तेव्हा तिथल्या कोपऱ्याकोपऱ्यावरचे क्रॉस आणि त्यापुढच्या मेणबत्त्या पाहून चकित झालो. पुण्यात गणपती किंवा मारुतीसुद्धा इतक्या संख्येने नसतील. त्यावेळी सेंट झेवियरचे शव दर्शनासाठी बाहेर ठेवले होते. तिथे यात्राच उसळली होती. त्या यात्रेवर पोट भरणारे बरेच लोक होतेच. पण या सगळ्यामुळे चर्चचा सुद्धा खूपच फायदा होत असावा. काही वर्षांपूर्वी सुमारे ६४–६५ सालात मी ते शव पाहिले होते. म्हणजे काचेच्या पेटीतून काळा पडलेला सुरकुतलेला पाय तेवढा कपड्यांबाहेर ठेवलेला दिसत होता. या प्रकाराला ते 'एक्स्पोझिशन' म्हणतात. एक्स्पोझिशनवर एका ख्रिश्चन सुधारक माणसाने टीका केली, म्हणून त्याच्याविरुद्ध चर्चेसनी खूप काहूर उठवले. चर्चेसमधल्या प्रवचनांनंतर त्याच्यावर टीका करण्यात आली. त्याला पाखंडी ठरवण्यात आले. म्हणून त्यांना मी भेटायला गेलो. आश्चर्य म्हणजे ते एक ७५ वर्षांचे म्हातारे गृहस्थ होते. डॉ कार्मो अझेवेदो त्यांचं नाव. ते मेडिकल डॉक्टर असून इतिहासाचा त्यांचा व्यासंग आहे. काही पुस्तके त्यांनी लिहिलेली आहेत. त्यांनी त्यांचा तो गाजलेला लेख वाचायला दिला. 'गोवा टुडे' च्या नोव्हेंबर १९८४ च्या अंकात होता.

सुरुवातीला सेंट झेवियर यांचे अल्पचरित्र त्यांनी दिले आहे. १५०६ सालामध्ये जन्मले. ४६ व्या वर्षी ते मृत्यू पावले. पॅरिसमध्ये शिकणारा हा सधन घरातील मुलगा सेंट लॉयलाचे शिष्यत्व स्वीकारून मिशनरी झाला. पुढच्या छोट्या आयुष्यात पर्शिया ते जपान ह्या खंडात त्याने धर्मप्रसारासाठी संचार केला. गोव्यात पोर्तुगीजांनी धर्मांतरे घडवून आणली तरी तिथल्या लोकांना ख्रिश्चन धर्माची तत्त्वे, आचार काही माहीत नव्हते. तिथली चर्चेस आणि धर्मव्यवस्था यांना आकार दिला. चीनमधे धर्मप्रसार करायला जायची त्यांची तीव्र इच्छा होती. पण चीनच्या राजाने भूमीवर उतरायला परवानगी दिली नाही. चीनजवळच्या सॅन्सियन बेटावर चारपाच शिष्यांसह ते अडकून पडले. आणि एका आठवड्याभरातच ते तिथे हताश अवस्थेत मृत्यू पावले. त्यांना तिथे चिनी पद्धतीच्या कॉफिनमध्ये घालून, मांस लवकर खलास व्हावे म्हणून तिथल्याच पद्धतीप्रमाणे त्यात चुना घालून ते तिथे पुरण्यात आले. दोन महिन्यांनंतर गोव्याला जाणाऱ्या जहाजाबरोबर ती कॉफिन पाठवण्यात आली. पण वाटेत मलाक्का येथे ती थांबवण्यात येऊन तिथे पुरण्यात आली. तिथे दगडात खड्डा खणून कॉफिनशिवाय प्रेत पुरण्यात आले. तो खड्डा लहान असल्याने त्यात कोंबताना त्यांचे मानेचे, नाकाचे हाड मोडले. बरगड्या मोडल्या. पुढे पाचसहा वर्षांनी ते प्रेत परत उकरून गोव्याला नेण्यात आले आणि आजपर्यंत ते तिथेच आहे.

या झेवियर यांच्याबाबतीत लोकांचा असा रूढ समज आहे की एवढे होऊनही त्या शरीराला काहीही झाले नाही, तो दैवी चमत्कार आहे, ' इनकरप्टिबल बॉडी ' असे त्याचे वर्णन केले जाते. हा समज रूढ करण्यात चर्चचा फार मोठा वाटा आहे. डॉ. कार्मी अझेवेदो यांनी या समजास सुरुंग लावायचा प्रयत्न केला आहे. त्यांनी डॉ. पाचेको–दो–फिगरेदो यांनी १९७७ साली लिस्बनच्या ' ॲकॅडमी ऑफ सायन्स ' मधे वाचलेल्या एका शोधनिबंधाचा आधार घेऊन लेख लिहिला आहे. एखादी लोकोत्तर व्यक्ती विशेषतः धार्मिक पंथातली– जेव्हा मृत्यू पावते तेव्हा तिच्या शरीराला दैवी समजून शिष्यगण ते कुठे कुठे ठेवून ' स्थाने ' निर्माण करतात, हा बऱ्याच धर्मांचा अनुभव आहे. महंमद पैगंबरांचा केस– हजरत बाल– काश्मिरात आहे. बुद्धाच्या दातावर स्तूप बांधल्याचे ऐकले आहे. पण सगळ्यांत सेंट झेवियर यांच्या शरीराचे जे नंतर हाल झाले, तेवढे कुणाचे झाले नसतील. सॅन्सियन बेटावरून मलाक्काकडे कॉफिन नेणाऱ्या सांताक्रूझ या जहाजाच्या कप्तानाने डाव्या गुडघ्या खालच्या भागातला बोटभर मांसाचा तुकडा स्वतःसाठी कापून घेतला. गोव्यात प्रेत आल्यावर डोना इस्बेल कोरात या पोर्तुगीज उमराव स्त्रीने उजव्या पायाचे एक बोट आणि तिच्या भावाने बरेच मांस काढून स्वतःच्या ' नॉमिना ' ( पवित्र वस्तू ठेवायची पेटी )मध्ये ठेवण्यासाठी घेतले. व्हॅलेंटी नावाच्या धर्मगुरूने त्याच्या चर्चसाठी पायाचे एक बोट काढून घेतले. सुपिरिअर जनरल क्लाडिओ ॲक्वाव्हिवा याच्या ऑर्डरवरून १६१४ साली उजवा संपूर्ण हात तोडण्यात येऊन त्यातील पुढचा हात रोममधील जेसुईट मदर चर्चकडे, दंडाचे दोन भाग करून त्यातला एक मलाक्का व दुसरा कोचीन कॉलेजांकडे पाठवण्यात आला. खांद्याचे हाड मकाऊ कॉलेजकडे पाठवले गेले. ( हे कापत असताना भूकंप झाले अशी त्याच्या चरित्रकारांनी नोंद केली असली तरी अलीकडच्या संशोधनावरून त्याला काहीही ऐतिहासिक आधार नाही. ) पुढे बारा वर्षांनी त्यावेळच्या सुपिरिअर जनरल व्हॅटेलिस्की याच्या आज्ञेवरून सेंट झेवियर यांच्या प्रेतातील छाती आणि पोटातील सर्व अवयव काढून त्यांचे लहान तुकडे करून बऱ्याच देशांकडे पाठवण्यात आले. यानंतर प्रेताची परिस्थिती अधिकच बिकट होत गेली. एक्स्पोझिशनच्या वेळी शरीराची तपासणी करण्यात यायची. त्यावेळी काही भाग ' नाहीसे ' झालेले दिसायचे. उदा. १६५४ साली पायाचे चौथे बोट, १८९० साली तिसरे आणि १९१० साली दुसरे बोट नाहीसे झालेले आढळले. लोकांना हे समजले तर लोकक्षोभ होईल या भीतीने गोव्याच्या काही प्रांतिक धर्मगुरूंनी रोमच्या सुपिरिअर जनरलकडे हे एक्स्पोझिशन बंद करून ते प्रेत कायमचे पुरून टाकायला परवानगी मागितली. पण ती नाकारली गेली. आता ते प्रेत काळे पडलेले आहे. डोळे थिजून गेले आहेत. अवयव झडून चालले आहेत. आता धर्मगुरूंची भाषाही थोडी बदलली आहे. पूर्वी ' इनकरप्टिबल बॉडी ' म्हणायचे. आता सावधगिरीने त्यास ' सेक्रेड

रेलिक्स' (पवित्र अवशेष) म्हणू लागले आहेत.

पण एक्स्पोझिशन हा प्रकार मात्र चालू आहेच. या एक्स्पोझिशनचे चमत्कारही गोव्यात प्रसिद्ध आहेत. उदा. १६८३ मध्ये संभाजीची गोव्यावर स्वारी होणार होती. तो गोव्याच्या सीमेवर येऊन ठेपला. गोव्यातील सांतो इस्तेवॉव इथे छापा घालणार होता. गोव्याचा व्हाइसरॉय काऊंट ऑफ आल्वेर हा गडबडून गेला. त्याने सेंट झेवियर यांना एक्स्पोझ करून साकडे घातले. आणि त्याबरोबर गोव्याच्या दारावर येऊन ठेपलेला संभाजी परत गेला. कार्मी अझेवेदो यांनी याबाबतीत लिहिले आहे की सेंट झेवियरच्या चमत्कारामुळे तो परत गेला नसून त्याच वेळी मोठी मोगल फौज दक्षिणेकडे उतरत असल्याची बातमी आल्यामुळे त्याने माघार घेऊन तो निघून गेला. डिसेंबर १९६१ मधे भारतीय फौजा गोव्याच्या सीमेवर उभ्या राहिल्या, तेव्हा १६८३ चा चमत्कार घडेल अशा आशेने परत सेंट झेवियर यांना पोर्तुगीजांनी साकडे घातले. पण त्याचा उपयोग झाला नाही. जाताना झेवियर यांचे पवित्र अवशेष घेऊन जायचा पोर्तुगीजांचा विचार होता. पण लोकमत प्रक्षुब्ध होईल या भीतीने ते नेले नाहीत. पण त्याची अतिशय भारी, चांदीची, गोव्यातील कलाकुसरीचा उत्तम नमुना असलेली शवपेटी त्यांनी बोटीने पोर्तुगालला नेली.

आज भारतातला ख्रिश्चन समाज अनेक अंधश्रद्धा, गैरसमजुती यांनी भरलेला आहे. एवढेच काय, अमेरिकेसारख्या आधुनिक संपन्न देशात बायबलमधले अक्षर न् अक्षर खरे आहे, (मधल्या काळातील शास्त्रीय ज्ञानाने त्यात काहीही फरक पडला नाही) असे मानणारा एक वर्ग आहे. अमेरिकेत चेटूक, करणी करणारे अघोर पंथीय छोटे गटही आहेत. फक्त त्यांचे प्रमाण आपल्यापेक्षा फार कमी आहे. देव, धर्म यांना वैयक्तिक बाब मानणारा आणि वैयक्तिक आणि सार्वजनिक व्यवहारात विज्ञानास प्रमाण मानणाऱ्यांचा प्रभाव समाजजीवनावर आहे. आपल्याकडे हे उलटे असल्याने हा प्रश्न निर्माण झाला आहे. सेंट झेवियरच्या बाबतीत संशोधन करणारे डॉ. पाचेको हा परखड निबंध लिहू शकले आणि तो उचलून धरणारे डॉ. कार्मी अझेवेदोंसारखे लोकही गोव्यात निघू शकले ही त्यातली अभिमानाची बाब आहे.

आपल्याकडला सुशिक्षित समाज कॉम्प्युटरसारख्या आधुनिक साधनांशी खेळत असला, तरी त्याने जुन्या कल्पना अजून सोडलेल्या नाहीत. मी खानदेशमधल्या एका कॉलेजात गेलो होतो. भाषण झाल्यावर प्राचार्य, प्राध्यापक मला कॉलेज दाखवायला निघाले. आमच्याकडे कॉम्प्युटर सेंटरसुद्धा आहे असे अभिमानाने सांगितले. एका खोलीत कॉम्प्युटर होता. समोर तो चालवणारा होता. मी म्हटले, काहीतरी चालवून दाखवा याच्यावर. त्याने प्रोग्रॅमची एक डिस्क घातली. काही बटने दाबल्यावर स्क्रीनवर आले. 'हिंदू वे ऑफ अॅस्ट्रॉलॉजी.' मग माझ्या डोक्यात प्रकाश पडला की कॉम्प्युटरवर भविष्य पाहण्याचा हा प्रोग्रॅम. मला भविष्य पाहण्यात

अजिबात इंटरेस्ट नव्हता. पण कॉम्प्युटर काय सांगतोय हे पाहण्याची उत्सुकता होती. तेवढ्यात त्या माणसाने एक बटन दाबले. त्याबरोबर मृत्यू, करिअर, कलांमधे गती, साहित्यात गती असे अनेक कॉलम्स आले. तो म्हणाला, 'यातल्या कुठल्या बाबतीत तुम्हाला इंटरेस्ट आहे?' मी म्हटले, 'साहित्यात मला काय गती आहे पाहू.' त्याने ते बटन दाबले. त्याबरोबर त्या गडद स्क्रीनवर हिरव्या ओळी उमटत गेल्या. 'वाचन : तुम्हाला वाचनाची अजिबात आवड नाही. लेखन : लेखन हा तुमचा प्रांतच नाही. तुम्हाला यात गती नाही. तुम्ही याकडे न वळलेलेच बरे.' मी हसू लागलो. सगळे चाट पडले होते. पण मी हसल्यावर सगळे हसू लागले. मी मनात म्हटलं, माझ्या पुस्तकांचा दर्जा कसा का असेना, पण माझी अकरा पुस्तकं प्रसिद्ध तर झाली आहेत!

भविष्य हे अजूनही सुशिक्षित समाजाच्या (आणि एकूणच समाजाच्या) डोक्यावर असलेले आणखी एक मोठे ओझे आहे. या मागे खरोखरच काही शास्त्र आहे की नाही, शास्त्र म्हणायला कुठल्या परीक्षांमधून जावे लागते याचा काहीही विचार न करता लोक त्यावर लग्नासारखे किंवा मुलांना कुठल्या लाईनला घालायचे किंवा तत्सम अतिशय महत्त्वाचे निर्णय अवलंबून ठेवतात. मुलाला मुलगी पसंत पडते, मुलीला मुलगा पसंत पडतो, घरच्या लोकांना एकमेकांची घरे पसंत पडतात. अचानक कुठला तरी मामा कुंडली पाहणारा असतो, तो कुंडल्या बघतो आणि सांगतो, 'हे जमणे नाही. जिवाला धोका आहे.' सगळ्यांना हे लग्न अगदी व्हायला हवे असते. पण करणार काय? माझ्या मित्राच्या बाबतीतच असे झाले आहे. त्याचे वडील तो लहान असतानाच गेले. असे पत्रिकेवरून लग्न मोडल्यावर मी त्याच्या आईला म्हणालो, 'अहो, काय त्यात वाईट होते? पत्रिका जमलेली सगळी लग्ने तरी कुठे यशस्वी होतात? याच्यावर काही अवलंबून नाही.' त्याची आई मान हलवीत म्हणाली, 'नको, विषाची परीक्षा नको. एकदा अनुभव घेतला ते खूप झाले.' त्याच्या वडलांच्या जाण्याचा आणि या लग्नाचा काय संबंध? पण असे मुद्दे पुढे आले की मग सगळे हळवे होतात आणि सारासार विचार सुटतो.

कॉलेजमधे असताना मी पामिस्ट्री शिकलो होतो. कुंडलीचा थोडाफार अभ्यास केला होता. ट्रीपला मुलामुलींचे हात बघून भविष्य सांगायचो. त्यामुळे माझ्याभोवती बऱ्यापैकी घोळकेही जमायचे, मलाही बरे वाटायचे. पुढे सुनंदाशी माझे ठरले. माझ्या मामाने मला सारखा आग्रह केला की, दोघांची कुंडली त्याच्या ओळखीच्या प्रसिद्ध ज्योतिष्याला दाखवू. माझी तयारी नव्हती, पण खूपच आग्रह झाल्यावर मी तयार झालो. सुनंदाकडे कुंडली नव्हती. पण जन्मतारीख आणि जन्मवेळेवरून मामाने ती तयार करून घेतली. आम्ही त्या ज्योतिष्यांकडे गेलो. त्यांनी दहा मिनिटां-तच सांगितले, 'हे लग्न करू नका. सहा महिन्यांत घटस्फोट ठरलेला आहे.' मी

हादरलोच. ते म्हणाले, 'घटस्फोटावर निभावलं तरी बरं, असं समजा.' असं म्हणून त्यांनी ग्रहांच्या भाषेत मला समजावून सांगितलं. पण मी ऐकण्याच्या मनःस्थितीतच नव्हतो. दोन दिवस आणि रात्री सतत उलटसुलट विचार करीत राहिलो. आणि शेवटी काहीही विचार न करता ठरवलं, की हे लग्न करायचंच. त्या क्षणापासून मी परत कुणाला माझी कुंडली दाखवली नाही. सुनंदाचं माझं लग्न वीस वर्षं चांगल्या रीतीनं टिकलं आहे. आणि मी घेतलेला लग्नाचा निर्णय हा माझ्या मते सर्वांत बरोबर ठरलेला निर्णय असावा. यावर कुणी म्हणेल, 'ते ज्योतिषी चांगले नसतील. त्यांच्या शास्त्रात त्यांना चांगले कळत नसेल.' पण आपण सर्वसामान्य माणसे शेवटी अशाच ज्योतिष्यांकडे जातो आणि त्यांच्या सांगण्यावर आपल्या आयुष्यातले महत्त्वाचे निर्णय घेतो.

या काळात लोक लग्नात कुंडल्या पाहिनासे झाले असतील असा माझा समज होता. पण बंगलोरच्या एका नातेवाईकांची मुलगी लग्नाची आहे आणि त्यांनी मला पुण्यातले काही पत्ते कळवून चौकशी करून यायला सांगितले. त्या निमित्ताने मी काही ठिकाणी गेलो. तेव्हा तो समज खोटा ठरला. एका ठिकाणी मुलाच्या वडलांनी सांगितले, 'मुलीची पत्रिका हवी.' मी म्हटले, 'ठीक आहे, मी त्यांना तसे कळवतो.' ते पुढे म्हणाले, 'त्यांना हेही कळवा की मुलाची पत्रिका मिळणार नाही.' मी चकित होऊन म्हटले, 'का?' ते म्हणाले, 'आम्हाला थोरल्या मुलाच्या वेळी फार वाईट अनुभव आले आहेत. आपण आपली भोळेपणाने पत्रिका द्यायचो. वधूपित्यांमध्ये ती पत्रिका सर्क्युलेट झाली. मग लोक आपापल्या मुलींची पत्रिका त्या पत्रिकेला जमेल अशा रीतीने मॅन्युप्युलेट करून आणून देऊ लागले. दहा रुपये दिले की ज्योतिषी कसलीही पत्रिका करून देतात.' मी मनात म्हटले, पण तेच आमच्या मुलीच्या पत्रिकेबाबतही होऊ शकते की. पण मुलाची बाजू वरचढ असल्याने ते ही भूमिका घेऊ शकत होते. दुसऱ्या एका ठिकाणीही चौकशीसाठी जावे लागले. आमच्या नातेवाईकांनी मला लिहिले होते, 'आम्ही रोहिणीतील जाहिरात वाचून त्या स्थळाला पत्र लिहिलेच आहे. अजून उत्तर नाही. तुम्ही प्रत्यक्ष जाऊन चौकशी करा.' मी तिथे गेलो. त्यांना सांगितले. ते म्हणाले, 'बंगलोरचे ते अमके ना, थांबा.' म्हणून वही काढली. ए बी सी डी प्रमाणे त्यांनी ते आडनाव शोधून काढले. 'त्यांना आम्ही लगेचच अमक्या तारखेलाच कळवले की पत्रिका जमत नाही. योग नाही.' त्यांची बायको दारात उभी होती. त्या म्हणाल्या, 'माझा भाऊच पत्रिका पाहणारा आहे. जाहिरात दिल्यापासनं रोजची पाचदहा पत्रं येतात. मी संध्याकाळी त्याच्याकडे नेऊन देते. रात्री तो बघतो. सकाळी ऑफिसला जाण्याच्या वेळेला तो रिपोर्ट आणून देतो. मी लगेच दुपारी उत्तर पाठवून टाकते.' ते गृहस्थ म्हणाले, 'म्हणजे बरं, कुणी आपल्यासाठी अडकून राहायला नको.' मला 'रिपोर्ट' शब्द

ऐकून पॅथॉलॉजी लॅबच्या रिपोर्टाचीच आठवण झाली.

गुरूंच्या बाबतीत जसं आहे तसंच ज्योतिष्यांच्या बाबतीत आहे. भविष्य खोटं टरलं तरी लोक विश्वास ठेवणे सोडत नाहीत. ते फार तर ज्योतिषी बदलतील. काहीही भविष्य वर्तवलं तरी ते काही वेळी बरोबर येण्याची शक्यता असतेच. बरोबर आलेले तेवढे आपण लक्षात ठेवतो. कारण त्यावर विश्वास ठेवायचा असे समाजात रुजलेलेच आहे. खोटे टरलेले आपण आपोआप विसरून जातो. एका ज्योतिष्याला मित्राने त्याचे भविष्य खोटे ठरल्यावर त्याचे कारण विचारले. त्यावर ज्योतिषी म्हणाला, 'त्याचं काय आहे, तुमच्या कुंडलीबरोबर तुमच्या आई-वडिलांची कुंडली पण दाखवायला हवी होती. कारण त्यांची छाया तुमच्या कुंडलीवर असते.' मग हे त्याने आधीच सांगायला हवे होते. समजा, जरी आईवडलांच्या कुंडल्या, बायकोची कुंडली एवढे जरी आधीच पुरवले आणि तरीही भविष्य खोटे ठरले तर ज्योतिषी म्हणतात, 'शेवटी प्रत्येकाचे प्रारब्ध असते, त्यामुळे असे होते.' मग भविष्य पाहण्यात अर्थच काय? एकतर कुंडल्या पाहण्यात दोन पद्धती. त्यामुळे दोघांच्या भविष्यात फरक पडतो. बऱ्याच जणांच्या जन्मवेळा बरोबर नोंदलेल्या नसतात. त्यात आई-वडील, प्रारब्ध असले फॅक्टर्स. शेवटी भविष्यात जे लिहिले आहे, ते बदलता येणार नसेल तर भविष्य पहायचे कशाला? काही जण म्हणतात, 'नाही नाही. बदलता येऊ शकते. अमक्या वेळेला जाऊ नका, अपघात होईल, तर ती वेळ आपल्याला टाळता येते.' मग तुम्ही भविष्यच खोटं पाडता.

पुण्यात वसंत व्याख्यानमालेने 'फलज्योतिष- सत्य की थोतांड' असा विषय ठेवला होता. त्यात गोऱ्हेशास्त्री, केळकर, भट असे प्रसिद्ध ज्योतिषी होते. मी विरुद्ध बाजूचा म्हणून मलाही बोलावले होते. मी अनेक प्रश्न त्यांच्यापुढे ठेवले. एका आईवडलांपोटी जन्मलेल्या, एका वेळी, एका जागी जन्मलेल्या जुळ्या मुलांच्या कुंडल्या तर एकच असतात ना, मग कित्येकदा त्यातील कमी वाढ झालेले मूल तासाभरात मरते आणि चांगली वाढ झालेले मूल अनेक वर्षे जगते, ह्याचे स्पष्टीकरण कसे कराल? भूकंप, बाँबहल्ल्यात हजारो-लाखो माणसे मरतात, त्यांच्या कुंडल्यांमधला मृत्युयोग त्या त्या शहरातल्या ज्योतिष्यांना आधी का दिसत नाही? इत्यादी. त्यावर त्यांनी काहीही समाधानकारक उत्तर दिले नाही. गोऱ्हेशास्त्र्यांनी मांडले, 'कुंडलीवरून रोगनिदान करता येणे शक्य आहे. अमका ग्रह लग्नी असला म्हणजे तो मेंटल पेशंट असलाच पाहिजे. अमका ग्रह अमक्या स्थानी असला तर तो कॅन्सरचा पेशंट...' इ. मी उठून म्हटले, 'मग या बाबतीत आपण प्रयोगच करूया. निरनिराळ्या रोगांनी मृत्यू पावलेल्या रोग्यांच्या कुंडल्या एकत्रितपणे तुमच्यासमोर ठेवतो, तुम्ही त्या रोगांप्रमाणे वेगळ्या करून दाखवा.' त्यालाही ते तयार झाले नाहीत. वसंत व्याख्यानमालेच्या चालकांना मी नंतर कधीतरी भेटून म्हणालो,

‘ अहो, या वर्षी आपण तो प्रयोग करायचाय ना?’ ते म्हणाले, ‘जाऊ द्या हो. असे परिसंवाद म्हणजे जरा आमच्या मालेत खुसखुशीतपणा यावा म्हणून आम्ही ठेवतो. तुम्ही मनावर नका घेऊ!’

आपल्याकडल्या सुशिक्षित, बुद्धिजीवी वर्गास कणाच दिसत नाही. एखादा माणूस चुकीचे बोलू, लिहू लागला तर त्याला कुणी अडवतच नाही. ‘असेल बुवा त्यात काहीतरी’ अशा वृत्तीने बहुतेकजण गप्प बसतात. त्यामुळे ती गोष्ट रूढ होऊन बसते. त्याला अनुयायी मिळतात. मधे ‘भृगुसंहिता’ या प्रकाराची लाट आली होती. असा ग्रंथ आहे की ज्यात जगातल्या सगळ्या लोकांचे, हजारो वर्षांमधे जन्मलेल्या सगळ्यांचे तंतोतंत भविष्य लिहून ठेवलेय. मी चकितच झालो. आत्ता निघालेल्या सुपर कॉम्प्युटरला सुद्धा एवढ्या लोकांची साधी नोंद ठेवणे शक्य होणार नाही, तर भविष्य दूरच. आणि इथे एका साध्या पुस्तकात हे कसे मावू शकेल! माझ्याकडे एक वृद्ध गृहस्थ आले होते. ते म्हणाले, ‘मी भृगुसंहितेतला श्लोक पुढे ठेवतो आणि तो लागू असलेल्या माणसाचा बायोडेटा पुढे ठेवतो.’ मी उत्सुकतेने त्यांच्या घरी गेलो. श्लोक म्हणजे माणसाच्या जीवनाचे टप्पे सांगणारा एक नमुना होता. मला त्या माणसाच्या बायोडेटामधे आणि श्लोकामधे फार साम्य आढळलं नाही. तेवढं साम्य कुणाही दोन माणसांच्या आयुष्यात असू शकतं. इतर श्लोक चाळले, त्यात नक्की माहिती किंवा भविष्य असं काही नव्हतं, ढोबळ टप्पे होते. आणि ते बहुतेक कुणीही आपल्या अनुभवाने लिहू शकेल. पण या ग्रंथाचा गवगवा मात्र असा, की आपल्या नावाचं पान काढावं आणि आयुष्याचा आलेख घडाघडा वाचावा. सुशिक्षित वर्गात सध्या लोकप्रिय असलेले पुस्तक म्हणजे सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. बी. एन्. पुरंदरे यांचे ‘शल्यकौशल्य’ होय. त्यांनी फलज्योतिषाचा महिमा सांगून आपले अनुभव लिहिले आहेत. ते निष्णात डॉक्टर आहेत. त्यांच्या आधी जन्मलेल्या अनेक शास्त्रज्ञांच्या, सर्जन्सच्या ज्ञानाच्या संचिताचा ते उपयोग करून निष्णात झालेले आहेत. पण त्यात आता ते कुंडली आणि भविष्य अतिशय अशास्त्रीय पद्धतीने बुसडू पहात आहेत. कुंडलीशास्त्राचा त्यांना सर्जरीत कसा उपयोग झाला त्याचे अनुभव त्यांनी लिहिले आहेत. प्रयोगादाखल डॉ. पुरंदरे असे करायला तयार आहेत का, की कुठलीही इन्व्हेस्टिगेशन्स न करता, शास्त्रीय ज्ञान न वापरता त्यांनी कुंडलीवरून निदान करावे आणि मग उपचार करून ते बरोबर ठरले असे दाखवावे. तसे ते इथे करत नाहीत. शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग तर करतात आणि त्यावर तिसरीच गोष्ट सिद्ध करू पहातात. कुंडली सिद्ध करायची असेल तर त्याच्या कसोट्या वेगळ्या आहेत. मग त्या बाईला असलेली ग्रहस्थिती इतर कुंडल्यांमध्ये असताना, त्यांच्यावरही असेच संकट व त्यातून सुटका झाली असे अनेक कुंडल्यांवरून सिद्ध करावे लागेल. भविष्याचा प्रयोग त्यांनी शास्त्रज्ञांपुढे करून दाखवला पाहिजे.

डॉ. पुरंदऱ्यांची दृष्टी सदोष असू शकते, ती स्वतःच्याच आवडत्या प्रमेयांनी भारलेली असू शकते. म्हणून केवळ त्यांच्या अनुभवांवर इतरांनी शास्त्रीय सत्य म्हणून विश्वास का ठेवावा ? आपल्या लिहिण्याने चुकीचे समज रूढ होऊ शकतात, म्हणून त्यांनी ही जबाबदारी स्वीकारलीच पाहिजे.

या भविष्य मानण्या न मानण्याबाबत एक साधा प्रश्न निर्माण होतो. जे घडणार आहे ते आधीच ठरलेले असते अशी एक भूमिका, आणि जे घडणार आहे ते आधी ठरलेले नसते, आपण आणि परिस्थिती यांच्या क्रिये–प्रतिक्रियेतून ते घडत जाते अशी दुसरी भूमिका. पहिली भूमिका घेतली तर आपण सगळे म्हणजे कळसूत्री बाहुल्या ठरतो. आपण विचारपूर्वक घेतलेले निर्णय हे आपले नसतात, तर कुणीतरी ते आधीच घेऊन ठेवलेले असतात, त्याप्रमाणे आपण फक्त आपोआप वागत जातो. ही भूमिका फार भयानक आणि दुःसह आहे. याउलट दुसऱ्या भूमिकेत माणसाच्या करण्याला काहीतरी अर्थ राहतो. दुष्ट, क्रूर माणसाचे परिवर्तन होऊन तो स्वप्रयत्नाने चांगला माणूस होऊ शकतो. चित्रकार, या जगाने त्यापूर्वी कधीही न पाहिलेली रेघ ओढून किंवा रंग थापून आपला निर्मितीचा आनंद लुटू शकतो, जगाला लुटू देतो. संगीतकार दुनियेतले सगळे सूर ऐकून नवाच सूर निर्माण करू शकतो. आपण आपल्या जीवनाला आकार देऊ शकतो, परिस्थितीशी झगडू शकतो, बऱ्या-वाईटाची जबाबदारी घेऊ शकतो. हे सगळे कुणीतरी ठरवून दिले म्हणून नाही, तर आपल्याला वाटले म्हणून. ज्या क्षणी असे सिद्ध होईल, आपण करतोय ते आधीच कुणीतरी ठरवले होते त्याक्षणी मी जर खरा संवेदनाशील माणूस असेल तर मी आत्महत्याच करेन.

लोक नुसते भविष्य बघून थांबत नाहीत तर त्याही पुढे जाऊन भविष्य बदलायची हास्यास्पद खटपट करतात. शनी चांगला नाही, मग शनीला शांत करा. ज्योतिषीच सांगतात, गुरूचा खडा घाला म्हणजे तुम्हाला तो लाभेल. ज्युवेलरीचं, मोत्यांचं दुकान चालवणारा माझा एक मित्र आहे. त्याचा या कशावर विश्वास नाही. पण वडिलो-पार्जित धंदा चालत आलाय तो चालवतो. गिऱ्हाईके असे ग्रहांचे खडे घ्यायला येतात. मित्र त्यांना सांगतो, ' यातले मला काही कळत नाही, तुम्ही म्हणाल तो खडा मी देईन. ' लोक विचारतात, ' फायदा होतो का हो या खड्यांनी ? ' मित्र हसून म्हणतो, ' तुमचा होतो की नाही हे मला माहीत नाही. पण या खड्यांमुळे माझा मात्र नक्कीच फायदा होतो. ' मुंबईत एका धार्मिक पुस्तकांचं दुकान आहे. गंडेदोरे-चेटूक-करणी, इंद्रजाल, अघोरी विद्या अशा टाईपची पुस्तके ते प्रसिद्ध करीत असतात. ते असले खडे विकत असतात. लोकांच्या सोयीसाठी दुकानाच्या माडीवर त्यांनी एक देवऋषी आणून बसवले आहेत. खड्यांसाठी गिऱ्हाईक आल्यावर दुकान-दार वर ' कन्सल्टेशन 'साठी पाठवतात. ते कुंडली पाहतात, उतारे सुचवतात.

खड्यांसाठी 'प्रिस्क्रिप्शन' लिहून देतात. मग खाली आल्यावर पुढची व्यवस्था दुकानदार करतात. या सगळ्या गोष्टी म्हटलं तर क्षुल्लक आहेत, पण त्यांचे प्रमाण आणि तीव्रता वाढली की 'वाघमारे बुवा' सारखे प्रकरण निर्माण होऊ शकते. वाघमारेवरचा माझा लेख वाचल्यावर अनेकांनी विचारले, 'एवढे होऊच कसे शकले?' म्हटले, 'याला सतत खतपाणी आपणच घालत असतो म्हणून.'

अंधश्रद्धा किंवा चुकीच्या समजुतींमुळे समाजाचे किती नुकसान होत असेल याची कल्पनाही करता येत नाही. अनेक सामाजिक प्रश्न या अंधश्रद्धांशी निगडित आहेत. एखादी गोष्ट मिळवायची असेल तर त्यासाठी योग्य दिशेने, सारासार विचार करून प्रयत्न करणे सोडून लोक कुठे नवस करतील, कुठं कुंडली बघतील, ग्रहांची शांती करतील, किंवा देवऋषीच्या सांगण्यावरून अघोरी मार्गही पत्करतील. मानवतच्या उत्तम बारहाते आणि रुक्मिणीबाईला मूल हवे होते. त्यांनी डॉक्टरना कन्सल्ट करायला हवे होते. तपासण्या करूनही असे निष्पन्न झाले असते की मूल होणे शक्य नाही, तर मग त्यांनी विचारपूर्वक मुलाचा नाद सोडून इतर बाबतीत मन रमवायला हवे होते. किंवा तसे राहावतच नसेल तर त्यांनी एखादे मूल दत्तक घेऊन वाढवायला हवे होते. पण एकदा साधा, माणुसकीचा मार्ग सोडला की माणसाचे पतन किती झपाट्याने होऊ शकते, याचे ते उदाहरणच आहे. कितीतरी लहान मुलींचा बळी घेऊन त्यांचे रक्त आणून त्याचे विधी केले. शेवटी निष्पन्न काय झाले? तर येरवड्याला तुरुंगवास, फाशी, इतक्या जिवांची हत्या. परवा एस्. एस्. सी. ला पहिल्या आलेल्या मुलाची मुलाखत वाचली. यशाचे रहस्य सांगताना 'आई मला रोज गणपती अथर्वशीर्ष म्हणायला लावायची' असे त्याने म्हटले. त्या मुलाची मला काळजीच वाटली. या म्हणण्याचा आणि परीक्षेतल्या यशाचा काय संबंध! अनेक गोष्टींचे पाठांतर करायला काहीच हरकत नाही. त्याचा अर्थ समजावून घेऊन प्राचीन वाङ्मयाचा व्यासंग तरी होईल. पण इथे त्याचा उद्देशच मुळी वेगळा आहे. असे अथर्वशीर्ष रोज म्हणणारी अनेक मुले असतील. पण ती पहिली आली नाहीत, आणि हा मुलगा पहिला आला, याचे कारण दुसरे कुठेतरी म्हणजे त्याच्या बुद्धीत, परीक्षाकौशल्यात असले पाहिजे, हा विचार तो मुलगा, ते पालक का करू शकत नाहीत? जगात ज्ञानात आघाडीवर असलेले अमेरिकन, रशियन, जर्मन्स कुठे अथर्वशीर्ष म्हणतात? तरी त्यांच्या एकेका विद्यापीठात नोबेल पारितोषिके मिळवलेले अनेक शास्त्रज्ञ असतात. त्यांचे खेळाडू सतत सुवर्णपदके मिळवतात आणि आम्ही मात्र एकही पदक न घेता हात हलवत परत येतो.

आपल्याकडे एखादा शेतकरी बागायती पिकांमुळे जर श्रीमंत झाला की बहुधा पहिलं काय करतो तर शेतात एखादे देऊळ बांधतो. बागायती भागातून फिरताना अनेक शेतात भडक ऑईल पेंट दिलेली देवळे दिसतात. एखाद्याला दानधर्म करायचा झाला तर

तो गावातल्या देवळाचा जीर्णोद्धार करतो, निदान कळस तरी चढवतो. शेतकऱ्यांचेच काय, कारखानदारीतले अग्रगण्य असे बिर्लाही हेच करतात. आपल्याकडे देवळे काय कमी आहेत का ? पुण्याला तर आता प्रत्येक कॉलनीत देऊळ बांधतात. ( तेही अगदी एका टाईपचे, हिंदी सिनेमातल्या सारखे ) गणेशोत्सववाले कोपऱ्याकोपऱ्यावर आधी पिंजरे उभारून त्यात गणपतीची मोठी मूर्ती ठेवतात, नंतर पक्के देऊळ बांधतात. सगळा समाज आज देवळे बांधत, रंगवत सुटला आहे. जशी आमची पहिल्या क्रमांकाची गरज देऊळ हीच आहे ! खेड्यांतून फिरताना अनेक गोष्टींची कमतरता, अनास्था आढळते. एका गावात गेलो. तिथं पाण्याचे फार हाल. विहिरीचं पाणी उन्हाळा जवळ येईल तसं खोल खोल जायचं. शेवटी संपायचं. स्त्रिया मग मैल-दोन मैल दूर शेतातल्या विहिरीतनं पाणी भरायच्या. मी विचारलं, ' पाण्याची टाकी बांधून ज्या विहिरीला पाणी असतं तिथून टाकी भरून, नळ योजना का करत नाही ? ' सरपंच म्हणाले, ' आमची ग्रामपंचायत गरीब आहे. ' वास्तविक जिल्हा परिषद, राज्य शासन यांची या योजनेला मदतही मिळण्याची तरतूद आहे. ग्रामपंचायतीला थोडाच वाटा उचलावा लागतो. त्या गावात मी एका पाहणीनिमित्त वर्ष दोन वर्षं जात राहिलो. वर्षभरात पाच-सहा मोठ्या जत्रा तिथं भरतात. खंडोबाची, म्हसोबाची, एका पिराची . प्रत्येक वेळी त्या छोट्या गावातही हजारो रुपये वर्गणी जमते, आणि ती पुढाऱ्यांच्या खाण्यावारीच बरीच संपते. उरलेली लाऊडस्पीकर, डेकोरेशनवर, आणि सिनेमे दाखवण्यावर. मी गावकऱ्यांना म्हटले, ' तुम्ही जत्रा जरूर करा, पण एक वर्ष प्रत्येक जत्रा निम्म्या खर्चात करा, तरी पाण्याची नळ योजना होऊन जाईल. ' पण ते अजून होऊ शकले नाही. खेड्यामधे संडासचे अतिशय हाल असतात. विशेषतः स्त्रियांचे. पूर्वी गावाभोवती मोकळ्या पडीक जागा असत. आता जमिनींच्या किमती वाढल्याने कुणी जागा मोकळी सोडत नाही. स्त्रियांना एक तर पहाटे किंवा संध्याकाळी अंधार पडल्यावर संडासला जावे लागते. गुंडगिरी वाढल्याने एकटे, अशा अवेळी लांब जाणेही धोक्याचे. त्यामुळे घोळक्याने त्या जात असतात. डायरिया, डिसेंट्री झालेल्या स्त्रीने काय करावे ? पण गावात संडासची सोय नाही. आणि त्याच गावात ऑईल पेंट दिलेली, संगमरवरी फरशा घातलेली, सोन्याचे कळस लावलेली देवळे मात्र आहेत, याला काय म्हणावे ? शहरातल्या गणेशोत्सवाबद्दलही असेच आहे. पुण्यातल्या पूर्वभागातल्या बकाल वस्तीत अनेक कुटुंबे पोटमाळ्यांवर, झोपड-पट्ट्यांतील अपुऱ्या जागेत राहतात. तिथल्या मुलांना अभ्यासाला जागा नाही. रस्त्या-वरच्या दिव्याखाली अभ्यास केल्याची आगरकरांची हकीगत आपण पुस्तकात वाचतो, आमच्या पूर्व भागात अशा दिव्यांखाली अनेक आगरकर अभ्यास करताना पाहतो. फक्त फरक इतकाच की ही मुले अभ्यास, शाळा मधेच सोडतात, बेकार भटकतात, पुढे नाईलाजाने गुन्हेगारीकडे वळतात. गणेशोत्सवात एवढे मोठे लाऊडस्पीकर

दणाणत असतात (आणि ते आता वर्षभर प्रत्येक चतुर्थीला, प्रत्येक सणांना, उत्सवांना दणाणू लागले आहेत) की तसा त्रास तरी त्या सुधारक आगरकरांना झाला नसणार. गणेशोत्सवाचा खर्च कमी करून या भागातल्या मुलांसाठी अभ्यासिका, वाचनालये तयार करणे अशक्य आहे का? पण सगळ्या समाजातच ती प्रेरणा नसेल तर त्या आळीतल्या गणपती बसवणाऱ्या मुलांमधे तरी कशी असेल? बिर्ला देवळे बांधतात आणि टाटा कॅन्सर हॉस्पिटल काढतात, टाटा इन्स्टि. ऑफ फंडामेंटल रिसर्च, सोशल सायन्सेस रिसर्च अशा संस्था काढतात. हा दृष्टीतला फरक आहे. धर्म हा अवडंबर माजवूनही व्यक्त करता येतो आणि लोकोपयोगी कार्यातूनही व्यक्त होऊ शकतो. निवड आपण करायची आहे.

याचा अर्थ आपल्या परंपरेतले सगळे टाकायचे असा नाही. काय टाकायचे आणि काय ठेवायचे हा खरोखर अवघड प्रश्न आहे. त्या त्या बाबतीत त्या त्या व्यक्तीलाच याचा निर्णय करावा लागतो. श्रद्धा कोणती आणि अंधश्रद्धा कोणती हे कसे ओळखायचे? श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात फरक तरी असतो का? डोळस श्रद्धा असू शकते का? असे अनेक प्रश्न उभे राहतात. मला श्रद्धा ही माझ्या जीवनास आवश्यक बाब वाटते. माझी काही मूल्यांवर श्रद्धा आहे. माणसे दुसऱ्याशी चांगलं वागू लागतील, शोषणविरहित, निर्मितिशील समाजजीवन कधीतरी अस्तित्वात येईल यावर माझी खरोखर श्रद्धा आहे. असं जीवन अस्तित्वात असल्याचा जगाच्या आरंभापासून पुरावा नाही. आदिम काळात तसे समाजजीवन कदाचित असूही शकेल. पण त्याविषयी आपल्याला नक्की माहिती नाही. पण असं असलं तरीही असे समाजजीवन उभारू शकू अशी माझी श्रद्धा आहे. ही श्रद्धा मानवी मूल्यांवरची, माणसांतल्या चांगुलपणावरची आहे. या श्रद्धेमुळेच मला निर्मितिशील जगणे आणि इतरांसाठी जगणे शक्य होते. आता कुठली श्रद्धा ग्राह्य धरायची, श्रद्धा कुठली आणि अंधश्रद्धा कुठली, असे प्रश्न पडतात. माझ्यापुरता मी निकष ठरवला आहे. जी श्रद्धा माणसाला व्यापक बनवते, धर्म, जात, देश यापलीकडे जाऊन माणसाकडे माणूस म्हणून पहायला शिकवते, एवढेच काय, निसर्गातल्या प्राणी, वनस्पती यासारख्या सर्व घटकांशी जुळवून घ्यायला शिकवते ती आवश्यक श्रद्धा, आणि याउलट जी माणसाला संकुचित बनवत असेल ती घातक श्रद्धा किंवा अंधश्रद्धा.

विज्ञान हे मानवीमूल्यांना पर्याय होऊ शकणार नाही. न उलगडलेले कोडे उलगडण्यासाठी माणसाने शोधून काढलेली ती एक सर्वात सुरक्षित अशी विचारपद्धती आहे. एखाद्याने शोध लावला तरी तो ' मी म्हणतो म्हणून इतरांनी मान्य करावा ' असे म्हणत नाही. तो त्याचे प्रमेय, त्यामागचा कार्यकारण भाव मांडतो. इतर शास्त्रज्ञ तो प्रयोग जगातल्या कानाकोपऱ्यांतल्या आपापल्या प्रयोगशाळांमधून करून त्याचा पडताळा पाहतात. त्यातील चुका, कमतरता दाखवतात. मूळ शास्त्रज्ञ त्या

स्वीकारतो. या प्रक्रियेने विज्ञान चालते. व्यापक मानवी मूल्यांची बैठक जर नसेल तर विज्ञानातून निष्पन्न झालेली शस्त्रे आपल्या सगळ्यांची राखरांगोळी करू शकतात. त्या धोक्याच्या कड्यावर आज आपण जग नेऊन ठेवलेलेच आहे. विज्ञानाचा उपयोग आपल्या सुखसोयी, अवास्तव गरजा भागविण्यासाठी करताना आपण भोवतालच्या निसर्गाला अक्षरशः वेठीला धरले आणि आपल्याच पायांवर आपण धोंडा पाडून घेतलेला आहे. आमचे कर्तृत्व एवढे की आम्ही पृथ्वीवरच्या ओझोनच्या संरक्षक कवचालाही भगदाड पाडले. आता होरपळून मरण्याची वाटच आपण त्या भगदाडातून तयार केली आहे. म्हणून हे फक्त स्वतःच्या सुखासाठी वखवखलेले मानवीजीवन म्हणजे आदर्श जीवन नाही, तर सगळ्यांमिळून आनंदाने, साधेपणाने जगणे हे चांगलं जीवन या बाजूचा आपण स्वीकार करायला पाहिजे. इथे विज्ञानाचा दोष नाही. विज्ञान वापरणाऱ्यांच्या दृष्टीचा दोष आहे. याच विज्ञानामुळे बांगला देश जलमय झाल्याची दृश्ये जगभर एका क्षणात दिसू शकतात आणि संकटात अडकलेल्यांना सोडवण्यासाठी मदतीची रीघही लागू शकते. विज्ञानाने रोगांविरुद्ध जीव वाचवणारी औषधे शोधून काढली आणि हेरॉईन–कोकेनसारखे घातक अंमली पदार्थही जगाला दिले. विज्ञानाची ही नशा आमच्या आधीच्या पिढ्यांवर आजवर चढलेली होती. आमच्या पिढीला त्याचे दुष्परिणाम दिसू लागल्याने भान येऊ लागले आहे.

मी बुवाबाजी, अंधश्रद्धेविरुद्ध लेख लिहितो म्हणून एकाने विचारले, ‘ खरोखरीच अशा लिखाणाचा काही फायदा होतो का ? बुवाच्या आहारी गेलेला माणूस तुमचे लेख वाचून तिथून परत येतो का ? ’ माझ्या लिखाणाच्या परिणामकारकतेविषयी माझा अजिबात दावा नाही. एक अनुभव सांगतो. साईबाबांची शिर्डी हा लेख मी ‘ मनोहर ’ साप्ताहिकात लिहिला. त्यात समाधीला मच्छरदाणी लावणे, गरम पाण्याने, गुलाबपाणी टाकून आंघोळ घालणे वगैरे अनेक हास्यास्पद गोष्टींचे उपहासाने तपशीलवार वर्णन केले होते. एस्. टी. तून मी प्रवास करीत असताना शेजारी एक माणूस तोच अंक आणि त्यातलाही तोच लेख वाचत होता. मी सहज विचारलं, ‘ काय वाचताय ? ’ तो म्हणाला, ‘ मनोहर आता चांगलं निघायला लागलं हो. आता बघा ना, काय शिर्डीचं हुबेहूब वर्णन केलंय. अगदी मला तिथं जाऊन दर्शन घेऊन आल्यासारखं वाटलं. ’ दुसरा अनुभव निर्मलामातांच्या भक्ताबाबतचा आहे. त्या बाईंची माहिती काढताना एका भक्ताच्या घरी गेलो होतो. त्याची बऱ्यापैकी ओळखही झाली. पुढे लेख लिहिला. मला हे गृहस्थ नेहमी वाटेत भेटायचे. त्यांना मी टाळत होतो. पण एकदा भेटलेच. त्यांच्या भरपूर शिव्या ऐकण्याची मनाची तयारी केली. पण ते अगदी हसून बोलत होते. शेवटी मीच म्हटलं, ‘ माझ्या लेखामुळे तुम्ही रागावला असाल. ’ ते हसून म्हणाले, ‘ छेः छेः, आमच्या माताजींनीच तुम्हाला असं लिहिण्याची बुद्धी दिली. ’

मी चकित झालो. थोडं थांबून ते म्हणाले, ' आमची परीक्षा पाहण्यासाठी. ' अशा अनुभवांमुळे मी हे शिकलो की जे अशा गोष्टींच्या पूर्ण आहारी गेलेले आहेत, त्यांच्यावर या लिखाणाचा परिणाम होणार नाही. पण जे सीमारेषेवर असतात ते कदाचित परत वळू शकतील, आणि त्याचाही एक अनुभव आला. मुंबईच्या एक बाई मला भेटल्या. म्हणाल्या, ' तुमचा तो गाणगापूरचा लेख वाचला. मला कल्पना नव्हती गुरुचरित्रात स्त्रियांविरुद्ध इतकं वाईट लिहिलंय असं. त्या महिन्यात आम्ही ऑफिसमधल्या बायकांनी गाणगापूरला जायला मिनी बस ठरवली होती. मी जाणं रद्द केलं. मी कारण सांगताच आणखी दोघीतिघींनी रद्द केलं. मग ती ट्रीपच रद्द झाली. ' ज्यांची मते अजून पक्की झालेली नाहीत, अशा तरुणांना आपली भूमिका ठरवताना अशा लिखाणाचा नक्कीच चांगला उपयोग होतो. या क्षेत्रात काम करणारे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे काही कार्यकर्ते तसे बोलूनही दाखवतात.

मला एकजण उपहासाने म्हणाला, ' महात्मा फुल्यांपासून आजपर्यंत अनेकांनी असे लेख लिहिले. काय उपयोग झाला ? समाज आहे तिथंच आहे. कशाला तेच काम परत परत करता ? ' मी त्याला म्हणालो, ' केस वाढले की न्हाव्याला ते कापावेच लागतात. असं म्हणून चालेल का, की तू कापले तरी ते वाढलेच, मग कापतोसच कशाला ? ' मला हे मान्य आहे की जुन्याचा प्रभाव इतका जबरदस्त आहे की त्याविरुद्ध असलेली शक्ती अगदी क्षुल्लक आहे. पण या गोष्टींविरुद्ध अगदीच आवाज उठला नाही अशा परिस्थितीपेक्षा, क्षीण का होईना पण आवाज उठला ही परिस्थिती जास्त बरी आहे, आणि आता तर या क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते जागोजाग दिसू लागले आहेत ही परिस्थिती तर नक्कीच चांगली आहे.

REFBK-0026052

३३५२ ६०५२ २।३।०० सिंघल